

साहित्य आणि संस्कृती मंडळ
राज्य

भाषांतरमाला क्रमांक १९

# तुरुंगातील पत्रे

## LETTERS FROM JAIL

by

**M. N. Roy**

या पुस्तकाचा मराठी अनुवाद

अनुवादक :

श्री. द्वा. भ. कर्णिक

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

पहिली आवृत्ती :१९७३ (शके १८९५)
दुसरी आवृत्ती : २००२

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.

© भाषांतरित आवृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकाधीन

**मूळ प्रकाशक :**
Renaissance Publishers Pvt. Ltd.
15, Bankim Chatterjee Street,
Calcutta-12.

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
५, फोटोझिंको पथ, पुणे-४११ ००१.

किंमत :रू. ५५/-

## निवेदन

मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा; इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे; इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे प्रमुख स्थान आहे तसे स्थान, महाराष्ट्रामधील विद्यापीठांत मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य आणि संस्कृती मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञान-माला, भाषांतरमाला इत्यादी योजना कार्यक्रमात अंतर्भूत आहेत . संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन इत्यादी पश्चिमी अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश-अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस्, ॲरिस्टोफेनीस्, ॲरिस्टॉटल, थॉमस् ॲक्वाइनस्, न्यूटन्, डार्विन्, रूसो, कांट, हेगल, जॉन स्टुअर्ट मिल्, गटे, शेक्सपीअर, टॉलस्टाय्, दोस्तएव्स्की, स्तानिस्लाव्स्की, बर्ट्रांड रसेल, रूथ बेनेडिक्ट, रायसेन्बाख, व्हाइटहेड, क्रोचे, मालिनाव्स्की, कॅसिरेर, गॉर्डन् व्ही. चाइल्ड् इत्यादिकांच्या या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे,

महाभारत, रामायण, ‘भरताचे नाट्यशास्त्र’, ‘संगीतरत्नाकर’, ‘ध्वन्यालोक’, प्राकृतातील ‘गाथासप्तशती’, कुर्आन (कुराण), त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

भाषांतर योजनेखाली मंडळाने आतापर्यंत १९ अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिल्चे “ऑन लिबर्टी”, रूसोचे “सोशल कॉन्ट्रॅक्ट” स्तानिस्लावस्कीचे “ॲन् ॲक्टर प्रिपेअर्स्”, एम्. एन्. रॉय यांचे “रीझन, रोमॅंटिसिझम ॲन्ड रीव्हल्यूशन”, कै. पां. वा. काणे यांचे “हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र” इत्यादी पुस्तकांची भाषांतरे व सारानुवाद प्रकाशित झाले आहेत.

कै. मानवेंद्र रॉय लिखित “Letters from Jail” या ग्रंथाचा मराठी अनुवाद श्री. द्वा. भ. कर्णिक, पणजी (गोवा) यांनी सुरस व सफाईदार केला आहे. मूळ पुस्तक साहित्य व वैचारिक नवजीवन या दृष्टीने मोलाचे आहे. “तुरुंगातील पत्रे” या शीर्षकाने सदर अनुवाद मंडळाच्या भाषांतर मालेत प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

या पुस्तकाचे मराठी भाषांतर प्रकाशित करण्यास साहित्य–संस्कृति मंडळास परवानगी दिल्याबद्दल मूळ ग्रंथाचे प्रकाशक रेनेसान्स् प्रब्लिशर्स प्रा. लि., कलकत्ता या प्रकाशन संस्थेचे मनःपूर्वक आभार मानतो.

लक्ष्मणशास्त्री जोशी

वाई. अध्यक्ष,

(कार्तिक ३, १८९५) महाराष्ट्र राज्य साहित्य–संस्कृति मंडळ,

२५ ऑक्टोबर, १९७३ सचिवालय, मुंबई

# तुरुंगातील पत्रे

१ डिस्ट्रिक्ट जेल, कानपूर
ऑगस्ट ११, १९३१

हे पत्र पाहून तू आश्चर्यचकित होणार नाहीस. कारण वृत्तपत्रांवरून तुला ही बातमी आधीच कळलेली असेल. होणार होते ते घडले. निदान माझ्या अपेक्षेप्रमाणे तरी आणि हा मी एका शांत जिल्ह्याच्या ठिकाणच्या तुरुंगात स्वस्थपणे विश्रांती घेत पडलो आहे. मी 'अ' वर्गाचा कैदी आहे बरं. विशेष व्यक्तीला मिळतो तो हा सन्मान. त्याची कल्पना तुला कशी करून देऊ? आमची जी सरबराई करण्यात येते ती अशी की, दिवसाला ६० फेनिंग्स[1] इतक्या किंमतीचे अन्न देण्याची आम्हाला मुभा असते. आता बघा, दुसऱ्या कशाकरिता नसले तरी याकरिता तरी, जर्मनीतील उपाहारगृहे आणि कॅफे यांची मला किती आठवण होईल ती.

मला वाटते हाइन्झने[2] माझी आशा सोडली असेल. पण युरप सोडण्यापूर्वी मी तुम्हाला म्हटले होते त्याप्रमाणे ही कसोटी आहे. त्या कसोटीतून आपल्याला गेलेच पाहिजे. त्याचा निष्कर्ष भले काही का होईना! भारतात काम करावयाचे तर भारतीय मनःप्रवृत्ती लक्षात घेऊन प्रथम भारतीय झाले पाहिजे. एका दृष्टीने हा माझा दृष्टिकोण मध्यमवर्गीय भावुकतेचा आहे. तो हाइन्झ आणि ऑगस्टला[3] पटणार नाही. तू त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न कर. कालांतराने तो त्यांना पटेल अशी मला आशा आहे. पण तो पटलाच नाही तर? तर मी एवढेच म्हणेन की अखेरचा निर्णय इतिहासावरच सोपवला पाहिजे.

या पत्रात कोणत्याच बाबतीत फारसे काही मला लिहिता येणार नाही. होय, आपण हवामानाबद्दल मात्र बोलू शकतो. मला पकडण्यात आले त्यालाही दोन आठवडे झाले. मला पकडण्यात आले आहे ते सात वर्षांपूर्वी झालेल्या एका खटल्याबद्दल. कम्युनिस्ट इंटरनॅशनलची ती घातकी पाचवी जागतिक परिषद भरली होती तो हा काळ. या

---

१. हे पत्र जर्मनीला असलेल्या एलन रॉय यांना पाठविण्यात येत असल्यामुळे जर्मन नाण्याचा उल्लेख करण्यात आला आहे.
२. सुप्रसिद्ध जर्मन कम्युनिस्टनेता हाइनरिच ब्रँडलर.
३. विख्यात कम्युनिस्ट तत्त्वज्ञ प्रोफेसर ऑगस्ट थलहायमेर.

खटल्याबद्दल सरकारला तशी घाईगर्दी दिसत नाही. तो केव्हा सुरू होईल कोण जाणे, आणि झाला तरी तो असाच रेंगाळत चालेल. म्हणून मला निवांतपणे विचार करून कार्याची काही दिशा ठरवावी लागेल. पहिली गोष्ट म्हणजे बचावाची तयारी करणे. तो मी स्वतःच हाती घेणार आहे. त्यानंतर 'मनाची डागडुजी करण्यासाठी' काही वेळ खर्च करण्याचा माझा विचार आहे. पण तशी साधने उपलब्ध झाली तर ! चांगली पुस्तके मिळणे अवघड आहे. ऑगस्टला काही योग्य पुस्तके सुचविण्यास सांगशील का ? शक्य तर ती इंग्रजीत असावीत. नाहीतर ती मिळणे कठीण जाईल. परदेशातून ती जमवून सरळ तुरुंगात माझ्या नावावर पाठवून द्या. अखेरीस आता एक कायमचा आणि सुरक्षित असा पत्ता मला मिळाला आहे. सारे काही मला आता व्यवस्थितपणे पोचेल. वेळोवेळी काहीतरी बौद्धिक सत्त्व माझ्यासाठी जरूर पाठवून देत जा. या देशात ते फार दुर्मिळ आहे. जडवादाचा इतिहास आणि मध्ययुगाचे सांस्कृतिक महत्त्व यांचा खास अभ्यास करण्याची माझी इच्छा आहे. मध्ययुगाचे महत्त्व मी कमी लेखतो असा ऑगस्टचा माझ्यावर आक्षेप होता नाही का ? अधूनमधून काही कादंबऱ्यांचीही भर टाकीत जा. कादंबऱ्या—आधुनिक आणि गुन्हेगारीच्या. जे घडले आहे त्याकडे दारुण निराशेने पाहू नकोस. आल्या दिव्याला आपण तोंड दिले पाहिजे—चांगल्याची अपेक्षा करीत.

जगात सध्या काय घडत आहे याची मला नीटशी कल्पना नाही. अस्पष्ट, अंधुक असे काहीतरी मला भासते आहे एवढेच. अलीकडे मी वर्तमानपत्रेही वाचली नाहीत. थोड्याच दिवसांत ती मला मिळू लागतील. जर्मन प्रजासत्ताकाचे होणार तरी काय ? हिटलर एकदा सोक्षमोक्ष तरी का करून टाकीत नाही ? मग निदान काही वळण तरी लागेल. का हुवर[१] खरोखरच हिन्डेनबुर्गचे सिंहासन सावरून धरणार आहे ?

साऱ्या मित्रांना माझा शुभसंदेश दे. अधूनमधून त्यांना चार ओळी मला लिहायला सांग. हाईन्झला म्हणावं माझ्यावर फार फार रागावू नकोस. माझे डोके फिरले नव्हते. अजून ते माझ्या खांद्यावरच आहे, आणि काही काळ तरी ते तसेच स्थिर राहणार आहे. माझी काळजी करू नकोस. लंडनमध्ये नुकतीच जी इतिहास व विज्ञान-विषयक जागतिक परिषद भरली होती तिच्यापुढे सोव्हिएट शिष्टमंडळाने जो प्रबंध सादर केला होता, तो माझ्याकडे पाठवू शकशील का ? 'सायन्स ॲट क्रॉसरोड्स' या मथळ्याखाली तो प्रकाशित करण्यात आला आहे.

१. हर्बर्ट हुवर हे त्या वेळी अमेरिकेचे अध्यक्ष होते.

२

डिस्ट्रिक्ट जेल, कानपूर
सप्टेंबर ६, १९३१

जवळ जवळ महिन्यापूर्वी मी तुरुंगातून तुला पहिले पत्र लिहिले होते. त्याचे उत्तर एव्हाना यावयाला पाहिजे होते. तुला पत्रे पोहचतात किंवा नाही कोण जाणे ? तुरुंगातून दोन पत्रे मी पाठविली तुला. आणखी एक पत्र हाईन्झला लिहिले. त्याला ते पोचले का ?

मित्रांकडून आणि सहकाऱ्यांकडून अधूनमधून पत्रे आली म्हणजे मला किती आनंद होतो म्हणून सांगू ? माझी पत्रे पोचली नसली तरी तुला सरळ तुरुंगाच्या पत्त्यावर पत्र पाठवायला काय हरकत होती ? अरे, पण तुला काय माहीत मी कोणत्या तुरुंगात आहे ते ! अति निष्ठुर जग आहे हे नाही का ? आपल्यासारख्या निरुपद्रवी लोकांचा उगाच छळ करते ते. पण आपण त्याची नवीन घडण करू आणि फार काळही नाही लागणार त्याला. पण आपले ते नवे जग काही मेटॅनो [1] होणार नाही बरे. ते स्वप्नरंजन कशाला करा. आपण या खडतर जीवनापेक्षा अधिक चांगले मात्र खास बनवू.

बरं, जग तुझ्याशी तरी कसे वागत आहे ? किंवा खरे तर तू त्याच्याशी कशी वागत आहेस ? तीच उपेक्षा, बेपरवाई ? की तू आता त्या जगात काही रस घेऊ लागली आहेस ? आता परिस्थिती काहीशी बदलली आहे, नाही का ? मग थोडा बदल करावयाला काय हरकत आहे—जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात तरी ! माझे तत्त्वज्ञान तुला माहीतच आहे. गैरसमज करून घेऊ नको बरे.

माझ्या खटल्याचा सारा वृत्तांत तुला कळला किंवा नाही कोण जाणे. बहुधा कळला नसावाच. ३१ ऑगस्टला तो सुरू झाला. आता तो पुन्हा थांबला आहे. कारण मॅजिस्ट्रेटसाहेब वैद्यकीय सल्ल्यानुसार रजेवर गेले आहेत. जामिनावर मला मोकळे करण्यात यावे म्हणून मी जो अर्ज केला, त्याच्या संदर्भात मी आपले वकिली पांडित्य प्रगट केले. मॅजिस्ट्रेटने अर्थातच तो अर्ज फेटाळून लावला. मी वरिष्ठ कोर्टाकडे दाद मागितली आहे. त्या कोर्टापुढे उद्या मी माझी कैफियत मांडीन. ते कोर्टही पुन्हा तो अर्ज धुडकावून लावील. मग मी हायकोर्टाकडे धाव घेईन.

मला वाटते, दोन-तीन महिन्यांच्या आत खटला संपून जाईल. तोवर तुरुंगात तसा आराम आहे. सध्या कोर्टात हजर राहणे आणि कायद्याच्या पुस्तकांचा अभ्यास करणे यात वेळ निघून जातो. थोडी फुरसत मिळाली की इतर गोष्टींत मन व्यग्र ठेवतो. शिवाय, मनाला विरंगुळा देण्यासाठी, आधुनिक साहित्याच्या स्वरूपात या देशात अलीकडील काळात जे साहित्य उपलब्ध झाले आहे, त्याचा शोध घेण्याचा मी प्रयत्न करतो. तसे ते

१. युरप सोडण्यापूर्वी थोडेच दिवस आधी मी टायरोलमधील या रम्य गिरिशिखरावर वास्तव्य केले होते.

निराशाजनकच आहे. पण मला नुकताच एक आश्चर्याचा आणि आनंदाचा धक्का बसला खरा. एका अत्यंत सुरेख कादंबरीने मला तो धक्का दिला. आधुनिक भारतीय साहित्यातील ती सर्वोत्कृष्ट कादंबरी म्हणता येईल – जगातील उत्कृष्ट कादंबऱ्यांतही तिची सहज गणना करता येईल. अर्थात या देशाला जगाशी बरोबरी करण्यासाठी खूपच मोठा पल्ला गाठावा लागेल. त्या दृष्टीने या उत्कृष्ट कादंबरीचीही, सिंक्लेअर लुईच्या या युगातील साहित्यकृतींशी तुलना करता येणार नाही. पण अनातोल फ्रान्स, इब्सेन किंवा झोला यांची ती खास बरोबरी करू शकेल. अद्यापपर्यंत तरी एखाद्या परकीय भाषेत तिचा अनुवाद झालेला नाही.[1] या कादंबरीची मध्यवर्ती नायिका एक मुलगी आहे. बंडखोर, मूर्तिभंजक डायोनिससच जणू ! साऱ्याच देवादिकांना ती कशी खाली ओढते. युगानुयुगांच्या आचारांनी पवित्र झालेल्या रूढी, चालीरीती, परंपरा यांच्यावर कसे कोरडे ओढते, आणि टागोर व गांधी यांची धार्मिकतेने श्रद्धा धरणाऱ्या तरुण भारताला ती कसे खंबीर धडे देते.

आता कागद संपला. एकच चतकोर दिला जातो. तेवढ्यातच सारे लिहावे लागते. म्हणून आता थांबले पाहिजे. इच्छा आहे मात्र अखंड लिहिण्याची.

## ३

डिस्ट्रिक्ट जेल, कानपूर
ऑगस्ट १७, १९३१

ग्रंथसंभार—तीन गठ्ठयांतील—मिळाला. गिबन्सची कलाकृती काही वारंवार वाचली जात नाही. आता लवकरच जो मुबलक वेळ मला मिळणार आहे त्यात तर या ग्रंथांचे मोल अधिकच वाढणार आहे. वाईट एवढेच वाटते, की तुला तो ग्रंथ पुन्हा विकत घ्यावा लागला. बर्लिनमधील माझ्या पुस्तकांत तो ग्रंथ तुला आढळला नाही का ? ती सारी पुस्तके वाड्याच्या तळघरात लोळत पडली आहेत. लँगच्या पुस्तकाबद्दल तू विचारले आहेस. संदर्भग्रंथ म्हणून ते चांगले आहे. आणि म्हणून ते नेहमीच उपयुक्त होईल. पण जडवादाचा इतिहास म्हणून मात्र मला त्यात स्वारस्य वाटत नाही. तथापि इंग्रजी भाषेत तेवढेच अस्तित्वात आहे म्हणा. इंग्लिश लोक फार आध्यात्मिक आहेत खरे ! कादंबऱ्या तू पाठविल्यास ते चांगले झाले. आधुनिक साहित्य कसे गुळगुळित पण किती निस्तेज, निष्प्राण असते. त्यात वाचण्यासारखे मला काही आढळले नाही. तथापि पुन्हा एकदा त्यावरून मी नजर फिरवीन आणि त्यात काही रस आढळला तर तुला जरूर कळवीन. मला वाटते आता अमर कलाकृतींकडेच मला वळले पाहिजे. ख्रिस्ती धर्माच्या इतिहासावरील काही मूलभूत ग्रंथ मिळाले तर ते मला हवे आहेत.

---

१. हा उल्लेख शरच्चंद्र चतर्जी यांच्या ‘ शेषप्रश्न’ या बंगाली भाषेतील कादंबरीचा आहे

फ्यूअरबाकच्या ग्रंथाचा इंग्रजीत अनुवाद झालेला नाही. पण मला वाटते हा ग्रंथ परकीय भाषेत असला तरी त्याला तुरुंगात प्रवेश मिळावयाला हरकत नसावी. इंग्लिश लोकांना सर्वच परकीय गोष्टींचा तिरस्कार वाटतो. ' फोरसायथे सागा ' मधील सोम्सने कारमेनला पाहिल्यानंतर काढलेले उद्गार तुला आठवतात का ? रसिकतेचे बाळकडू पाजलेली ही व्यक्ती संगीतावर अनुरक्त झाल्याशिवाय कशी राहील ? पण तरी त्याला निरतिशय आनंद झाला नाही, तो ती पोर इतकी परकीय भासली म्हणून !

ते असो म्हणा. अमर कलाकृतींचा विचार करावा. मार्क्स आणि एंगल्स यांनी फ्यूअरबाक आणि तरुण हेगेलवाद्यांबद्दल ( उदाहरणार्थ, हेलिगे फॅमिली ) जे सर्व काही लिहिले आहे ते मला मिळाले तर बरे होईल. माझ्याजवळ ऑगस्टने स्पिनोझावर लिहिलेले पुस्तकसुद्धा नाही. ही सारी लांबलचक यादी मी पाठवीत आहे. पण सारीच पुस्तके पाठविण्याची घाई मात्र नाही हं. यादी आपली तू लक्षात ठेव आणि सवडी-सवडीने पुस्तके गोळा करून पाठव. बाळपणी माझी जी शिक्षणाची हेळसांड झाली ती उणीव भरून काढून उशिरा का होईना माझ्या शिक्षणाचा भार तुला याच मार्गाने उच-लता येईल. उशीर झाला खरा, पण मुळीच नसण्यापेक्षा उशिराने का होईना ज्ञान तर पदरात पाडून घ्यावे. अर्थात् पुस्तकावर फार पैसे खर्च करू नकोस. अधूनमधून मला एक दोन पुस्तके पाठवीत जा. मला इथेसुद्धा बरीच पुस्तके मिळतील.

बंडखोर नायिकेच्या त्या कादंबरीचा अनुवाद करण्याचा मलासुद्धा मोह झाला होता. पण ते आता जमणार नाही. तुझी महत्त्वाकांक्षा मात्र अजब आहे. इतक्या साऱ्या भाषांवर तू प्रभुत्व संपादन केले आहेस. त्यात टागोरांच्या ' देववाणीची ' भर टाक-ण्याची तुझी इच्छा आहे की काय ? त्याशिवाय ' हसन ' चा अनुवाद करण्याचा जो आवण जोडीने अनुभव घेतला त्याची पुनरावृत्ती कशी होऊ शकेल ? सुदैवाने ' हसन '-ला सुप्रसिद्ध जॉन ॲन्थनी यांनी आधीच इंग्रजी साज चढविला होता. मला मात्र एक इशारा द्यावासा वाटतो. बाई ग, तू बंगाली शिकलीस आणि टागोरांच्या खेरीज इतर कोणत्याही बंगाली लेखकाचा प्रथम अनुवाद करावयाला घेतलास तर शान्तिनिकेतनला भेट देण्याची तुझी स्वप्ने विरून गेलीच म्हणून समज. तथापि एकंदरीने परिस्थिती इतकी भयप्रद नाही. टागोरांच्या बहुतेक पुस्तकांचा अनुवाद झालेला आहे, म्हणजे सर्वोत्कृष्ट अशी त्यांची पुस्तके सोडून ( ! ) जी सुप्रसिद्ध होण्यापूर्वी, आणि गूढवादी भविष्यवाणीच्या रूपाने जगाला संदेश देऊ लागण्यापूर्वी त्यांनी लिहिली. काय आश्चर्य पाहा ! ज्या गूढवादी भाषेतून ते संदेश देऊ लागले, ती अनाकलनीय असल्यामुळेच लोक भक्तिभावनेने तिची पूजा करताना दिसत आहेत.

काही म्हणा, शरद् चतर्जी यांच्या बंडखोर नायिकेची पाश्चिमात्य जगाला ओळख पटवून देण्याचे जो कोणी महत्कार्य करील, तो दुसऱ्यांदा एका भारतीयाला साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळवून देण्याचे श्रेय संपादन केल्याशिवाय राहणार नाही. आणि

खरेच सांगतो, माझी अशी श्रद्धा आहे की, हे पारितोषिक मिळविणारा दुसरा साहित्यिक पात्रतेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारे कमी पडणारा नाही. व्यक्तिशः मी 'शेषप्रश्न' गीतांजलीपेक्षा वरचढ ठरवीन. चांगल्या साहित्याचा रसास्वाद घेण्याबद्दलची माझी पात्रता वादातीत खास नव्हे. पण प्रत्येकाच्या आवडीनिवडीचा हा प्रश्न आहे. 'शेषप्रश्न' हा भारतीय साहित्य आणि संस्कृतीच्या पुनरुज्जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे खास. बंगाली भावुकता आणि गूढवादी भावनाशीलता यांचे चैतन्यहीन आणि रोगट वातावरण त्या कादंबरीने मुळापासून ढवळून काढले आहे. या बंडखोर नायिकेची चतर्जींच्याच पूर्वीच्या कलाकृतीतील नायिकांशी तुलना केली तर ती किती तेजस्वीपणाने उठून दिसते. चतर्जींनी अमाप लेखन केले आहे. त्या कादंबऱ्यांतील त्यांच्या पूर्वीच्या नायिका गांजणुकीने पिचलेल्या, विव्हळणाऱ्या, क्षणिक खवळून उठणाऱ्या, प्रतिकार करणाऱ्या होत्या. पण अखेरीस त्यांनी माना वाकविल्याचना! —अर्थात् स्वेच्छेने. चतर्जींनी या नायिकांना निष्ठुर प्रतिगामित्वाच्या दडपणाखाली निर्दयपणे चिरडून टाकले असले तरी ते चित्रण उच्च प्रकारचे वास्तववादी ठरले असते. पण त्यांच्या बाबतीत एवढे तरी म्हणता येईल की, ते क्रमाक्रमाने पुढे पाऊल टाकीत गेले आणि अखेरीस ही बंडखोर नायिका, प्रतिकाराची नव्हे तर प्रत्यक्ष क्रांतीचा ध्वजपताका धारण करणारी तेजस्विनी म्हणून त्यांनी निर्माण केली. ही कलाकृती अर्थात्च ध्येयवादी आहे. देशातल्या सध्याच्या परिस्थितीत त्याशिवाय दुसरा तरणोपायच नाही. पण हा ध्येयवाद 'कलेसाठी कला' या दृष्टिकोणातूनच प्रकट झालेला आहे. हा दृष्टिकोणसुद्धा ध्येयवादाचाच एक प्रकारचा हीन आविष्कार नव्हे काय?

खटल्याच्या प्रगतीबद्दल तुला सर्वसाधारण कल्पना आलीच असेल. खालच्या कोर्टातील सुनावणी पुरी झाली. खरा खटला सेशन्स कोर्टातच सुरू होईल. तो फार काळ चालेल असे मला वाटत नाही.

मला तुझी पत्रे मिळत आहेत. पण मला वाटते, तुझा लिहिण्याचा वेग जरा कमी केलास तर बरे. सध्याच्या माझ्या भोवतालच्या अमानुष वातावरणात इतका मानवी जिव्हाळा अप्रत्यक्षपणे प्रगट झाला तरी तो मानवण्यासारखा नाही. सहज जाता जाता एक सूचना द्यावीशी वाटते. माझी पत्रे तुरुंगाच्या सुपरिंटेंडेंटच्या नावाने कृपा करून पाठवू नकोस. त्यांच्या प्रतिष्ठेला हा धक्का बसत नाही का? तुरुंगाच्या सुपरिंटेंडेंटच्या नियंत्रणाखाली थोडेथोडके नाही तर हजार कैदी आहेत; त्यांपैकीच एक जीव मी.

रोझेनफेल्डच्या भवितव्याबद्दल तू लिहिलेस. नाही म्हटले तरी मला ते चमत्कारिक वाटले. आता स्वतःचा सवतासुभा[1] त्यांनी उभा करणे हे निखालस मूर्खपणाचे

---

१. डॉ. कुर्त रोझेनफेल्ड हे एक विख्यात जर्मन फौजदारी वकील होते. जर्मन सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचे एक माननीय सभासद म्हणून जर्मनीतील रिपब्लिकन राजवटीत ते

आहे. ते आपल्याला येऊन का मिळत नाहीत ? किंवा त्यांच्यापैकी एकाने जो मार्ग धरला तो का चोखाळीत नाहीत ? मला वाटते तो सर्वांत शहाणपणाचा मार्ग ठरेल. कालांतराने त्यांना समज पटेल अशी आशा करूया.

या वेळी एका चतकोरापेक्षा अधिक मी लिहिले आहे. हा अपवाद म्हणायाचा. अनावृत्त पत्रे ही लांबलचक असू नयेत असा पुराण्या व्यवहाराचा एक नियम आहे. सांगण्यासारखे पुष्कळ काही असल्यानंतर लेखणीला लगाम घालणे कठीण असते हे खरे आहे. पण तसाच काळाचा आणि परिस्थितीचा बदल होईपर्यंत ती गुपिते आणि हितगुजे अंतर्मनाच्या कप्प्यात दडून राहिलेली बरी. तोवर चर्चच्या प्रार्थनागीताचा अमेरिकेतील सुखवाद्यांनी जो उपहास केला आहे त्याला प्रतिसाद देत मी म्हणेन, ' वेट ॲन्ड प्रे ॲन्ड लिव्ह ऑन हे. '

## ४

डिस्ट्रिक्ट जेल, कानपूर
ऑक्टोबर ३१, १९३१

बऱ्याच दिवसांपूर्वी बारा पुस्तके मला मिळाली आणि मी त्यांची पोचही दिली. त्यांपैकी बहुतेक सारी वाचूनही झाली आहेत.–विशेषतः कादंबऱ्या. गुन्हेगारीची कादंबरी म्हणजे व्हॅन डाइनची फार चांगली आहे. त्याचे पहिले पुस्तक मी आधीच वाचले होते. खरोखरीच्या पोलिस अहवालांवर त्याच्या कादंबऱ्या आधारित असतात असे म्हणतात. त्या सर्वस्वी तशा असतील किंवा नाही याची मला शंका आहे. त्यातील नायक फिलो व्हान्स हा इतका भारावलेला आहे की, तो सत्यसृष्टीत आढळणे कठीणच आहे. तू जे " सुंदर पुस्तक " पाठविलेस ती एक अगदीच कच्ची कलाकृती मला वाटली. त्यात काही चांगला, सुंदर भाग आहे. पण त्याची गुंफणमात्र ओबडधोबड आहे.[1] युद्ध हे कादंबरीतील लैंगिक गुंतागुंतीत नाहीसेच होते. ग्रीनविच व्हिलेजच्या कल्पनेची ही नमुनेदार प्रतिकृती आहे. म्हणजे काय ? असा तुला प्रश्न पडेल. ग्रीनविच व्हिलेज हे न्यूयॉर्क

---

न्यायमंत्रीही झाले होते. पुढे पक्षाच्या धोरणाशी त्यांचा मतभेद झाला आणि त्यातील डाव्या गटाचे ते म्होरके झाले. फॅसिझमच्या उदयाचे तुफान सुरू झाल्यामुळे जर्मनीत जी अरिष्टमय परिस्थिती निर्माण झाली तीत रोझेनफेल्ड यांचा डावा गट मूळ पक्षापासून फुटून निघाला व त्याने ' सोशलिस्ट लेबर पार्टी ऑफ जर्मनी ' ( सोशालिस्टिशे आरवायटेर पार्ताय ) या नावाने एक सवतासुभा निर्माण केला. रोझेनफेल्ड यांच्या काही सहकाऱ्यांनी कम्युनिस्ट पक्षाचा आश्रय घेतला.

१. हा उल्लेख अर्नेस्ट हेमिंग्वेच्या " **फेअरवेल टू आर्म्स** " या कादंबरीचा आहे.

शहराच्या गाभ्यात वसलेले आहे. अमेरिकन खुशालचेंडूंची ती चूष आहे म्हणेनास. माझा मित्र माइक गोल्ड याने हे पुस्तक लिहिले तर मी एवढेच समजू शकतो की, तो कदाचित जास्त चांगले चित्रण करू शकेल. माफ कर हं, तुझ्या आवडत्या लेखकाबद्दल हे कटू विचार प्रदर्शित केल्याबद्दल. पण मी अधिक विस्ताराने लिहिले तर माझा निर्णय तुला इतका कठोर खास वाटणार नाही. एकंदरीने पाहता ते पुस्तक चांगले आहे. विशेषतः युद्धाशी संबंधित अशी त्यातील प्रकरणे. त्या दृष्टीने हे पुस्तक रेमार्कपेक्षाही चांगले आहे. बरे पण, रेमार्कचे दुसरे पुस्तक कसे काय वठले आहे ? मला ते हवेच आहे असे नव्हे. मध्यमवर्गीय जहाल मतवाद्यांच्यामध्ये त्याला जो भाव प्राप्त झाला आहे तो पाहता, माझ्या सद्‌भावना संपादन करणे त्याला कठीण आहे. माझे तर असे मत आहे की, तो युद्धाचाच छद्‌मी प्रचार करतो--अर्थात् जाणीवपूर्वक नव्हे. त्याच्या कार्लची बेछूट, खेळकर वृत्ती तरुण मनावर अनिष्ट परिणाम केल्यावाचून राहणार नाही. मध्यमवर्ग उगाच नाही त्याच्याकडे आकृष्ट झाला.

सेशन्स कोर्टातील माझा खटला ता. ३ नोव्हेंबरपासून सुरू होईल. बहुधा महिन्याभराच्या काळात तो संपून जाईल. गेले महिनाभर माझा जामीन अर्ज हायकोर्टा-पुढे होता. तो नुकताच फेटाळून लावण्यात आला. म्हणजे, सध्याच्या माझ्या निवास-स्थानातून मी काही बाहेर पडत नाही. जेव्हा केव्हा कायमची सुटका होईल तेव्हाच तेथून निघावयाचे.

बर्लिनमधील कडाक्याच्या थंडीत तुझा जीव किती बेजार झाला असेल त्याची मी कल्पना करू शकतो. मला मात्र ती थंडी फार आवडत असे. वीस अंशाच्या खाली तपमान गेले की मी बेहोष होत असे. ते चाळीस अंशाच्याही खाली गेलेले मी अनु-भवले आहे. आणि बरं का, कृत्रिम उष्णता तयार करण्यासाठी घरात जळणही नसे त्या वेळी.[1] काय गंमत आहे पाहा, तू नितांतसुंदर बर्लिनचा तिरस्कार करीत आहेस आणि मला त्याची घरच्यासारखी ओढ लागली आहे. खरेच, युरपला माघारी परतण्यासाठी माझा जीव तळमळत आहे. केव्हा बरे तो योग येईल ? बहुधा कधीच येणार नाही. कारण मी बाहेर पडलो, स्वतंत्र झालो तरी मला युरपपासून दूरच राहावे लागणार आहे. चैनीची सहल करण्यासाठी युरपला भेट देण्याइतका मी कधीच श्रीमंत होणार नाही. पण आल्प्स पर्वताच्या एखाद्या उंच शिखरावर एखादा महिना काढण्यासाठी मी काय बरे देणार नाही !

क्लेमेन्सने (दत्त) जे गलिच्छ कृत्य केले त्याबद्दल......ही मला लिहिले होते. मला खरोखर आश्चर्याचा धक्का बसला. मला वाटले होते की तो जरा समजूतदार आहे.

---

१. रशियन राज्यक्रांतीनंतरच्या यादवी युद्धाच्या काळात मध्य आशियात ही परिस्थिती असे. त्यानंतर सैबेरियातही तोच अनुभव घ्यावा लागला होता.

इतक्या हीन पातळीला हे लोक कसे जाऊ शकतात ? [२]

५

डिस्ट्रिक्ट जेल, कानपूर
नोव्हेंबर २१, १९३१

तुझे मागील पत्र मला फक्त दहा दिवसांत मिळाले. किती आनंदाची गोष्ट. मनुष्यमात्राने निसर्गावर जी मात केली आहे, तिच्यात आधुनिक समाजाच्या आचरटपणाने मोडता घालण्याचा प्रयत्न केला नाही तर केवढी तरी सुखाची दालने मनुष्यमात्राला खुली होऊ शकतील बरे.

छे छे ! मला तंबाखू नको आहे. ही सवय मोडलेलीच बरी. म्हणजे पाहा, जो मद्य घेत नाही, धूम्रपान करत नाही, जो शिव्या देत नाही असा एक संपूर्ण आदर्श पुरुष म्हणून मी अवतीर्ण होणार आहे बरे ! शिव्या मी कधीच दिल्या नाहीत म्हणा. फक्त एखादा डच माणूस भेटला तर 'गॉड व्हर्डोमा' आणि दक्षिण अमेरिकेतील लोकांच्या सहवासात 'कररम्बा' असे काही शब्दोच्चार करण्याचा मोह मात्र मल टाळता आला नाही. ते सुद्धा असे काही नादमधुर पण निरुपद्रवी शब्द आहेत, एवढेच त्यांचे आकर्षण.

ही सारी पत्रे लिहिताना माझे मन किती शंकाकुल, सचिंत होते म्हणून सांगू. भावना मनात उचंबळून येतात, न जाणो आपण कोठल्या एखाद्या पोकळीत तर ती पत्रे टाकीत नाही ना ? ती उद्दिष्ट स्थळी पोचतात किंवा नाही याबद्दलही मी साशंक असतो. सुदैवाने कधी कधी एखादे पत्र साऱ्या अडचणी उल्लंघून नियोजित स्थळी पोचते. काही दिवसांपूर्वी तुझ्या आवडत्या हेमिंग्वेच्या पुस्तकावर एक समीक्षण लिहून मी पाठविले होते. ते पत्र पोचले नसले तर बरेच झाले. तुझ्या आवडत्या लेखकावर मी त्यात बरेच कोरडे ओढले होते. फारच चिकित्सक मनःप्रवृत्तीत असेन मी त्या वेळी.

हाइन्झचे प्रबंधपर लेखन, तू केलेल्या भाषांतरासहित मला पोचले. लवकरच मी त्याला लिहीन. खटल्याबद्दलची इतकी थोडी हकीकत तुला कळावी ही खेदाची गोष्ट आहे. तो सध्या चालू आहे. तेव्हा इंग्रजी वृत्तपत्रात त्याचा वृत्तांत येत असेल. ठीक आहे म्हणा. परिस्थितीचे आपण बळी आहोत. साहजिकच त्या परिस्थितीशी आपण जुळवून घेतलेच

---

२. माझा खटला चालू असताना क्लेमेन्स दत्त ( रजनी पामदत्त यांचे बंधू ) याने 'इंटरनॅशनल प्रेस कॉरेसपॉन्डन्स' या कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या मुखपत्रात एक लेख लिहिला. त्यात त्याने असे लिहिले होते की, तुरुंगात मला अनेक प्रकारच्या सवलती आणि सुखसोयी मिळत आहेत आणि मीरत केसमधील कैदी मात्र खडतर हालअपेष्टा भोगीत आहेत.

पाहिजे. जर्मन वृत्तपत्रांबद्दल [1] तू विचारलेस. नको पाठवू ती. आणि पुढील वेळी पुस्तके पाठविशील तेव्हा सरळ माझ्याकडे पाठवू नकोस; माझ्या वकिलाच्या पत्त्यावर पाठव.

मी एक दुर्दम्य आशावादी आहे. आणि मी हसतोसुद्धा. अर्थात् पूर्वी जेवढा हसत असे तेवढा मात्र नाही. माझ्या कोठडीच्या समोर जो एक लहानसा बगीच्याचा तुकडा आहे, त्यात या वर्षी चकचकीत पिवळी फुले फुलली आहेत, पण ती तुला पाठवू कशी मी? मला नाही पाठविता येणार.

६

डिस्ट्रिक्ट जेल, कानपूर
जानेवारी ६, १९३२

निर्णयाचा दिवस माझ्या शापित मस्तकावर अद्यापही टांगता राहिला आहे. तुला चांगली विश्रांती घेता आली का? माझी कल्पना आहे, तू जे विश्रांतीसाठी ठिकाण निवडलेस ते चांगले आहे. बर्लिनच्या परिसरातील बहुतेक सारी विश्रांतिस्थाने अशीच चांगली आहेत. अधूनमधून मी असाच एका ठिकाणी जात असे. तीन सरोवरांच्या मध्यभागी बसलेले ते ठिकाण आहे. मला नाव आता आठवत नाही. जायचे तिथे ते 'क्राइनबानने.' अरुंद रुळावरून चालणारी ती गाडी किती रम्य असे. माझी पत्रे तुला नियमाने पोचतात हे ऐकून मला फार आनंद वाटला. खटल्याचा निर्णय झाल्यानंतर मात्र आपला पत्रव्यवहार आखडता घ्यावा लागेल. महिन्यातून एकापेक्षा अधिक पत्रे मला पाठवता येणार नाहीत. आता पुढील सूचना येईपर्यंत माझ्या वकिलाच्या पत्त्यावरच तू पत्र पाठविणे बरे. माझे जे निवासस्थान ठरेल त्यावर तो पाठवून देईल. नव्या घराचा एकदा पत्ता लागला की तुला तो मी कळवीनच.

पुस्तके अजून येऊन पोचली नाहीत. नाताळच्या भाऊगर्दीत ती अडकून पडली असावीत. पुस्तकांची यादी पाहून मात्र मला वाटले की, मला जी हवी आहेत तीच बरोबर पुस्तके तू पाठवीत आहेस. होय. तू म्हणतेस ते साहित्य इंग्रजीत उपलब्ध नाही. अशा तऱ्हेचे शास्त्रीय ग्रंथ तरी, परकीय भाषेत ते आहेत म्हणून, मला मिळावयाला अडचण पडू नये. जमले तर मला असेच आणखी काही साहित्य हवे आहे. कारण हिंदू तत्त्वज्ञान आणि भारतीय संस्कृती यावर एखाद दुसरे पुस्तक लिहिण्याचा माझा विचार आहे. फ्यूअरबाकचा त्या दृष्टीने फार उपयोग होईल. मॅक्स वेबरचा आशियातील धर्मांवरील ग्रंथसुद्धा मला हवा आहे.

---

१. परदेशातील वृत्तपत्रे मला तुरुंगात दिली जात नसत.

कादंबऱ्यांची मी आतुरतेने वाट पाहात आहे. मागे पाठविलेल्या साऱ्या कादंबऱ्या चांगल्या होत्या. व्हॅन डाईनची आणखी एक कादंबरी तू हुडकून काढलीस त्याबद्दल धन्यवाद. होय, प्रिय व्हान्सच्या मी अगदी प्रेमात पडलो आहे. मी जर ऐदी श्रीमंत असतो आणि दुसऱ्या फंदात पडलो नसतो तर, मी त्याच्यासारखाच काही तरी झालो असतो.

हे पत्र पोचण्या आधीच बहुधा माझ्या भवितव्याबद्दलची तार तुला पोचलेली असेल. आता कोणत्याही क्षणी त्याबद्दलचा निर्णय जाहीर होईल. ते कसे का असेना, गेल्या वर्षापेक्षा हे नवे वर्ष तुला अधिक सुखाचे जाईल अशी मला आशा आहे. नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी हाइन्झने केम्पिन्स्कीकडून चांगली मद्याची बाटली निवडली होती की नाही? रानटी आहे बेटा तो. रात्रीच्या जेवणाला रेड वाईन त्याने मागविली की नाही? खरे सांगू तुला ऱ्हाइन वाइनच्या ऐवजी बरगंडी पसंत करणाऱ्या जर्मन माणसावर "होक व्हेन्हट" ( देशद्रोह ) चाच आरोप ठेवला पाहिजे. कॉट्स्कीची मला आठवण आहे. बावळ्याला अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत समजावून देताना जोहान्स-बर्गरच्या बाटलीचा आधार घ्यावा लागत असे.

७

सेंट्रल प्रिझन, बरेली
जानेवारी १८, १९३२

माझ्या नव्या निवासस्थानातून लिहिले जाणारे हे पहिलेच पत्र. शिक्षा झाल्या-नंतर त्याच दिवशी येथे मला आणण्यात आले. जीवनपद्धतीत आता साहजिकच बदल होणार आहे. तुझ्याशी संबंधित, तुला जाचणारा, आणि काही काळ तुझे मन खिन्न करणारा ( नव्या परिस्थितीचा तुला सराव पडेपर्यंत ) बदल म्हणजे यापुढे महिन्यातून एकच पत्र पाठविण्याची मला परवानगी राहील. त्याचा अर्थ असा की, इतरांनाही माझ्या पत्राची अपेक्षा असल्यामुळे आता यापुढील माझी पत्रे ही एक प्रकारची पत्रके होतील. त्याने तुझे समाधान कसे होऊ शकेल? परंतु दुसरा इलाजच नाही. तुम्हा सर्वांच्या इच्छा झुगारून देऊन भारतात येण्याचा निर्णय घेताना मला या साऱ्या परिणामांची कल्पना नव्हती असे थोडेच आहे. पण तरीसुद्धा मी आग्रह धरून येथे आलो. मला वाटते या वार्तेने सगळ्यांना भयंकर धक्काच बसला असेल. आघात तसाच जबरदस्त आहे, अपेक्षे-पेक्षाही भयंकर.[1] माझ्या दृष्टीनेही अनपेक्षित. ( यापुढील वाक्य तुरुंगाधिकाऱ्यांनी खोडून टाकले होते ) तू धीराने प्रसंगाला तोंड देशील असा माझा विश्वास आहे. तुझी जी

---

१. बारा वर्षे काळेपाण्याची मला सजा देण्यात आली होती.

पूर्वीची योजना होती ती निदान काही काळ तरी सोडून देण्याची आवश्यकता तुला आता पटल्यावाचून राहणार नाही. मला कळत नाही, तू आपले जीवन फुकट का घालवावेस ? सध्याच्या परिस्थितीत तू येथे येणे याला काहीएक अर्थ नाही. तुझ्या पदरात काही पडणार असेल तर महिन्याकाठी पंधरावीस मिनिटेपर्यंत भेट घेण्याची सवलत. बस्स. वर्षामागून वर्षे, या पोरकट विरंगुळ्यावर कोणी समाधान मानू शकेल काय ? मला तर निश्चितपणे वाटते की, दूरवरच्या एका अज्ञात देशापेक्षा, मित्रमंडळीत जीवन कंठणे तुला अधिक सोपे जाईल.

खटल्याचा कायमचा निकाल लागलेला नाही. सेशन्स कोर्टात खरे तर मी माझा बचाव पुढे मांडला नाही. त्यावर हायकोर्टात अपील करावयाचे आहे आणि तेथे अग-दीच निर्दोष सुटलो नाही तरी बरीचशी शिक्षा कमी होईल अशी अपेक्षा करण्यास सबळ कारणे आहेत. आठ वर्षांपूर्वी याच पुराव्यावर इतरांना चार वर्षांची सजा देण्यात आली होती. मग मला इतकी जास्त शिक्षा देण्याचे प्रयोजन काय ? हायकोर्टात स्वतःचा खटला चालविण्याला मला परवानगी मिळण्याची शक्यता नसल्यामुळे देशातील नामांकित कायदेपंडितांपैकी कोणातरी एका वकिलाची या कामी मदत घेण्याचा आमचा विचार आहे. अपिलाचा निकाल लागण्यास आणखी तीन-चार महिने तरी लागतील. तोवर ज्या पवित्र चरख्याच्या साहाय्याने गांधीजी जगाचा बचाव करू पाहात आहेत तो चरखा चालविण्याला मी शिकणार आहे. मला हे करावे लागावे हा दारुण दैवदुर्विलासच नाही काय ? महात्म्याने अखेरीस माझ्यावर एका बाबतीत तरी मात केली खरी. गांधीजींना हे कळले तर ?

शारीरिक दृष्टीने आणि मनानेही मी प्रसन्न आहे. जागा बदलली हा सुद्धा एक विरंगुळाच आहे. ती जागा बदलताना जो प्रवास करावा लागला त्यात बाहेरच्या जगाचे ओझरते दर्शन घेण्याची मला संधी मिळाली. थोडेसेच हे दर्शन. रेल्वेच्या डब्यातून, रात्रीच्या वेळी जे काही मला बघणे शक्य झाले ते. नवे ठिकाण जुन्यापासून फारसे लांब नाही—त्याच प्रांतातील. फक्त आमचे एकेक प्रांत, युरोपमधील सर्वांत मोठ्या देशापेक्षा अधिक मोठे आहेत एवढेच.

आता महिनाभर मला पुन्हा लिहिता येणार नाही या जाणिवेने असंख्य गोष्टी लेखणीच्या टोकावर येऊन उभ्या राहिल्या आहेत. पण त्या कागदावर उतरवावयाच्या तर किती तरी कागद लागतील. ( मला तर एकापेक्षा अधिक मिळावयाची परवानगी नाही ) म्हणून बऱ्याच गोष्टी तशाच मुग्ध राहिल्या पाहिजेत. माझ्याबद्दलच्या वार्तेमुळे फार दुःखीकष्टी होऊ नकोस आणि गांगरून तर मुळीच जाऊ नकोस. आपण त्याला तयारच नव्हतो का ? हाइन्झ, ऑगस्ट आणि इतर सहकाऱ्यांना माझ्या हार्दिक सदिच्छा दे. ते माझ्यावर फार फार रागावले तर नाहीत ना ?—त्यांचा सल्ला झिडकारून देऊन या अंधारकोठडीत येऊन पडल्याबद्दल ! सध्या महिन्यापुरता तुमचा सर्वांचा निरोपच

घ्यावयाचा आहे. पुढील खेपेला अधिक प्रसन्न अशी काहीतरी वार्ता देण्याची वेळ येईल अशी आशा करू या.

सेंट्रल प्रिझन, बरेली
८
फेब्रुवारी १६, १९३२

माझा कायमचा पत्ता तुला आता ठाऊक झाला आहे. त्यावर महिन्यातून एकदा मला सरळ तुला लिहिता येईल. महिन्याभरात निरनिराळ्या दिवशी लिहिलेला सारा मजकूर एका पत्रात समाविष्ट करून ते पत्र मला पाठव. एकाच कागदापुरता मजकूर मर्यादित करण्याचे कारण नाही. केवढे समाधान, नाही ? इतक्या कालावधीनंतर पत्र लिहिणे कठीण आहे. इतक्या गोष्टी या काळात साठून राहतात आणि त्यांची इतकी गल्लत होते की सुरुवात कोठून करावी हेच समजेनासे होते. आता या गोंधळातून मार्ग तरी कसा काढावा ? एक उपाय आहे. कॅलेंडरपासूनच सुरुवात करू दे मला.

बारा वर्षांतील फक्त पाच आठवडे निघून गेले आहेत. आणखी अकरा वर्षे आणि अकरा महिने राहिले. मन स्तिमित करणारी भवितव्याची खूण आहे की नाही ही ! क्षितिजावरील काळ्याकुट्ट मेघांना सोनेरी किनार नसती तर काय बरे झाले असते ? तुला वाटेल की मी फारच निराशेने माझ्या भवितव्याकडे पाहात आहे. तसे नाही बरे. आहत्या परिस्थितीचा जास्तीत जास्त चांगला उपयोग मी करून घेत आहे. आश्चर्य वाटते माझे मलाच. दिवस कल्पनातीत वेगाने निघून जात आहेत.

सध्याच्या परिस्थितीत मी जे निष्प्राण जीवन जगत आहे त्याबद्दल दोन शब्द. चरख्याच्या घरघराटात माझा दिवस सुरू होतो. तो आता मी चांगला चालवू लागलो आहे. दुपार आणि संध्याकाळ वाचनात जातात. त्यासाठी चांगले बौद्धिक खाद्य तू पुरविलेले आहेस. कालांतराने आणखी असेच खाद्य मला लागेल. खाली यादी दिली आहे. सर्वांनाच मला लिहिता येत नसल्यामुळे ज्यांना शक्य आहे त्यांनी ती जबाबदारी वाटून घ्यावी. अमेरिकेतील आपले दोस्त पुस्तके आणि मासिके पाठवतील. मासिके अगदी न चुकता मला मिळावयाला हवीत. कारण त्यातूनच, प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील जीवन मी कंठीत असताना आधुनिक जगाशी मला संबंध ठेवता येईल.

खटल्याबद्दलचे वृत्त तुझ्या कानी आलेच असेल. या खटल्याचे निकालपत्र हा तेथील आपल्या मित्रांना विचारांना चालना देणारा प्रबंध वाटल्यावाचून राहणार नाही. अपिलाची तयारी चालू आहे. परंतु त्याची प्रत्यक्ष सुनावणी होईपर्यंत आणखी एक-दोन महिने सहज उलटून जातील; त्यानंतर त्याचा निर्णय. सध्याच्या देशाच्या परिस्थितीत, त्याविषयी फारसा आशावाद ठेवण्यात अर्थ नाही. बघू या काय होते ते. अधिकारारूढ

लोकांची ( कम्युनिस्ट इंटरनॅशनल ) या वार्तेबद्दलची प्रतिक्रिया कोणती आहे हे जाणून घेण्याला मी फार उत्सुक आहे. येथील कम्युनिस्ट[1] ( म्हणजे स्वतःला कम्युनिस्ट पक्ष म्हणून मानणारे ) हे अत्यंत निर्लज्जपणाने बोलत, वागत आहेत असे माझ्या कानी आले आहे.

मला शिक्षा झाल्यापासून तुझ्याकडून एकही पत्र नाही. तुला आश्चर्य वाटेल, पण आपल्या पुराण्या डॉक्टरला तू जे पत्र लिहिलेस त्यातील मजकूर मला कळला आणि तुला उत्तरही कशा प्रकारचे गेले असेल त्याचीही मला कल्पना करता येते. खरे सांगू का, अगदी वेडेपणाचे पाऊल टाकले आहेस तू हे. तुला काय वाटते, लोकांना इतक्या सहज रीतीने बनविता येईल ? अवकाश आणि काळ यांचे अस्तित्व आपल्याला नाकारून चालणार नाही. आणि त्यांची निष्ठुरता आपल्याला सहन करावी लागणारच आहे हेही विसरून चालणार नाही. किती काळ ? परमेश्वर जाणे ! सरळ साध्या भाषेत सांगावयाचे तर मला जे मनापासून हवे आहे तेच मला झिडकारून द्यावेसे वाटत आहे. पेनेलोपची भूमिका वठवणे हे काही वांछनीय उद्दिष्ट नव्हे. पण बर्लिनमधील तुझ्या एकाकी जीवनाऐवजी या देशात त्याच प्रकारच्या जीवनासाठी पाय रोवावयाचे तू ठरविलेस तरी त्या जीवनाची झळ कमी का होणार आहे ? यातही अनेक गोष्टी गृहीत धराव्या लागतीलच. उदाहरणार्थ, येथे पाय रोवणे हे प्रत्यक्ष व्यवहारात कितीसे शक्य आहे याचा विचार करावयाला नको काय ? कर्तव्यनिष्ठ पत्नीचे व्रत घेणे हे वर्षा दोन वर्षांपुरते ठीक आहे. अर्थात् हिंदू पत्नीला या व्रतसंकल्पात हरविण्याची तुला संधी मिळाली तरच. मी एवढेच म्हणेन की, बाई ग कृपा करून जीव जाळू नकोस.

आजच मला नवा पोषाख ( तुरुंगातील कैद्याचा ) मिळाला. तो करवून घ्यावा लागला. माझ्यासारखे ताडमाड वाढणारे लोक तुरुंगात यावेत अशी अपेक्षा नसावी. एकंदरीने पाहता पिढ्यानुपिढ्या दारिद्र्यात पिचत असलेल्या दुबळ्या जिवासाठी तयार करण्यात आलेले हे विश्रांतिस्थान आहे. पण गुन्हेगार–शास्त्रात अवगाहन करण्याचा मोह मला टाळला पाहिजे. पण तुला सांगतो, भूमिगत गुन्हेगारांशी संबंधित असलेल्या

---

१. मला इतकी जबरदस्त तुरुंगवासाची शिक्षा झाल्यानंतरही भारतीय कम्युनिस्ट पक्ष म्हणून स्वतःला संबोधणाऱ्या गटाने माझ्याविरुद्ध मोहीम चालूच ठेवली. मला वाटेल ती नावे ठेवीत ते असे बिनदिक्कतपणे आरोप करू लागले की, मी सरकारच्या मदतीने क्रांतिकारक चळवळ उद्ध्वस्त करण्यासाठीच भारतात् परत आलो आहे. काहीजणांची तर इतकी मजल गेली की, खटला आणि शिक्षा ही सगळी सोंगे आहेत. मी तुरुंगात नसून ब्रह्मदेशातील एका राजेशाही प्रासादात् सुखासमाधानाने जीवन कंठीत आहे असे म्हणावयालाही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. ब्रिटनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रात अशा तऱ्हेचे वृत्त प्रत्यक्षपणे प्रकाशितही झाले होते.

या शास्त्राबद्दल मला विलक्षण आकर्षण आहे. म्हणूनच तर फिलो व्हान्सचा मी असा भक्त आहे. त्याची मनोविश्लेषणात्मक हेरगिरी शास्त्रीय तंत्राशी मिळतीजुळती नाही याची मात्र मला कल्पना आहे. त्याचे अगदी अलीकडील पुस्तकही तसेच चांगले आहे. पण कित्येक जागी ते फार अतिरंजित वाटते. बेन्सन मर्डर हे सर्वोत्कृष्ट आहे.

गेल्या आठवड्यात हे पत्र जाऊ शकले नाही, म्हणून त्यात भर घालीत आहे. उशीर झाल्यामुळे तू फार अस्वस्थ तर झाली नाहीस ना ? सांगून ठेवतो तुला, तसे अस्वस्थ होण्यासारखे काही नाही. माझी प्रकृती चांगली आहे आणि मनही प्रसन्न आहे. वसंतऋतूचा उदय झालाच आहे आणि मला दहशत वाटत आहे ती भीषण उन्हाळ्याची.

माझ्या नव्या पोषाखाबद्दल मी तुला लिहिले. तो निराळ्या प्रकारचा आहे. जुना होता तो वेगळा होता. या पोषाखात मी कसा दिसतो ? तुला कल्पनासुद्धा करता येणार नाही. ख्रिस्ती मठात राहिल्यासारखे मला वाटत आहे—पापी देहाच्या शुद्धीसाठी यातना भोगीत. ख्रिस्ती धर्माच्या पूर्वकाळातील आचारांचा त्यामुळे माझ्यावर संस्कार व्हावयाला पाहिजे. ज्या परिस्थितीत ते धर्मगुरू राहात असत त्यातून वाकडे पाऊल पडावयाला प्रेरणा मिळाली नाही तरच नवल. ओबडधोबड लोकरी–सुताचे कपडे अंगात घालून शरीराला यातना द्यावयाच्या आणि खुशालचेंडू ख्रिस्ती धर्मगुरू घेत असत त्याप्रमाणे बेनेडिक्टाइन आणि 'चारत्रूदे व्हर्ट'चे प्राशन करावयाला मुभा द्यावयाची नाही हा काय न्याय झाला ! माझा तर असा कयास आहे की हे धर्मगुरू आपल्या ओबडधोबड, जाड्याभरड्या पेहरावाच्या आत तलम झुळझुळीत रेशमी वस्त्रे घालीत असावेत.

मी तुला पुन्हा एकदा अजीजीने सांगतो की, सारी पुस्तके तूच एकटीने विकत घेता कामा नयेत. माझ्या शिक्षणाचा भार सोसण्यासाठी इतरांना वाव दिला तर ते आनंदाने आपला वाटा उचलतील. मला जर आवश्यक सवलती मिळाल्या तर दोन पुस्तके लिहिण्याची माझी योजना आहे. एक हिंदू धर्म, तत्त्वज्ञान आणि संस्कृती यावर आणि दुसरे गांधीवादाची समीक्षा (तात्त्विक आणि तत्त्वज्ञानात्मक). म्हणजे भारतातीलच हे वैशिष्ट्य नव्हे तर धार्मिक पुनरुज्जीवनाची वगैरे जी चळवळ साऱ्या जगात होत आहे तिचाच तो एक आविष्कार आहे हे त्यात मला दाखवून द्यावयाचे आहे. त्यानंतर तिसरे पुस्तक लिहिण्याचा माझा विचार आहे तो समीक्षेचे संकेत प्रस्थापित करण्यासाठी. त्या पुस्तकाची माझ्या दृष्टीने सर्वांत आधी गरज आहे. हे पुस्तक म्हणजे जडवादावरील भाष्य होय. निसर्ग, जीवन आणि इतिहास यांच्या संबंधातील शास्त्रीय दृष्टिकोण सहज, सुलभ रीतीने प्रगट करणे हे त्या पुस्तकाचे उद्दिष्ट राहील. भारताला या दृष्टिकोणाची अत्यंत आवश्यकता आहे.

या ग्रंथासाठी मला साहित्य हवे आहे. भारताशी संबंधित असे सर्व साहित्य येथे मिळू शकेल. तसेच अनेक मूलभूत ऐतिहासिक ग्रंथही येथे उपलब्ध होऊ शकतील. पण खास वैशिष्टयपूर्ण साहित्य मात्र परदेशातूनच पाठवावे लागेल. ते येथे मिळण्याची आशा नाही. या साहित्याचे मूलधन हुडकून काढण्याच्या बाबतीत मला ऑगस्टची मदत लागेल. शक्य तोवर सारे साहित्य इंग्रजीतच असलेले बरे. त्यामुळे बराचसा विलंब टळेल आणि अडचणीही येणार नाहीत[1]. त्यानंतर नीट छाननी करून संगतवार लावलेले साहित्य मला मिळाले तर फार चांगले होईल. जुन्या पुराण्या साहित्याचे ढीगच्या ढीग वाचून काढणे हे अत्यंत कंटाळवाणे काम आहे. माझा आत्मा काही प्राध्यापकाचा नाही. सध्याच मी पुन्हा एकदा फ्यूअरबाकचा 'बेसेन दे क्रिसेन्टम्स' हा ग्रंथ वाचून काढीत आहे. पन्नास वर्षांपूर्वी एंगल्सने लिहिले होते की, त्यातील काही भाग अनाकलनीय वाटतात. आता तर त्याहीपेक्षा किती तरी भाग मला जड वाटत आहे.

मला हवी आहेत ती पुस्तके पुढीलप्रमाणे : व्हेवेलः––हिस्टरी ऑफ द इंडक्टिव्ह सायन्सेस; लेकी––हिस्टरी ऑफ युरोपियन मॉरल्स ॲन्ड हिस्टरी ऑफ रॅशनॅलिझम; ड्रेपर––हिस्टरी ऑफ द इंटलेक्चुअल डेव्हलपमेंट इन युरप; कुनोफिशर––बेकन ऑफ व्हेरूलम; रेनाँ––ॲव्हेरोएस एट ॲव्हेरोइझम (फ्रेंच भाषेतच मला वाटते हे पुस्तक उपलब्ध आहे); ऑस्कर श्मिट––डॉक्ट्रिन ऑफ डिसेंट; कॉलिस––कॉन्ट्रिब्यूशन टू द थिअरी ऑफ नॅचरल सिलेक्शन; झेलर––ग्रीक फिलॉसफी; युएबेरवेग––हिस्टरी ऑफ फिलॉसफी; लायेल––ॲन्टिक्विटी ऑफ मॅन; लुबॉक––प्री-हिस्टॉरिक टाइम्स; मॅटर जे––हिस्टॉइरे क्रिटिक दु नॉस्टिसिस्मे (इंग्रजी भाषांतर उपलब्ध नाही); मीड जी. आर. एस.––फ्रॅगमेन्ट्स ऑफ फेथ फरगॉटन आणि मिस्टिकल ॲडव्हेंचर्स; टेलर––प्रिमिटिव्ह कल्चर; डाल्टन––न्यू सिस्टिम ऑफ केमिकल फिलॉसफी; हेल्महोल्ट्झ––ऑन द इंटरॲक्शन ऑफ नॅचरल फोर्सेस; फेझर सी. जे.––ह्युमॅनिझम् ॲन्ड सायन्स; अप्पियन––सिव्हिल वॉर्स इन रोम; ब्रोड––सायंटिफिक थॉट; रिची––सायंटिफिक मेथड; बर्ट्रान्ड रसेल––द ॲनालिसिस ऑफ मॅटर.

बहुतेक मूलभूत ग्रंथ वाइलच्या सळघरात साठवलेले आढळून येतील. सावकाशीने ते पाठवून दे. अर्थात् सारी पुस्तके एकदम पाठविण्याची आवश्यकता नाही. सारे साहित्य, गोळा करून त्यांचा अभ्यास करण्यात सहा महिने जातील असा माझा अंदाज आहे. त्यानंतरच मी प्रत्यक्षपणे लिहावयाला लागेन.

---

१. परकीय भाषांतील पुस्तके मला मिळू दिली जात नसत. अपवाद झाला तर तो काही जगप्रसिद्ध सर्वश्रेष्ठ ग्रंथांबद्दल. पण शास्त्रीय ग्रंथ आणि परकीय भाषांतील कादंबऱ्यासुद्धा मला मिळत नसत. आक्षिप्त नसलेली, उदाहरणार्थ, मार्क्स-एंगल्सचा पत्रव्यवहार यासारखी पुस्तके सरळ जप्त केली जात.

साऱ्या मित्रांना सांग की, महामूर्ख म्हणून मला सोडून देऊ नका. आतापर्यंत तरी माझे अंदाज फारसे चुकले नाहीत आणि माझी श्रद्धा आहे की, मी जे केले ते योग्यच केले. या देशात काम करावयाचे तर काही मध्यमवर्गीय भावना विचारात घेऊन त्या संतुष्ट करण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. जीवनातील ताण तू जरा कमी कर; जीवनाकडे जरा प्रसन्नपणे पाहा. वसंतऋतूत सभोवारचे जग मोहरून, फुलून आलेले आहे. त्याच्याकडे जरा दृष्टी टाक. प्रत्येक झाडाझुडपात तुला चैतन्याची खूण दिसेल.

सेंट्रल प्रिझन, बरेली
एप्रिल १९, १९३२

९

दुसरी काही पुस्तके पोचल्याचे तुला मी आधीच कळविले आहे. फार फार उपयोग होत आहे मला त्यांचा. गेल्या पत्राबद्दल तुला इतकी लाज वाटण्याचे कारण नाही. ते तसे विस्कळित नव्हते आणि लांबलचकही नव्हते. फक्त राजकारण तू वर्ज्य केलेले बरे.[1]

पुस्तकांच्या बाबतीत माझी प्रगती चांगली आहे. अर्थात अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड देऊनच मला काम करावे लागते. सध्याच्या माझ्या अवस्थेत या अडचणी अपरिहार्य आहेत.[2] तुरुंग हे काही विद्यापीठ नव्हे. शास्त्रीय संशोधन करण्यापेक्षा व पुस्तके लिहिण्यापेक्षा इतर काही हेतूंसाठी तेथे माणसांना पाठविण्यात येते. पुस्तके

---

१. मला राजकीय प्रश्नांचा—परदेशातील सुद्धा—माझ्या पत्रात उल्लेख करावयाची परवानगी नसे. असे उल्लेख झाले तर ते खोडून टाकले जात आणि मग उरत ती माझ्या पत्रांची अगदी भुते !

२. लिहिण्याचे साहित्य मिळण्याबद्दल बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या. सजा झाल्यानंतर मला 'ब' वर्गात ठेवण्यात आले आणि 'ब' वर्गाच्या कैद्यांना त्याची परवानगी नसे. कालांतराने खास परवानगी देण्यात आली. पण मला एका वेळी एकच वही ठेवण्याची परवानगी असे. ती एकदा भरली की ती तुरुंगातील कचेरीत ठेवावयाची आणि दुसरी घ्यावयाची. साहजिकच महिन्याच्या अभ्यासात जी टिपणे केली गेलेली असत त्यांचा लेखनासाठी उपयोग करता येत नसे. मित्रांकडून मला पुस्तकांचा भरपूर पुरवठा होत असे. पण एका वेळी तीनपेक्षा अधिक पुस्तके माझ्याजवळ ठेवता येत नसत. त्यामुळे त्यांचा खुलेपणाने मला उपयोग करता येत नसे. शिवाय योजनापूर्वक संशोधन करण्याच्या बाबतीत किंवा आधारित साहित्याचा उपयोग करण्याच्या बाबतीत अतोनात अडचणी निर्माण होत असत.

लिहिण्याचे वगैरे काम तेथे अनुषंगाने करावयाचे असते.[१] कैदी हा आपल्या वेळेचा मालक नसतो. प्रथम त्याने नियोजित कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. शिवाय तुरुंगाच्या कोठड्या किंवा बराकी या अभ्यासाला सोइस्कर होतील अशी अपेक्षा करण्यात तरी काय अर्थ आहे.

आता माझ्या व्यक्तिगत सुखसोयीबद्दल काय लिहू ? अत्यंत आवश्यक अशा साबण वगैरे गोष्टींशिवाय बाकीचे जे काही तुरुंगात मिळेल, तेवढेच मला वापरता येईल. खटला चालविणाऱ्या न्यायाधीशाने 'अ' वर्गातून 'ब' या खालच्या वर्गात माझी पाठवणी केली आहे. या वर्गातील कैद्यांना सामान्य कैद्यांपेक्षा जरा अधिक चांगली वागणूक मिळत असली तरी अन्न, कपडे, पांघरुणे वगैरेंच्या बाबतीत खाजगी रीतीने पुरवठा करून घेण्याची त्यांना परवानगी नाही. कायद्याच्या दृष्टीने राजबंद्यांना तसे वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झालेले नाही. कैद्याला बाहेरच्या जगात जी मानमान्यता असेल त्याचा विचार करूनच वर्गवारी केली जाते.[२]

माझी प्रकृती तशी चांगली आहे. पण उष्णता मात्र भयानक होत चालली आहे आणि मला काही सेंट मॉरिझचा आश्रय घेता येणार नाही. म्हणून मी मस्त आनंदात आहे असे मात्र मला म्हणता येणार नाही. हवा तर दिवसेंदिवस अधिकच वाईट होत जाईल. सुदैवाने येथील हवामान इतर ठिकाणांपेक्षा अधिक चांगले आहे. येथील उन्हाळा कोरडा असतो. त्यामुळे उष्णता जरा कमी असह्य भासते. गंमत अशी की, या कडक उन्हाळ्यातच मला इन्फ्लुएंझाचा ज्वर आला आहे. सोव्हिएटच्या अध्यक्षाप्रमाणे हाताच्या बाह्यांनी वाहते नाक पुसत असलेले मला पाहून तुला खास कौतुक वाटले असते.[३]

अपीलाच्या सुनावणीची तारीख अद्याप ठरली नाही. इथल्या लोकांना असा विश्वास वाटतो की झालेली शिक्षा बऱ्याच मोठ्या प्रमाणात कमी केली जाईल. मलाही तशीच आशा वाटते. या परिस्थितीत बारा वर्षे काढण्याची कल्पना मोठी उज्ज्वल खास नाही. तत्त्वज्ञाची शांती धारण करण्याचा आव आणला तरी त्यात समाधान मानता

---

१. तुरुंगाच्या मुख्याधिकाऱ्याने स्पष्ट शब्दांत तशी मला समज दिली होती.

२. व्यक्तिशः मी आणि येथील तशाच परदेशातील मित्रांनी सरकारच्या नजरेस आणले होते की त्यांनी घालून दिलेल्या आदर्शाप्रमाणे सुद्धा माझे स्थान निर्विवादपणे 'अ' वर्गात मोडण्यासारखे आहे. पण त्या अर्ज-विनंत्यांचा काडीइतकाही परिणाम झाला नाही. माझा हा न्याय्य हक्क मला नाकारण्यात आला तो या कारणासाठी की 'अ' वर्गाचा कैदी म्हणून मला जिल्ह्याच्या ठिकाणच्या तुरुंगात ठेवावे लागेल आणि तेथे आवश्यक ती देखरेख व पहारा ठेवण्याचा बंदोबस्त करणे कठीण आहे.

३. 'ब' वर्गातील कैद्यांना हातरुमाल वापरण्याची परवानगी नसे.

येण्यासारखे नाही. आणि मी तर तसा काही तत्त्वज्ञ नाही. मनन आणि चिंतन करण्या-व्यतिरिक्त मला अन्य काही आकांक्षा आणि वासनाही आहेत.

केम्पिन्स्कीमधील अवखळ संध्याकाळचे तू जे वर्णन केले आहेस ते वाचून माझ्या तोंडाला अक्षरशः पाणी सुटले. बर्फाच्या चकचकीत वेष्टनात बुडून गेलेली ऱ्हाइन वाइनची बाटली, ओ हो हो! आनंदाची परिसीमाच नव्हे तर काय? किंवा व्हिल्हेल्म-शालेनमधे म्युएन्शनेर बीअरचा फेसाळलेला प्याला हाती धरता आला तर!

ते असो म्हणा, सहज आठवण झाली म्हणून सांगतो. तुला ठाऊक आहे, टागोर हे ओमर खय्यामच्या भूमीला भेट देणार आहेत आणि राजेसाहेबांच्या खास आमंत्रणावरून. हे आधुनिक ऋषी, राजे महाराजे, मुसोलिनी आणि मेनका यांच्याशी कसे साटेलोटे जमवितात नाही! तुझ्या पत्रात तू 'उबेरमुट' या नितांतरमणीय जर्मन शब्दाचा उल्लेख केला आहेस नाही. खरेच इंग्रजी भाषेत त्याला सुयोग्य असा प्रतिशब्द नाही. पण त्या शब्दातून प्रतीत होणारा तत्त्वज्ञाचा नितांत आशावाद तुझ्यासारखाच माझ्या मनावरही मोहिनी घालीत आहे. अवखळ ट्यूटन्स–भयानक हूण हे असतील तर वासनाविकारांचे मूर्तिमंत अवतार. त्यांनी बेल्जियममधील साऱ्या बालकांचे बळी घेतले ते उगाच नाही. म्हणूनच तर या लहानशा दुर्दैवी देशात जगातील कोणत्याही देशात नसेल इतके विरळ लोकसंख्येचे प्रमाण आहे.

कोणाला काही निरोप? म्हणून तू विचारले आहेस. पण तसा खास कोणाला निरोप नाही, संदेशही नाही. माझ्या शुभेच्छा तेवढ्या सर्वांना कळव. जेकब आणि पॉलच्या[1] घोडचुकांबद्दल मला वाईट वाटते. पण मला वाटते थोड्या दिवसांच्या आत सारी गुंतागुंत दूर होईल आणि आपल्या " सुखी कुटुंबातील " दुजाभाव दूर होऊन पुनर्मीलनाचा सोहळा आपल्याला साजरा करता येईल. आणि परमेश्वरसाक्ष ( माफ कर हं या विकृतीबद्दल ) ते इष्ट आणि आवश्यक नाही काय? टेडीने जो भयानक गोंधळ माजविला आहे त्याबद्दल किती किती लिहावेसे मला वाटते. त्याच्या महामूर्खपणाच्या आचारविचारांचा अस्पष्ट प्रतिध्वनी माझ्या कानी आला आहे. विश्वास बसणार नाही इतका तो आचरटपणा आहे. कधी कधीच त्यांची डोकी ठिकाणावर येणार नाहीत का?[2]

---

१. जेकब कॉल्मेट आणि पॉल फ्रोएलिक हे जर्मनीतील जुने आणि जाणते कम्युनिस्ट पुढारी होत. कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या धोरणाबद्दल नापसंती व्यक्त करणाऱ्या विरोधी दलात ते सामील झाले होते. काही काळानंतर डॉ. रोझेनफेल्ड व त्यांचे इतर सहकारी यांच्यासारख्या डाव्या सोशल डेमोक्रॅटिक सभासदांनी स्थापन केलेल्या जर्मनीच्या सोशलिस्ट लेबर पक्षात ते सामील झाले.

२. अर्न्स्ट थेलमान या कम्युनिस्ट पुढाऱ्याबद्दलचा हा उल्लेख आहे. या पक्षाचे जुने पुढारी, उदाहरणार्थ, हाइनरिच ब्रँडलर, आगस्ट थलहायमेर, जेकब कॉल्मेट यांची

१०

सेंट्रल प्रिझन, बरेली
मे २१, १९३२

अपीलाच्या सुनावणीची तारीख अद्याप ठरली नाही. जुलैच्या अखेरीपर्यंत ती सुनावणी होईल असे दिसत नाही. पण मी फारशा उत्सुकतेने त्याची वाट पाहात नाही. त्या बाबतीत भाबडी आशा लावून ठेवण्यात काही अर्थ नाही. पण सर्वसाधारणपणे अपेक्षा आहे ती अशी (वकील तसे बोलूनही दाखवितात) की शिक्षा बरीच कमी होईल. पाहू या काय होते ते. भवितव्य अवलंबून आहे ते इतर घटकांवर आणि मला चिंता वाटते ती त्यांची.

दुसऱ्या कोणत्या तरी तुरुंगात माझी बदली झाल्याच्या बातम्या फैलावल्यामुळे गेल्या दोन महिन्यांत कोणीच मला भेटायला आले नाही. अखेरीस......पुन्हा गेल्या आठवड्यात भेटून गेला. सर्वांत नजीक तो राहतो. म्हणून सहजपणे तो येऊ शकतो. इतरांना खूप दूरवरचा प्रवास करावा लागतो.

या कामानिमित्त थोडाफार प्रवास तू करू लागली आहेस हे ऐकून आनंद वाटला. घरच्या वातावरणात तुला थोडे चमत्कारिक वाटले असेल नाही ? "जबाबदारीचे आणि संस्कृतीचे" तेथील वातावरण कसे असेल याची मी कल्पना करू शकतो. म्हातारबुवांशी तू आपल्या भवितव्याची चर्चा केलीस का ? ते उपयोगी पडतील असे तुला वाटते का ? वसंतऋतूत ऱ्हाईनलँडची शोभा काय वर्णावी ? किती आल्हाददायक वातावरण असेल तिथे या वेळी. इथे उन्हाळ्याने शीग गाठली आहे. आता संध्याकाळ केव्हाच होऊन गेली आहे. पण हा कागद कसाबसा मी कोरडा ठेवू शकलो आहे. माझे

---

त्या पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर थेलमान हे पक्षाचे पुढारी झाले. १९३२ साली हिटलेर सत्तासंपादनाच्या मार्गावर वाटचाल करीत होता. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे नेतृत्व दुबळे आणि चंचल होते. पण कामकरीवर्ग, विशेषतः सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे सामान्य सदस्य—ज्यांची संख्या कित्येक लाखांनी मोजता येण्यासारखी होती—यांच्या मनात दहशत निर्माण झाली होती. त्यांना व कम्युनिस्ट पक्षातील लक्षावधी सभासदांना फॅसिझमविरोधी संयुक्त आघाडीत सामील करून घेता आले असते. पण त्याच वेळी कम्युनिस्ट पक्ष, जिला विनाशकाळची प्रवृत्ती म्हणता येईल, तिच्या आधीन झाला. या प्रवृत्तीचा जो आविष्कार प्रगट झाला तो असा की, फॅसिझमचा विजय अटळ आहे आणि म्हणून त्याला प्रतिबंध घालण्यात आपली शक्ती वाया दवडली जाऊ नये. या सिद्धांताला अनुसरून कम्युनिस्टांनी प्रत्यक्ष आंदोलनाच्या स्वरूपात फॅसिझमशी एकजूट प्रस्थापित केली व सोशल डेमोक्रॅटिक नेत्यांचा प्रभाव खच्ची करण्याच्या हेतूने आपल्या धोरणाची आखणी केली.

कपडे घामाने चिंब झाले आहेत. तपमानाची तू कल्पना कर. पाऊस येईल तो जुलैच्या मध्याला आणि तरी सुद्धा हवा फारशी सुधारणार नाही. नोव्हेंबरातच थोडा जीवविसावा मिळेल. तथापि मी उन्हाळ्याला बरेच चांगले तोंड देत आहे. माणूस कोणत्याही परिस्थितीशी टक्कर देतो खरा. सुदैवाने तुरुंगाधिकाऱ्यांनी दयाळू होऊन मला मच्छरदाणी पुरविली आहे. खरा अनुग्रह आहे तो. बर्लिनमध्ये सुद्धा आता उन्हाळा असेल. ही उन्हाळ्याची सुट्टी तू कशी घालविणार आहेस ? शहरात राहू नकोस. विश्रांतीसाठी कोठे तरी जा. तुझ्या आप्तांपैकी कोणाकडे तरी – अर्थात रडणाऱ्या त्या भोंदू आत्याकडे मात्र नको. ती जरा सुस्थितीतील आहे तिचे काय ? ती बरी दिसते. किंवा रगुसाला राहते तिच्याकडेही तुला जाता येईल. ते जमेलच नाही तर आपला जुना पुराणा दोस्त फ्यूक्स आहेच.[1] त्याच्याकडे तुला जाऊन राहता येईल. त्यांच्या घराच्या सभोवार सुरेख झाडी आहे आणि तो इतका मद्याचा भोक्ता आहे की त्याचे तळघर उंची मद्याच्या बाटल्यांनी नेहमी फुललेले असते. मार्क्स, मेहरिंग आणि थलहायमेरबद्दल त्याचा सिद्धांत काय आहे माहीत आहे का ? म्हणे त्यांना उत्कृष्ट मद्याची चव होती म्हणून ते इतके थोर प्रज्ञावंत झाले. माझी त्याला आठवण दे हं. १९२० साली मी बर्लिनला गेलो तेव्हा पहिली भेट त्याची घ्यावयाचा मला आदेश होता. त्याला याची आठवण आहे किंवा नाही कोण जाणे ! पण काप्प आणि त्यांचे बंडखोर सैन्य जेव्हा बर्लिनवर चाल करून आले त्याच वेळी मी तेथे पोचलो आणि त्या गोंधळात फ्यूक्सचा मागोवा घेणे कठीण झाले. त्याला पुढे जेव्हा हे कळले तेव्हा तो संतापाने लाल झाला. एडवर्ड फ्यूक्सचा ज्याला केव्हाही, कोठेही बर्लिनमध्ये पत्ता लागत नाही तो महामूर्ख असला पाहिजे अशी त्याची बालंबाल खात्री आहे. मी तसा ठरलो खरा. पण माझ्या या अपराधाची त्याने क्षमा केली.

माझ्या नियोजित साहित्यविषयक साहसाबद्दल ऑगस्ट इतकी दाट आस्था दाखवीत आहे हे ऐकून मला आनंद वाटला. त्याने केलेल्या सूचना मोलाच्या आहेत. पण "भारतीय तर्कशास्त्राचा वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार" असे जे तो म्हणतो, त्याचा अर्थ नीटसा मला कळत नाही. माझे असे स्पष्ट मत आहे की या बाबतीत, युरपमधील संस्कृतज्ञ आणि पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे उपासक यांनी आपल्या कल्पनेला बराचसा ताण दिलेला दिसत आहे. ते कसेही असो, या मुद्द्यावर त्याने अधिक स्पष्ट आणि निश्चित असावे ही माझी इच्छा आहे. पुस्तके आणि साहित्य यांच्या बाबतीतही त्याच्या मदतीवर मी अवलंबून आहे. पूर्वीच मी लिहिल्याप्रमाणे, प्रथम जडवादावरील पुस्तक मला

---

१. एडवर्ड फ्यूक्स हा सुप्रसिद्ध जर्मन समाजवादी पुढारी होता. फ्रान्झ मेहरिंग, कार्ल लिबनेक्ट आणि रोझा लुक्झेम्बुर्गचा तो दोस्त होता. युरोपच्या सांस्कृतिक इतिहासावर त्याने बरीच पुस्तके लिहिली आहेत.

हाती घ्यावयाचे आहे. इतर पुस्तकांसाठी साहित्य गोळा करीत असतानाच मी त्या पुस्तकाची पूर्वतयारीही करू लागलो आहे. त्या दृष्टीने माझी प्रगती समाधानकारक आहे. पुस्तकाचा सांगाडा तयार झाला आहे. परंपरागत असे जे ग्रंथ मला चाळावयाचे आहेत ते येथे उपलब्ध आहेत. पण मला नॅचरल सायन्सेस व विशेषतः सापेक्षतावादाचा सिद्धान्त यावरील अगदी अलीकडील काळात प्रसिद्ध झालेले ग्रंथ हवे आहेत. कारण लँगच्या ग्रंथाच्या ( जडवादाचा इतिहास ) नव्या इंग्रजी आवृत्तीला बरट्रान्ड रसेल यांनी जी प्रस्तावना लिहिली आहे त्यातील दृष्टिकोण मला खोडून काढावयाचा आहे. माझ्या पहिल्या पुस्तकाचा विषय " निसर्ग, जीवन आणि इतिहास यावरील शास्त्रीय दृष्टिकोण" हा राहील. त्यातील उद्देश भारतातील धर्म, तत्त्वज्ञान आणि संस्कृती यांची जडवादी दृष्टिकोणातून समीक्षा करण्यासाठी भूमी तयार करणे हा होय. खाली मी जी तात्पुरती विषयसूची देत आहे तिच्यावरून मला कोणते संदर्भ ग्रंथ लागतील त्याची तुला कल्पना करता येईल.

[प्रास्ताविक : मूळ सिद्धांताचे निरूपण—पाश्चिमात्य संस्कृती ही भारतीय संस्कृती-पेक्षा अधिक जडवादी नाही आणि भारतीय संस्कृती ही अधिक आध्यात्मिकही नाही प्रकरण १ ले : धर्म; प्रकरण २ रे : तत्त्वज्ञान; प्रकरण ३ रे : विज्ञान; प्रकरण ४ थे : अंतिम कारणपरंपरा आणि कार्यकारणभाव; प्रकरण ५ वे : वंशवादाचे सिद्धांत; प्रकरण ६ वे : ध्येयवाद; प्रकरण ७ वे : तर्कवाद; प्रकरण ८ वे : ]

टेडीने अधःपाताचा जो कळस गाठला त्याबद्दल मन खिन्न होणे साहजिक आहे. पण तो आपल्याला तरी अनपेक्षित नव्हता. प्रश्न आहे तो उच्चपदस्थ देव आता तरी इष्ट तो निष्कर्ष काढतील का ? अरेरे ! काय हा विलंब, किती ही अवनती ! परवाच एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने माझ्यापाशी शोक प्रदर्शित करताना म्हटले की, मॉस्कोतील देवांनी मला फार वाईट रीतीने वागविले आणि तसे करण्यात फार मोठी घोडचूक केली. हे ऐकून तुझी करमणूक होईल यात संशय नाही. पण तेवढेच समाधान नाही का ?

रोबसनच्या आठवणीने मला जणू घरची ओढ लागल्यासारखे वाटते. " स्टील अवे " या गीताने तर मला झपाटले आहे. त्यानंतर मला हवेहवेसे वाटले ते भव्य, दिव्य संगीत.—उदाहरणार्थ रिमस्की कोरसाकॉफ, ' इगॉर'चे ऊव्हेरचूर, बीथोवेनच्या सिंफनीज : कितीक आठवणी. चघळत, रवंथ करीत बसाव्या अशा——कधी न संपणाऱ्या.

सेंट्रल प्रिझन, बरेली
११
जून २१, १९३२

आश्चर्य आहे, तुला माझे फेब्रुवारीचे पत्र तेवढे मिळावे. जॅन्युआरीपासून मी महिन्याच्या मध्याला न चुकता तुला लिहीत आलो आहे. माझी पत्रे इतकी सोवळी, इतकी निरपराध, इतकी नियमांच्या चाकोरीत बसविलेली असतात की ती थांबवून धरण्याचे प्रयोजनच नाही. त्यांचा दुसऱ्या कोणाला उपयोगही होण्यासारखा नाही. तुझी पत्रे अगदी वक्तशीरपणे येतात आणि महिन्याच्या मध्याला ती माझ्या हाती पडतात. त्यात खंड पडू नये म्हणून कृपा करून राजकीय स्वरूपाचा मजकूर त्यात घालूच नकोस. अर्थात किती आनंद होईल मला तो असला तर. तेवढी सुद्धा वार्ता कळू नये हे केवढे दुर्दैव नाही का ? पण सध्याच्या माझ्या परिस्थितीत काटेकोरपणे ठरविलेल्या आहारावरच मला जगले पाहिजे. दुर्दैवाने पत्रव्यवहाराबद्दलची परिस्थिती काही सुधारलेली नाही. मला त्याचे फार वाईट वाटते. कारण अधूनमधून मला इतरांना लिहिणे भाग आहे आणि सरळ त्यांच्याकडून पत्र येणेही आवश्यक आहे.

अपीलाच्या सुनावणीची तारीख बहुधा जुलैच्या अखेरीची ठरेल अशी अपेक्षा आहे. मग मात्र तातडीने ती चालेल आणि दुसऱ्या महिन्याच्या मध्यापर्यंत निर्णयही लागेल. वकिलांच्या बाबतीत काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. स्वतःचे अपील स्वतःच चालविण्याची परवानगी मिळण्याची शक्यता नसल्यामुळे धंदेवाईक वकिलाकडे हे काम सोपविणे मला भाग पडले. राजकीय खटले चालविण्यात निष्णात असलेल्या सर्वोत्कृष्ट वकिलाची नेमणूक करण्यात आली आहे. पण तो कलकत्त्याचा आहे. माझ्या-कडून सल्ला घेण्यासाठी इतक्या दूरवर येणे त्याला कठीण आहे. त्याला बराच खर्चही येईल. त्यानंतर ज्या कोर्टात अपीलाची सुनावणी होईल ते कोर्ट येथून तीनशे मैलांवर आहे आणि माझे भवितव्य ते जव्हा ठरवील तेव्हा त्या कोर्टाच्या आसमंतातही मी असू शकणार नाही. कायदा आहे तो असा.

गणित आणि आकड्यांची मोजदाद करणे यात मी अगदीच अनभिज्ञ आहे असे नव्हे. पण काही वेळा सुरुवातीला माझे सारे अंदाज चुकलेले दिसून येतात. हा जो गोंधळ होतो त्याचा उगम शाळेतील माझ्या काही वाईट खोडीकडे नेऊन भिडविता येईल. त्या वेळी एक मूर्ख शिक्षक मला बीजगणित शिकविण्याचे ढोंग करीत असे. पण वस्तुतः त्याला गणिताचे मुळाक्षरही अवगत नव्हते आणि मी नेहमी त्याचा वर्ग चुकवीत असे.

बौद्धिक खाद्य पूर्णपणे संपुष्टात आलेले नाही. शिवाय येथूनही मी त्यात भर टाकीत असतो. पण मला अधिकाधिक पुस्तकांची गरज आहे. गेल्या पत्रात ज्या पुस्तकाची मी पूर्वतयारी चालविली आहे त्याची प्राथमिक विषयसूची मी निर्देशित केली

आहे. त्यावरून मला कोणते साहित्य हवे त्याची कल्पना करणे सोपे जाईल. ऑगस्ट हे काम उत्कृष्टपणे करील. त्याला सांग की सध्या भारतीय तत्त्वज्ञानातील सांख्य पद्धतीचा मी बराच काळजीपूर्वक अभ्यास करीत आहे आणि तीत बरेच आकर्षक मुद्दे मला आढळून येत आहेत की ज्यांचे स्पष्टीकरण करणे उपयुक्त ठरेल. हिंदुधर्म व तत्त्वज्ञान यावरील दुसऱ्या पुस्तकात मी त्यांचा समाचार घेणार आहे. उदाहरणार्थ, तीत मला सहीसही कार्टेशियन कोजिटो अर्गो सम ( Cogito Ergo Sum ) आढळून आले. एपिक्यूरसशी जुळणारे मुद्देही सांख्य पद्धतीत आढळून येतात आणि त्याहीपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे ती ही की, लॉकच्या सेन्सेशनॅलिझमचेही अंश तीत अंतर्भूत झालेले आहेत. तथापि त्याच्याशी जुळती होणारी सामाजिक पार्श्वभूमी मात्र संशोधनाच्या आधारे हुडकून काढावी लागेल. ऐतिहासिक दाखले त्या दृष्टीने उपलब्ध नाहीत. तो काळही वादग्रस्त आहे. अंतर्गत पुराव्यावरून असे दिसून येते की सांख्यदर्शन हे सहा दर्शनांतील अखेरचे होय. पण परंपरेनुसार ते अग्रेसर मानले जाते. मी या बाबतीत वाटेल तेवढे लिहू शकेन. कारण माझे मन त्यातच सध्या व्यग्र आहे. पण जागा कोठे आहे. माझी तातडीची गरज म्हणजे अगदी अलीकडील शोधांचा समाचार घेऊन नॅचरल सायन्सेसच्या प्रगतीचा आढावा घेणारा सर्वसंग्राहक प्रबंध ही होय. वायलच्या तळघरात असलेल्या माझ्या ग्रंथसंग्रहातील या विषयावरील काही पुस्तके शोधून काढून ती माझ्याकडे तुला पाठविता येणार नाहीत काय ![1]

माझ्या प्रकृतीची वगैरे काळजी करू नकोस. सर्व अडचणींतून मी निश्चित बाहेर पडेन. गेले दोन महिने भयानक उन्हाळा आहे. पण लवकरच पाऊस पडू लागेल.

## १२

सेंट्रल प्रिझन, बरेली
जुलै ११, १९३२

माझ्या परिस्थितीत सुधारणा नाही. म्हणजे आपला पत्रव्यवहार पूर्वीसारखाच चालू राहणार. पत्रल्याने आपली भेट अधिक लवकर होऊ शकणार नाही. अर्थात दोस्त मंडळी जेवढे करणे शक्य आहे तेवढे करीत आहेत. परंतु एकंदरीने सारा कारभार मंदगतीनेच चालतो. त्यानंतर इतर मंडळीही माझ्यासारख्याच परिस्थितीतील आहेत. तेव्हा कोणी कोणाला मदत करावयाची ? माझे सारे लेखन नैसर्गिक साधनांनीच होत आहे. टाइपरायटर येथे कोठे मिळणार ? पण तेवढीच अडचण नाही आणि

---

१. मागाहून मला कळून आले की बर्लिनमधे मी सोडून आलेली पुस्तके आणि हस्तलिखितेही नात्सी सत्तारूढ झाल्यानंतर त्यांनी जप्त केली.

टाइपरायटर नसणे ही काही तशी फार मोठी अडचणही नव्हे. पण माझ्या बाबतीत असे झाले आहे की, परमेश्वराने दिलेल्या साधनाचा उपयोग करणे मी विसरूनच गेलो आहे. त्यानंतर माझी योजना सिद्धीस जाण्याच्या मार्गात अशा काही अडचणी येत आहेत की ज्यांच्यामुळे योजना बारगळून जाईल की काय अशीही मला भीती वाटू लागली आहे. तथापि आहे त्या परिस्थितीत मी जेवढे शक्य तेवढे करीत आहे. या एका आशेवर की अखेरीस कशी तरी अडचणींची गुंतागुंत दूर होईल. एकंदरीने मात्र माझी प्रगती समाधानकारक आहे. पण बाहेर मात्र सध्या काहीच पाठविता येणार नाही. त्याला अनेक कारणे आहेत. म्हणजे काय माहीत आहे का ? जगाने धीर धरला पाहिजे. "या शतकातील आदर्श ग्रंथ" प्रगट व्हावयाला बराच कालावधी लागेल.

माझ्या बौद्धिक खाद्याबद्दल फारशी चिंता करू नकोस. झालेला पुरवठा टिकून आहे, आणि येथूनही मला बऱ्याचशा महत्त्वाच्या पुस्तकांचा पुरवठा होत आहे. बहुतेक परंपरागत अभिजात ग्रंथ येथे उपलब्ध आहेत. मला ते मिळावयाला अडचणी येतात यात संशय नाही. पण माझी सर्वांत मोठी अडचण आहे ती ही की, मार्क्सवादी वाङ्मय तसेच विज्ञान व तत्त्वज्ञान यावरील वैशिष्ट्यपूर्ण साहित्य मला मिळू शकत नाही.

आता पुस्तकांबद्दल पुरे. तुझ्याकडून येणारा वार्ताविहार मोठा मनोरंजक असतो. अशाच गप्पासप्पा मला न चुकता पाठवीत जा. सध्याच्या माझ्या भयानक परिस्थितीत त्यांच्यामुळे माझी चांगली करमणूक होते. तुझ्या मानलेल्या पितृभूमीतील ( जर्मनी ) त्रस्त परिस्थितीबद्दल काहीना काही बातम्या झिरपत माझ्यापर्यंत येऊन पोचतात. पण तुला एक महत्त्वाची माहिती जाता जाता देऊन ठेवतो. तिसऱ्या राइशच्या भावी अध्यक्षांचा चान्सेलर माझ्या ओळखीचा झाला होता. वॉशिंग्टनमधे लष्करी सल्लागार म्हणून वावरत असताना, मध्य पश्चिमेतील जर्मन – अमेरिकन किसानांमध्ये देशभक्तीची भावना चेतविण्याचा तो प्रयत्न करीत असताना त्याची माझी ओळख झाली होती-- बिचाऱ्याला त्या बाबतीत सपशेल अपयश आले. पण या कहाणीचा उच्चार करू नको हं. ती त्याच्या कानी गेली तर तो तुला लगेच हाकलून लावील. माझ्याशी त्याची जी चकमक झडली तिच्याबद्दलच्या त्याच्या आठवणी फारशा मधुर खास नाहीत.

माझ्या कानी ज्या वार्ता पडत आहेत त्यावरून मला असे कळते की, अलीकडे फ्रान्समध्ये ज्या निवडणुकी झाल्या तीत सिंहाच्या ( ट्रॉटस्की ) अनुयायांना फार मोठा विजय मिळाला. त्यांनी म्हणे अधिकृत प्रतिस्पर्ध्यांना ( कम्युनिस्ट पक्षाचे सभासद ) सपशेल धूळ चारली. म्हणजे त्या देशाच्या व्यवहाराचे दिवाळेच वाजले असे म्हणावयाचे ! किती दारुण दुर्घटना आहे नाही का ही ! बिचारा कचीन पराभूत झाला. बापड्याला हृदयविकाराचा झटका आला असेल. पॅले बोरबोनच्या बाहेर तो जिवंत तरी कसा राहू शकेल. या जुनाट राजवाड्यातील कोंडलेल्या हवेत त्याने थोडीथोडकी वर्षे काढलेली नाहीत. मला वाटते, पहिल्या कन्व्हेन्शनच्या दिवसापासून अव्याहतपणे तो

येथील हवा खात आला आहे. आणि चेंबर ऑफ डेप्युटीज त्याच्याशिवाय ? कल्पना सुद्धा करवत नाही. महान क्रांतीच्या परंपरेचा अवशेष तेथे नसताना पार्लमेंटची शोभा ती काय राहिली ? पण दोरियोची काय हालहवाल आहे ? मॉस्कोतील देवदेवतांनी त्याला कायमचे झिडकारून टाकले काय ? अहो दुर्भाग्यम् !

इन्फ्लुएंझाने जी बारीकशी चुणूक मला दाखविली त्याबद्दल चिंता करावयाचे कारण नाही. मला खरा त्रास झाला तो उन्हाळ्याचा. या वर्षी उन्हाळ्याची तीव्रता भयानक होती. त्याने शीग गाठली खरी; पण अद्याप पावसाचे नावनिशाणही नाही. हे वर्ष अवर्षणाचे जाणार असे दिसते. तेवढेच कमी होते -- दुर्दैवाचा पेला काठोकाठ भरून जाण्यासाठी ! उन्हाळ्याचा मला जरा शीण आला आहे. पण पाऊस आणि थंडी आली की मी तग धरीन. अर्थात तोवर मी बंदिवान असलो तरी. जागेच्या अभावी तुरुंगातील माझ्या जीवनाचा साद्यंत वृत्तांत मी तुला देऊ शकत नाही. काहीतरी कंटाळवाणेच वर्णन होईल ते. दुःखात सुख आहे ते हे की, या वर्षी आमच्या समोरच्या बागेत पांढरी फुले फुलली आहेत. पण माझ्या आवाक्याच्या बाहेर आहेत ती ( इथे बरीचशी वाक्ये खोडून टाकण्यात आली आहेत. ) [1]

ऑगस्टकडून आणखी काही सूचना मला हव्या आहेत. त्या आल्यानंतर पुस्तकाची रूपरेषा नव्याने आखून माझी विषयसूची मी पाठवीन. प्राचीन भारताबद्दल विश्वासार्ह असे ऐतिहासिक साहित्य उपलब्ध नसल्यामुळे माझी बरीच अडचण होत आहे. चिकित्सक असे लेखन त्यावर झालेलेच नाही. भारतीय विचारप्रवाहातील ज्याला विस्मृतीच्या पडद्याआड गेलेले प्रकरण म्हणता येईल, असे एक प्रकरण मी शोधून काढले आहे. विरुद्ध बाजूच्या आणि विजेत्या विचारधारेच्या साहित्यात जो काही तुटक आणि तुटपुंजा पुरावा विखुरलेला आढळून येतो, त्यातूनच दडपून टाकण्यात आलेल्या

---

१. खरे सांगावयाचे तर माझी प्रकृती आणि तुरुंगातील माझे जीवन याबद्दलचे सारे उल्लेख माझ्या पत्रातून खोडून टाकले जात. हे पत्र लिहीत असताना मी बराच आजारी होतो व हॉस्पिटलमध्येही माझी पाठवणी करण्यात आली होती. तुरुंगावरील अधिकाऱ्याचे पुढील पत्र माझ्या पत्रासोबत जोडण्यात आले होते. " गेले एक-दोन आठवडे, उन्हाळा आणि इतर कारणांमुळे रॉय यांची प्रकृती विशेष ठीक नव्हती. त्या दृष्टीने हलकेफुलके वाचन तेवढे त्यांनी करावे आणि सध्या राजकीय व तत्सम विषयाचे वाचन त्यांनी पूर्णपणे वर्ज्य करावे असा सल्ला त्यांना देण्यात आला आहे. तुम्ही सुद्धा आपल्या पत्रात अशाच हलक्या आणि घरगुती विषयांचाच उल्लेख करणे बरे. तुरुंगाधिकारी आणि वैद्यकीय सल्लागार या दोन्ही नात्यांनी रॉय यांची व्यवस्था मला करावयाची असल्यामुळे त्यांच्या हिताच्या दृष्टीनेच मी ही सूचना करीत आहे."

व गवसलेल्या या विचारधारेचा प्रत्यय येतो. प्राचीन सोफिझम किंवा अलीकडील अज्ञेय-वाद यांच्याशी ही विचारधारा मला मिळतीजुळती दिसते. काही टीकात्मक लेखनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की सांख्य विचारपद्धतीचे उद्दिष्ट पाखंडी आणि संशयात्मे यांचे खंडन करणे हेच आहे. त्या काळच्या ऐतिहासिक पुराव्याच्या अभावी विचारांची तर्क-शुद्ध मांडणी करणे मला फार जड जात आहे.

मला कळण्यापूर्वीच कागद संपून गेला आणि लिहिण्यासारख्या कितीकिती गोष्टी अद्याप शिल्लकच आहेत.

## १३

सेंट्रल प्रिझन, बरेली
ऑगस्ट ८, १९३२

जुलैच्या तुझ्या पत्रात जो सामुदायिक संदेश तू समाविष्ट केला आहेस तो पाहून किती आनंद झाला म्हणून सांगू. त्यांच्यापैकी प्रत्येकाला उत्तर लिहिण्याची माझी केवढी तरी इच्छा आहे. पण त्यांना म्हणावे ते शक्य नाही. आणि म्हणून माझ्या शुभेच्छा-वरच—जर्मन भाषेत ग्लुएकवून्श म्हणतात नाही का ?—त्यांना समाधान मानून घ्यावे लागेल. ज्या परिस्थितीत त्यांची बैठक झाली तिचा विचार करता, ही एक अपूर्व महत्त्वाची बैठकच होती. मी त्या बैठकीला हजर असतो तर किती चांगले झाले असते. जर्मनीतील घडामोडी मन भयभीत करणाऱ्या आहेत. अजून तरी मॉस्कोतील देव धडा घेतील काय ?[1]

माझ्या मागील पत्रात सुपरिंटेंडेंटचे जे पत्र जोडले गेले होते त्यामुळे तू अस्वस्थ झाली असशील. पण मी तरी काय करू ? माझ्या पत्रात मी आजारीपणाचा उल्लेख केला नाही. कारण त्यामुळे तुझी चिंता तेवढी वाढली असती आणि उपयोग मात्र काही झाला नसता.[2] आता माझी प्रकृती पुष्कळच सुधारली आहे. या वर्षीचा उन्हाळा भयानक होता आणि पाऊस बराच लांबला. त्यामुळे माझ्या जुन्या हृदयविकाराच्या

---

१. फॅसिझम जर्मनीत सत्ता काबीज करीत असताना कम्युनिस्ट इंटरनॅशनलने ज्या धोरणाचा पाठपुरावा केला होता त्या धोरणाला विरोध करणाऱ्या कम्युनिस्टांची एक परिषद भरली होती. तिच्याबद्दलचा हा उल्लेख आहे.

२. पूर्वीच्या तळटीपेमधे म्हटल्याप्रमाणे आजारीपणाचा उल्लेख मी पत्रात केला नाही. त्याचे खरे कारण हे आहे की तसा उल्लेख करण्याची मला परवानगी नव्हती. आता या पत्रात प्रकृतीचा उल्लेख करण्याची परवानगी मिळाली ती प्रकृती सुधारल्याची वार्ता देण्यासाठी. वस्तुतः तशी सुधारणा झालेलीही नव्हती.

दुखण्याने उचल खाल्ली आणि काही काळ मला अंथरुणात झोपून राहावे लागले. या दुखण्याचा मला किती त्रास होतो याची तुला कल्पना आहे. त्यानंतर जो अशक्तपणा येतो तो महिने न् महिने टिकून राहतो. यावरचा जो उपाय तात्काळ फलदायक होतो तो म्हणजे उंच हवेच्या ठिकाणी जाऊन राहणे. पण सध्याच्या माझ्या परिस्थितीत तो उपाय शक्य नसल्यामुळे प्रकृतीत आपोआप जो उतार पडेल त्यावरच अवलंबून राहणे भाग आहे.

सुदैवाने पाऊस एकदाचा आला. पुरेसा नाहीच. पण निदान थोडी सुटका देण्यापुरता तरी खास आहे. हवेत बराच गारवा आला आहे आणि म्हणून अलीकडे मला पुष्कळच बरे वाटू लागले आहे. तू आता मुळीच काळजी करू नकोस. लवकरच मी धट्टाकट्टा होईन असे वाटू लागले आहे. माझ्या परिस्थितीतील माणसाने आजारी पडणे हे खरोखरीच एक दुर्दैव आहे. या आजारीपणामुळे वाचन आणि लेखन हा जो माझा एक विरंगुळा होता तोही नाहीसा झाला आहे. कारण आता हलक्याफुलक्या वाचनापलीकडे काही गंभीर लेखन-वाचन करावयाची मला परवानगीच नाही.

माझ्या प्रकृतीमुळे अलीकडे माझे दैनंदिन जीवन पूर्वीपेक्षाही अधिक कंटाळवाणे झाले आहे. त्यामुळे विशेष काही लिहिण्यासारखेही नाही. शिवाय जे लिहावयाचे ते जपून आणि आडवळणाने लिहिले पाहिजे. सूत कातण्याचा सुरेख उद्योग मी तीन महिन्यांपूर्वीच आजारीपणामुळे सोडला. पण थोडक्या काळात या मध्ययुगीन कलेच्या बाबतीत मी खूपच प्रगती केली होती. पण आम्ही काही तलम कापडासाठी सूत कातीत नाही; तुरुंगातील ब्लँकेटसाठी ही सुतकताई असते. मला ज्या खोलीत ठेवण्यात आले आहे ती एक लांबरुंद खोली आहे. तीत आणखी एक सहकैदी आहे. पूर्वी दोघे होते. अलीकडेच एकाला दुसरीकडे नेण्यात आले. सबंध दिवसभर खोली उघडी असते. रात्री मात्र कडीकुलपात बंदिस्त करण्यात येते. गेल्या काही महिन्यांत जेव्हा उष्णतेचा कडाका होता तेव्हा रात्री खोलीत कोंडून राहावे लागणे हा एक भयानक अनुभव होता. दिवसा खोलीबाहेरच्या पडवीत मला हिंडता येते. पण गेल्या दोन महिन्यांत मी हिंडूच शकलो नाही. माझा संसार म्हणजे लोखंडी कॉट, त्यावर काथ्याची गादी. एक टेबल, स्टूल आणि पुस्तकासाठी एक शेल्फ. शिवाय खाणे, पिणे आणि धुणे यासाठी काही भांडी. एकंदरीने, प्राप्त परिस्थितीत एवढे साहित्य पुरेसे आहे असे म्हणावयास हरकत नाही. त्यानंतर, तुला माहीतच आहे की या बाबतीत मी तसा बेफिकीर असतो. म्हणजे जीवनातील चांगल्या गोष्टी माझ्या वाट्याला आल्या तर त्या मी झिडकारीन असे मात्र नाही. येथील अन्नसुद्धा बरे आहे. त्याला थोडी जोड मिळाली—जशी कानपूरला सोय होती—तर कोणाला नको आहे ? आपले छोटे राजेसाहेब, येथून जवळच असल्यामुळे ते दर महिन्याला भेटावयाला येतात. आणि मग तुरुंगातील एका अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली आम्हाला वीस मिनिटे बातचीत करता येते. ( काही मजकूर येथे खोडून

टाकण्यात आला आहे) अशा परिस्थितीत काय बोलता येत असेल त्याची तूच कल्पना कर.

अपीलाची तारीख अद्याप ठरली नाही. थोडेसे चमत्कारिक आहे हे. कारण अपीलाला एवढा वेळ लागत नाही. आम्हाला वाटले होते की जुलैच्या अखेरीस अपील निघेल. काही झाले तरी ते लवकरच निघाल्याशिवाय राहणार नाही. सारेच जण त्या बाबतीत आशावादी आहेत. आपले वकील (राजकीय खटल्यातील सर्वोत्कृष्ट) म्हणतात की साधारणपणे नव्वद टक्के आपल्या बाजूने निकाल लागेल. पण तू मात्र भाबडी आशा लावून बसू नकोस. "साधारणपणे" हा शब्दप्रयोग फार सूचक आहे. बर्लिनच का, जवळ जवळ सारे जग अत्यंत असाधारण परिस्थितीतून जात आहे (काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे.)

## १४

सेंट्रल प्रिझन, बरेली
सप्टेंबर १३, १९३२

उजवा खांदा संधिवाताने धरल्यामुळे या महिन्याचे पत्रलेखन मला एक आठवडाभर पुढे ढकलावे लागले. अलीकडे माझ्या परिस्थितीत थोडा बदल झाला आहे. (एक वाक्य खोडून टाकण्यात आले आहे) पण अस्वस्थ होऊ नकोस. हृदयविकाराचे दुखणे रेंगाळल्यामुळे माझी विशेष काळजी घेणे भाग पडले एवढेच. अखेरीस पावसाने संततधार धरली आहे. हवामान थंड झाले आहे. आणि त्यामुळे माझी प्रकृती आता ताळ्यावर येईलच अशी मला खात्री वाटू लागली आहे.

इतर परिस्थिती मात्र तशीच कायम आहे. आता असे दिसते की अपील नोव्हेंबर अखेरीपर्यंत तरी निघणार नाही. त्याचा अर्थ, अपील ऐकले जाण्यापूर्वीच माझ्या सजेचे एक वर्ष मी पुरे करणार आहे. बारा वर्षे डोळे लावून बसण्यासाठी मनाची तयारी करावयाला तू लागली आहेस का ? आधुनिक काळातील महाकाव्यासाठी तो किती उदात्त विषय होईल नाही का ? पण लक्षात ठेव. पेनेलोपने सुद्धा त्या प्राचीन काळातील सभ्य संस्कृतीच्या मर्यादेत थोड्याफार स्वातंत्र्याचा उपभोग घेतलाच. भावी होमरला आपले महाकाव्य लिहिण्यासाठी अधिक चांगला काव्यविषय का बरे मिळू नये ?—प्राचीनांच्या कल्पनेपेक्षा अधिक हृदयंगम. शिवाय आधुनिक "ओयेसस" तर कल्पित सद्गुणांच्या तशाच खऱ्या गुणांच्या बाबतीत किती किती तरी भिन्न असणार आहे. पण माझा असा विश्वास आहे की, आधुनिक होमरला स्फूर्ती देणारे जीवन जगण्यासाठी तुला संधी मिळणार नाही. नाही तरी या वादळी आणि तणातणीच्या दिवसांत महाकाव्य कोण वाचणार आहे ?

माझ्या ग्रंथाच्या बाबतीत काही प्रगती झाल्याचे मला कळविता येत नाही याचे मला फार वाईट वाटते. ( काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे ) मला हल्ली गंभीर वाचनही करू दिले जात नाही. वेळ घालविण्यासाठी हलके-फुलके वाचण्याची तेवढी मला परवानगी आहे. माझ्याजवळचा कादंबऱ्यांचा साठा केव्हाच संपुष्टात आला. येथील मित्रांकडून कादंबऱ्या मिळणे कठीण आहे. तथापि काही मला मिळाल्या. पण जीवनातील अनेक अंगोपांगांप्रमाणे साहित्यिक आवडीनिवडींच्या बाबतीतही हा देश बराच मागासलेला आहे. माझ्याजवळ ज्या कादंबऱ्या आहेत त्यांत आश्चर्यकारक विविधता आहे. एक कादंबरी आहे अति वास्तववादी, इंग्रजी कादंबरीकार मायकेल आर्लेन याची **ग्रीन हॅट** ही. "पाश्चिमात्य जडवादा" बद्दल तिरस्कार दाखविणाऱ्या राष्ट्रात अशा प्रकारच्या मजकुराला वाचक मिळावे याचे मला आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही. मला मात्र तीत असे काही आढळले की ज्यामुळे ती कादंबरी मला बरीच मनोरंजक वाटली. या कादंबरीतील नायिकेचा विवाह जुळला होता, प्रतिष्ठितपणे. पण तिला बालपणीचा एक स्नेही भेटतो आणि ती अजाणतेपणाने त्याच्या प्रेमात पडते ( प्रतिष्ठितपणे विवाह जुळल्यामुळे तिला अर्थातच जाणतेपणाने असा अनाचार करणे शक्यच नाही ! ) पण ती प्रेमात का पडली माहीत आहे का ? कारण म्हणे, त्या पुरुषाने "भल्या मोठ्या कुत्र्याच्या डोळ्यांनी" तिच्याकडे पाहिले. कमाल आहे की नाही ?

पुस्तकांबद्दल लिहीत होतो म्हणून आठवण झाली. थोड्या दिवसांपूर्वी माझ्याकडे एक पुस्तक आले— ॲग्रेरियन क्रायसिस इन द यू. एस्. ए. ज्युलियन गुम्पेर्टझ याने ते पुस्तक लिहिले आहे. बहुधा त्यानेच पाठविले असावे. फ्रँकफुर्ट इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमध्ये तो या विषयावर अभ्यास करीत होता तेव्हा त्याची आणि माझी भेट झाली होती. खरंच तो आता कोठे आहे याचा तपास घेशील का ? त्या वेळी त्याची इच्छा होती पूर्वेकडे जाऊन ॲग्नेस स्मेडले बरोबर राहण्याची.

नवी पुस्तके मिळाली तर मला हवीच आहेत. पण तशी घाई नाही. काही चांगल्या कादंबऱ्या मात्र जरूर पाठव. मी बऱ्याच काही नव्या आणि मनोरंजक पुस्तकांवरील अभिप्राय पाहिले. त्यांपैकी एक ब्रिटिश राजदरबारातील सोव्हिएट वकिलाच्या पत्नीची--गॅलीना सोकोलनिकोव्हा--साहित्यकृती आहे. पुस्तकाचे नाव "नाइन विमेन ऑफ द रेव्होल्यूशन" असे आहे. त्या पुस्तकावर अभिप्रायही खूप आले आणि बहुतेक चांगले आहेत. पुस्तकाचे स्वागत एकंदरीत चांगले झाले आहे. गॅलीनाने काय लिहिले आहे, कसे लिहिले आहे हे पाहण्याची मला उत्सुकता आहे. म्हणजे लेखिका म्हणूनसुद्धा ती यशस्वी झाली आहे की काय हे मला पाहावयाचे आहे. वकिलीणबाई म्हणून तिने बरेच यश मिळविल्याची वार्ता आहे. लंडनच्या सामाजिक जीवनाचा परामर्श घेणाऱ्या वृत्तपत्रीय लेखनावरून असे दिसले की वकिलीणबाईची प्रतिष्ठा ती मोठ्या नाजुकपणाने सांभाळीत असते. मदाम सोकोलनिकोव्हा यांच्या महापार्ट्यां

" आल्हाददायक " असतात आणि विशेषतः यजमानीणबाईच्या "मधुर पण वेगळ्याच" शब्दोच्चारांमुळे तर त्या पार्ट्यांची लज्जत न्यारी ठरते असा अभिप्राय वृत्तपत्रातून प्रगट केला जातो. पहा बरे, केवढ्या गप्पासप्पा मी जमविल्या आहेत. अर्थात आचरटपणाच्या, पण कसे असले तरी गॅलीनाचे पुस्तक मला पाठवून दे. तिनेही पाठविले असते. पण राजनैतिक पेचप्रसंग त्यातून उद्भुत व्हावयाचा— न जाणो तिच्या नवऱ्याला " अनिष्ट परदेशी व्यक्ती " म्हणून इंग्लंडला सोडचिठ्ठी द्यावयाची वेळ यावयाची. जग तरी किती विचित्र आहे नाही ! राजदरबारातील वकीलपद कोण भूषवीत आहे ? प्रथम खिडक्या धुणारा, नंतर वृत्तपत्राचा संपादक, नंतर लष्करी नियंता आणि नंतर अर्थखात्याचा कमिसारियट. काही लोकांना त्यातही खुमारी वाटते खरी.

जर्मनीमधे झपाट्याने घडामोडी होत आहेत आणि परिस्थिती मात्र आहे तशीच टिकून आहे. या साऱ्या गोंधळाचे वैशिष्ट्य म्हणून जर कोणता धडा घ्यावयाचा असेल तर तो हा की, फॅसिझमचा एकच ठराविक साचा नाही. त्याचे स्वरूपही वेगवेगळे असते आणि तो निरनिराळ्या मार्गांनीही चढाई करीत असतो. आपण पहिल्यापासूनच हा दृष्टिकोण पुढे मांडला आहे. पण " आम्ही सांगत नव्हतो " असा अभिमानाने पुकारा करण्यात समाधान तरी कोणते ! सभोवारचे सारे जग कोसळून पडत असताना या अभिमानाला काही अर्थ तरी आहे का ? ते असो म्हणा. सारे आसमंत धडाडून पेटेपर्यंत आपल्या जागी पाय रोवून बसण्याचा तुझा निर्धार चांगला आहे.

## १५

सेंट्रल प्रिझन बरेली
नोव्हेंबर ६, १९३२

तुमच्याकडच्या जगातील फारच थोडी वार्ता आम्हाला कळते. फॉन पापेन यांचे मंत्रिमंडळ—" कॅबिनेट ऑफ मॉनॉकल्स " म्हणतात ना त्याला ?– स्थिरस्थावर झालेले दिसत आहे. फॉन पापेन यांची श्रद्धाळू धर्मनीती आणि त्यांचे फ्रेंच भाषेवरील प्रभुत्व यांच्या आधारे त्यांना ऱ्हाइन पलीकडील आपल्या शेजाऱ्याची मनमिळवणी करता येईल. विशेषतः " पूर्वेकडे चाल करून जाण्याच्या " बिस्मार्क यांच्या धोरणाचा त्यांनी पाठपुरावा केला, तर त्यांना फ्रान्सची मैत्रीही संपादन करता येईल; आणि शस्त्रास्त्रांच्या बाबतीत संतोष धरण्याच्या अटीवर त्यांनी ही सौदेबाजी करण्याची तयारीही ठेवलेली दिसत आहे. आंतरराष्ट्रीय दृष्टीने या मंत्रिमंडळाचे यश अपयश काहीही असो, हेर जनरल-लेफ्टनंट ( श्लायशर ) यांनी उद्धट ॲडॉल्फला चांगलीच जरब बसविली आहे. सारे रस्ते रोमकडे जातात खरे; पण रोमकडे चला असे म्हणून रोमवर मोर्चा नेण्यात नेहमी यश येते असे नव्हे. तुझ्या देशाबद्दल खडान् खडा माहिती मी मिळवीत असतो नाही ?

तुम्हांला माझ्या देशाबद्दल अशी माहिती उपलब्ध होत असते का ?

मला टाइपरायटर देता येईल का अशी पृच्छा......यांनीही तुरुंगाच्या सुपरिंटेंडं-टला केली होती. ती मागणी मान्य होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मी तत्काळ जे काम हाती घ्यावे,[1] अशी सूचना करण्यात आली आहे. तिच्याबद्दल मला एवढेच म्हणावयाचे आहे की, दोन कारणांसाठी मला ती सूचना स्वीकारता येत नाही. एक तर सध्याच्या माझ्या परिस्थितीत अशा तऱ्हेचे पुस्तक मला हवे तसे लिहिता येणार नाही. दुसरे तुरुंगात अशा तऱ्हेचे राजकीय पुस्तक लिहावयाला मला परवानगी मिळणार नाही. ते काही असो, मला उपयोगी होतील असे आत्मचरित्रपर ग्रंथ मला मिळाले तर फार बरे होईल. तू काही पुस्तके पाठविली असल्याचा उल्लेख केला होतास (उदाहरणार्थ, "ब्राइफवेश्शेल" — मार्क्स व एंगल्स यांचा पत्रव्यवहार वगैरे) ती पुस्तके मला मिळाली नाहीत. त्यांचे काय झाले असेल कोण जाणे. सध्या मला पुस्तकांची फारशी टंचाई भासत नाही. गेल्या चार-पाच महिन्यांत गंभीर लेखन वा वाचन मला करताच आले नाही. लवकरच ते मी हाती घेईन असे मला वाटते. आता हवा पुष्कळच सुधारली आहे आणि हिवाळ्यात तर येथील हवा छानच असते. म्हणजे माझी प्रकृती चांगली व्हावयाला हरकत नाही. अपील या महिन्याच्या अखेरीपर्यंत सुनावणीसाठी निघेल. पण वकिलांच्या बाबतीत थोडासा घोटाळा झालेला दिसत आहे. तेव्हा माझा विचार चालला आहे की, स्वतःचा बचाव स्वतःच करावा.

## १६

सेंट्रल प्रिझन, बरेली
डिसेंबर ७, १९३२

तुटक तुटक अशा माझ्याकडे जमणाऱ्या वार्तांचा विचार करता, जर्मनीतील एकंदर परिस्थिती मला खरोखरच विलक्षण गोंधळ निर्माण करणारी वाटते. तिथे प्रत्यक्ष काय चालले आहे ते मला पाहता आले असते तर! मी जर्मनी सोडल्याला आता दोन वर्षे उलटून गेली. काय गंमत आहे पाहा. हा कालावधी जितका दूरवरचा तितकाच नजीकचा वाटतो. विश्वास बसत नाही की, बरोबर दोन वर्षे आणि अकरा दिवसांपूर्वी मी व्हेरो-नाच्या प्लॅटफॉर्मवर उभा होतो. दरम्यान असंख्य घडामोडी झाल्या आहेत. या दोन वर्षांत जग नेहमीच्या जीवनापेक्षा दस पटीने अधिक जीवन जगले आहे. पण तरी त्याच्या आठवणी मात्र काल घडाव्या तशा ताज्या आहेत.

---

१. मित्रांनी मला अशी सूचना केली होती की, तुरुंगात असतानाच मी माझ्या आठ-वणी लिहून काढाव्या. एक अमेरिकन प्रकाशक त्या आठवणी प्रसिद्ध करण्यासाठी उत्सुक होता. मला फार मोठी रकम त्यासाठी देऊ करण्यात आली होती.

तुझ्या आवडत्या शेतकीविषयक अध्ययनाचा तुला त्याग करावा लागत आहे हे वाचून फार वाईट वाटले. पण त्या दृष्टीने तू आपल्या मनाची काही काळ तयारीच करीत होतीस ना ? ज्या पत्रकाराबरोबर तू आता काम करीत आहेस तो एक अजीब नमुनाच दिसतो आहे. मॉनोकल्सचे मंत्रिमंडळ अधिकारारुढ झाले तेव्हा त्याला मोठी आशा वाटली असेल. आता त्याला कसे वाटत आहे ? जर्मन उमरावांचे ( हेरेनक्लासे ) निळे रक्त सुद्धा शक्तिमान झालेल्या जर्मनीत नवे चैतन्य निर्माण करावयाला उपयोगी पडणार नाही. तत्त्वतः ऑगस्टशी माझे पूर्ण सहमत असले तरी चार्ली चॅपलिनसारख्या मिश्या ठेवणाऱ्या नेत्यांच्या भवितव्याबद्दल मी इतका आशावादी नाही. मला तर असे वाटू लागले आहे की, त्याने घिसाडघाईने पावले टाकली आहेत. ज्या दलाची तो उभारणी करू पाहात आहे त्याला जर्मनीपुरते तरी वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप हवेच आहे.

माझी प्रकृती आता पुष्कळच सुधारली आहे. हॉस्पिटलमधून मी आता बाहेर पडलो आहे. हिवाळा सुरू झाल्यापासून हृदयक्रियेत जाणवण्यासारखी काही विकृती दिसून आलेली नाही. थंडी मात्र इथे कडाक्याची आहे आणि गेल्या वर्षीच्या मानाने ती मला अधिक जाणवते. महिन्याभरात मी या तुरुंगात एक वर्ष घालविलेले असेन— सजेचा बारावा हिस्सा. मी येथे आलो तेव्हा हिवाळा शिगेला पोहोचला होता. पण तरी रात्री एका पेक्षा जास्त ब्लँकेटस मला लागत नसत. या वर्षी दोन ब्लँकेट्सनीसुद्धा माझी हुडहुडी जात नाही. आणि तिसऱ्याचे ओझे सहनशक्तीच्या बाहेरचे आहे. ( कैद्यांना देण्यात येणाऱ्या ब्लँकेटांचे वर्णन करणारा मजकूर खोडून टाकण्यात आला आहे. )

' अ ' वर्गाच्या काढून घेण्यात आलेल्या सवलती पुनः परत मिळण्याची आशा दिसत नाही. सामाजिक प्रतिष्ठा ही श्रीमंतीतूनच ठरावयाची असेल तर या सन्मानावर मला हक्क सांगता येणार नाही. बरे आहे. जीवनाच्या साऱ्या परिस्थितीशी मी जुळवून घेत आहे. आणि आता वाटेल त्या परिस्थितीत मी जीवन कंठू शकेन. अर्थात जीवन-शक्तीवर त्याचा परिणाम हा होणारच. ( काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे.)

शरीरप्रकृतीत सुधारणा झाल्यामुळे संकल्पित ग्रंथाच्या बाबतीत मी आता काम करू लागलो आहे. पण इतर काही अडचणींमुळे हे काम अखंडितपणे होत नाही. सुरुवातीला मी जी प्रगती केली होती तितका वेग आता राहिलेला नाही. अलीकडे निरनिराळ्या विषयांवर मी बरेच काही प्रबंध लिहावयाला घेतले आहेत. त्यांपैकी एक मी नुकताच संपविला—ऑन द हिस्टॉरिकल रोल ऑफ इस्लाम. तो प्रबंध उद्बोधक होईल. आणि माझे स्वतःचे त्याने समाधान झाले आहे. दुसराही प्रबंध मी संपविला आहे, " सम रिफ्लेक्शन्स ऑन द हिंदु आयडियल ऑफ ॲसेटिसिझम् " असे त्याचे नाव मी ठेवले आहे. हे प्रबंध बाहेर पाठविता येतील किंवा नाही कोण जाणे ! ते पाठविता आले तर तुम्हाला केव्हा तरी मिळतील. पण भारतीय वाचकांसाठी ते मी

लिहिले असल्याकारणाने परदेशात त्यांचे प्रकाशन करून फारसा फायदा होणार नाही.

नव्या भारतीय साहित्याबद्दल मी काहीच माहिती देऊ शकत नाही. भारतीय भाषांतील पुस्तके मला मिळतच नाहीत. जी काही थोडी तुरुंगाच्या वाचनालयात आहेत तेवढीच. (काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे.) पण त्यामुळे माझे फारसे नुकसान झाले असेल असे वाटत नाही. आधुनिक साहित्याच्या दृष्टीने भारताने विशेष काही लिहिलेले नाही. खरे सांगावयाचे तर फार मोठ्या घटना घडावयाच्या असताना जे बौद्धिक वातावरण येथे असावयाला पाहिजे त्या मानाने भारतातील बौद्धिक पातळी बरीच खालच्या दर्जाची आहे. ही विसंगती इतकी डोळ्यांत भरणारी आहे की त्या-बद्दल गंभीरपणे विचार करणे अत्यावश्यक आहे. माझा एक प्रबंध या विषयाचा परामर्श घेणारा आहे. 'फिलॉसॉफिकल रेव्होल्यूशन' असे त्या प्रबंधाचे मी नाव ठेवले आहे. गेल्या वर्षी ज्या बंगाली कादंबरीचा मी उल्लेख केला होता तीच अद्यापपर्यंत तरी सर्वोच्च साहित्य-कृती होय. पण तिचे भाषांतर करण्यापासून फारसा फायदा होईल असे मला वाटत नाही. ऐतिहासिक सापेक्षतेची जाणीव असणाऱ्या वाचकांना ती आकर्षक वाटेल. पण सर्वसाधारण युरोपियन वाचकावर तिचा ठसा उमटणार नाही. ती कादंबरी आता इब्सेन किंवा अनातोल फ्रान्स यांच्या साहित्यकृती जितक्या नीरस वाटतील त्यापेक्षाही अधिक नीरस ठरेल.

आपले कुटुंब (कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या टीकाकारांची संघटना) इतके खंबीर आणि आशावादी राहिलेले पाहून मला अतिशय आनंद होत आहे. त्या सर्वांच्या सदिच्छांबद्दल मी आभारी आहे. माझे हार्दिक धन्यवाद त्यांना कळव. माझ्या या सन्मित्रांच्या सहवासात दिवस घालविण्याचे सुख मिळविण्यासाठी मी आसुसलेला आहे. कोण जाणे कदाचित या देशातही ती भेटगाठ होईल.

## १७

सेंट्रल प्रिझन, बरेली
जॅन्युआरी ९, १९३३

आजचा दिवससुद्धा माझ्या दृष्टीने वाढदिवसच आहे. मला शिक्षा झाल्याला आजच एक वर्ष पुरे झाले आणि बारा महिने या तुरुंगात पार पडले. माझी प्रकृती हिवाळ्यात जशी असावयाला पाहिजे तशी चांगली राहिली नाही. पण काळजी करू नकोस. स्वेच्छेने स्वीकारलेल्या दिव्यातून मी कसा तरी खास पार पडेन. एवढेच की या परिस्थितीत आजारी पडण्याचा मला तिटकारा वाटतो. माझ्या पोलादी शरीरप्रकृतीचा मला नेहमीच अभिमान वाटत आला आहे. आजच्या या असहाय्य अवस्थेत, जेव्हा मला त्या बळकट प्रकृतीची गरज आहे, तेव्हाच तिने दगा दिला तर हा निव्वळ विश्वास-

घात होईल. ( काही मजकूर खोडण्यात आला आहे. ) माझी खात्री आहे की, यात तसे गंभीर असे काही नाही आणि लवकरच हे दुखणे बरे होईल. बाहेरच्या जगात एक दुखणेकरी म्हणून बाहेर पडण्याची कल्पनासुद्धा मला तिरस्करणीय वाटते. नाही, ते अशक्य आहे. तसे कदापिही घडणार नाही.

नव वर्षाच्या पूर्वीच्या रात्रीसुद्धा तुला क्रांतिकार्यासाठी राबावे लागले ही कीव करण्यासारखी घटना आहे. पण मला कल्पनासुद्धा करता येत नाही की, या रात्री ( सिल्व्हेस्टर-नाक्त ) आनंददायी पेय घेतल्याशिवाय जर्मनीतील इतके सारे सज्जन रात्रीचा निरोप कसा घेऊ शकले ? राजकीय चर्चेत निमग्न झाले म्हणून या आनंदाला ते पारखे कसे झाले हेच मला कळत नाही. केव्हाना केव्हा तरी अशा तऱ्हेचा जीव-विसावा तुला मिळाला नाही तर हा तुझा पत्रकार तुला अक्षरशः वेडी बनवील.

थोड्याच दिवसांपूर्वी......कडून नाताळानिमित्त एक पॅकेज मला आले. अमेरिकन लोक किती काटेकोर असतात नाही ? त्या पॅकेजमध्ये दाढीचे साहित्य आणि प्रसाधन साधने आहेत असे मला सांगण्यात आले. त्याचा वापर मला कितीसा करू दिला जाईल कोण जाणे ? अशा तऱ्हेच्या वस्तू पाठविण्यात खरोखरीच काही अर्थ नाही. पुस्तके आणि मासिके मात्र खऱ्या उपयुक्त वस्तू होत. मित्रांकडून भरभरून ती पाठविली जातात असे मला कळते. पण गेल्या दोन महिन्यांत तरी मला काहीच पोचली नाहीत. पुस्तकांचा बराच मोठा गड्डा जो तू पाठविलास तोसुद्धा माझ्यापर्यंत आला नाही. पूर्वीसुद्धा अशीच काही पुस्तके गहाळ झाली होती. खरोखरच मन उद्विग्न करणारी ही परिस्थिती आहे. पुस्तके गहाळ झाल्यामुळे जे नुकसान होते ते तर सोडूनच द्या, पण मला बौद्धिक खाद्य मिळत नाही त्याचे काय !

लखनौच्या मित्राला जावे लागले, त्यामुळे मला कोणीच भेटावयाला आले नाही. विविध कारणास्तव ![1] पहिली गोष्ट अशी की, दूरवरच्या ठिकाणाहून यावयाला मीच बंदी घातली आहे. त्यानंतर बरेचसे मित्र माझ्याच अवस्थेत आहेत ( म्हणजे तुरुंगात ). छोट्या राजपुत्राच्या वागणुकीबद्दल मी काय लिहू ? आश्चर्य आहे खरे. पण तो सोडून गेला ही काही गंभीरपणे विचार करण्यासारखी घटना नाही. आणि तिकडच्या मित्रांनी त्याबद्दल चिंता करण्याचे कारण नाही. अडचण झाली आहे ती व्यक्तिशः माझी. पण ती किरकोळ महत्त्वाची आहे. त्याचे सोडून जाणे मात्र निर्भेळ विश्वासघातकीपणाचे आहे. माझे असेही मत आहे की, मानसिक अवनतीचीच ही चिन्हे आहेत. म्हणजे व्यक्तिगत प्रभाव नाहीसा झाल्याबरोबर जुन्या व्यसनांच्या तो आधीन झाला आहे.

---

१. देशातील निरनिराळ्या भागांतील असंख्य मित्र मला भेटावयाला उत्सुक होते. पण त्यांचे अर्ज नेहमीच फेटाळून लावण्यात येत असत. कारण देण्यात येत असे ते हे की, तुरुंगातील कैद्याला भेटावयाची परवानगी फक्त नातेवाईकांनाच मिळू शकते.

इतक्या भुसट पायावर खंबीर इमारतीची उभारणी करणे कसे शक्य आहे? तात्पर्य असे की हा काही फार मोठा तोटा नाही.

तुझ्या गेल्या पत्रात ऑगस्टने जे विचार प्रदर्शित केले आहेत त्याबद्दल मला बरेच लिहावयाचे आहे. पण सध्याच मी सविस्तर लिहू शकत नाही. एक दोन खुलासे तेवढे करतो. सांख्यांची एपिक्यूरसशी जुळणी ही उभयतांच्या विचारपद्धतीचा पाया कल्पनावादी असल्यामुळेच होय. धक्का देणारे हे विधान आहे हे खरे आहे. पण मला एपिक्यूरसमध्ये दिसते ते असे की, मार्क्स आणि इतरांना वाटले त्यापेक्षाही अधिक जाणीवपूर्वक तो पदार्थ-विज्ञान शास्त्राचा गूढवादासाठी (किंवा नीतिवादासाठी) बळी देत आहे. सांख्याचा विचार करता तो निश्चितच जडवादी नाही. पण त्याचा कल्पनावादी स्वैरसंचार हा सुद्धा हवेतच तरंगणारा आहे. म्हणून आपण त्याचा जो स्वीकार करावयाचा तो चिकित्सापूर्वक केला पाहिजे. चार्वाकाचे तत्त्वज्ञान जवळ-जवळ नामशेष झाले आहे. त्याचे विरोधक, विशेषतः मध्ययुगातील पदिक विज्ञान व धर्मशास्त्रज्ञ शंकराचार्य यांच्या लेखनातून जे काही थोडे गोळा करता येईल त्यातून त्याची प्रतिमा उभी करण्याचा मी काहीसा प्रयत्न करीत आहे. भारतीय तत्त्वज्ञानातील जडवादाचा खरा आधार कणादाच्या वैशेषिक पद्धतीतच मिळू शकतो. भारतीय तत्त्वज्ञान सूत्रबद्ध रीतीने सांगणाऱ्या ज्या सहा मुख्य शाखा आहेत त्यांतीलच वैशेशिक पद्धती ही एक होय. कणाद हा साधारणपणे डेमोक्रिटासच्या काळातच जन्माला आला होता. त्यानेही एक प्रकारचा अणुवादच दिग्दर्शित केला. आणि त्याने जो ब्राह्मण निर्माण केला त्याला, डेकार्ट आणि न्यूटन यांच्या तत्त्वज्ञानात सृष्टिनिर्मात्याला जे अस्तित्व आहे त्यापेक्षा वेगळे अस्तित्व आहे.

माझ्या तिथल्या मित्रांचा माझ्यावर इतका जीव आहे हे पाहून मला विलक्षण आनंद होतो. आपण सर्वजण एकत्र येऊ तो अतिभाग्याचा दिवस होईल. त्यांना व्यक्तिशः मला लिहिता येत नाही याचे मला वाईट वाटते. त्यांना म्हणावे दिवसेंदिवस मला अधिकाधिक विश्वास वाटू लागला आहे की, स्वतःच्या संबंधी मी जो दृष्टिकोण ठेवला आहे तो योग्य ठरत आहे. त्यांना त्यातच आनंद होईल याबद्दल माझी खात्री आहे. (मॉस्कोतील) बऱ्या पुढाऱ्यांची डोकी ठिकाणावर नाहीत. कल्पनेवर ते जगत आहेत. ते जे बोलत आहेत ते अस्तित्वात असले तर ते त्यांच्या तप्त स्वप्नरंजनात. आपल्याला जर काही उभारणी करावयाची असेल तर गवताशिवाय विटा पाडण्याचा आपण प्रयत्न करू नये; जे प्राप्त आहे त्याच्या साहाय्यानेच आपण काम करावे. या वास्तववादी दृष्टिकोणातून पाहिले तरच त्यांना माझ्या दृष्टिकोणाची सत्यता पटून येईल. ज्यांना दृष्टी आहे त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहावे. बाकीच्यांनी आपल्या विकृत कल्पनाशक्तीला ताण द्यावा. भविष्यकाळ आपला आहे.

अपील सुनावणीसाठी नऊ तारखेला निघणार होते. पण ते पुनः पुढे ढकल-

ण्यात आले आहे. परवाच माझ्या एका वकिलाशी माझी मुलाखत झाली. सुनावणीच्या वेळी कोर्टात हजर राहण्याची मला परवानगी मिळाली आहे. व्यक्तिशः अपील चालविण्यासाठी नव्हे, पण वकिलाला सल्ला देण्यासाठी. मी जी कैफियत दिली आहे तिच्या अनुरोधानेच त्याने बाजू मांडावी यासाठी मी जेवढा प्रयत्न करणे शक्य आहे तेवढा करणार आहे.

१८

सेंट्रल प्रिझन, बरेली
फेब्रुवारी ६, १९३३

नववर्षाच्या पूर्वीच्या रात्रीचे पत्र (सिल्व्हेस्टर नाईट) परवाच पोचले. पण दुर्दैवाने पत्रात उल्लेख केला गेलेला, तेथे जमलेल्या मित्रांचा संदेश मात्र आला नाही. ते कसेही असो, तो संदेश माझ्या हृदयाला भिडलेलाच आहे. आणि त्यांतच मला आनंद आहे. अर्थात तेथे जमलेल्या मित्रांनी जी चर्चा आणि विचारविनिमय केला तो जाणून घेण्याची मला उत्कंठा लागली आहे. हा विचारविनिमय ऐतिहासिक महत्त्वाचा असणार यात शंकाच नाही. या आणीबाणीच्या काळी मी जगतो तसे जीवन जगणे ही दुर्दैवाची परमावधी होय. पण समाधान आहे ते असे की, हा मार्ग स्वेच्छेने स्वीकारलेला आहे. आणि तो यासाठी की याहीपेक्षा निर्वाणीचे दिवस येतील तेव्हा ही परिस्थिती कमी दुर्दैवाची ठरावी.

तुमची तार हा एक आनंदाचा ठेवाच होता. थोड्याच दिवसांपूर्वी माझ्या एका वाढदिवसाची मी तुला आठवण करून दिली होती. अशीच आणखी जुल्या वर्षावर मात करण्याचा तुझा कठोर निर्धार केविलवाणा खरा. पण तितकाच विलक्षण समाधान देणारा आहे. पण परिस्थितीला तोंड देण्यापेक्षा अधिक निराशावादी होण्याचे कारण नाही. गेल्या खेपेला वाढदिवसाच्या ज्या सदिच्छा मला मिळाल्या तशा अनेक सदिच्छा स्वीकारण्याची माझ्यावर पाळी येईल, असे मला वाटत नाही. कदाचित आणखी एक पुरेशी होईल. माझ्या अंदाजांचा विसर पडू देऊ नकोस.ते अगदी तंतोतंत खरे ठरतील. अर्थात परिस्थितीला आकस्मिक कलाटणी मिळाली तर कोणाचाच इलाज नसतो हे गृहीत धरलेच पाहिजे.

ज्या मित्राकडे खटल्याचे कामकाज सोपविण्यात आले होते तो मित्रच आकस्मिकपणे व आश्चर्यकारकरीतीने अदृश्य झाल्यामुळे साहजिकच बराच गोंधळ निर्माण झाला आहे. पण कशीतरी परिस्थिती सावरण्यात आली आहे. तथापि आपल्या मित्राचे वर्तन हे एक गूढच आहे. त्याने त्यानंतर जे धोरण स्वीकारले त्याबद्दल आश्चर्य वाटून घेण्याचे कारण नाही. अडचण आहे ती माझे सारे इतर मित्र एकतर कारावासात तरी आहेत

किंवा दूरवर राहात असल्याने स्वतःच्या व्यवसायाला इजा न पोहोचविता त्यांना माझ्या व्यवहारात सतत लक्ष घालता येत नाही. त्यामुळे मी एकाकी पडल्यासारखा झालो आहे. पण माझ्याशी फक्त वीस मिनिटे मुलाखत घेण्यासाठी त्यांनी अनेक दिवसांचा प्रवास करावा याला मात्र माझा तीव्र विरोध आहे. त्यात भर पडत आहे ती कोणाशीही मला पत्रव्यवहार करता येत नाही तिच्यामुळे! (महिन्यातून एकच पत्र पाठविण्याची मला परवानगी होती.) पण त्याला इलाज नाही. जवळ एक मित्र होता की ज्याला फारसा त्रास न होता महिन्यातून एकदा मला भेटता येत होते, तेव्हाची परिस्थिती बरीच निराळी होती.

या एकाकी अवस्थेमुळे मला या देशातून पुस्तकेही मिळविता येत नाहीत आणि ती फार मोठी अडचण आहे. परदेशातून पाठविण्यात आलेली पुस्तके मला बऱ्याच दिवसांत मिळाली नाहीत. मला ते कोडेच पडले आहे. पण या वेळी निदान चार गठ्ठे तरी उपलब्ध व्हावयास पाहिजेत. (काही मजकूर खोडला आहे.) अमेरिकेतून पाठविण्यात आलेली मासिकेसुद्धा वक्तशीरपणे येत नाहीत. हे सारेच मन अस्वस्थ करणारे आहे. कारण माझा पुस्तकांचा साठा जवळजवळ संपत आला आहे आणि येथून त्यात भर घालण्याची मुळीच शक्यता नाही. काही नव्या जर्मन कादंबऱ्या मला मिळाल्या तर हव्या आहेत. त्या मला मिळण्याच्या बाबतीत अडचण येईल असे मुळीच समजू नकोस. फक्त त्या तुरुंगात पोचल्या मात्र पाहिजेत. अर्थात इतर पुस्तकांप्रमाणे इथे पोचण्यापूर्वीच त्या गहाळ झाल्या तर मात्र इलाज नाही.

माझ्या साहित्यिक कार्यात प्रगती होत असल्याचे मला कळविता येत नाही याचेच मला वाईट वाटते. त्यात अनेकविध अडचणी येतात आणि माझे प्रकृतिमान हे तर नेहमीच आड येते. तथापि बरीचशी पूर्व तयारी मात्र झाली आहे. पण जानेवारीच्या सुरुवातीपासून मी पुनः अंथरुणाला खिळलो आहे. (काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे.) हिवाळा जवळ जवळ संपत आला आहे. गेल्या उन्हाळ्याची झळ मी सहन करू शकलो नाही, आणि त्यातून हे दुखणे उद्‌भवले. आता, दुसरा उन्हाळा माझ्या समोर उभा आहे. शारीरिक दृष्टीने मी दुबळा होईन की काय अशी मला भीती वाटते. इथे येण्याची योजना मी आखीत असताना ऑगस्टने 'आत्मघात' (उमब्रिंगेन नाही का!) असा शब्दप्रयोग केला होता. त्या वेळी मी त्याची हेटाळणी केली. आता मी एवढीच आशा करतो आहे की त्याचे भाकित खोटे ठरो. मागील अनुभवावरून मला एवढेच कळून आले आहे की, उंच हवेच्या ठिकाणी बदली झाली तरच पुढील उन्हाळा मला सहन करता येईल. पण कैद्याला थोडीच निवड करता येते! त्याने एवढीच अपेक्षा करायची की निदान सहनशक्तीबाहेर त्याच्यावर ताण पडू नये.

सेंट्रल प्रिझन, बरेली
मार्च ६, १९३३

१९

अखेरीस काही पुस्तके येऊन थडकली. एकंदर ३८ ग्रंथ आहेत ते. पण त्याची यादी सोबत नव्हती. गेल्या पत्रात पुस्तकाच्या बाबतीत जो निराशावाद मी प्रगट केला होता तो आता मावळला आहे. अमेरिकेतून पाठविण्यात आलेली पुस्तके जरी पोचली नसली तरी ती आज ना उद्या येतील. त्यांना अधिकच अंतर काटावयाचे आहे.

माझ्या प्रकृतीबद्दल जास्त काय लिहू ! ( काही मजकूर खोडलेला आहे. ) लंडन-मध्ये काही सूत्रे हालविली तर निश्चित फायदा होईल. पण त्यासाठी तू स्वतः जाण्या-पेक्षा दुसऱ्या कोणामार्फत काही करता आले तर पाहा. रोझेनफेल्डचा या कामी उपयोग होईल. हिज एक्सॉल्टेड हायनेस राईट ऑनरेबल भावी अर्ल ऑफ लॉसी माऊथ ( काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे. ) यांची भेट अद्यापही त्याला घेता येईल. पण प्रत्यक्षपणे काही होईल अशी मात्र मला आशा नाही. उन्हाळा दरवाजाशी येऊन ठेपला आहे. आणखी महिन्याभरात शिजून निघावयाची वेळ येईल. कदाचित तो ताण या वर्षी सहन करणे इतके कठीण जाणार नाही. एक वर्षाचा अनुभव कारणी पडेलच की ! काही झाले तरी माझ्या हाती वाट पाहण्यापेक्षा अधिक काय आहे ? आल्या प्रसंगाला तोंड देण्याचा निर्धार मात्र मला ठेवला पाहिजे.

तिसऱ्या राईशमधील तुम्हा सर्वांना ज्या दिव्याला तोंड द्यावे लागत आहे त्याच्याशी तुलना करता तर माझ्या यातना इतक्या क्षुद्र ठरतात की त्यांच्याबद्दल यापुढे न बोलणेच बरे ! सध्याच अनेक लोकांवर कोणती आपत्ती आली असेल याच्या विचारानेच माझे काळीज थरथरते. अरेरे ! किती भयानक किंमत द्यावी लागत आहे. आणि ज्या चुका सहज टाळता आल्या असत्या त्यांच्यासाठी ! ( मॉस्कोतील ) उच्च पदस्थांना आता काय वाटते आहे कोण जाणे. फिनलंडमधील अनुभवातून तरी त्यांनी काही धडा घेतला का ? तिथे जो बोजवारा झाला, त्यात खरी आहुती कोणाची पडली त्यावरच हे अवलंबून आहे. उद्ध्वस्त झालेली ही वास्तू पुनः उभारावयाची असेल तर तळापासूनच तिची बांधणी करावयाला पाहिजे. उपाययोजना वरून कधीही सुचविली जाणार नाही. इतक्या दूरवरून मी काय भूमिका मांडू शकणार म्हणा ! आणि प्रत्यक्ष स्थानावर उभे असलेल्या लोकांपेक्षा मी अधिक चांगले निदान करू शकेन असाही माझा दावा नाही. पण दिसते ते असे की तिसऱ्या राइशचा प्रत्यक्ष राज्यकर्ता अॅडॉल्फ पेक्षा हेर जनरल लेफ्टनंट हाच असावा. बाहेरचा देखावा काहीही असो म्हणा, आतला गाभा एकच आहे. आता मी उत्सुकतेने वाट पाहात आहे ती तीन मार्चला होणाऱ्या निवडणुकीची ( नात्झी राजवटीखाली होणारी पहिली निवडणूक ). ज्या काही वार्ता माझ्या कानी येणे शक्य आहे त्याबाबत मॉस्कोची मदार कशावर ? तर

आकड्यातून प्रकट होणाऱ्या यशावर. ते तरी या वेळी मिळू शकेल काय ? ' आता व्यक्तिशः तिसऱ्या राइशमध्ये तुझे भवितव्य काय ? तू जर कशीतरी बतावणी करू शकलीस तर तुझे राष्ट्रीयत्व तुझे संरक्षण करू शकेल. नव्या राजवटीच्या प्रवक्त्याने परकियांचा धिक्कार केला असला तरी प्रत्यक्षपणे त्यांचा अनादर करण्याचे धाडस ती दाखवील असे मला वाटत नाही. प्रवक्त्याचे ते उद्गार सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठीच काढण्यात आलेले होते. शिवाय फ्रेंचांशी जो संघर्ष अपरिहार्य आहे त्याचा विचार करता ' अंकलसॅम'च्या सहानुभूतीची थर्ड राइशला उपेक्षा करून चालणार नाही.

एका अमेरिकन मासिकात इंग्लंडमधील घडामोडींबाबत एक उत्तेजक अशी वार्ता मी वाचली. वार्ता अशी की हॅरी पॉलिट म्हणे बंडखोरीच्या मार्गावर आहे. तसे असेल तर ती फार महत्त्वाची घटना ठरेल. हॅरी पॉलिटचे मतांतर झाले तर तेथील साऱ्या कम्युनिस्ट राजकारणाचा पायाच ढासळून पडेल.

माझे अपील ६ एप्रिलला सुनावणीसाठी निघेल. आता तरी त्यात चालढकल होणार नाही अशी आशा आहे. आपल्या बाजूनेही त्यात थोडासा गोंधळ झालाच. राजपुत्र आकस्मिकपणे बाजूला झाल्यामुळे म्हणा किंवा त्याने बाजू बदलल्यामुळे म्हणा एकंदर परिस्थिती बिकट झाली. आता तरी सारे काही सुरळीत झाले आहे असेही नव्हे. माझी बाजू मांडणाऱ्या ज्येष्ठ वकिलाशी माझी अद्याप मुलाखत झालेली नाही. खालच्या कोर्टात तो हजर नव्हता. त्याच्याशी माझे सूत कसे जमणार आहे कोण जाणे ! ऐन वेळेला काही पेच निर्माण झाला तर ते दुर्दैवच म्हणावयाचे. पण कसे तरी मी सांभाळून घेणार आहे. छोटे राजेसाहेब आता कोठे आहेत ? आकस्मिकपणे राजकीय मतांतराचा जो आविर्भाव त्याने आणला आहे तो नुसता दंभ आहे. आपल्या तेथील मित्रांना म्हणावे तुम्ही त्याच्याबद्दल विचारसुद्धा करू नका.

माझ्या साहित्यिक कार्यातील प्रगतीबद्दल फारसे सांगण्यासारखे काही नाही. सुरुवातीला मी जी त्याची योजना आखली होती त्या योजनेनुसार काम होणार नाही अशी मला भीती वाटते. अनेक प्रकारच्या अडचणी आहेत. प्राप्त परिस्थितीत नीट सुसूत्रपणे काम होणे शक्य नाही. प्रकृतिमान चांगले राहिले तर मी शक्य तेवढे सारे करीन. म्हणजे हे दिव्य पार पाडीत असतानाही त्या काळाचा काही उपयोग केल्यासारखे होईल. मी जे प्रबंध आधीच लिहिले आहेत त्या उत्स्फूर्त विचारलहरीच म्हणता येतील. साखळीतील दुवे म्हणून सुद्धा त्यांच्याकडे पाहाता येणार नाही. मला वाटते सारे लेखन याच पद्धतीने करावे लागेल. हे दुर्दैव आहे खरे ! एका पुस्तकाची सारी साधने गोळा झाली आहेत. पण त्यांचा योग्य तो उपयोग करता येत नाही.

---

१. पूर्वीच्या निवडणुकीत कम्युनिस्ट उमेदवारांना मिळालेली एकंदर मते हळूहळू वाढत असलेली दिसत होती.

नव्या पुस्तकांची जी भर पडली आहे ती काही काळ पुरेल. कालांतराने अगदी अलीकडील विज्ञानविषयक ग्रंथांची मला गरज लागेल. अमेरिकन मित्रांनी ते पुरवावेत. बहुशः ते त्यांच्या देशातच प्रकाशित झालेले आहेत. आम्स्टरडॅमच्या स्नीव्हलीटला तू कधी लिहिलेस का? माझ्या शुभेच्छा त्याला कळव. तुला ठाऊक असेलच की, तो सिंहाचा ( लिऑं ट्रॉट्स्की ) अनुयायी आहे. त्याचा गुरू आता मुक्त झाला असल्यामुळे तो बराच गडबडीत असेल. पण आम्ही बरेच जुने मित्र आहोत आणि त्याच्या व्यक्तिगत निष्ठेवर मदार ठेवण्यासारखी अनेक कारणेही घडलेली आहेत.

## २०

डिस्ट्रिक्ट जेल, अलाहाबाद
एप्रिल ६, १९३३

तिसऱ्या तुरुंगातील जीवनाचा मी अनुभव घेत आहे. देव:जाणे, सुटकेपूर्वी आणखी किती तुरुंग मला पाहावयाचे आहेत! हे तात्पुरते वास्तव्य आहे. तेव्हा माझ्याकडून सूचना येईपर्यंत तू बरेलीच्या पत्त्यावरच लिही. मला मात्र आशा आहे की, उंच आणि थंड अशा हवेच्या ठिकाणी मला पाठविण्यात येईल. नाहीतर हा उन्हाळा मला फार जड जाईल.

तुमच्या तेथील परिस्थितीची मी कल्पना करू शकतो आणि मग माझ्या यातनांचा मला विसर पडतो. आपले अध्यक्षीय उमेदवार[1] आणि जर्मन पार्लमेंटमधील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून ज्याचा अभिमानाने उल्लेख होत असे त्या पक्षाचे सभासद यांना रात्रीच्या पोशाखात तुरुंगात पाठविण्यात आल्याचे जेव्हा मी वाचले, तेव्हा मी मनात म्हटले की आता स्वतःबद्दल तक्रार करण्यात तरी अर्थ कोणता? मी तशी तक्रार करीत नाही म्हणा आणि करणारही नाही. मला एवढीच आशा आहे की, व्यक्तिशः तुला याची झळ लागणार नाही आणि माझे खास मित्र निदान खाईत तरी लोटले जाणार नाहीत. १९२३ साली आणि त्यानंतर त्यांनी दुःख भोगलेच आहे. आता दुसऱ्यांची पाळी आहे आणि जे त्यांना भोगावे लागणार आहे ते त्यांच्याच करणीमुळे. मनातून उद्‌गार निघतो, कसले हे मूर्ख शिरोमणी! आणि अन्तर्मन म्हणते, " नव्हे गुन्हेगार! " " आम्ही सांगत नव्हतो " असे म्हणणेसुद्धा किती सवंग वाटते. त्यांत समाधान कसले! मी तर म्हणतो आमची भाकिते खोटी ठरली असती तर फार बरे झाले असते. किती किती तापदायक आहे ही जाणीव. आपण एवढीच आशा करूया

१. ३ मार्च १९३३ च्या निवडणुकीसाठी अध्यक्षीय उमेदवार म्हणून जर्मनीच्या कम्युनिस्ट पक्षाने अर्न्स्ट थेलमन यांना उभे केले होते.

की, ज्या तुफान वारूवर ते स्वार झाले, त्यावरून पडल्यामुळे त्यांच्या माना कायमच्या मुरगळल्या गेल्या नसतील. उद्ध्वस्त झालेले जीवन सुधारण्याची इच्छा प्रगट होत असल्याची काही चिन्हे तरी दिसत आहेत का?

माझ्या अपीलाचा पुरा गोंधळ उडाला आहे. अखेरच्या क्षणी जो वकील माझा खटला चालविणार होता तो इंग्लंडला गेल्यामुळे हजरच राहू शकला नाही. व्यक्तिशः खटला चालविण्याची मला परवानगी मिळाली आहे. पण बाजू तयार करण्यासाठी इतका थोडा वेळ आहे की, माझी मलाच खात्री वाटत नाही. काही दिवसांची मुदत मिळविण्याचा मी प्रयत्न करीत आहे. ती मुदत नाही मिळाली तर तीन दिवसांनंतर खटल्याचे हे नाटक सुरू होईल. पण निकाल लागायला मात्र महिना तरी लागेल. एक तरुण वकील मला मदत करीत आहे. त्याचा डॉ. रोझेनफेल्डशी पत्रव्यवहारही झाला आहे. पण सध्या रोझेनफेल्डही धाईगर्दीत असेल, आणि कदाचित धोक्यातही असेल. काही महिन्यांपूर्वी म्युनिकमधील अब्रुनुकसानीच्या खटल्यात कर्टने ॲडॉल्फचे जे सालडे काढले त्याची आठवण ॲडॉल्फ ठेवल्याशिवाय राहणार नाही.

तुझ्या बंधूंनी माझ्याबद्दल आस्था दाखवावी हा त्यांचा मोठेपणा आहे. त्यांना शक्य झाले तर पदार्थविज्ञानशास्त्रावरील आणि प्राणिशास्त्रावरील तात्त्विक स्वरूपाचे अगदी नवे ग्रंथ त्यांनी पाठवावे (एडिंग्टन, जीन्स, रुदरफोर्ड, पिकरिंग वगैरे). फार महाग आहेत ते ग्रंथ. सध्याच्या अमेरिकेतील पेचप्रसंगात त्यांनीही खूप मार खाल्ला असेल. की ते रुझवेल्टपंथी आहेत? मला कोणत्या प्रकारची पुस्तके हवीत ते जेल्व्हस्टनलाही कळव.

माझी प्रकृती आहे तशीच आहे. पण तू फार काळजी करू नकोस. नाही तरी तुला काहीच करता येणार नाही. प्रकृतीच्या या अवस्थेमुळे आणि इतर बंधनांमुळे लेखनातील प्रगती मंदावली आहे. त्याचेच मला विशेष दुःख होते. काही तरी उपयुक्त कार्य करण्याची मला ओढ लागली आहे. पण ते होत नाही. गेल्या काही दिवसांत तर ते अशक्यच झाले, पण काही लांबलचक प्रबंधाबद्दल मी जे तुला काही महिन्यांपूर्वी कळविले, त्यानंतर मात्र भारतासहित प्राचीन काळातील जडवादी विचार यावरील लेखन मी पुरे केले आहे. (लहान आकाराचे ते पुस्तक होईल.) त्यासाठी योग्य ते साहित्य उपलब्ध न झाल्यामुळे ते जसे मला हवे होते तसे उतरले नाही. पण चांगला आराखडा मात्र तयार झाला आहे. पुढे-मागे संधी मिळेल तेव्हा, त्याला बाळसे देता येईल. पण ते केव्हा कोण जाणे!

एप्रिल, १०, १९३३

आज मी कोर्टापुढे उभा राहिलो. माझ्या अर्जानुसार खटला २५ तारखेपर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे. खटल्यातील अत्यंत महत्त्वाचे कागदपत्र अद्याप माझ्या हाती नसल्यामुळे आज माझी बाजू मांडावयाला मी तयार नव्हतोच. आता सर्व कागदपत्र

जमवून योग्य ती तयारी करावयाला मला वेळ मिळेल. शिवाय जमले तर मी दुसरा एखादा वाकबगार वकील नेमीन की जो इतक्या तुटपुंज्या पूर्व-सूचनेनंतरही माझा खटला चालवू शकेल. हा सारा ताण सहन करण्याइतके सामर्थ्यही माझ्यामध्ये नाही आणि माझे कायदे-सल्लागार व मित्र यांचे असे मत आहे की, खटला चालवावयाचा तर व्यावसायिकाने तो चालविणे फायद्याचे होईल. त्यांना तर असे वाटते की, मी माझी बाजू मांडण्यामुळे आपल्या इच्छेविरुद्धच निकाल लागावयाचा !

छोटा राजपुत्र कोठे आहे ? अद्याप बर्लिनमध्येच का ? त्याच्या संकल्पित पृथ्वी-पर्यटनाची दिशा पूर्वेकडेच झुकलेली असावी असा माझा तर्क आहे. तो जर कोठे भेटला तर त्याला हडसावून खडसावून सांग की, माझ्या अपिलाच्या बाबतीत ज्या अडचणी आल्या त्या त्याने केलेल्या विश्वासघातामुळेच होत आणि त्याचे सारे खापर मी त्याच्या डोक्यावर फोडतो. खरोखरीच विश्वासघातकी आहे तो. त्याच्या निर्लज्ज वर्तनाचे दुसऱ्या कशानेच समर्थन होणार नाही.

तुझे बंधू या उन्हाळ्यात तिकडे आले तर ॲटलांटिक महासागरापलीकडे जाण्याचा विचार तू का करीत नाहीस ? ईश्वराच्या त्या आवडत्या देशात अजूनही शांतता आणि समृद्धी नांदण्याचा संभव आहे. दूवर गेला तरी ! युरपमध्ये थैमान चालू असताना तेथे राहून तू काय करणार याची मला चिंता आहे. "वेल्टब्यूहने" मला बऱ्याच दिवसांपूर्वी मिळाले. ते अद्याप प्रकाशित होत आहे ? बुद्धिवादी विचारवंतां-विरुद्ध नाझींनी झोड उठविल्यानंतर सुद्धा ! बरेलीला मी परत जाण्यापूर्वीच तुझे पत्र तेथे माझी वाट पाहात असेल. त्यात फार फार वाईट बातम्या नसतील एवढीच माझी आशा आहे. पण आता तेथे वाटेल ते घडेल याची खूणगाठ मनाशी बांधलेली बरी !

## २१

सेंट्रल प्रिझन, बरेली
मे ५, १९३३

अपीलाचा निकाल तुला तारेने पोचलाच असेल; शिक्षा निम्म्याने कमी झाली आहे. माझ्या अपेक्षेबाहेर हे घडले. आता आपण प्रिव्ही कौन्सिलकडे जाऊ. दुर्दैवाने रोझेनफेल्डचा या कामी उपयोग करून घेता येणार नाही. तो स्वतःच कोणत्या अवस्थेत आहे कोण जाणे. हायकोर्टात जे वकील माझ्या बाजूने उभे राहिले (डॉ. के एन. काटजू) ते लंडनला जात आहेत. या महिन्याच्या अखेरीस ते लंडनला पोचतील. तू पॅरिसमध्ये असू शकशील हे मला आधी कळले असते तर मी त्यांना तुझी पॅरिसमध्ये भेट घ्यावयाला सांगितले असते. ते माझ्या खटल्याचे सारे कागदपत्र घेऊन जात आहेत. लंडनमधील कोणत्यातरी सॉलिसिटरच्या ते हवाली करतील आणि बरोबर आवश्यक त्या

सूचनाही ते देतील. डॉ. रोझेनफेल्ड याला तसे कळविण्यात आले आहे. आणि जाणे शक्य असेल तर त्याने डॉ. काटजू यांना लंडनमध्ये जाऊन भेटावे अशी विनंतीही करण्यात आली आहे. नाहीतर डॉ. काटजू यांनी ब्रॉकवे यांच्याशी संपर्क साधावा आणि त्यांच्या सल्ल्यानुसार वागावे असेही त्यांना सांगण्यात आले आहे. ब्रॉकवे यांना तू लगेच पत्र पाठव, आणि रोझेनफेल्ड आला नाही तर आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्याची त्यांना विनंती कर. पहिली गोष्ट अशी की, डॉ. काटजू यांच्याकडून खटला समजावून घेण्यासाठी एक सॉलिसिटर धुंडाळला पाहिजे. नंतर खटला चालविण्यासाठी एका बॅरिस्टरची नेमणूक केली पाहिजे. सॉलिसिटरच्या बाबतीत मी सूचना करू शकत नाही. तसे त्याला महत्त्वही नाही. सॉलिसिटरचा कार्यभाग खटल्याची रूपरेखा तयार करणे व बॅरिस्टरला सूचना देणे—डॉ.काटजूही पार पाडू शकतील. फक्त त्यांना लवकरच परतावे लागेल. बॅरिस्टरच्या बाबतीत मला असे वाटते की, सर हेन्री स्लेस्सर किंवा सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांच्याकडे काम सोपविणे कठीण जाणार नाही. ब्रॉकवे हे ती व्यवस्था करू शकतील. डॉ. काटजू हे खटल्याच्या बाबतीत बरेच आशावादी आहेत. म्हणूनच लंडनमध्ये सर्वोत्कृष्ट व्यवस्था आणि तीही त्वरेने करणे आवश्यक आहे. तसे झाले तर माझ्या यातना अपेक्षेच्या आधी संपतील. माझ्या मनात एक कल्पना आली की, खटला चालविण्यासाठी अमेरिकेहून क्लेरेन्स डॅरो यांना बोलावण्यात यावे. आपले तेथील मित्र, सहज ही व्यवस्था करू शकतील. आता आइन्स्टाइन तिथे असल्यामुळे ते अधिकच सुलभ होईल. परंतु सर्व बाजूंनी विचार करता, असे वाटते की, इंग्लिश बॅरिस्टरलाच प्राधान्य देणे बरे. मुख्य गोष्ट आहे ती अनाठायी विलंब टाळणे ही होय.

तुझे स्ट्रासबुर्गहून आलेले लांबलचक पत्र बऱ्याच दिवसांपूर्वी पोचले. किती खळबळ उडविणाऱ्या बातम्या त्यात आहेत म्हणून सांगू! एका जर्मन प्रांताच्या राजधानीपेक्षा पॅरिस हे तुला अधिक आवडेल यात शंका नाही. पण हाइन्झ, ऑगस्ट वगैरेपासून तुझी फारकत होण्याची कल्पनाच मला सहन होत नाही. त्यांच्या स्नेहपूर्ण सहवासामुळेच तुझ्या एकाकी जीवनात थोडा फार विरंगुळा निर्माण झाला. त्यांच्याशी संपर्क अगदी कायम ठेव. कदाचित कालांतराने तेही पॅरिसचा आश्रय घेतील. मला वाटले होते ते स्वीडनला जातील. पॅरिसमध्ये बारबूझे आणि दोरियो यांची भेट घे. दोरियो हा आता पार्लमेंटचा सभासद आहे की नाही कोण जाणे. काही असले तरी त्याची भेट घेणे कठीण नाही. तो अधिकृत कम्युनिस्ट पक्षाचा सभासद आहे. पण आम्ही दोघे चांगले मित्र होतो. आणि लाल मंदिरात उजवा पाय टाकून प्रवेश करीत असल्याचा त्याच्याबद्दल संशय आहे.[1] बारबुझे याची जर्मन साहित्यिक निर्वासितांमार्फत

१. जॅकस दोरियो हा एक वेळच्या फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाचा एक नेता होता. विरोधकांच्या बाबतीत तो सहानुभूती ठेवतो या संशयावरून त्याला नेतृत्वपदावरून काढून टाका

किंवा वाटल्यास सरळ तुला भेट घेता येईल. माझ्या खटल्याच्या बाबतीतील व्यवस्था नीट होते किंवा नाही हे पाहण्यासाठी तो लंडनलाही जाईल. शिवाय स्नीव्हलिटलाही लिही. तो तुला भेटण्यासाठी पॅरिसला खास येईल. ॲम्स्टरडॅमहून पॅरिसला यावयाला फक्त सहा तास लागतात. अर्थात थोर ' लायन 'साठी तो कमालीचे कष्ट करीत असेल. पण तुला आश्चर्य वाटेल,त्याच्या उदार हृदयात माझ्यासाठीही तसेच जिव्हाळ्याचे स्थान आहे. भावनोत्कट असा तो उच्च माणूस आहे. त्याला शक्य असले तर लंडनमधील कामकाजाला चालना देण्यासाठी तो निश्चितपणे लंडनकडे धाव घेतल्याशिवाय राहणार नाही.

आगीतून फुफाट्यात जी तू उडी घेत आहेस त्याबद्दल मला फार चिंता वाटते. आगच ती; कोठे अधिक धडाडून पेटेल हे कुणी सांगावे. जो देश तू दत्तक घेणार आहेस त्यातही तुला सध्या तरी ' परकीय ' म्हणूनच प्रवेश घ्यावा लागेल. दूर अंतरावरून वधुवरांचा— त्यांतही छायाचित्रांच्या साहाय्याने निवडलेल्या वधूचा– विवाह घडवून आणण्याची जपानी पद्धती या देशात रूढ नाही. या देशात भडकणारी आग युरपमधील आगीपेक्षा अधिक स्वाहाकार करणारी होणार नाही याची मला खात्री असती तर मी धीर धरण्याचा, जुनाच डोके उठविणारा संदेश वारंवार दिलाच नसता.

माझ्या प्रकृतीबद्दल इतकी काळजी करू नकोस. ती आता पुष्कळच चांगली आहे. सुदैवाने या वर्षी उन्हाळा तितका असह्य होणार नाही अशी चिन्हे दिसत आहेत. का कोण जाणे, तो उशिरा आला आहे. अद्याप हवा प्रसन्न आणि थंड आहे आणि पाऊस कोसळतो आहे. येथील उन्हाळ्यांतील पाऊस हा हिवाळ्यातील बर्लिनमधल्या पावसापेक्षा वेगळा असतो. म्हणून आता मला खूपच हुशारी वाटत आहे आणि ती टिकून राहील अशी आशा आहे.

मालिक व्हेरलागच्या तळघरातील माझी पुस्तके व्हेरलाग [1] बरोबर नष्ट झाली असावी अशी मला भीती वाटते. दुर्दैवाचा हा कहर आहे. अशा तऱ्हेचा संग्रह पुनः करणे कठीण होईल. पण इतर भयानक आपत्तींच्या मानाने माझा तोटा अगदीच क्षुल्लक

---

ण्यात आले होते. पुढे त्याला पुनः नेतृत्व देण्यात आले. पण लवकरच त्याच्यावर एक नवीन हल्ला सुरू झाला. पक्षातील कडव्या लोकांनी त्याच्यावर असा आरोप केला की दोरियो याचा उजवीकडे झुकलेला कल कायमच राहिलेला आहे.

१. द मालिक व्हेरलाग ही आधुनिक साहित्य प्रकाशित करणारी प्रकाशन संस्था होती. " रेव्होल्युशन ॲंड कौंटर रेव्होल्युशन इन चायना " या माझ्या पुस्तकाची जर्मन आवृत्ती त्या संस्थेने प्रकाशित केली होती. ती प्रकाशन संस्था नात्सींनी बंद केली आणि तिची सारी मालमत्ता जप्त केली.

ठरेल. असहाय्यपणे पाहण्याशिवाय मला दुसरे काही करताही येत नाही. अचूक राज-कीय भाकिते केल्याचे समाधान तरी कसले? उच्च पदस्थ नेत्यांबद्दलची माझी सारी आशा मावळली आहे. भग्नावशेष दुरुस्त करावयाचे तर ते मुळापासून केले पाहिजेत. आता हाइन्झला पटेल "भग्नावशेष दुरुस्त करावयाचे" म्हणजे काय करावयाचे. माझ्या एका लेखाला मी हा जो मथळा दिला होता त्याला त्याने तर्कशुद्ध आक्षेप घेतला होता त्याची तुला आठवण आहे का?[१]

## २२

सेंट्रल प्रिझन, बरेली
जून १०, १९३३

तुला पॅरिस आवडत आहे आणि तुला तेथे बरेचसे जुने मित्र भेटले हे कळून आनंद वाटला. तुझ्या पत्रातील इतक्या साऱ्या बातम्या आणि पॅरिसमध्ये झालेल्या बैठकीचे चटकदार वर्णन वाचून मला अगदी घरची ओढ लागल्यासारखे वाटले. अहं-कारी बुद्धिवंतांच्या त्या मक्केबद्दल मला कधीच आकर्षण वाटले नाही. बहुधा सर्व-साधारणपणे त्या शहराच्या बुद्धिवादी परंपरेबद्दल जो अतिरेकी उत्साह दाखविला जात आहे त्यामुळेही हे घडले असेल. खरे सांगावयाचे तर पॅरिसचा माझ्यावर फारसा प्रभाव पडला नाही. पडलाच असला तर त्याच्या ऐतिहासिक वा सांस्कृतिक परंपरेच्या अमूर्त जाणिवेने. राहण्याच्या दृष्टीनेही मला ते स्थळ बरेचसे गैरसोयीचे वाटले. विशेषतः कौंसिअर्ज. भयानकतेचा नमुना आहे तो. अलीशान उपाहारगृहाच्या त्या शहरात मला अशी एकही जागा आढळली नाही की जेथे सुखाने एखादी दुपार घालविता येईल. जशी आपण बर्लिनमधील "कॅफे ऊॅन्श्रू," किंवा 'जेस्टर' किंवा 'गेरॉल्ड ऑन नी' मध्ये घालवीत असू. मग त्या लहानशा इटालियन नदीच्या किनाऱ्या वरील 'बॅक्स बार" तर सोडूनच द्या. हिटलरिझमने ज्यांना देशोधडी लावले आहे असे जर्मन निर्वासित पॅरिसमधील कोणत्या कॅफेमध्ये गोळा होत असतील याची मी मनाशी कल्पना करतो. "रॉमानिशे कॅफे"चे (नात्सी पूर्व काळात बर्लिनमधील बुद्धिवंत व खुशालचेंडू

---

१. जर्मन कम्युनिस्ट नेता हाइन्झ ब्रॅंडलर हा व्यवसायाने गवंडी होता. कम्युनिस्ट इंटर-नॅशनलने १९२५ सालापासून स्वीकारलेल्या अति जहालवादी धोरणामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी काही उपाययोजना सुचविताना मी. "भग्नावशेष दुरुस्त करा" या मथळ्याखाली जेव्हा एक लेख लिहिला तेव्हा ब्रॅंडलरने त्या मथळ्याला आक्षेप घेताना विनोदाने असे उद्गार काढले होते की, "बांधकाम करणारे कामगार भग्नावशेष दुरुस्त करीत नाहीत, ते उचलून फेकून देतात."

यांचा अड्डा ) स्मारक तेथे तयार झालेलेच असेल. मला वाटते सुप्रसिद्ध ( मी त्यांना कुप्रसिद्धच म्हणेन ) 'डोम' आणि 'रोतोंडे' अद्याप बरीच गजबजलेली असतील[1]. दैववशात् आपले मित्र त्यात गोळा होत असतील तर तेथील वातावरण बदलून जाईल अशी मला आशा आहे. पण किमतीची जाहिरात केलेल्या थाळ्यावर थाळ्या ज्या टेबलावर जमा होत असतात त्यांच्या भोवती बसून सुटू शकणाऱ्या प्रश्नांपेक्षा कितीतरी गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहिलेले असतील. पॅरिसचा तिटकारा असूनही मला वाटते, मी तेथे असतो तर किती चांगले झाले असते. घरच्या ओढीने मी इतका बेजार झालो आहे की, दैवयोगाने प्रिव्ही कौन्सिलमध्ये आपल्याला यश आले तर निदान काही महिने तरी सुट्टी घेण्याचे मी स्वतःच्या मनाला आधीच आश्वासन दिले आहे. तसे घडले तर मी तत्काळ पॅरिसकडे धाव घेईन. आणि माझी खात्री आहे की, पॅरिस सारे नवे झालेले मला आढळून येईल.

युरपच्या बाबतींत घरची ओढ लागण्याचे आणखी एक कारण म्हणजे आपला रखरखीतपणा कधीमधी तरी काढून टाकण्याचा सूर्यराज दाखवीत असलेला समंजसपणा होय. येथे सूर्य सध्या वैभवाच्या शिखरावर आरूढ झाला आहे. आणि मी जो नुसताच उतावळा आशावाद प्रगट केला होता तो त्याने खोटा ठरविला आहे. पण पाऊस लवकरच सुरू होईल असा अंदाज प्रकट केला जात आहे. त्याने फार मोठा फरक होईल असे नव्हे. आता रात्रीचे दहा वाजले आहेत. पण हा कागद घामाने ओला होऊ नये म्हणून मला केवढे प्रयास घ्यावे लागत आहेत ! सहारा की अरेबिया--की देव जाणे कोठून-मधील उष्ण वारे साऱ्या दिवसभर वाहात आहेत आणि सकाळच्या दोन तीन वाजेपर्यंत ते थांबणार नाहीत. माझ्या परिस्थितीची जाणीव करून देण्यासाठी डांटेच्या काव्यपंक्तीचीच मी तुला आठवण करून देऊ शकतो. "नरकातील भडकत्या ज्वाळांची क्षिती न बाळगता अग्निकुंडातच झोपल्यासारखे" मला वाटत आहे. ठीक आहे. आतापर्यंत मी कसे तरी हे सहन केले आहे. परिस्थितीत बदल होण्याची आशाही नाही. पण म्हणून फार काळजी करू नकोस.

अपीलाच्या निकालामुळे तुला इतका परमावधीचा आनंद व्हावा ही कल्पना खरोखरच मला केविलवाणी वाटते. बारा वर्षांसाठी तू आपल्या मनाची तयारीच केली होतीस असे दिसते. माझी नव्हती. सहा वर्षेसुद्धा मी गृहीत धरीत नाही आणि शिक्षा कमी झाली नाही तरी मी आणखी तीन वर्षांनी बाहेर पडेन. त्यापूर्वी एक वर्ष आधी सुद्धा बाहेर पडण्याची संधी मिळण्यासारखी आहे.

---

१. पॅरिसमधील मोपार्नास विभागातील उपाहारगृहे.

माझ्या ग्रंथसंग्रहालयाबद्दलचा तुझा आशावाद अगदीच निराधार ठरणार नाही अशी मला आशा वाटते. चीनवरील माझ्या ग्रंथाचे इंग्रजी हस्तलिखित आणि प्रकाशित न झालेली व पूर्ण न केलेली इतर हस्तलिखिते त्यांत होती. ती नष्ट झाली तर तो तोटा भरून काढता येणार नाही. या देशातील माझ्या मित्रांजवळ चीनवरील हस्तलिखिताची अपूर्ण अशी प्रत तेवढी आहे. ते हस्तलिखित नष्ट झाले नसेल तर तो ग्रंथ इंग्रजी व फ्रेंच भाषेत प्रकाशित करण्याकडे लक्ष देणे उचित होईल. नात्सी कलाविध्वंसनाच्या मोहिमेत बहुतेक श्रेष्ठ जर्मन ग्रंथांची आहुती पडेल याबद्दल माझ्या मनात संदेह नाही. इंग्रजी आवृत्तीसाठी एखादा अमेरिकन प्रकाशक शोधून काढता येईल का? फ्रेंच आवृत्तीसाठी बारबुझेची मदत होईल.

दोरियोने तुझे कसे स्वागत केले कोण जाणे? ती भेट चांगली झाली असली तर पुढील वेळेस त्यालाही माझ्या शुभेच्छा दे आणि माझा म्हणून त्याला सल्ला दे की हे अत्यंत आणीबाणीचे दिवस आहेत; या वेळी धरसोड आणि अनिश्चितता ठेवता कामा नये. कुर्तने आपला निर्धार पक्का केला हे ऐकून मला आनंद वाटला.[1] मुळीच न करण्यापेक्षा उशिरा का होईना केले हे बरे झाले. माझ्या वतीने त्याचे अभिनंदन कर. त्याला म्हणावे, मला आशा आहे की त्याच्या पावलावर पाऊल टाकण्याच्या दृष्टीने इतर सहकाऱ्यांचे – ब्रिटनमधीलसुद्धा—मन वळविण्यात त्याला यश येईल. हाइन्झ आणि ऑगस्टच्या सहकाऱ्यांबद्दलची वार्ता ऐकून माझे मन व्यथित झाले. बिचारे, निराश झाले असतील. मी त्यांच्याबरोबर या वेळी असतो तर बरे झाले असते. अनुभवांती त्यांना माझ्या दृष्टिकोणाची यथार्थता पटून आली असेल—नवे दुकान नाही. पण आपण जोडलेल्या भागीदारांचे थवेच्या थवे तेथे घेऊन जावयाचे[2]

---

१. जर्मनीच्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे माननीय पुढारी डॉ. कुर्त रोझेनफेल्ड यांनी कम्युनिस्ट पक्षात सामील व्हावयाचे ठरविले अशी बातमी आल्यानंतर हे लिहिले होते.

२. कम्युनिस्ट इंटरनॅशलच्या त्या वेळच्या अधिकृत धोरणाला विरोध करणाऱ्या व त्यामुळे पक्षातून काढून टाकलेल्या कम्युनिस्टांनी अलग संघटना प्रस्थापित करावी याला माझा विरोध होता. मी ज्या धोरणाचा पुरस्कार केला ते असे की, त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचे सभासद म्हणून काम करावे, आपल्या मतानुसार प्रचार करावा आणि त्या मतांना पाठिंबा देणाऱ्या लोकांना अधिकृत कम्युनिस्ट पक्षात सामील होण्याचा सल्ला द्यावा. माझे असे मत होते की, या धोरणाचा पुरस्कार केल्यामुळे कम्युनिस्ट पक्षातून काढून टाकलेल्या कंम्युनिस्ट विरोधकांना पक्षाच्या सर्वसाधारण सभासदावर आपला प्रभाव टाकता येईल व कालांतराने पक्षाच्या धोरणात बदल घडवून आणण्यातही यश येईल.

कम्युनिस्ट दलात मीलन होण्याच्या दृष्टीने आणि या अरिष्टातून बाहेर पडण्याच्या दृष्टीने हाच मार्ग श्रेयस्कर आहे. सॅक्सनीतील निवडणुकीनंतर ऑगस्टने जेव्हा चिकित्सक नेतृत्वाचा (क्रितिशेर कॉफ) सिद्धान्त मांडला तेव्हा याच धोरणाकडे तो झुकत चाललेला होता. तुला कल्पना आहे, त्यावेळी एक लहानसा निष्क्रीय लोकांचा गट किती प्रक्षुब्ध झाला होता त्याची ?

मला काही फ्रेंच पुस्तकेही हवी आहेत. जॅरेसचे हिस्टॉयर; आणि बेल आणि मॉन्टाची काही पुस्तके. आतां जागा नाही. त्यामुळे थांबविलेच पाहिजे. पण किती किती तरी लिहावयाचे आहे.

## २३

सेंट्रल प्रिझन, बरेली
जुलै १४, १९३३

तुझ्या मासिक पत्रांची मी आतुरतेने वाट पाहत असतो. आता तर ती आतुरता शिगेला पोचलेली असते. कारण तू अशा ठिकाणी आणि परिस्थितीत दिवस काढीत आहेस की जेथे केव्हा, किती वेगाने फेरबदल होतील आणि त्यांचे किती भीषण परिणाम होतील हे सांगतासुद्धा येणार नाही. जर्मनीमध्ये ज्या रोगाची लागण झाली आहे तिचे लोण फ्रान्सपर्यंत पोचणार नाही–निदान नजीकच्या काळात तरी–अशी मला आशा आहे. ही रोगाची बाबटळ फ्रान्सपर्यंत येईल की काय अशी भीतीची आणि निराशावादाची झाक तुझ्या गेल्या पत्रात उमटून गेली होती. मला तर असे वाटते की, थोड्याच दिवसांत तिचा भर ओसरुन जाईल. खरोखर, थकावटीची चिन्हे आजच दिसू लागली आहेत. नाझी तुफानी दलातील वीर कुरकुर करावयाला लागले आहेत. कदाचित अंतिम अवनतीची ही सुरुवातही असेल. निदान फ्रान्स तरी वार्धक्याच्या उंबरठ्यावरील गृहिणीशी–लोकशाहीशी–अद्याप संसार करीत आहे. अर्थात मला आठवते, १९२४ सालीच "ले काहीस्मा एस्टला" अशी आरोळी ठोकीत लोकशाहीच्या विध्वंसनाची भाकिते केली जात होती. दुर्दैवी ग्रिशाच्या मावळत चाललेल्या वैभवाच्या त्या काळात तुफानी सुझाने अगदी रुथ फिशरच्या आवेशात पॅरिसमध्ये फॅसिझमला पायबंद घालण्यासाठी झटत होती.[1] कालच रात्री 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज' मध्ये "पडद्याआडून पाहणाऱ्या" एका लेखकाचा लेख मी वाचत होतो. फ्रान्सच्या प्रजासत्ताकाच्या

१. हा उल्लेख फ्रान्सच्या कम्युनिस्ट पक्षाच्या १९२४ साली काही काळ नेतृत्वपदी असलेल्या सुझाने गिरॉल्ट हिचा आहे. त्याच सुमारास रुथ फिशर ही जर्मन कम्युनिस्ट पक्षाची पुढारी होती. तिचे नेतृत्व बराच काळ टिकले. तिसरा उल्लेख रशियन पुढारी झिनोव्हिव्ह यांच्याबद्दलचा आहे.

भवितव्याबद्दल त्यात निराशाजनक भाकिते वर्तविण्यात आली आहेत. लेखकाने लुई बोनापार्टच्या काळाची पुनरावृत्ती होण्याची शक्यताही सूचित केली आहे. म्हणे, प्रजा-सत्ताकावर आघात करणारा एखादा बोनापार्ट निर्माण होईल. कोण ? माझी मती चालत नाही. कॉर्सिकन घराणे नामशेष झाले आहे आणि फ्रेंच हिटलेर किंवा मुसोलिनी अद्याप दृष्टिपथात यावयाचा आहे. साराच मला कल्पनाविहार वाटतो. थोडक्यात मला वाटते की काही काळ तरी तुझे जन्मस्थान हे सुसह्य असावयास हरकत नाही. अर्थात हल्लीच्या काळात अघटित असे केव्हा घडेल हे कोणी सांगावे ?

आपला " देर टाग " ( भाग्याचा दिवस ) खूप दूर आहे. चार वर्षे म्हणजे चार वर्षे. तो दिवस पुराण्या युरोपचे दर्शन घेण्यात साजरा करण्यापेक्षा या चार भिंतीं-आडून माझी सुटका करून तू साजरा केलास तरी मला आनंद वाटेल. अर्थात युरप-भेटीचे आमिष हे मोह पाडणारे आहे यात संशय नाही. अलीकडे विमुक्त जगातील काही चांगल्या गोष्टींची वाण मला तीव्रतेने भासू लागली आहे. उदाहरणार्थ, काही वेळी मला मधुर संगीताची ओढ लागते. पॅरिसच्या बाबतीत एक आठवण माझ्या अंतःकरणात उचंबळून येते. ती म्हणजे " थाइस " ( निवेदन अनातोल फ्रान्सचे ) ऐकण्यासाठी ऑपेरात काढलेली एक संध्याकाळ. उंच डोलकाठीवर चढलेल्या एका दिवाण्या इसमाच्या दडपलेल्या पण वेदना देणाऱ्या प्रक्षुब्ध भाव-भावनांचे जे चित्रण त्यात केलेले आहे ते निखालस भव्य आहे.

आपल्या दोस्तांना स्वीडिश [1] मित्रांकडून बराच त्रास सहन करावा लागत आहे, हे ऐकून माझे मन फार विषण्ण झाले. ऑगस्ट आणि हाइन्झला म्हणावे त्यांचा दृष्टिकोण मला पूर्णपणे मान्य आहे आणि कोणत्याही परिस्थितीत तो दृष्टिकोण बदलू नये असा माझा आग्रह आहे. आजच्या या मंदीच्या काळात नवीन दुकान उघडण्याची कल्पना मूर्खपणाचीच नव्हे तर तो एक अक्षम्य गुन्हा होईल. लायनचा ( ट्रॉट्स्की ) अपरंपार अहंकारच या वेळी या प्रकारच्या मार्गाचा पुरस्कार करू शकतो. खरोखर, परिस्थितीचा विचार करता, जर कम्युनिस्ट पक्षाच्या ध्येयधोरणांत खरा बदल दिसला असता तर आपला सवतासुभा नष्ट करण्याची शिफारस करण्यापर्यंतही मी मजल गाठली असती. काही झाले तरी मी योग्य संधीची वाट ही पाहीनच. तथापि एक गोष्ट मात्र लक्षात ठेवा. माझ्या मनात अणुमात्रही बदल झालेला नाही. पण आणीबाणीच्या उपाययोजना या असतातच. आपल्या मंडळाची पुढील बैठक होईल त्या वेळी माझ्या या मताची दखल घ्यावी. ते असो. सध्या लायन कोठे आहे ? त्याने डेन्मार्कमध्ये नाट्यपूर्ण प्रवेश केल्याची बातमी तेवढी वाचली.

---

१. स्वीडनमधील काही विरोधी कम्युनिस्ट त्या वेळी सोशल डेमोक्रॅटिक पक्षात सामील झाले.

२४

सेंट्रल प्रिझन, बरेली
ऑगस्ट १०, १९३३

या महिन्याच्या २१ तारखेला मी तुरुंगातील दोन वर्षे पुरी केली. त्यात खटल्या-पूर्वीच्या काळाचा समावेश होताच. मला अजूनही वाटते की काळ नेहमीप्रमाणेच वेगाने दौड करीत आहे आणि आपल्याला एकमेकांच्या जवळ आणीत आहे. अव-काशाच्या नसले तरी वेळेच्या दृष्टीने; आणि यांत्रिक वाहतुकीच्या या काळात काही हजार मैलांचा पाड काय ? प्रिव्ही कौन्सिलमधील संधी आणि इतर भाग्ययोगांची शक्यता यांचा विचार करता मला प्रत्यक्षपणे चार साडेचार वर्षांपेक्षा अधिक काळ तुरुंगात घालवावा लागणार नाही. असे असेल तर तीन वर्षेच आता राहिली आहेत आणि आणखी एक शक्यता अशी आहे की, अर्धी शिक्षा भोगल्यानंतरही माझी सुटका होऊ शकेल. या आशावादी वार्तांमुळे तुझ्या सध्याच्या भटक्या आणि अनि-श्चित जीवनात थोडा तरी विरंगुळा येईल, असे मला वाटते. अर्थात दुर्दैवाचा कहर झाला तरी ते सहन करण्याची माझी तयारी आहे आणि मला हे माहीत आहे की, आतापर्यंत जसे तू शौर्याने आल्या प्रसंगाला तोंड दिलेस तसेच ते पुढेही देशील.

क्रिप्सला सरळ पत्र लिहिण्यासाठी मी तुझ्या पत्राची वाट पाहात आहे. दरम्यान तू त्याला कळव की, माझ्या मते या खटल्याचा गाभा म्हणजे राजकीय पक्ष संघटित करणे, हे कायदेशीर आहे किंवा नाही हे ठरविणे हाच होय; अशा तऱ्हेचा पक्ष कायदेशीर रीतीने ब्रिटनमध्ये अस्तित्वात असल्यामुळे तसा पक्ष संघटित करणे हा हिंदुस्थानातही गुन्हा होत नाही. कारण हा विशिष्ट कायदा उभय देशांत सारखाच आहे. मीरत खटल्यातील अपीलाचा निकाल लक्षांत घेता प्रिव्ही कौन्सिलमध्ये मला न्याय मिळण्याची शक्यता दिसत आहे. मीरत खटल्यातील चौदा आरोपींना सोडण्यात आले आहे आणि बाकीच्या तेरा जणांची शिक्षा नाममात्र ठेवण्यात आली आहे. अर्थात आपल्याला यापासून इतरही निष्कर्ष काढता येतील आणि ते समाधान देणारेहि आहेत. मीरत आणि माझ्या खटल्यातील शिक्षेत जी विसंगती दिसत आहे ती माझ्या दृष्टीने सूचक आहे.

( काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे ) माझ्या संकल्पित ग्रंथावरील काम अनेक कारणांमुळे जवळ जवळ थांबले आहे हे ऐकून तुला आणि आपल्या मित्रांना बरे वाटणार नाही. मी स्वतःच त्यामुळे फार अस्वस्थ झालो आहे. तथापि साऱ्या निराशेवर मात करून काही तरी, कसे तरी पार पाडण्याचा माझा निर्धार आहे. तुला माहीत आहे की, मानवी जीवन म्हणून ज्याला म्हणण्यात येते त्याच्या औट घटकेच्या काळात महिने आणि वर्षे काहीही उपयुक्त असे कार्य न करता, नुसती उडून जाऊ लागलेली पाहून मला काय वाटत असेल ते ! खरोखर कोण्या निराशावादी अत्या-

धुनिक प्राणिशास्त्रज्ञाने जीवनाचे सार्थ वर्णन करताना म्हटल्याप्रमाणे मलाही आपण स्वतः 'सरपटणाऱ्या जीवजंतूंतील एक तिरस्करणीय अंश' असल्यासारखेच वाटत आहे.

अलीकडे मी पुनः एकदा फ्युअर बाकचे " दास वेसन दे क्रिस्टेन्टन्स " हे पुस्तक वाचीत आहे. हिंदुस्थानासारख्या मागासलेल्या देशासाठी हे अद्यापही कल्पनातीत उद्बोधक आणि मोलाचे पुस्तक आहे. या देशातील बौद्धिक जीवन अत्यंत उथळ आणि नवनवीन कल्पना करण्याच्या बाबतीत संवेदनाशून्य आहे. हे पुस्तक हिंदुस्थानातील आत्मसंतुष्ट आणि उपचारनिष्ठ बुद्धिवाद्यांच्या समोर असे एक चित्र रंगवील की जे त्यांच्या कल्पनेतील आचरटपणाशी तंतोतंत जुळण्यासारखे असेल. काही झाले तरी, त्यांच्यापैकी जे मूठभर आशा बाळगण्यासारखे लोक असतील, त्यांना तरी हे पुस्तक पवित्र संस्था आणि पूजनीय ठरलेले पूर्वग्रह यांच्याकडे कसे बघावे हे शिकवील. त्यांना मग आपल्या पावन मातृभूमीचे पूर्वजीवन कल्पिले गेले होते तसे नव्हे तर, खरोखर कसे होते त्याची साक्ष पटून येईल. या साऱ्या गोष्टींचा विचार करता सध्याच्या माझ्या स्थितीत मला करण्यासारखे एकमेव उपयुक्त कार्य म्हणून या पुस्तकाचा अनुवाद करण्याचा विचार माझ्या मनात घोळत आहे. त्या पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती तयार करण्यात आली किंवा नाही हे मला माहीत नाही. तशी झाली असली तरी ती आता उपलब्ध खास नसेल. अर्थात् इंग्रजी भाषांतर असलेच तर बराचसा मूलभूत मजकूर अनुपयुक्त म्हणून बाजूला काढून ठेवता येईल. उदाहरणार्थ, 'लीबे' (प्रेम) बद्दलचे आणि 'मेन्शन कुल्टुस्' (मानवी पंथ) बद्दलचे भावुक गुन्हाळ; हे पाहा त्यात असे काही शब्द आहेत की ज्यांच्यासाठी मला अचूक इंग्रजी प्रतिशब्द मिळणार नाहीत. उदाहरणार्थ, पुस्तकाच्या तत्त्वांचेच भाषांतर तू कसे करशील? 'वेसेन'ला 'इसेन्स' म्हणता येणार नाही. शिवाय, पुस्तकात 'वेसेन' हा शब्द अनेक अर्थांनी वापरण्यात आला आहे आणि त्यासाठी भिन्न भिन्न इंग्रजी शब्द वापरावे लागतील. दुसरा एक बुचकळ्यात पाडणारा शब्द म्हणजे 'गेमुएन' हा होय. त्याचा अनुवाद तू कसा करशील? विशेषणात्मक असा जेव्हा तो वापरला जातो तेव्हा त्याला एक निराळाच अर्थ प्राप्त होतो. अर्थात ही एक संकल्पित योजना आहे—ती अद्याप पक्की झालेली नाही.

बरगसाँचे नवे पुस्तक " ले ज्यू सोर्सेस द ला मोराल एट द ला रिलिजन " मला पाठवून देशील का? एका अमेरिकन मासिकातील परीक्षणावरून, पंचवीस वर्षांपूर्वी त्याने " ल, रेव्होल्युशन क्रिएट्रिस " हे पुस्तक लिहिल्यानंतर त्याच्या मनात बराच बदल झालेला दिसतो. असे म्हणतात की नव्या पुस्तकात धर्म आणि अविचल नीती यांच्यावर टीका करण्यात आली आहे, त्याच प्रकारची टीका जी आधीच्या पुस्तकात विज्ञानावर करण्यात आली होती. मोठे कुतूहलजनक भाष्य असेल ते! म्हणूनच ते वाचण्याचे कुतूहल माझ्यामध्ये निर्माण झाले आहे. आपल्या सिद्धान्ताची शेजारच्या

राष्ट्रांत ज्या प्रकारे राजकीय अंमलबजावणी होत आहे ती पाहून या तत्त्वशाचा लोकशाहीवादी फ्रेंच आत्मा थरारून गेला असेल की काय कोण जाणे !

आपले सारे मित्र कसे आहेत ? विसाव्या शतकातील रानोमाळ हिंडणारे ज्यू.

२५

सेंट्रल प्रिझन, बरेली
सप्टेंबर २२, १९३३

दुर्दैवाने आपला व्यवहार पुनः विस्कळीत झाला आहे. गेल्या महिन्यात तुझे पत्र फार उशिरा आले आहे— प्रवासात दोन आठवड्यांचा विलंब. या महिन्यात ते वेळेवर आले. पण मोहाचे ते फळ माझ्या डोळ्यासमोर एक आठवडाभर टांगलेले राहिले.[1] यापुढे महिन्यातील दुसऱ्या मेलच्या आधी तू पत्र पोस्टात टाकू नकोस. नाहीतर एअरमेलचा काहीच फायदा होणार नाही. पत्रे जणू बोटीने याबीत तशी उशिराने मला पोचतील. माझी पत्रे पोचावयालाही दोन आठवडे लागतात असे दिसते. माझे मागील पत्र तुला तीस तारखेला पोचले असेल तर त्याचा अर्थ ते तीन आठवडे प्रवास करीत होते. ते घेऊन जाणारे विमान काही पृथ्वीप्रदक्षिणेला निघाले नसेल. तसे असते तरी एवढा वेळ लागला नसता. सारेच मन विषण्ण करणारे आहे; पण इलाज काय ?

तुझ्या इच्छेप्रमाणे मी सोबत क्रिप्ससाठी एक पत्र पाठवीत आहे. ब्रॉक्वे त्याच्या निरुपयोगी आंतरराष्ट्रीय राजकारणात इतका निमग्न असेल तर तू ब्रेल्सफर्डसाठी प्रयत्न कर. ब्रेल्सफर्ड सध्या तरी त्यातून मोकळा झालेला आहे. म्हणून अशा तऱ्हेची लहानमोठी कामे करायला त्याला फुरसद असेल. बिचारा ! मॅक्डोनाल्डबद्दल त्याला फार आशा होती. हा सर्व विलंब झाल्यामुळे अद्याप तरी नुकसान झालेले नाही. कारण अपील याच्या आधी गुदरता आले नसते. उन्हाळ्याची सध्या सुटी आहे आणि सारे लाटसाहेब आपली संधिवाताची हाडे मोकळी करण्यासाठी कॉन्टिनेंटवरील निरनिराळ्या थंड हवेच्या ठिकाणी जाऊन पोचले असतील.

माझ्या प्रकृतीची फार काळजी करू नकोस. प्रत्येक वेळी मी लिहीत नाही त्याबद्दल, कारण कधी कधी मी विसरून जातो. आणि कधी हे लहानसे चिटोरे इतर महत्त्वाच्या प्रश्नांबद्दल चार शब्द लिहिण्यापूर्वीच भरून गेलेले असते. अलीकडे, तसा खास तक्रार करण्यासारखा माझ्या प्रकृतीत बिघाड नाही. जुने हृदयाचे दुखणे चालूच आहे. नव्याने उद्भवले आहे ते दाताचे दुखणे. मला वाटते हा पायोरियाचा विकार असावा, आणि त्यामुळे सारे शरीर ठणकत आहे. आता हिरडीच्या पोटाखाली गळवासारखे काही झाले

---

१ पूर्वीचे पत्र दिल्यानंतर एक महिना उलटेपर्यंत मला दुसरे पत्र देण्यात आले नाही. म्हणजे एखादे पत्र उशिरा पोचले तर दुसरे आणखी एक महिना उलटेपर्यंत ...!

आहे आणि त्यावर उपचार करणे भाग आहे. सध्याच्या माझ्या परिस्थितीत ते इथेच करून घेणे इष्ट नाही. दंतवैद्य बाहेरून बोलवावा लागेल, आणि एक लाख लोकसंख्येच्या या शहरात बत्तीस लक्ष दातांची निगा राखण्यासाठी फक्त एकच दंतवैद्य अस्तित्वात आहे. ( एकंदर दातांचा हा अंदाज अचूक नाही. कारण लोकसंख्येत अर्भके आणि वृद्ध स्त्री-पुरुष आहेत ) पण ही संख्या निम्मी असली तरी एका माणसाला ती भारीच आहे. म्हणून आपली पाळी येईपर्यंत कैद्याला वाट पाहणे भाग आहे. साहजिकच ती पाळी अधिक भाग्यवंत लोकांच्या नंतरच येणार. पण केव्हा तरी ती येईलच आणि मग आणखी काही यातनांच्या बदली माझ्या सध्याच्या यातना दूर होतील.

केवढी मोलाची जागा एका वळवळणाऱ्या, अशुद्ध जीवाची दुःखे आणि यातना यांचे वर्णन करण्यासाठी खर्ची पडली आहे. पुरे झाले हे रडगाणे.

माझी प्रकृती बरीच सुधारल्यामुळे मी आता पवित्र चरख्यावर बसून सूत कातू लागलो आहे. मला ते आवडते, आणि मी त्यात तज्ज्ञही झालो आहे. दररोज मी नेमून दिलेले काम पार पाडतो–साधारण कैदी जेवढे करतो तेवढे–ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा किती तरी कमी वेळात. मी कोणापेक्षाही अधिक चांगले काम करण्याचा नेहमीच प्रयत्न करीत आलो आहे. ही नवी कला आत्मसात् केल्यामुळे आता महात्म्याच्या अगदी अंतस्थ गोटात मला प्रवेश मिळू शकेल असा मला आत्मविश्वास वाटू लागला आहे. कारण काँग्रेसवर हुकमत गाजविणाऱ्या सर्वश्रेष्ठ मंडळाच्या सभासदांची–महात्म्याच्या कार्डिनल्सचे मंडळ–निवड दुसऱ्या कोणत्याही गुणावर नव्हे तर प्रार्थनाचक्र चालविण्यातील हातोटीवर असते. हे सारे भक्तजन सद्गुरुसहित दलाई लामाच्या भूमीत का जाऊन राहात नाहीत कोण जाणे ! पण त्यांचे दिवस भरलेले दिसत आहेत. अर्थात आमच्यासारख्या पुराण्या देशात इतर मर्त्य देशांच्या मानाने दिवस हे वर्षांच्या मापाने मोजता येतील. पण तरीसुद्धा त्यांचे दिवस भरले आहेत.

मी सुद्धा माझे दिवस मोजीत आहे. आणखी दोन आठवड्यांनी सहा वर्षांच्या शिक्षेतील वीस महिने मी पुरे केलेले असतील. आणखी काही इष्ट असे घडून आले नाही तरी तीन वर्षांपेक्षा जास्त काळ राहिलेला नाही. दरम्यानच्या काळात आशेचे काही किरण दैव उजळून टाकतात की काय पाहू या. आणि ही तीन वर्षे--समजा त्यांत काही कमी झाले नाही तरी–सूत कातण्यात आणि दातांची निगा राखण्यात मी खास खर्च करणार नाही. दुर्दैवाने, माझे संकल्पित साहित्यिक कार्य पार पाडण्यात अनेक अडचणी आहेत. पण मी शक्य तेवढ्या नेटाने त्याकडे लक्ष पुरवीत आहे.

सध्या मी आधुनिक तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांची पाहणी करीत आहे. हेतू एवढाच की, या सर्व शाखा निखालस " आध्यात्मिक " आहेत हे दाखवून द्यावे. राष्ट्रीय विचारसरणीवर – अन्यापैकी राष्ट्रवाद सुद्धा – ज्या पूर्वग्रहांची दाट पुटे चढलेली आहेत ती काढून टाकण्याच्या दृष्टीने हे अत्यंत आवश्यक आहे. तुला घोषवाक्य माही-

त्च आहे. पौर्वात्य अध्यात्मवाद विरुद्ध पाश्चिमात्य जडवाद. सारा भोंगळपणा आहे तो ! ते सिद्ध करण्यासाठी बरगसॉची नवी पुस्तके, त्याचप्रमाणे इतर अगदी अलीकडील तात्त्विक प्रकाशने मला हवी आहेत. उदाहरणार्थ, बरट्रांड रसेल आणि व्हाइटहेड यांचे सारे ग्रंथ मला मिळाले तर बरे. त्याचप्रमाणे राइनहोल्ड नीबुइट चे 'मॉरल मॅन ॲण्ड इम्मॉरल सोसायटी', यूजेन लायमनचे 'द मीनिंग ॲण्ड ट्रूथ ऑफ रिलिजन', टॉमस हॅन्ट मॉर्गनचे 'द सायंटिफिक बेसिस ऑफ इव्होल्युशन' आणि शिवाय जीन्स, एडिंग्टन आणि त्याच्या पटडीतील इतर तत्त्वज्ञ यांचे ग्रंथ हवे आहेत.

कागदाचा शेवट, निष्ठुर सुरीच्या धारदार पात्याप्रमाणे माझ्या डोळ्यांसमोर चमकू लागला आहे. आणि अद्याप मला कितीतरी लिहावयाचे आहे. तुझे बरेचसे जुने दोस्त आणि आपणा दोघांचे मित्र पॅरिसमध्ये गोळा होऊ लागलेले पाहून मला अतिशय आनंद होत आहे. पॅरिसबद्दलचा तिटकारा माझ्या हाडीमासी खिळलेला असे. पण आता ते मला आवडू लागले आहे. ट्रॉकॅडेरोजवळचा शांत कोपरा तुला कसा मिळाला कोण जाणे ! मी त्याच्या जवळच राहात असे.—एकोले मिलिटेअरच्या परिसरात. हाइन्झ आणि ऑगस्टला म्हणावे या संकटाच्या काळी त्यांना साथ द्यायला मी नाही त्याचे मला फार वाईट वाटते. माझी भूमिका पूर्वीइतकीच निर्धाराची आहे. अर्थात ती अस्थिर करण्यासारख्या घटनामात्र अमाप घडून येत आहेत. मी जर... ! नको हा जर तरचा विचारसुद्धा नको. आता महिनाभर मला थांबलेच पाहिजे.

## २६

सेंट्रल प्रिझन, बरेली
ऑक्टोबर १२, १९३३

गेल्या महिन्यात मी लिहिल्याप्रमाणे माझे ठीक चालले आहे. उन्हाळा आता निघून गेल्यामुळे प्रकृती अधिक चांगली होईल. माझ्या छातीत तसा काही बिघाड झाला असेल असे मला वाटत नाही. हृदयविकार आहेच. पण अलीकडे तोही मंद झाला आहे. एकंदरीने जो थकवा आला आहे—आणि माझ्या सध्याच्या परिस्थितीत तो येणे साहजिक आहे—तो सोडला तर मी बरा आहे. काही दिवसांपूर्वी दाताच्या दुखण्याने थोडा त्रास दिला. अखेरीस नाइलाजाने एक दाद काढून टाकावी लागली. ( काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे. ) खरे दुखणे होते ते हिरड्यांचे. आणि खास औषधोपचार करून ते बरे करता आले असते. पण माझ्या परिस्थितीत ते शक्य नव्हते. तेव्हा मी म्हटले की दात बळी द्यावा लागला तरी हरकत नाही पण हा ठणका एकदाचा थांबवावा. पॅरिसमधील दंतवैद्य भयानक असतात असे मी ऐकले आहे. तसेच उन्हाळ्यातील पॅरिसचे हवामान. मला एकाचा अनुभव आला होता आणि हिवाळासुद्धा फारसा

चांगला नसावा. बहुशः तेथे बर्फ पडत असते. क्वॉर्टियर लॅटिन अपार्टमेंट कसे आहे ? हिवाळ्यात ते चांगले ऊबदार करण्यात येईल अशी मला आशा आहे. बहुतेक पॅरिसमधील घरांत ती सोय नाही. विशेषतः बुद्धिवंतांच्या "डाव्या बाजूकडील विभागात" ( सीन नदीच्या बरे का ! ). पण या हिवाळ्यात फ्रान्समध्ये कोळशाची सुबत्ता होईल. कारण न्हूरचा कबजा घेण्याचे जुने नाटक पुनः पार पाडले जाईल. हिटलरवादी त्या दृष्टीने फ्रान्सला प्रक्षुब्ध करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करीत आहेत. मला समजत नाही की अशा मूर्खपणाच्या साहसांनी त्यांचा काय फायदा होणार आहे ?

परिस्थितीची अनिश्चितता आणि तुझ्यावरील वाढती जबाबदारी यांची मी कल्पना करू शकतो. आजूबाजूला इतके सारे लोक दुपारची भ्रांत करीत जगत असताना कोणाचीही प्राप्ती पुरेशी होणे शक्यच नाही. विशेषतः परिस्थितीने ती प्राप्ती लायकीपेक्षा कमी केलेली असताना तर शक्यच नाही. हाइन्झचे पत्र केविलवाणे होते. बेटा बराच निराश झालेला दिसतो. पण बहुधा माझ्या परिस्थितीचा विचार करून असेल; त्याने शूरपणाचा आविर्भाव मात्र खूप आणला आहे. मला त्यांना परोपरीने सांगावयाचे आहे की, मी माझी परिस्थिती त्यांच्यापेक्षा अधिक बिकट मुळीच समजत नाही. उलट तिसऱ्या राइशमधील गोंधळात सापडलेल्या लोकांपेक्षा ती बरीच सुसह्य आहे असे मला वाटते. होय तर डिमिट्रॉव्हला मी चांगला ओळखतो. त्याच्या जन्मभूमीतील —बल्गेरिया—सँकॉव्हच्या पाशवी अत्याचारातून तो जिवानिशी सुटला तेव्हा अस्ताव्यस्त केसांमुळे आणि दाढीमुळे तो दरोडेखोरासारखा दिसत असे. विनोदाने त्याला 'बँडिट' म्हणण्यात येऊ लागले आणि ते नाव त्याला इतके चिकटले की उंटेर देन लिंडेन (बर्लिनच्या राजनैतिक विभागातील मुख्य रस्ता) वरून तो नखशिखांत पोशाखात हिंडू लागला तरी तो त्याच नावाने ओळखला जात असे. त्या वेळी तो...विश्वासांतील सुभेदार होता.

माझ्या जीवनाबद्दल तशी तक्रार करण्यासारखे साधारणपणे काही नाही. तुरुंगातील परिस्थितीचा विचार करता ते ठीकच आहे. नाही, दुर्दैवाने मी एकटा नाही. एक सोबती आहे. खोली मोठी आहे. आणि दोनच का, अधिकसुद्धा कैदी त्यात राहू शकतील. पण कोणत्या प्रकारचे ? तेथेच तर दोन जगांचा फरक निर्माण होतो. तुला माहीत आहे, मी किती माणूसघाणा आहे तो. निवडक मंडळींचा सहवासही मला मानवत नाही. मग भाऊगर्दीने माझा जीव किती कासावीस होत असेल त्याची कल्पनाच कर. माझ्या आवडीनिवडींशी न जुळणाऱ्या व्यक्तींचा तर मला तिटकारा असतो. दुर्दैवाने माझा सध्याचा सोबती असा आहे की, जो सवयी, आवडीनिवडी, शिक्षण, संस्कृती या सर्व बाबतींत माझ्याशी न जुळणारा आहे. पण काय करणार ? सारा देश अशा लोकांनी भरलेला आहे आणि त्यांच्यापैकी काही लोकांना तरी आपल्याला टाळता येणार नाही. माझ्याच वर्गातील तो कैदी असल्या कारणाने त्याला लाथ मारून बाहेर काढण्याचा

मला हक्क नाही. पण ती भावना उचंबळून येण्यासारखी कारणे मात्र भरपूर आहेत. त्याच्याविषयीच्या काही गमती सांगण्याचा मोह मला टाळता येत नाही. भारतमातेचा एक सुपुत्र म्हणून त्याची बालंबाल खात्री आहे की, पाश्चिमात्य जडवादी संस्कृती ही भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीपेक्षा कमी दर्जाची आहे. गंमत मात्र अशी की, एका इंग्रजी न्यायाधीशाने त्याचा खटला चालवीपर्यंत एकही युरोपियन इसम त्याने जवळून पाहिला नव्हता. युरोपीय इतिहासाचे अगदी प्राथमिक स्वरूपाचे ज्ञान तर राहू द्याच, पण मुख्य मुख्य युरोपीय देशांच्या भौगोलिक स्थानाबद्दलही तो अज्ञानी आहे. अर्थात ज्या संस्कृतीचा तो इतका हिरीरीने तिटकारा करतो त्याची त्याला अणुमात्रही कल्पना नाही. त्याला एवढे माहीत आहे की, जीवनातील भौतिक वस्तूंची उपेक्षा करणाऱ्या आध्यात्मिक संस्कृतीचा तो एक अभिमानास्पद संतान आहे. म्हणून दररोज आणि वेळोवेळी साखरेच्या चिमटीसाठी किंवा अशाच चिल्लर गोष्टीसाठी दुसऱ्या गरीब कैद्याशी त्याला हमरीतुमरीवर येताना पाहिले की, मला केवढे हसू येत असेल त्याची कल्पनाच कर. पाश्चिमात्य संस्कृतीबद्दल त्याची आणखी एक कल्पना आहे. ती अशी की, साऱ्या युरोपियन स्त्रिया वाईट आहेत – नैतिक दृष्ट्या. आता हे ऐकून करमणूक करून घ्यायची नाही तर काय ? कारण त्याची आकलनशक्ती इतकी बाल्यावस्थेतील आहे की, त्याला उमगतसुद्धा नाही की आपले हे मत, माझ्यासारख्या ज्या व्यक्तीला स्त्री जातीचे सर्वोत्कृष्ट आदर्श — तो तिरस्कार करीत असलेल्या पाश्चिमात्य देशांत— पाहण्याचे भाग्य लाभले आहे हे त्याला पटणार नाही, पण काय करणार ? या पवित्र भूमीत लक्षलक्षावधी असे नमुने आहेत. काय बदलावयाचे ते तुला माझ्याकडून जाणून घ्यायचे होते ना ! हे पाहा त्याचे चित्र आधीच तुझ्यापुढे उभे आहे. खरोखर तसे पाहिले तर हा माणूस अपायकारक आहे असेही नव्हे ! तो दुसरे काही होऊच शकत नाही. तो अवनत संस्कृतीचा प्रतिनिधी आहे. जी संस्कृती फार काळ लांबणीवर पडलेल्या मूटमातीची वाट पाहत आहे. या देशाला गरज आहे ती ' केमालपाशाची. ' सुरुवात म्हणून डोक्यावरील हास्यास्पद शेंडी तोडून टाकण्यासाठी; भयंकर मिश्या ठेवणे हा प्रत्यक्ष खून करण्यासारखा गुन्हा ठरविण्यासाठी; लाडात वाढविण्यात येणाऱ्या ऐदी, गप्पाष्टकात गुंगणाऱ्या पण शिसारी येईल अशा रीतीने वाईट वागणूक दिल्या जाणाऱ्या स्त्रियांना त्यांची चरबी कमी व्हावी किंवा त्यांची रक्तहीनता दूर व्हावी म्हणून रस्त्यावर कामाला लावण्यासाठी; आणि भावभावना दडपून टाकावयाला लावणारा जो शाप परंपरेने त्यांच्या माथी बसला आहे त्यापासून त्यांना मुक्त करण्यासाठी; थोड्याच लोकांना समजू शकणाऱ्या भाषेत चाललेला, कपाळशूळ उठविणारा मंत्रघोष बंद करण्यासाठी; आणि अशाच प्रकारच्या असंख्य गोष्टी करण्यासाठी.

हे झाले माझ्या माननीय सोबत्याबद्दल. बाकीच्या गोष्टी सांगावयाच्या तर रोज मी आंघोळ करतो – उन्हाळ्यात तर दिवसांतून तीन वेळा. तसे मी केले नाही तर,

माझे शरीर कुजून जाईल. मी एका मोठ्या खिडकीजवळ झोपतो. त्या खिडकीतून उंच भिंतीच्यावरून डोकावणारे आकाश मला दिसते. सध्या आकाश नितांत सुंदर आहे. असे गर्द निळे आभाळ तू कधी पाहिलेले नाहीस. आणि तारका— अब्जावधी. ज्या जीन्स किंवा एडिंग्टनला कधी मोजता येणार नाहीत. तत्त्वतः त्यांची गोळाबेरीज तेवढी त्यांना करता येईल. या भागातील या वेळचे हे सर्वांत चांगले दिवस. इथला ग्रीष्म ऋतू युरोपपेक्षा अगदीच निराळा. तिथल्या वसंतासारखा तो असतो. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर आणि मार्च आणि एप्रिल हे महिने फार आनंददायक. डिसेंबर ते फेब्रुवारी-पर्यंतचा काळ थंडीचा. खोली ऊबदार ठेवली म्हणजे झाले. तेवढ्या सवलतीच्या अभावी ( तुरुंगातच नव्हे तर बहुतेक साऱ्या घरात ) काही वेळा हिवाळा बराच त्रासदायक होतो. मी हवेची चर्चा करीत आहे. कमाल आहे की नाही !

आवश्यक त्या साहित्याचा अभाव हीच संकल्पित पुस्तके तयार करण्याच्या मार्गातील धोंड नव्हे ! मुख्य अडचण माझ्या सध्याच्या जीवनातील बंधनाची. सुसूत्र असे काम ती करूनच देत नाहीत. पहिल्या वर्षात मी खूपसे साहित्य गोळा केले. पण त्या साहित्याला अखेरचा आकार मी देऊ शकत नाही. तथापि मी तुटक तुटक भाग पुरा करीत आहे. सध्या मी पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाच्या आधुनिक शाखांची चिकित्सा पुरी करीत आणली आहे. अलीकडील वैज्ञानिक सिद्धान्ताच्या ज्ञानशास्त्रविषयक निर्णयांचाही त्यात समावेश होतोच.

हे साहित्य 'आउटलाइन ऑफ द हिस्टरी ऑफ सायंटिफिक थॉट' ( जडवाद या नावापेक्षा कमी धक्का देणारे नाव ) या पुस्तकाच्या प्रस्तावनेसाठी उपयोगी होईल. गंमत काय आहे पाहा. एका पुस्तकाची प्रस्तावना म्हणून जे लिहिले तेच मुळी लहान आकाराचे एक पुस्तकच झाले आहे. ते बरेच झाले म्हणा ! एकदा सुरुवात झाल्यानंतर सांगोपांग चर्चा करणे आवश्यकच होते. म्हणून मला अगदी अलीकडील काही शास्त्रीय ग्रंथ हवे आहेत. ( मार्गन, प्लान्क, दसिटर, जीन्स, एडिंग्टन, सॉड्डी, हॉलडेन, हक्सले वगैरे. ) इतकी सारी मासिके पाठविण्याचे कारण नाही. व्यापारविषयक मासिके तर काढूनच टाकावी. मला टाइम, करंट हिस्टरी, द नेशन, आणि काही गंभीर शास्त्रीय मासिके मिळाली तरी माझे समाधान होईल. विद्वज्जडतेचा आविर्भाव आणणारी 'द अमेरिकन मर्क्युरी' किंवा 'ॲटलांटिक मंथली' या मासिकाबद्दल तर मला मुळीच आस्था नाही.

२७

सेंट्रल प्रिझन, बरेली
डिसेंबर २३, १९३३

कृपा करून सर स्टॅफोर्डला खालील निरोप कळव. त्याने जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याचा मी काळजीपूर्वक विचार केला आहे आणि त्याच्या गांभीर्याची मला पुरेपूर कल्पनाही आहे. तेवढा विचार केल्यानंतर मात्र मला असे वाटते की, प्रिव्ही कौन्सिलचा निर्णय कांहीही होवो, आपल्याला प्रिव्ही कौन्सिलपुढे अपील नेण्यांत विशेष धोका नाही. भारताचा विचार करता, निर्णय विरुद्ध गेल्यामुळे परिस्थितीत फरक पडणार नाही. तथापि तो अनुकूल असणे मात्र फायद्याचे होईल. त्यांतून निर्माण होणाऱ्या अनिष्टतेची व्याप्ती ब्रिटनपर्यंत पोचण्याची जी शक्यता आहे ती फार दूरच्या काळातील–इतक्या दूरची की अनुकूल निर्णयाचा जो तात्कालिक फायदा होण्यासारखा आहे तो संभाव्य अनिष्टतेच्या पोटी अपायकारक न ठरावा. मीरत खटल्याचा पूर्वनिर्णय हा अप्रस्तुत असण्याचे कारण त्या खटल्यात प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करणे हे व्यावहारिक दृष्टीने निरर्थक होते. त्या वेळी अपील करण्यात आले होते ते निव्वळ तत्त्वबोधासाठी–म्हणजे शक्य तो अनुकूल कायदेशीर पूर्व-उदाहरण प्रस्थापित करण्यासाठी. म्हणून अपील करावे की न करावे, हा निर्णय सर स्टॅफोर्ड याने उपस्थित केलेल्या मुद्द्यानुसारच घ्यावयाचा होता. या सर्व कारणास्तव, हे अपील पुढे चालवावे असे मला वाटते. पण त्याला एकच अट आहे. क्रिप्स याने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे गांभीर्य खटल्याच्या कायदेशीर गुणाच्या आधारेच अजमावले पाहिजे. या बाबतींत कायदेपंडित हाच खरा न्यायनिवाडा देऊ शकतो. खटल्याच्या गुणावरून सर स्टॅफोर्ड आणि इतर कायदेशास्त्रातील वाकबगार असे मुरब्बी लोक यांना वाटले की अनुकूल निर्णय येण्याला बराच वाव आहे तर अपिलासाठी घेतलेला धोका जवळ जवळ नसल्यासारखाच होतो. तेव्हा मला टाकलेल्या सवालाचा जबाब देताना मी माझ्या परीने सर स्टॅफोर्डला एकच विनंती करीन की, त्याने खटल्याच्या गुणावरूनच आपला निर्णय घ्यावा. व्यक्तिशः मला असे वाटते की, खटल्याच्या गुणावर प्रिव्ही कौन्सिल भारतीय न्यायालयाचा निर्णय उचलून धरणार नाही. पण माझी चूक होण्याचा संभव आहे किंवा मी फाजील आशावादीही असेन. कायदे पंडितानेच त्याचे निदान करावे.

आता, मी आपल्या अवकाशातून दुवा जोडणाऱ्या मासिक संवादाकडे वळतो. स्नीव्हलिटने लिहिलेल्या चार ओळी वाचून मला कल्पनातीत आनंद झाला. विशेष आनंद झाला तो त्याने अन्तर्मन खुले केल्याबद्दल. शांती मिळो त्याच्या आत्म्याला—तो असेल तर ! त्याला सरळ लिहिता आले असते तर किती बरे झाले असते. त्याने ज्या जिव्हाळ्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या माझ्या हृदयाला भिडल्या. मला खात्री

आहे की, तो एकाकीपणे पार्लमेंटमध्ये बाजू लढवील. प्रभावी वक्ता आहे तो. जहालवादाच्या रोगाने जे त्याच्यामध्ये मूळ धरले आहे ते नाहीसे करता आले तर केवढे कर्तृत्व तो गाजवू शकेल. त्याच्या लहानशा देशात आणि त्या देशाच्या विशाल साम्राज्यात कोणीही त्याचा प्रतिस्पर्धी होऊ शकणार नाही. १९३४ साली मला जेव्हा त्याने आपल्या देशातील लोकांपुढे येऊन भाषण करावयाला सांगितले तेव्हा मी त्याच्याबद्दल आशावादी होतो. परंतु दुर्दैवाने रूथ, मॅस्लो, आणि त्यांचा गट यांच्याशी त्याचे पूर्वसंबंध असल्यामुळे आपल्या लोकांचे मत त्याच्याविषयी फार कलुषित झाले होते. त्याच्याबद्दलच्या माझ्या आशावादाची हेटाळणी करण्यात आली. तथापि मला अजूनही वाटते की, आपले लोक त्याच्याबद्दलचा दृष्टिकोण ठरविण्याच्या बाबतीत अधिक लवचिक, अधिक समजूतदार राहिले असते तर आपण त्याला जिंकू शकलो असतो. आणि त्याचा अर्थ असा की, त्याच्या देशात परिश्रमपूर्वक जे काही मिळवगाऱ्यासारखे होते ते आपण संपादन केले असते. पण ते असो. उतू गेलेल्या दुधाबद्दल खंत करून काय उपयोग? त्यांचा निर्धार आहे आपले भाग्य जोखून पाहण्याचा. त्यांना प्रयत्न करू द्या.— बोटे भाजून घेण्यासाठी किंवा आपले हसे करून घेण्यासाठी. ते काही असले तरी तो आपला सच्चा दोस्त राहणार आहे. तू ते पाहिलेच आहेस. विश्रांतीसाठी तू त्याच्याकडे का जात नाहीस! तू भेट दिलीस तर त्याला आणि त्याच्या पत्नीला फार आनंद होईल याची मला खात्री आहे. आणि ती रुचकर डच खाद्यपदार्थांचा तुझ्यावर मारा करील. अतिशय सुंदर जेवण असते ते. माझ्या मते जगातील सर्वोत्कृष्ट. कारण फ्रेंच नाजुकपणा आणि जर्मन खमंगपणा यांचा सुरेख संयोग त्यात झालेला असतो.

मी अद्याप परवानगी मागितली नसली तरी माझ्या साहित्यकृती माझ्या आधी तुरुंगातून बाहेर पडू शकणार नाहीत. नाही तरी त्या परदेशी पाठविण्यात फारसा अर्थ नाही. या देशातील वाचकासाठीच बहुशः ते लेखन झाले आहे. अपवाद आहे तो भारतीय तत्त्वज्ञानावरील पुस्तकाच्या बाबतीत. पण त्याचीही अद्याप नीट आखणी झालेली नाही. पुरेसे साहित्य उपलब्ध होत नसल्यामुळे त्याची प्रगती कुंठित झाली आहे. मला तर वाटते की तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर सुद्धा काही काळ ते पुरे होऊ शकणार नाही. मध्यंतरीच्या काळात विशिष्ट मुद्द्यावर मी काही फुटकळ लेखन केले आहे. फ्युअरबाकचा अनुवाद करण्याच्या बाबतीत मी काहीच केलेले नाही. पाश्चिमात्य तत्त्वज्ञानावरील पुस्तक जवळ जवळ पुरे झालेले आहे. त्याचे तीन भाग पडतात; ख्रिस्ती आणि मध्ययुगीन विचार; आधुनिक तत्त्वज्ञान; आणि पाश्चिमात्य संस्कृती ही जडवादी नाही. या सिद्धान्ताला पुष्टी देणाऱ्या पाहणीतून काढण्यात आलेले निष्कर्ष. या पुस्तकाच्या आकारामुळे, (हस्तलिखित ६०० पाने) "आउटलाइन ऑफ द हिस्ट्री ऑफ सायंटिफिक थॉट" याची ती प्रस्तावना होणे कठीण असले तरी एक स्वतंत्र प्रबंध म्हणून त्याचा उपयोग नाही असे मला वाटते. दुसऱ्या एखाद्या ग्रंथाशी संबंधित म्हणूनच त्या

पुस्तकाचे प्रकाशन होणे बरे ! ते कसे करावयाचे याबद्दल माझे पक्के मत झालेले नाही. ऐतिहासिक रूपरेखेच्या बाबतीतही काही प्रगती झाली आहे. परंतु अगदी नव्या शास्त्रीय ग्रंथाच्या अभावी ते कामहि रेंगाळत पडले आहे. हे ग्रंथ लवकरच माझ्या हाती येतील असे वाटते. या सर्व गोष्टींवर सुटका झाल्यानंतरच हात फिरविता येईल.

दोन-तीन महिने मला अगदी हुषारी वाटत होती. अलीकडे पुनः एकदा मला थकल्यासारखे वाटू लागले आहे. थंड हवेचा तो परिणाम असेल. माझे वजन कमी होत चालले आहे. (मजकूर खोडून टाकला आहे.) खरे सांगायचे तर उच्च प्रकारच्या जीवनमानाची मला सवय जडली होती यांत संशय नाही. त्यामुळे सध्याची परिस्थिती मला अधिकच जड जात आहे. पण तक्रार करण्यात काय अर्थ ? माणसाने नियमाप्रमाणेच खेळ केला पाहिजे आणि खिलाडू वृत्तीने राहण्याचा मी निश्चय केला आहे.

## २८

सेंट्रल प्रिझन, बरेली
जानेवारी २५, १९३४

या महिन्याच्या माझ्या पत्राला विलंब लागून चालणार नाही. कारण या देशातील नुकत्याच झालेल्या भूकंपाच्या वार्तेमुळे तू अस्वस्थ झाली असशील. या प्रान्ताच्या पूर्वेकडील भागात भूकंपाने हाहाकार उडविला आहे. काही धक्के इथेही बसले. पण नुकसान झाले नाही. हा प्रलय ज्या प्रान्तात झाला तेथे जीवन आणि मालमत्ता यांचा किती नाश झाला याची पूर्ण कल्पना अद्याप आलेली नाही. पण भयानक नुकसान झाले यात संशय नाही. पाच मोठी शहरे जवळ जवळ उद्ध्वस्त झाली आहेत. भूकंपाचे केंद्र कोठे तरी हिमालयाच्या गाभ्यात आहे. आमच्या देवांचे तेच वसतिस्थान. विशेषतः शिवाचे — विध्वंसनाचा तो देव. अलीकडे, देवांची वसती असलेल्या अवकाशातील गुपिते जी उकलून काढण्याचा मानव प्रयत्न करीत आहे – त्यासाठी स्वतः तयार केलेल्या, हवेत उडणाऱ्या भयानक यंत्राचा त्याने उपयोग केला– त्यामुळे देव रुष्ट झाले असावेत. कैलास पर्वतावरून ( शिवाचे वसतिस्थान:) उड्डाण ! मर्त्य मानवाचा केवढा हा उद्दटपणा ! म्हणून हे शासन. अशा रीतीची कारणमीमांसा सहज पटण्यासारखी आहे. ती यामुळे की, हिमालयावरील अगदी अलीकडील उड्डाणाची सुरुवात ज्या भूमीवरून झाली तिचेच सर्वांत अधिक नुकसान झाले आहे. पण विनोद असा की, खरे पापी जे आहेत त्यांना देवांच्या या रोषाची झळ लागली नाही. बळी गेले ते श्रद्धाळू भक्तजन.

एकंदरीने निसर्ग चमत्कारिकपणे वागत आहे. या वेळचा हिवाळा अतिशय

कडाक्याचा आहे. जवळ जवळ दोन महिने आम्ही कुडकुडत आहो. आणि त्यात भर पडत आहे ती धुक्याने भरलेल्या रात्रींची आणि अनेक दिवस पडणाऱ्या बादळी पावसाची. त्याचा शेवट अजूनही दृष्टिपथात नाही. युरपमध्येही कडाक्याची थंडी पडल्याच्या बातम्या आहेत. पण पॅरिसच्या नेहमीच्या तापदायक ओल्या हिवाळ्यापेक्षा बर्फ पडणे बरे. अर्थात घरे ऊबदार केली असतील तर.

तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी दयाळूपणे मला कळविले की, नव्या वर्षासाठी शुभेच्छा देणारी तार तुझ्याकडून आली होती. ( एक वाक्य खोडून टाकण्यात आले आहे. ) अशा गोष्टींसाठी तू पैशाचा अपव्यय करू नकोस. पैशाचा यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक चांगला उपयोग करुन घेता येईल. तुझ्याकडून उसने पैसे मिळाले असते तरी कोणाला आनंद झाला नसता का ? हाइन्झ प्रवासाहून परत आला का ? कितीक तरी गोष्टी मला त्याला लिहावयाच्या आहेत. पण ते शक्य नाही. त्याने आणि इतरांनी एवढे मात्र निश्चित समजावे की, त्यांना वरकरणी दिसत असेल तसा मी मूर्ख ठरलेला नाही. माझे समाधान व्हावे अशी जबरदस्त कारणे आहेत. फार दिवस नकोत जावयाला. लवकरच सर्व परिस्थिती अधिक स्पष्ट होईल. तशी ती होणार यात संशयच नाही. हळूहळू पण निश्चितपणे त्या दिशेने पावले पडू लागली आहेत.

या महिन्याच्या नऊ तारखेला कारावासाचे माझे दुसरे वर्ष पूर्ण झाले. आता चार वर्षे उरली. त्यांपैकी काही भाग—निदान वर्ष तरी साधारणपणे सूट म्हणून जाईल. म्हणजे वाईटात वाईट गृहीत धरले तरी आणखी तीन वर्षेच राहिली. ज्या दिव्यातून मी जात आहे, त्यात काही ओलावा आला नाही तरी ही तीन वर्षे झराझ्याने जातील. पण प्रिव्ही कौन्सिलच्या अपिलात अनुकूल निर्णय मिळेल अशी मला आशा आहे. म्हणून ते अपील पुढे चालवावे अशी सूचना देण्याची जबाबदारी घ्यावयाला मी मनाची तयारी केली आहे. यापुढे त्यात विलंब होणार नाही अशी मला आशा आहे. सध्याच्या माझ्या परिस्थितीचा शेवट व्हावा यासाठी साहाजिकच मी उत्सुक आहे. इकडच्या वकिलांची वागणूक प्रक्षोभकारक आहे. सुरुवातीपासूनच या खटल्याचा खेळखंडोबा करण्यात आला आहे. ( काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे ) पेटन, ब्रॉक्वे ( तो परतला असल्यास ) किंवा जरूर पडल्यास क्रिप्स यानी स्वतः या बाबतीत नेहरूंशी संपर्क साधावा. हा द्राविडी प्राणायाम करण्याचे कारण असे की, जे व्यक्तिशः त्यात लक्ष घालतील अशा लोकांना सरळ लिहावयाचे तर तुला पत्र पाठविण्याचा हक्क मला सोडावा लागेल. ते मला मुळीच करावयाचे नाही. ( काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे ) काही दैनंदिन गरजेच्या वस्तू, उदाहरणार्थ साबण वगैरे, मला विकत घेण्याची परवानगी आहे.

स्नीव्हलिटकडून येणारी पुस्तके अद्याप आलेली नाहीत. मला कोणत्या प्रकारची

पुस्तके हवी आहेत ते तू त्याला कळविले असशीलच. त्याला कळव की जी. डी. एच्. कोल याची सर्वांत अलीकडची दोन पुस्तके मला हवी आहेत. ( द गाइड थ्रू द वर्ल्ड केऑस आणि इंटलिजंट मॅन्स व्ह्यू ऑफ युरप ) काही हलकेफुलके साहित्यही मला हवे आहे.

कडाक्याच्या थंडीमुळे गेल्या दोन–तीन महिन्यात मी काही लेखन केलेले नाही. संध्याकाळी सुसह्य असे स्थान म्हणजे अंथरूणच. पण ते सुद्धा नेहमी नाहीच. काही रात्री इतकी भयानक थंडी असे की, बिछानासुद्धा कधी ऊबदार झाला नाही. शिवाय अलीकडे कोणतेही परिश्रमाचे काम करण्याइतकी माझ्यामध्ये ताकदच राहिलेली नाही. सध्या मी सूतकताई करीत नाही. वैद्यकीय कारणास्तव मला त्यातून सूट मिळाली आहे. पण लवकरच मला बरे वाटेल आणि जीवनाचा नैसर्गिक प्रवाह चालू राहील अशी मला आशा आहे. तथापि उष्णता आणि थंडी या दोहोंनाही तोंड न देता येणे हा शुद्ध दुबळेपणा आहे. मला वाटते मी आता म्हातारा झालो. माझी पोलादी शरीरप्रकृती गंजत चालली आहे. पण इतक्या लवकर वृद्ध होण्याची माझी इच्छा नाही.––अनेक कारणांस्तव कारावासातील दोन वर्षांमुळे जर वृद्धत्वाकडे, निदान पोक्तपणाकडे मी झुकू लागलो तर आणखी तीन वर्षांनी मी गलितगात्र होईन. ती कल्पनासुद्धा मला सहन होत नाही. आणखी बरीच वर्षे जगण्याची आणि तीही झुंज देत जगण्याची माझी इच्छा आहे. तारुण्य जतन करण्याच्या इच्छेचा जर शरीरप्रकृतीवर प्रभाव पडत असेल तर ! तर काय, मी तरुण म्हणूनच बाहेरच्या जगात उत्साहाने पाऊल टाकीन. पण खेदाची गोष्ट अशी की, मी चाळिशीत आलो आहे.

एका मासिकात मी वाचले की, ' लाइफ बिगिन्स ॲट फॉर्टी ' या नावाच्या एका पुस्तकाने अमेरिकेत खळबळ उडवून दिली आहे. आणि स्त्रियांना उद्देशून हे म्हटले आहे ! म्हणजे पुरुषाची मर्यादा पन्नासपर्यंत न्यावयाला हरकत नाही. त्याचा अर्थ असा की, फेरजन्माचा बिंदू गाठण्यापूर्वी मला आणखी दहा बारा वर्षे तरी उधळता येतील. जीवनाचा हा जो नवा सिद्धान्त प्रगट झाला आहे त्याने चाळिशीतच जीवनाला लाथ मारण्याची माझी जुनी कल्पना उधळून लावली आहे. त्या वेळी मला वाटत असे की, चाळिशीलाच वृद्धापकाळाचा दरवाजा खुला होतो. ही मजेदार भावना वस्तुतः माझ्या अस्तित्वाशी विरोधी होती. पण ती रेंगाळत राहिली खरी. मला वाटते माझ्या कुंडलीने जे भाकित केले होते की, मी चाळीस वर्षांपेक्षा अधिक जगणार नाही त्याचा प्रभाव माझ्या सुप्त मनावर पडला असणे शक्य आहे. आता हा सारा आचरटपणा लिहिणे हा सूज्ञपणा खास नव्हे, याची मला आता उशिराने जाणीव झाली आहे. कारण सध्याच्या तुझ्या परिस्थितीत संशय निर्माण करणाऱ्या सूचनेने सुद्धा तू थरारुन जाण्याची किंवा निदान अस्वस्थ होण्याची शक्यता आहे. तू हे सारे गंभीरपणाने घेणार नाहीस ना ? मी नुसता विनोद करीत आहे. त्या जाणिवेने सुद्धा, कल्पनेने मी त्या अविस्मरणीय

दिवसांची अनुभूती घेत आहे की जेव्हा आपण हसण्यापलीकडे काही केले नाही. तसेच पुनः हसण्याची इच्छा इतकी उफाळून आली आहे की, ती मला इतके वृद्ध बनूच देणार नाही की ज्या वृद्धापकाळाबद्दल मनुष्याला घृणा वाटू लागेल. म्हणून लक्षात ठेव, मी माझ्या कुंडलीवर मात करणार आहे. जे पापी ग्रह मला घेरू पाहतील त्यांना जीव-सृष्टीतील क्षुद्र ग्रह ज्या वक्रगतीने चालतात तशाच वक्रगतीने त्यांच्या कक्षेत फिरायला लावणार आहे. त्यासाठी आईन्स्टाइनच्या सापेक्षवादापेक्षा अनिश्चिततेच्या सिद्धान्ताचा स्वीकार करण्याची माझी तयारी आहे. आइन्स्टाईन आणि त्याचे अनमोल व्हॉयोलिन यांच्याबद्दलचा आदरभाव कायम ठेवूनही मी हे म्हणत आहे. अनिश्चिततेच्या सिद्धान्ता-बद्दल मी लिहिले आणि मग मला आठवले की, पदार्थविज्ञानशास्त्रात आध्यात्मिकतेचे हे जे मिश्रण करण्यात आले आहे ते बॉर्नच्या अलीकडील संशोधनाने फोल ठरविले आहे.

त्यावरून आठवण झाली की, शास्त्रीय विचारावरील माझा ग्रंथ पुरा करण्यासाठी मला अगदी नवीन विज्ञानविषयक पुस्तके हवी आहेत. अमेरिकन्सना त्याची निकड लाव आणि स्नीव्हलीटलाही सांग. नाहीतर मला ते ग्रंथ मागवावे लागतील. आमच्या ज्या वकिलाने आपले काम नीट रीतीने केले नाही त्याला आगाऊ दिलेले पैसे त्याच्याकडून परत घेतल्यानंतरच अमेरिकन प्रकाशकाकडून मी ती पुस्तके मागवू शकेन. बर्लिनमधील आपल्या पुस्तकाचे काय ? अमेरिकन कौन्सलमार्फत हिटलेरवाद्यांना टोचणी लावण्याचा तू प्रयत्न केलास का ? ते असो. डॅंडिट आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या भाग्याची वार्ता वाचून मला आनंद वाटला, तसेच आश्चर्यही वाटले.[1] लंडनमधील जळजळीत निषेधामुळे हे घडून आले. तेवढीच समाधानाला जागा. पण गरीब विचारा डचमन— एका असंभाव्य शोकांतिकेचा नाहक बळी. डोके मारले जात असताना काय होत असेल त्याची कल्पनाही मी करू शकत नाही. पण ते पाहताना काय होते याची मला कल्पना आहे. चीनमध्ये मी तो अनुभव घेतला आहे.

आता ब्लँकेटांच्या आंत मला शिरलेच पाहिजे. पुढील दहा तास—सहस्र-रश्मीचे दयाळू किरण माझ्यापर्यंत पोचेपर्यंत--माझे गोठलेले पाय ऊबदार करण्याचा बहुधा यशस्वी न होणारा प्रयोग मला केलाच पाहिजे.

---

१. बर्लिनमधील राइशस्टॅगला लावण्यात आलेल्या आगीबद्दलच्या खटल्याचा हा उल्लेख आहे.

सेंट्रल प्रिझन, बरेली
२९
फेब्रुवारी २४, १९३४

तुझे जानेवारीचे पत्र अखेरीस मिळाले आणि किती हायसे वाटले. परिस्थिती कशीही असो, मी निदान एका जागी स्थिर आहे आणि सुरक्षित. पण तू केंद्रबिंदू ढळलेल्या जगातील तुफान दर्यावर हेलकावे घेत आहेस. दिवसेंदिवस परिस्थिती बिघडतच चाललेली दिसते. तुझ्या पत्राला उशीर झाल्यामुळे मी अधिकच अस्वस्थ झालो; त्याचे कारण असे आहे की, जी काही थोडीशी वार्ता मला मिळत आहे त्यावरून अलीकडे पॅरिसमध्ये बऱ्याच वादळी घडामोडी होत असलेल्या दिसत आहेत. त्या घडामोडींतून लॅटिन उद्रेकाच्या या केंद्रस्थानी काय घडू शकेल हे कोण सांगू शकणार? मला ते दुश्चिन्हच वाटत आहे. त्याच्या उलट, अकारण प्रसिद्ध पावलेला छोटा मेटरनिक ( मिली मेटरनिक )[1] -- बड्या राष्ट्रांनी गोंजारलेले बाहुले — हाही सत्तास्पर्धेत उतरला आहे. हरेराम! आता आणखी पोरखेळ तो काय व्हावयाचा? एक हिंदी म्हण आहे, या हास्यास्पद परिस्थितीला साजेशी. 'हत्तीघोडे बुडाले आता गाढव सरसावले। प्रवाहाची खोली अजमावायला ॥' एकंदरीने माझा कल होऊ लागला आहे तुला सल्ला देण्याचा, की आपली झिओनिस्ट बन आणि पॅलेस्टाइनचा रस्ता धर. फक्त अडचण आहे ती तेथे तरी कोठे शांतता आहे! विनोद सोडून दे. पण केवळ पॅलेस्टाइन भारताच्या जवळ आहे या भौगोलिक मोहाला बळी पडून अशा तऱ्हेच्या साहसाचा मार्ग धरू नकोस. सारे काही विचारात घेतले तर तुझ्या दृष्टीने सर्वांत चांगले स्थान तू आहेस तेच. सन्मित्र साऱ्या गैरफायद्याची -- प्रत्यक्ष किंवा संभाव्य -- भरपाई करू शकतात.

अपीलाच्या बाबतीत आणखी काहीच करता येण्यासारखे नाही. फक्त धीराने आणि निराशावादी भावनेने वाट तेवढी पाहावयाची. तसे आपण केले तर निराशा व्हावयाची नाही. अपीलाचा कसाही निकाल लागो, आणखी वर्षानंतर माझी सुटका होण्याची आणखी एक संधी आहे. दीर्घकालीन शिक्षा झालेल्या कैद्याच्या शिक्षेचा काही विशिष्ट परिस्थितीत, त्यांची अर्धी शिक्षा झाल्यानंतर रिव्हिजन बोर्डामार्फत फेरविचार होतो. बोर्डाने शिफारस केली तर तो कैदी मुक्त होतो. प्रिव्ही कौन्सिलचा निर्णय आपल्या विरुद्ध गेला तर रिव्हिजन बोर्डाने माझी सुटका करावी म्हणून इंग्लंडमध्ये काही खटपट सुरू करावी. नोकरशाहीच्या हुकुमाने माझी वेळेपूर्वी सुटका अनेक कारणांसाठी करता येईल. त्यांतील अत्यंत मुद्देसूद, सुसंगत आणि कायद्याच्या दृष्टीने काटेकोर असे कारण

---

१ ऑस्ट्रियाचा चॅन्सेलर, डॉल्फस याला त्याच्या बुटकेपणामुळे हे टोपण नाव देण्यात आले होते.

म्हणजे मीरत खटल्यातील आरोपींना देण्यात आलेल्या माफक शिक्षा. इंग्लंडमधील मित्रांना या दृष्टीने कोणती शक्याशक्यता आहे त्याचा शोध घ्यावयाला सांगून वेळे-पूर्वीच योग्य अधिकाऱ्यामार्फत ही गोष्ट तडीस न्यावयाला सांग.

वसन्तऋतू हा पॅरिसमध्ये खरोखरीच नितान्त रमणीय असतो. एवढेच की काही चमत्कारिक परिस्थितीमुळे निसर्गसौंदर्याला बाध येता कामा नये; आणि सध्या तरी तशी शाश्वती दिसत नाही. शॉं एलिझेमध्ये भुकेकंगाल दीनवाण्या जनसमुदायाचे थवेच्या थवे लोटून त्याची नरकपुरी झाली तर त्याच्या सौंदर्याने कोण मोहित होऊ शकेल ? आणि या वेळी तिथे ती शहाणी राणीही नाही, की जिने म्हटले पाव मिळत नाही ना ! मग केक का खात नाही ?

माझ्याकरता एक फौन्टनपेन आल्याचे मला कळविण्यात आले आहे. डचमन-कडून येणार असलेलेच ते पेन असेल. त्याच्या आत्म्याला शांती मिळो--सारी पापे करूनही काही पुस्तकेही आली आहेत. तीही बहुधा डचमनकडूनच आलेली असतील. किंवा अमेरिकेतील कोणी ती पाठवली असतील. 'जे' कडून आलेल्या गठ्ठ्याचे काय हे एक कोडेच आहे. प्लिव्हिअरच्या नव्या पुस्तकावरील अभिप्राय नुकतेच मी वाचले. तसेच 'रॅडेटझी मार्च' या नावाच्या एका ऑस्ट्रियन लेखकाच्या पुस्तकावरील. ही दोन्ही पुस्तके पाठवशील का ?

घरची ओढ मला किती लागली आहे म्हणून सांगू ? आणि मी आतुरतेने वाट पाहात आहे ती आपल्या मीलनाचीच नव्हे तर सर्वस्पर्शी [1] मीलनाची – ज्याचा सोहळा आपल्याला भव्य रीतीने साजरा करता येईल. त्या दृष्टीने उपयोगी होत असेल तर 'विर रायझेन...' हे गाणे म्हणत राहा. व्यक्तिशः माझे मत विचारले तर मी म्हणेन की, आपल्या बाजूने अर्ध्या वाटेपर्यंत जावयाला हरकत नाही– एक आणी-बाणीची उपाययोजना म्हणून. नाही तर 'उद्ध्वस्त अवशेष दुरुस्त' करण्याचीही वेळ निघून जाईल. अट असली तर एकच की दुरुस्तीसाठी अपरिहार्य असलेले साधन म्हणजेच चिकित्सक दृष्टिकोण शाबूत ठेवला पाहिजे.

---

१. मला मनापासून वाटत होते की, जवळ जवळ साऱ्या युरपमध्ये फॅसिझमची विजयी घोडदौड होत असताना या संकटाविरुद्ध प्रभावी प्रतिकाराची आघाडी उभारण्या-साठी कम्युनिस्ट व सोशालिस्ट यांना आपल्यामधील फूट सांधण्याची प्रेरणा होईल. ज्या गाण्याचा उल्लेख करण्यात आला आहे ते 'लाल हवाई' सैनिकाचे गाणे आहे.

सेंट्रल प्रिझन, बरेली
३० मार्च २२, १९३४

सर स्टॅफर्ड क्रिप्स याच्या प्रश्नांना तातडीने उत्तरे देण्याची मागणी करणारे तुझे पत्र, ते ज्या तारखेला लिहिले गेले, त्यापासून बरोबर एक महिन्याने माझ्या हाती आले. साराच गोंधळ झाला आहे – सावरता न येण्यासारखा. इकडील वकिलांनी व्यावसायिक जबाबदारीची किमान जाणीवही न ठेवल्यामुळे हा गोंधळ झाला आहे. आश्चर्यकारक आहे त्यांची वागणूक. मी खरोखरच हताश झालो आहे आणि मला शंका वाटते ती ही की, तिकडच्या मित्रांनी इतका सारा आटापीटा केल्यानंतरही अपील गुदरणे शक्य होईल की नाही! बहुधा आमच्या अनास्थेमुळेच ते बारगळेल. इतके निराशेच्या आधीन होणे बरे नाही हे मला पटते. पण आता मला वाटते की, अपीलाचा विचार न करणेच बरे. कारण मला त्या बाबतीत करण्यासारखे काही राहिलेले नाही. नाहीतरी आपण त्याच्या निर्णयावर फारसे अवलंबून राहिलेलो नाहीच. इंग्लंडमधील मित्रांनी माझी सुटका करून घेण्यासाठी इतर मार्गांनी प्रयत्न करावा. वाईटात वाईट म्हणजे आणखी तीन वर्षे घालवावी लागतील. कदाचित थोडी कमीच. ( अनेक ओळी खोडून टाकण्यात आल्या आहेत. )

तू पाठविलेली पुस्तके ( दहा ) पोचली. हलकेफुलके साहित्य मिळाले याचाच मला आनंद झाला आहे. बराच काळ ते मला मिळाले नव्हते--मासिके सोडली तर. मासिके मात्र मला भरपूर मिळतात.--चांगली मासिके म्हणून तशी माझी गैरसोय झालेली नाही.

फ्रेंच पुस्तकांबद्दल माझे मत तुला काय कळवू ? ती माझ्या हाती पडावयालाच अद्याप अवकाश आहे. सेन्सॉरकडे ती पाठवायला पाहिजेत. कादंबऱ्या असल्यामुळे अर्थात ती मंजूर होतील. पण त्यालाही वेळ लागतो. दरम्यान मी ॲन व्हिअर्स ( सिंक्लेअर लुई ) वाचीत आहे. ती कादंबरी प्रसिद्ध झाल्याचे वाचल्यापासून ती वाचण्याची मला उत्सुकता लागली होती. माझी मुळीच निराशा झाली नाही. अमर साहित्यात तिची गणना होऊ शकेल. त्या कादंबरीवरील बरेचसे अभिप्राय मी आधीच वाचले आहेत. एकंदरीने ते अनुकूल आहेत. पण सर्वोत्कृष्ट अभिप्राय लेखकाला वाटले त्यापेक्षाही ती कादंबरी अधिक चांगली आहे. 'बॅबिट' या त्याच्या कादंबरीने त्याला एक थोर लेखक म्हणून कीर्ती मिळवून दिली. पण त्यानंतर विलक्षण वाढ झाली आहे. मेंकेनच्या विचारसरणीचे प्रौढीबाज टीकाकार कलेसाठी कला या कालबाह्य कल्पनेचे अद्यापही स्तोम माजवीत खुशाल म्हणू शकतील की, निव्वळ कलात्मक गुणांच्या दृष्टीने हे पुस्तक नीरस आहे. पण हे पुस्तक असे आहे की, जुन्या मानदंडांच्या साहाय्याने त्याचे मूल्यमापन करता येणार नाही. कलेच्या प्रगतीच्या दृष्टीने त्याने एक नवीनच पल्ला गाठला

आहे. केवढे तरी विशाल क्षितिज त्या कादंबरीने व्यापले आहे. ती कादंबरी पडद्यावर चित्रित करण्याचा विहअर टेलने विचार केला आहे काय? मला वाटते त्याच्यासारख्या कलाकारालाही या कादंबरीचे चित्रीकरण यथार्थपणे करता येणार नाही. त्या कादंबरीचा कशिदाच इतका नाजूक आहे की तो छायाचित्रकाराला टिपता येणार नाही. लेखकाची चोखंदळ दृष्टी बारीकसारीक घटनांवर खिळलेली दिसत आहे आणि आधुनिक अमेरिकन समाजाचे प्रक्षोभक चित्र या भेगाभेगांतून प्रगट करण्यात आले आहे. इतके सर्वस्पर्शी हे चित्रण आहे की, आपल्या अधिकृत कम्युनिस्ट वीरपुरुषावरही त्यांना साजेसे कोरडे ओढण्यात आले आहेत. त्यांच्या पोरखेळांचा किती कौशल्याने उपहास करण्यात आला आहे.

जॅक हॉर्नरकडून फौन्टनपेन आले. त्यानेच हे पत्र मी लिहीत आहे. अप्रतिम आहे. लवकरच पुस्तकेही येतील. डच लोक हे भरदार– त्यांच्या चीजप्रमाणे; त्यांचे ते चीज. डोळ्यांत भरेल असा लाल गोळा. आतला भाग सोनेरी आणि चव कशी क्षण-क्षणीत. त्याने ते चीज पाठविले तर? मला आवडेल खास. पण पाणी सुटलेल्या माझ्या तोंडात ते खास जाणार नाही. त्याने पाठविले तरी.

आता अपेक्षेबाहेर उष्मा वाढू लागला आहे. या महान देशाला वसन्त हा माहीतच नाही. उन्हाळा वादळासारखा कडकडून आदळतो. तेही ठीक आहे म्हणा. वसंताचा आनंद लुटायचा असेल तर तो एकाकी येऊन चालणार नाही. जीवनाच्या सौंदर्यासाठी माझा जीव आसुसला आहे. देवदार वृक्षांनी भरून गेलेल्या पर्वतशिखरा-वरील आरामशीर हॉटेल, खाद्य पदार्थांनी भरगच्च भरलेले टेबल पाहून उसळलेला भुकेचा आगडोंब, आणि खळखळून येणारे हसू या सर्वांची मला ओढ लागली आहे. सौंदर्याची ही कल्पना कोणाला अपवित्र वाटेलसुद्धा. पण उच्चभ्रू सौंदर्यपूजकांनी कितीही नाके मुरडली तरी मी माझ्या कल्पनेप्रमाणेच वागणार आहे.

सेंट्रल प्रिझन, बरेली<br>एप्रिल २१, १९३४

३१

तुझ्या मार्चच्या पत्रालाही आठवडाभर वाट पाहावी लागली. ( काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे ) तुझा मुंबईशी संपर्क जुळला हे कळून आनंद वाटला. माझी अडचण अशी आहे की, वकिलाखेरीज मला कोणाशी संबंध ठेवता येत नाही. कारण तसा संबंध साधला तर महिन्यातून एकदा तुला पत्र लिहिण्याचा हक्क मला गम-वावा लागेल. म्हणून मला केवळ वकिलांवर अवलंबून राहावे लागते. मुंबईचे लोक शक्य आहे ते सारे करतील. कागदपत्रांचा नवा संच तयार करण्याचे त्यांचे प्रयत्न

यशस्वी झाले नाहीत तर त्या बाबतीत आणखी काही करता येण्यासारखे नाही.

माझ्या बदलीबद्दल अद्याप निश्चित बातमी नाही. उन्हाळ्यासाठी ही बदली होईल असे मला सांगण्यात आले. उन्हाळा अधिकृत रीतीने १५ एप्रिलला सुरू होतो. सरकारी कचेरी उंच हवेच्या ठिकाणी जावयाला निघण्याची ही तारीख. दरबारी रीतिरिवाजाप्रमाणे उन्हाळा अद्याप ताजा असला तरी अलीकडे बरेच दिवस तो तेजाने तळपत आहे. या वर्षी या आगेच्या मानाने तो लवकरच आला. सध्या कमालीची उष्णता वाटत आहे. आणि त्याच्या जोडीला डास कसले जबरदस्त ! सुदैवाने मला मच्छरदाणी वापरण्याची परवानगी आहे. तेवढेच वरदान. पण संध्याकाळी बरेच तास तरी या श्वापदांचा त्रास सहन करावाच लागतो. सूर्यास्त झाल्याबरोबर काही मच्छरदाणीचा आश्रय घेता येत नाही. दिवसासुद्धा डास तुम्हाला सोडत नाहीत. फक्त वाऱ्याचा झोत तेवढा ते अंगावर घेऊ शकत नाहीत.

तुझा फ्लॅट राहण्यालायक झाल्याचे वाचून आनंद झाला. तसा उशीरच झाला म्हणा ! पण मुळीच न होण्यापेक्षा उशिरा झालेले बरे. मुळीच नसलेल्या काकापेक्षा आंधळा काका बरा अशी एक बंगाली म्हण आहे. इतका चांगला शेजार तुला लाभावा ही आनंदाची गोष्ट आहे. एकेकाळी त्याच घरात मी विलीबरोबर एक वर्षभर राहिलो होतो. त्या वेळी तो एक फार मोठा माणूस होता.——वैभवाच्या शिखरावर बसला होता. जवळ जवळ ब्रूजेनबर्ग किंवा रॅादरमीअरचाच तो प्रतिस्पर्धी होता. एकाच आढ्याखाली जेव्हा आम्ही एकत्र राहात होतो, त्या वेळी सुरुवातीच्या काळात तर मी त्याचा राजकीय नेता होतो. तो पुष्कळच चांगला वागला. आणि बॅबेरे ! तिला आपल्या बालपणीच्या पॅाट्सडॅम परंपरेचा कधीच विसर पडला नाही. ती अशी ताठर होती——मला अवघडल्यासारखे होत असे. पण विलक्षण कार्यक्षम. विलीला काही व्यसने होती हे तुला माहीतच आहे. अधूनमधून तुझे त्याने आदरातिथ्य केले तरी पुरे. सहज आठवण झाली. हाइन्झ न्यूमनचे काय झाले ! त्या क्षुद्र माणसाबद्दल मला काही आस्था आहे असे नव्हे.

हो तर, तू जॅकसला ( दोरियो ) भेटच. आधीच तू त्याला भेटावयाला हवे होतेस. व्यक्तिशः तुला तो विलक्षण चांगला वाटेल आणि तो फार हुषार आहे. आम्ही जानी दोस्त होतो——डचमनप्रमाणे. फक्त पॅरिशियन हा डचमनप्रमाणे इतका भावनोत्कट कसा असेल ? डचमनबरोबरचे माझे मतभेद दोरियोपेक्षा अधिक तीव्र होते. खरे सांगावयाचे तर जॅकस आमच्यापासून दूर असा कधी गेलाच नाही. कोणतीही गोष्ट पार पाडण्याचा सर्वांत उत्कृष्ट मार्ग कोणता याबद्दलच जो काही मतभेद होईल तो. तुझ्या पत्रात उल्लेख आहे तो लठ्ठ फ्रेंच मेयर कोण ? स्ट्रासबुर्गचा आहे का तो ! काही वेळ मला वाटले सेलियर असेल. जॅकसला माझ्या शुभेच्छा सांग. आणि त्याला म्हणावे मी पुष्कळ वेळा त्याची आठवण काढतो——अनेक घटनांच्या संदर्भात, उदाहरणार्थ हॅंकोचे कॅबेरे.

तू पाठविलेला कादंबऱ्यांचा संच काही दिवसांपूर्वी आला. त्यातला निम्मा मी संपवून टाकला. फ्रेंच कादंबऱ्या, त्या भाषेचे ज्ञान असलेल्या लोकांकडून सेन्सॉर करून घ्यावयाच्या होत्या. त्या नुकत्याच माझ्या हाती आल्या. लवकरच त्या मला वाचता येतील. एक नवी व्हॅन डाइनची कादंबरी आली आहे--द ड्रॅगन मर्डर केस. पण तू ती मिळविण्यासाठी फार धडपड करू नकोस. कारण माझ्याकडे आता जर्मन कादंबऱ्यांचा एक सुरेख संच जमला आहे. सन्यालकडे जी पुस्तके आली ती कोणाकडून कोण जाणे! माझ्याकडे अद्याप ती आलेली नाहीत. तसे झाले की मनाला ताप होतो. ती पुस्तके अमेरिकेहून आली असतील आणि बहुधा ते शास्त्रीय ग्रंथ असतील. मी किती आतुरतेने त्यांची वाट पाहात आहे. काही दिवसांपूर्वी मी मँचेस्टर गार्डियनची साप्ताहिक आवृत्ती पाठवावयाला सांगितली होती. ती मिळाली तर फार चांगले होईल. त्याशिवाय आणखी दोन अमेरिकन मासिके मला हवी आहेत; द मॉडर्न थिंकर आणि द मॉडर्न मंथली.

नुकत्याच झालेल्या भूकंपाबद्दल काही शास्त्रीय साहित्य ऑगस्टला पुरविता येत नाही याचे मला वाईट वाटते. जे वृत्तपत्र मला मिळते त्यात या दृष्टीने फारच थोडी माहिती देण्यात आली आहे. मला जे कळले ते एवढेच की, भूकंपानंतर लगेच भूगर्भशास्त्रज्ञांकडून एक तातडीने पाहणी करून घेण्यात आली. ती यासाठी की, अशाच तऱ्हेचे धक्के पुन: थोड्या दिवसांत बसतील अशी जी सार्वत्रिक भीती वाटत आहे तिला काही आधार आहे की काय हे पाहण्यासाठी. त्या पाहणीचा जो अहवाल बाहेर आला आहे तो धीर देणारा आहे. असे दिसते की हा ज्वालामुखीचा उद्रेक नव्हे. पृथ्वीच्या गाभ्यात खोलवर जे खडकाचे पृष्ठ तयार झालेले असते त्याचे आकुंचन झाल्यामुळे हा भूकंप घडला असावा. बहुधा हिमालयाच्या पर्वतश्रेणीत काही वैशिष्ट्यपूर्ण उलथापालथ झालेली असावी. सपाट भूमीवर स्थानिक स्वरूपाचे फेरबदल झालेले दिसत आहेत. बरेचसे भाग वालुकामय झालेले आहेत आणि जमीन कित्येक फूट खोलपर्यंत वाळूखाली दडपली गेली आहे. त्यामुळे त्या प्रान्ताच्या शेतकीविषयक परिस्थितीतही काही बदल होईल. ही आणि या प्रकारची जी माहिती इतस्तत: उपलब्ध होत आहे तिला शास्त्रीय अनुमान करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते साहित्य म्हणून काहीच मोल नाही. मला वाटते आणखी काही दिवसांनी पुन: भूगर्भशास्त्रज्ञांकडून अधिक कसोशीने पाहणी केली जाईल. त्या पाहणीचा जो अहवाल प्रगट होईल त्यात शास्त्रीय निदान करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊ शकेल.

ऑगस्ट जर अगदी तातडीच्या प्रश्नांत गर्क नसता तर हायझेनबेर्गच्या अनिश्चिततेच्या तत्त्वाबद्दल आणि त्यावर आधारलेल्या बाहेरच्या स्वतंत्र इच्छाशक्तीच्या सिद्धांताबद्दल काही मुद्दे मला देण्याची मी त्याला विनंती केली असती. या प्रश्नांबद्दल मी काही लिहीत आहे. माझ्या अल्पमतीला जे दिसते आहे ते असे की, इलेक्ट्रॉनिक मेकॅनिझमच्या

क्षेत्रात जे नवे शोध लागले आहेत त्यांनी, उद्दिष्टपूर्वक मांडण्यात आलेल्या अनिश्चिततेच्या तत्त्वाखालील सारी भुसभुशीत जमीन काढून घेतली आहे. गोएटिंगेनच्या प्राध्यापकाच्या ( त्याचे नाव काय बरे ? ) सिद्धान्ताने त्यात भर घातली आहे ती अशी की, क्वॅान्टम थिअरीमुळे मेकॅनिकल व्ह्यू कोलमडून पडतो असा जो समज निर्माण झाला आहे त्यावर या प्राध्यापकाच्या सिद्धान्ताने घाव घातला आहे. या मुद्द्यावर प्रकाश पाडणारी, तशीच प्राणिशास्त्रातील नव्या सिद्धान्तांची चर्चा करणारी काही पुस्तके मला निकडीने हवी आहेत. हॅाल्डेनने जी कोलांटी उडी मारली आहे ती आश्चर्यकारक आहे. आणि लॅाईड मॅार्गनने स्वतःचेच सिद्धान्त खोडून काढण्याचे जे कसब दाखविले आहे ते केविलवाणे आहे. तसाच केविलवाणा आहे तो टॅामस हन्ट मॅार्गनचा हेतुप्रेरित अनुवंशवाद. मी या साऱ्या जंजाळात गुरफटून गेलो आहे, तो हिंदुस्थानात जी एक मूर्खपणाची समजूत आहे की पाश्चिमात्य तत्त्वज्ञान हे जडवादी आहे ती खोडून टाकण्यासाठी ;

आगामी आंतरराष्ट्रीय बैठकीच्या वेळी अमलात आणावयाच्या संकल्पित योजनेबद्दल[1] माझे पूर्ण एकमत आहे. माझी सूचना अशी आहे की, आणीबाणीच्या परिस्थितीवर अधिक भर दिला जावा. आपल्या इच्छेनुसार सारे घडून येईल या भावनेने वाहून न जाण्याइतका मी वास्तववादी आहे. आपल्या पुढील अडचणींची मला जाणीव आहे आणि मी फाजील आशावादीही नाही. पण तरी सुद्धा आपण आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे आणि त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. मी जे माझ्यासाठी खास कार्यक्षेत्र निवडले आहे त्या बाबतीत आशावाद ठेवण्याला सबळ आधार आहे. माझी अपेक्षा आहे की आपल्याला तेथे प्रधान स्थान तरी खास मिळेल आणि त्यामुळे एकंदरीने समतोल प्रस्थापित होण्याला मदत होईल.

## ३२

डिस्ट्रिक्ट जेल, अलमोडा
मे १७, १९३४

माझी बदली झाली. इथे पोचण्यासाठी दोन दिवस आधी पत्र टाकावे लागेल. म्हणजे दिल्लीच्या एअर मेलने ते येऊ शकेल. माझे नवे घर तुला नकाशावरून हुडकून

---

१. कम्युनिस्टांतील विरोधकांची जी एक आंतरराष्ट्रीय बैठक भरली होती तीत असा निर्णय घेण्यात आला की, कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या आगामी सातव्या जागतिक परिषदेला एक पत्र लिहिण्यात यावे. आणि त्या परिषदेला हजर राहण्याची परवानगी मागण्यात यावी. ती अशासाठी की मतभेदांच्या मुद्द्यांची चर्चा व्हावी आणि सर्व कम्युनिस्ट दलांचे एकीकरण करण्याच्या दृष्टीने पावले टाकली जावीत.

काढता येईल किंवा नाही कोण जाणे. पूर्वीच्या ठिकाणापासून ते १५० मैलांवर आहे. हिमालयाच्या पायथ्यावरील पर्वतराजीत उंचीवर ते वसलेले आहे. रेल्वेचे स्टेशन ऐंशी मैल दूर आहे येथून. हे ठिकाण एक छोटेखानी शहर आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे ६००० फूट वर आणि त्याची हवा कोरडी आणि तजेलदार आहे. मी येथे पाच तारखेला आलो–नव्हे मला आणण्यात आले. साहजिकच तो प्रवास मला फार आवडला. वर्षानंतर बाहेरच्या जगात मी टाकलेले ते पहिले पाऊल. (ज्या अवस्थेत आणि ज्या पद्धतीने मला हलवण्यात आले त्याबद्दलचे वर्णन करणारा बराचसा भाग खोडून टाकण्यात आला आहे. या प्रवासात मला हातकड्या घालण्यात आल्याबद्दलचा जो उल्लेख मी केला होता त्याला आक्षेप घेण्यात आला होता.)

हे नवे ठिकाण कसे आहे ते मी सांगावे अशी तुझी साहजिकच अपेक्षा असणार. पण तुझी मला निराशा करावी लागणार आहे. मला त्याचे दर्शनही झालेले नाही. ऐंशी मैलांचा मोटार प्रवास मात्र सुरेख होता. पण पायथ्याच्या सगळ्या टेकड्या ओसाड, वृक्षहीन आहेत. माझी फार निराशा झाली. माझी अपेक्षा होती की, मला अशा ठिकाणी नेले जाईल की, जेथून मला निद्रिस्त श्वापदे पहुडलेली आढळतील.[1] तुरुंगाच्या आवारातून दुर्दैवाने जे दर्शन होत आहे ते कुरूप अशा भिंतींनी मर्यादित झालेले आहे. मी अशा उंच जागी आहे याची मला कल्पनाच केली पाहिजे. तथापि तसा मी आरामात आहे. इथे एका बराकीत एका नव्या सोबत्याबरोबर मी राहतो. (या तुरुंगात खोल्या अशा नाहीतच. साऱ्या बराकी किंवा कोठ्या आहेत.) हा तुरुंग अगदी लहान आहे. पण आमच्या दिमतीसाठी आवार मात्र चांगले मोठे आहे. सर्वांत मोठे वरदान म्हणजे सपाटीवरील भयानक उष्णतेपासून मुक्तता. एप्रिलच्या अखेरीसच असह्य होत चालले होते. इथे प्रसन्न अशी ऊब आहे. हवा कोरडी आहे. पण पाणी-मात्र फार फार हलके आहे. त्याचा मला तिटकारा वाटतो. साबणाच्या गुळगुळीतपणा-सारखी भावना धुऊनसुद्धा नाहीशी होत नाही. या फेरबदलामुळे माझ्या प्रकृतीवर काय परिणाम होईल हे इतक्या लवकर सांगता येणार नाही. पण मला बरे वाटेल अशी अपेक्षा आहे. सध्याच्या परिस्थितीत आशा करावयाची ती निदान वाईटातील वाईट टळावे. ही अल्पशी आशा फलद्रूप करण्याच्या दृष्टीने या ठिकाणाचा उपयोग होईल अशी मला खात्री आहे.

मला इथे किती दिवस ठेवले जाईल हे मला माहीत नाही. हिवाळ्यात येथे कडाक्याची थंडी पडते. अर्थात शून्याच्या खाली चाळीस डिग्री (सेंटिग्रेड) या

---

१. युरपमधून निघण्याच्या सुमारास टायरोलमधील उंच हवेच्या ठिकाणातील एका हॉटेलमध्ये मी राहात होतो. त्या वेळी सभोवार जे पर्वत दिसत ते मोठमोठ्या निद्रिस्त श्वापदांसारखे दिसत असत.

हवामानात वास्तव्य केले असल्यामुळे हिवाळ्याची मला क्षिती नाही. पण कैद्याला निवड करता येत नाही. कैदी ही एक वस्तू आहे. तो या ना त्या जागी राहतो असे नाही. त्याला ठेवण्यात येते ( बराच मजकूर खोडून टाकण्यात आला आहे. )

माझ्या ग्रंथांवरील काम मी सुरू केले आहे. बदली होण्यापूर्वी प्रकृतीच्या कारणासाठी अनेक महिने मला ते काम स्थगित करावे लागले होते. जुन्याच ठिकाणी मला राहावे लागले असते तर उन्हाळ्यामुळे आणखी चार-पाच महिने ते काम बंद राहिले असते. पहिले पुस्तक— ' पाश्चिमात्य जडवादा ' बद्दलचे गृहित कृत्य नष्ट करण्यासाठी लिहिलेले—लवकरच संपेल. दोनतृतीयांशापेक्षा अधिक भाग तयार आहे. मध्ययुगीन आणि प्राचीन विचारदर्शनाच्या पार्श्वभूमीवर आधुनिक तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांचे त्यात स्पष्टीकरण केलेले असेल. जडवादावरील संकल्पित आणि अर्धवट पूर्ण झालेल्या ग्रंथाची प्रस्तावना इतकी मोठी झाली आहे की, तिलासुद्धा स्वतंत्र पुस्तकाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पुरे झालेले असे ते पहिलेच पुस्तक होईल. तिसरे आणि मुख्य कार्य म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानावरील पुस्तक. ते अद्याप गर्भावस्थेतच आहे. पण माझ्या शिक्षेची मुदत मला पुरी करावयाची झाली तर तेही पुरे होईल अशी मला आशा आहे. नाहीतरी ज्या दृष्टिकोणातून या अवाढव्य आणि बहुशः अशोधित अशा क्षेत्राचा शोध घ्यावयाचा आहे आणि ज्या पद्धतीने तो करावा लागेल त्याचे स्पष्टीकरण करणे हीच प्राथमिक गरज होय. हे मूलभूत कार्य पार पडले तर संकल्पित ग्रंथाचे अर्धे काम पुरे झाल्यासारखे होईल. तिकडच्या मित्रांना प्रथम मी भारतीय तत्त्वज्ञानाचा ऊहापोह केलेले अधिक पसंत पडेल. पण या देशांतील परिस्थितीच्या गरजा ओळखून मी संकल्पित कामाची आखणी उलट रीतीने करावयाचे ठरविले आहे. भविष्याचा मागोवा घेण्यासाठी भूतकाळाबद्दलची योग्य दृष्टी केवळ मला असून भागणार नाही. इतरांनाही त्यात भागीदार करून घेतले पाहिजे. तेवढ्यासाठी ती दृष्टी कशी संपादन करावयाची याचे ज्ञान परिस्थितीनुरूप जे त्या दिशेने चालले आहेत त्यांना करून देणे आवश्यक आहे; आणि मला असे वाटते की, ज्या पद्धतीने ज्ञान द्यावयाचे असेल तिचा स्वीकार केला जावा म्हणून काही पूर्वतयारीही करणे इष्ट आहे. परदेशातील आपल्या मित्रांना ही पूर्वतयारी करणे हा कालापव्यय वाटण्याचा संभव आहे. पण त्यांना जे सोपे सहजसिद्ध वाटेल ते इतरांच्या दृष्टीने अज्ञात ज्ञानभांडारही असू शकेल;: आणि अरण्यात सहल करावयाला गेलेल्या अज्ञ मुलांना सांभाळणे ही माझी खास जबाबदारी आहे.

बोर्ड ऑफ डिरेक्टर्सच्या आगामी बैठकीच्या ( कम्युनिस्ट इंटरनॅशनलची सातवी जागतिक परिषद ) संदर्भात आपण आधीच ठरून जी योजना आखली तिची कशी प्रगती होत आहे हे कळून घेण्याला मी फार उत्सुक आहे. ती योजना मला एकदम पसंत आहे; आणि मला मनापासून आशा वाटते ती ही की, आपला पवित्रा इष्ट तो परिणाम केल्याशिवाय राहणार नाही. मला यापेक्षा अधिक काहीतरी प्रत्यक्ष करता आले असते

तर ? त्याचा परिणाम अधिक चांगला झाला असता असा मला भरंवसा आहे. पण दुर्दैवाने ते शक्य नाही म्हणून मी फक्त नैतिक पाठिंबा देऊ शकतो. अमेरिकेहून कोण येणार आहे ? जे ( ल्व्हस्टन ) आला तर फार चांगले होईल.

येथे असेपर्यंत काही भरीव लेखन करण्याचा माझा विचार असल्याकारणाने मला काही पुस्तके तातडीने हवी आहेत. मी दिलेल्या यादीशिवाय माझ्या हेतूला पूरक अशी तत्त्वज्ञानावरील अगदी नवीन पुस्तके ऑगस्ट सुचवू शकेल.

फ्रेंच पुस्तके वाचावयाला अद्याप मला वेळ मिळाला नाही. सहज आठवले म्हणून विचारतो, ज्यूल्स रोमाँची कादंबरी तू वाचलीस का ? तिने खूपच खळबळ उडवून दिलेली दिसते. मला ती पाठवू मात्र नकोस. सध्या मी दुसऱ्या काही गोष्टींत इतका गर्क आहे की, प्रायोगिक कादंबरीचा आस्वाद घेण्यात मला रस नाही. पण चांगल्या रहस्यकथा वाचावयाला मी नेहमीच वेळ काढू शकतो. आणि जर्मन निर्वासित लेखकांची[1] पुस्तके मिळाली तर मला फार आनंद होईल. त्यांनी माझ्याबद्दल ज्या जिव्हाळ्याच्या भावना व्यक्त केल्या त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. माझ्या हार्दिक सदिच्छा त्यांना कळव. बूलव्हार्ड कॅफेमधील त्या अवघड खुर्च्यांवर बसून गप्पासप्पा करायला मिळाल्या तर केवढी मजा येईल नाही !

## ३३

डिस्ट्रिक्ट जेल, अलमोडा
जून १९, १९३४

या महिन्याला तुझे पत्र फारच लवकर आले. त्यावर पॅरिसचा ६ तारखेचा शिक्का होता. आणि मला ते इथे १५ ला पोचले. पूर्वीचे सारे उच्चांक त्याने मोडून टाकले. तुझे गेल्या महिन्यातील पत्र मात्र मी माझे पत्र पोस्टात टाकल्यानंतर एक-दोन दिवसांनी मिळाले. बरेलीहून इथे येईपर्यंतच ते कोठे आडवळणाला गेले— देश भटकून आले. काय गंमत आहे पाहा. ते कानपूरलाही जाऊन आले. ही ठिकाणे जन्मभर आपल्याला झपाटत राहणार खरी.

---

१. जर्मनीतून हद्दपार करण्यात आलेल्या जर्मन लेखकांच्या आधुनिक कादंबऱ्यांचा एक संच त्यांनी स्वतः देणगी म्हणून मला पाठविला होता. पण त्या कादंबऱ्या मला मिळू शकल्या नाहीत. त्या पुनर्भेट म्हणून पॅरिसला माझ्या खर्चाने पाठविण्यात आल्या. या संचातच जर्मनीतील नात्सी राजवटीवरील अनेक पुस्तके होती. उदाहरणार्थ लीग ऑफ नेशन्सने प्रकाशित केलेली 'ब्राऊन बुक ऑन हिटलर टेरर' किंवा 'पर्सीक्यूशन ऑफ न्यूज इन जर्मनी' अशा प्रकारची पुस्तके. यांपैकी एकही पुस्तक मला जवळ ठेवण्याची परवानगी मिळाली नाही.

कागदपत्रांची कहाणी हे आपले दुर्भाग्य आहे. माझ्या खटल्याच्या चालत्या गाड्याला खीळ घालण्यातच दैवाला समाधान असले तर आपण काय करणार? मला त्याचे आश्चर्य वाटत नाही. अशा चमत्कारिक घडामोडींची सवयच झाली आहे. किती चमत्कारिक! अशा गोष्टी क्वचितच घडतात म्हणा!—खटल्यातील कागदपत्र म्हणे पोस्टाने येत असतानाच गहाळ झाले. कोणी ऐकले आहे असे. एक मुरब्बी वकील म्हणून क्रिप्सने सावधपणाने आपले मत प्रदर्शित केले आहे. इतके निराश होण्याचे कारण आहे असे मला वाटत नाही. म्हणून माझ्या वतीने ब्रॉकवेला लिही की, आणखी विलंब न करता काही व्यावहारिक उपाययोजना करण्यासाठी क्रिप्सवर दडपण आणले पाहिजे. खटल्यातील कागदपत्र त्याला योग्य वेळी पोचतील. दुसरा एक संच पाठविला जात आहे. दरम्यान त्याने आपल्या व्यावसायिक कल्पना योजाव्या. नाहीतर मध्ययुगीन विग वापरण्याची त्याची पात्रता ती कसली!

अपीलाचे भवितव्य अनिश्चित असल्यामुळे सुटकेसाठी इतर मार्गांचाही अवलंब करण्यात यावा. कोणत्या दृष्टीने प्रयत्न करता येईल याची दिशा मी दाखविलीच आहे. पोटनिवडणुकीतील ब्रॉकवेच्या अपयशाची बातमी वाचून वाईट वाटले. पण पार्लमेंट-मध्ये तो प्रश्न उपस्थित करावयाला मॅक्सटन आहे. मीरत खटल्यातील आरोपींना जी माफक शिक्षा मिळाली तिचा विचार करता तीन वर्षांपेक्षा अधिक काळ मला डांबून ठेवावयाला कोणताच आधार राहिलेला नाही. माझी शिक्षा अधिक लांबलेली आहे. मला आता अगदी कंटाळा आला आहे.

तुला आश्चर्य वाटेल सांगितले तर, पण मानसिक आजार जडल्याचा माझ्याबद्दल संशय घेतला जात आहे. मी आणि मानसिक दृष्ट्या आजारी! तू विश्वास तरी ठेवू शकशील काय? आपण एकमेकापासून दूर झाल्यानंतरच्या काळात जर माझा एवढा अधःपात झाला असेल तर दरम्यानच्या काळात जे फ्रॉइडवादी शिक्षण तू पैदा केले असशील, त्याच्या आधारे तुला माझ्यावर उपचार करण्याची मुभा द्यावयाला हरकत नाही. या शास्त्रीय गर्भपाताबद्दल तुला इतका तिटकारा आहे का? वडील = घोडा, हे नाहीतरी फ्राइडवादी गणिताचे सर्वोच्च सूत्रवाक्य नव्हे! अर्थात मानसशास्त्राची केवळ लैंगिकतेशी जोड करून त्या शास्त्राचा अधःपात करणे हे आचरटपणाचे आहे. पण लैंगिक विषयाचा जो परामर्श फ्रॉइडवादी घेतात त्यात काही चांगले मुद्देही निघतात. शिवाय बापड्या फ्रॉइडवाद्यांनाच दोष देण्यात अर्थ काय? मानसशास्त्र हे एक आचरट शास्त्र आहे हीसुद्धा वस्तुस्थिती नव्हे काय? या विषयावर नव्वद टक्के लोक जे शहाण-पणाने बोलतात तेच मुळी अनाकलनीय असते.

जॅकसबद्दल ऐकून मला आनंद झाला. मी त्याला पुष्कळच लिहू शकतो आणि ते परिणामकारकही होण्याची शक्यता आहे. माझी नेहमीच त्याच्यावर श्रद्धा होती. माझ्या कसोटीला उतरणारी जी काही थोडी माणसे होती त्यांच्यात त्याची गणना होते.

तू सरळ जाऊन त्याला भेटत का नाहीस ? निर्णायक भूमिका घ्यावयाला त्याला सांग. कधीकधी प्रवाहाविरुद्ध पोहत जाण्याचे धैर्य दाखविलेच पाहिजे. बाकीचे सर्व मार्ग त्याने सोशिकपणे आणि आशेच्या भावनेने चोखाळले. आता नशिबाची परीक्षा पाहिलीच पाहिजे. आम्ही-त्याने आणि मी-आतापर्यंत जो अनुभव घेतला त्याने एवढीतरी खात्री पटविली नसेल का, की आम्हाला डोके आपटावे लागणार आहे ते दगडाच्या भिंतीवर! या साहसात काही बापुड्यांची डोकी मारली गेली तर ते आवश्यकच आहे. त्यामुळे इतरांसाठी तरी मार्ग मोकळा होईल. आपल्या गळ्याला तात लागेल की काय म्हणून आम्ही इतकी काळजी का करावी ? नाहीतरी गळ्याला फास लागला तर जीव थोडाच बचावणार आहे ? जॅकसने खूणगाठ बांधावी की वेळीच त्याने खंबीर उपाययोजन केली नाही तर फासाचा दोर त्याला टाळता येणार नाही.

येथे आल्यानंतर महिनाभर मला चांगले वाटले आणि मी बरेचसे कामही हातावेगळे केले. गेले काही दिवस मात्र मी पुनः बेचैन झालो आहे. लवकरच ती भावना निघून जाईल अशी मला आशा आहे. काही झाले तरी उष्म्यातून बाहेर पडणे हे वरदानच आहे. येथील हवा छान आहे. इतकी छान की, सुटल्यानंतर इथे कोठेतरी काही दिवस घालविण्याची योजना माझ्या मनात घोळू लागली आहे. योजना कसली हे स्वप्नरंजनच म्हणाना. सध्याच्या माझ्या मनःस्थितीत माझी युरपची ओढ अनावर झाली आहे. तेथील ते सुसंस्कृत जीवन आणि पुराणे मित्र यांच्याबद्दलची ती ओढ आहे. पण मग विचार मनात येतो की, भारतात परत आलो तो अनेक वर्षे तुरुंगात काढून परत जाण्याकरताच की काय ? किती मूर्खपणाचे ते होईल नाही का ?

डचमनकडून तुला नेहमी पत्रे येतात का ? त्याच्याकडून अद्याप पुस्तके आली नाहीत. आश्चर्य आहे, कारण तो असा निष्काळजीपणा दाखवील असे मला मुळीच वाटत नाही. माझा समज आहे की, लायन आणि कंपनीचे नवे दुकान, उघडण्याच्या फंदात तो गढून गेला असावा. पण तू तर लिहितेस की, त्याचा बोजवाराच उडाला आहे. सातव्या वाढदिवसाच्या वेळी काय घडेल आणि विशेषतः आपल्या देणगीचा कसा स्वीकार केला जाईल हे जाणून घेण्यास मी फार उत्सुक आहे. अर्थात पूर्वीच्या अनुभवावरून फारसा आशावाद बाळगण्यात अर्थ नाही. तथापि ही शोचनीय अवस्था फार काळ अशी टिकेल असे मानणेही कठीण आहे. काही काही वेळी मी अगदी हताश होतो. उच्चासनावरील नेत्यांना समोरचा धोका दिसत नसेल का ? त्यांच्या बोलण्यावरून दिसते तसेच ते मूर्ख आहेत का ? खरोखर सारे असंभाव्य, अनाकलनीय आहे. मला आनंद वाटतो तो एवढाच की, आपले लोक मात्र अत्यंत कठीण प्रसंगाला चिकाटीने तोंड देत आहेत आणि प्रत्यक्षपणे प्रगती करीत आहेत.

ईस्टरच्या सोहळ्यासाठी[1] ( ईस्टरच्या सुटीत भरलेली कम्युनिस्टातील विरोधकांची

---

१. ट्रॉट्स्कीने सुरू केलेले फोर्थ इंटरनॅशनल.

आंतरराष्ट्रीय बैठक ) जे आला होता का ? स्वीडनमधील अशा विचारसरणीचे लोक कसे आहेत ? त्यांनी सारा सत्यानाश करून घेतलाच आहे का ? अरेरे, कसला सत्यानाश !

हाइन्झबर्ग याच्या अनिश्चिततेच्या सिद्धान्ताबद्दल मला जी माहिती हवी ती सिद्धान्ताबद्दल नव्हे, तर ब्रिजमन, बेनब्रिज वगैरे लोकांच्या अगदी अलीकडील शोधांच्या संदर्भात त्या सिद्धान्ताचे स्थान काय हे मला समजावून घ्यावयाचे आहे. 'आध्यात्मिक पश्चिम' या जवळजवळ पुरे होत आलेल्या व ज्यावर मी अखेरचे हात फिरवीत आहे अशा पुस्तकात जीन्सचा मॅथेमॅटिकल गॉड, एडिंग्टनचे गूढवादी अध्यात्म आणि बोहरचा निओ-ड्युॲलिझम् यांनाच बरेच महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. आणि प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे अनिश्चिततेच्या सिद्धान्त हाच या सर्वांचा पाया आहे. ज्या सिद्धान्तामुळे गतानुगतिक यंत्रतत्त्वावर घाला पडला आहे असे समजण्यात येत होते तो सिद्धान्तच कोलमडून पडला तर, आधुनिक तत्त्वज्ञानातील नव-अध्यात्मवादाला जबरदस्त धक्का बसेल. म्हणूनच शास्त्रीय जगात या सिद्धान्ताचे निश्चित स्थान कोणते ते कळून घेण्याला मी उत्सुक आहे. आता करावयाचे आहे ते हे की, या सिद्ध झालेल्या गोष्टींत व पूर्वीचे गतीचे नियम यांच्यामध्ये कोणता दुवा आहे ते शोधून काढणे. गोएटिंगेनचे प्रोफेसर बार्न यांनी हा दुवा शोधून काढला आहे असे दिसते. या सिद्धान्ताबद्दल मला जी माहिती मिळाली आहे ती रूपरेखात्मकच आहे. मला एवढेच कळले आहे की, बॉर्न यांनी क्वॉन्टम थिअरी ही मॅक्सवेलच्या गणिती सिद्धान्ताशी जुळते हे दाखवून दिले आहे. युनायटेड फिल्डच्या प्रायोगिक सिद्धान्तामधील तुटलेले दुवे यावरून आइनस्टाईनला जुळवता येतील. विश्वव्यापी यंत्ररचनेतील सुसंगती मग पुनः प्रस्थापित करता येईल.

अगदी नवीन भौतिक सिद्धान्तांशी संबंधित अशा या नवीन मुद्द्यावर काही अचूक पुरावा मिळाला तर नव्या गूढवादावरील टीकेचा मला समारोप करता येईल. अर्थात मी ज्या वाचकांसाठी लिहीत आहे त्यांची बौद्धिक पातळी लक्षात घेऊन मी किचकट अशा तांत्रिक गोष्टी टाळणार आहे. म्हणून मला फक्त सर्वसाधारण माहिती हवी आहे. तयार झाले की हस्तलिखित ऑगस्टकडे वाचण्यासाठी पाठविता आले असते तर मला ते फार आवडले असते. पण अनेक कारणांमुळे ते करता येणे शक्य नाही. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे सर्व लेखन करावे लागल्यामुळे ते बरेचसे अव्यवस्थित स्थितीत आहे. त्यातील काही भाग तर टाचणांच्या स्वरूपाचा आहे, आणि त्याला अखेरचा आकार फक्त मीच देऊ शकतो. पण ते तांत्रिक काम सध्या मी करणार नाही.

शास्त्रीय साहित्याचा विचार करता आल्बॅट्रास पब्लिकेशनच्या यादीत मला एक-दोन चांगली पुस्तके आढळली. ती स्वस्त आहेत आणि पॅरिसमध्ये सहज रीतीने मिळू

शकतील. माझ्यासाठी ती पाठवशील का ? त्यांची नावे : ' द मायक्रोब हंटर्स ' आणि ' मॅन अगेन्स्ट डेथ ' अशी आहेत. लेखक आहे पॉल द क्रुइफ. तसेच बेलॉकचे ' रिशल्यू ' ही मला पाठव.

३४

डिस्ट्रिक्ट जेल अलमोडा
जुलै १८, १९३४

एक नवे दुर्भाग्य माझ्यावर कोसळले आहे. जितके भयानक तितकेच अनपेक्षित. साहित्यिक कार्य करण्याच्या बाबतीत, ज्या काही सवलती-तशा काटेकोर मर्यादित होत्या त्या-मला देण्यात आल्या होत्या, त्याही काढून घेण्यात आल्या आहेत. तुरुंगाच्या नियमाप्रमाणे ' ब ' वर्गातील कैद्यांना या सवलती आपोआप मिळत नाहीत, पण मला त्या आजवर मिळत गेल्या होत्या. म्हणूनच हा घाव अनपेक्षित आहे आणि सध्याच्या माझ्या स्थितीत कोणत्याही इतर संकटांपेक्षा अधिक धक्का देणारा आहे. मला कोरा कागद, पेन किंवा पेन्सिलसुद्धा ठेवण्याची परवानगी नाही. हे पत्र लिहिण्यासाठी एक पेन पुरविण्यात आले आहे. पण पत्र पुरे होताच ते मला परत करावे लागणार आहे. यापुढे मला कोणतेही लेखन करता येणार नाही–वाचन आणि चिंतन यांच्या साहाय्याने जी टाचणे मी करीत असे तीही मला आता करता येणार नाहीत. शास्त्रीय हेतू पुढे ठेवून व्यवस्थित रीतीने काही अभ्यासही आता अशक्य होईल. कारण वाचलेल्या पुस्तकात पुढे उपयोगी पडाव्या म्हणून खुणा करणे किंवा टिपणे लिहिणे हेही मला आता करता येणार नाही. या परिस्थितीत मला काय वाटत असेल याची तू कल्पनाच कर. ज्या दिव्यातून मी जात आहे ते तर आता असह्यच झाले आहे. इंग्लंडमधील लोकांनी आता या बाबतीत लक्ष घातले पाहिजे आणि बौद्धिक जीवनावर अशी परिपूर्ण बंधने घालून माझी शिक्षा अधिकच कठोर होऊ नये यासाठी हिरीरीने प्रयत्नही केले पाहिजेत लॅन्सबरीलासुद्धा तू या बाबतीत पत्र लिही. दोन मुद्दे आपण स्पष्ट केले पाहिजेत. एक-तर मी शास्त्रीय विषयावर लिहीत आहे आणि ते लेखन राजकीय दृष्टीने आक्षेपार्ह ठरणार नाही; आणि दुसरे, माझ्या साहित्यिक कामामुळे कैदी या नात्याने माझी जी कर्तव्ये आहेत त्यात कधीही कसूर झालेली नाही. तुरुंगात माझ्या वाट्याला जे काम येत असते ते मी पुरेपूर पार पाडीत आलो आहे–सर्वसामान्य कैद्याइतक्या प्रमाणातच.

माझ्या अभिदिव्याच्या तिसऱ्या वर्षाची ही अखेर फारशी शुभदायक खास म्हणता येणार नाही. तो वाढदिवस तारखेने बरोबर २१ तारखेला येतो. तुला आठवतच असेल-हाइन्झकडून आलेला टेलिफोनवरील संदेश. पण अगदीच अनपेक्षित नव्हता तो. कदाचित थोडासा आधी आला असे म्हणता येईल. शेवट हा ठरलेलाच होता.––

निराळ्या दृष्टीने विचार करणारे लोक यालाच नियति म्हणत असतील. शोकान्तिकेने कळस गाठला तो प्रसंग व्हेरोना रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर पार पडला. जे नंदनवन आपल्याला पारखे झाले, त्याच्या आठवणी ताज्या असल्यामुळेच हा आघात तेवढा असह्य वाटला नाही. त्या दुःखदायक भूतकाळावर आज नजर फिरवीत असताना, आपल्याला त्या सुखाच्या दिवसाची अपेक्षा करता येईल की ज्या दिवशी नंदनवन पुन्हा हाती येईल आणि मिल्टनच्या वाट्याला आले तसे ते कळसाचे विरोधी टोकही असणार नाही. कारण आपल्याला काही नंदनवनातून हाकलून लावण्यात आले नव्हते. ते आपले आहे. चिरकाल आपले आहे आणि कोणीही आपल्याला त्यातून हाकलून लावू शकणार नाही हे पुरेपूर माहीत असल्यामुळेच आपण काही काळापुरते त्यातून स्वेच्छेने बाहेर पडलो. तो काळ लवकरच संपेल आणि आम्ही पुन्हा पूर्वपदावर येऊ या विचाराने ज्या काही यातना माझ्या वाट्याच्या असतील त्या सोसण्याला मला धीर येईल. माझे स्वतःचे जीवन जगण्यातील एक खाजगी ध्येय आहे. ते माझ्या डोळ्यासमोर उभे असताना आणखी एक वर्षाची वाटचाल झाल्यामुळे ते ध्येय अधिकच तेजाने चमकू लागले आहे आणि मला अधिकच उत्तेजन मिळत आहे.

माझा व्यक्तिगत कल पाहिला तर पुराण्या युरपबद्दलचा मोह अनावर झालेला दिसत आहे. पण इतरही अनेक गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मी युरपला पुनः परत जाण्यापूर्वी तू भारताचे दर्शन घेण्याची शक्यता अधिक आहे.

या वर्षी अतिशय प्रसन्न अशा उन्हाळ्याचा मी अनुभव घेत आहे हे कळून तुला हायसे वाटेल, आणि आता तर पावसाची संतत धार लागली आहे. मला ते आवडते. पावसाळी आणि तुफानी हवा मला नेहमीच आवडत आली आहे. पण सोयीस्कर वातावरण असल्याशिवाय त्या हवेचा पुरेपूर आस्वाद घेता येत नाही. तथापि दिवसामागे दिवस सूर्यप्रकाशाशिवाय गेले तरी त्या हवेत मला निरुत्साही वाटत नाही. इथे तेवढी हवा कधीच वाईट असत नाही. पावसाने आमच्या आवारात काही फुले फुलविली आहेत– लाल, सफेद आणि शेंदरी रंगाची. देलियाचे एक झाड विलक्षण वेगाने वाढले आहे. मी आलो तेव्हा ते काही इंचच वर आले होते. कोरड्या खडकाळ भूमीतून उफाळून वर येण्यासाठी धडपडत होते. आज ते आठ फूट उंचीचे झाले आहे आणि भडक लाल रंगाची फुले त्यावर फुलली आहेत.

दोरियोला तू भेटलीस का ? त्याच्या भवितव्याबद्दल मला फार मोठे कुतूहल आहे. उलट दिशेने फारच दूरचा पल्ला तो गाठील की काय अशी त्याच्या बाबतीत भीती दिसते का ? नसेल अशी आशा आहे. तसे घडले तर ती मात्र कीव करण्यासारखी घटना होईल. मी तिथे असतो तर किती बरे झाले असते. तू माझे प्रतिनिधित्व करू शकणार नाहीस का ?

डचमनकडून कोणतीही पुस्तके आली नाहीत. आश्चर्य आहे. तो कामचुकार

माणूस नव्हे ! किती तत्परतेने त्याने पेन पाठविले– आता निरुपयोगी. ज्यांनी ती देणगी दिली त्यांची अपेक्षा होती की, या पेनचा उपयोग होईल. पण इतरांना तसे वाटले नाही, त्याला काय करणार ? तो पुनः अडचणीत सापडला की काय ? समृद्ध अशा त्याच्या लहानशा देशातील स्थिरता अद्याप कायम असलेली दिसत आहे. पण बेल्जियममध्ये मात्र सर्वसाधारण असंतुष्टतेचा प्रभाव वाढत चालला आहे.

जर्मनीत नुकतेच जे हत्याकांड झाले त्याची बातमी वाचून मी गोंधळून गेलो आहे. माझ्याकडे ज्या बातम्या आल्या त्या इतक्या अपुऱ्या आणि तुटक तुटक आहेत की, त्यावरून स्वच्छ असा निष्कर्षच काढता येत नाही. हा स्फोट उजव्यांनी केला की डाव्यांनी ? ( अन्तर्गत डावे मी म्हणतो. ) बाहेरच्या डाव्यांना केव्हाच मोडून काढण्यात आले आहे. सध्या तरी लक्षात येण्यासारखी खळबळ उडविणे त्यांना शक्य नाही. स्ट्रासेर आणि रोहेम-- ही विचित्र जोडगोळी आहे ! कालांतराने मासिकावरून मला परिस्थितीचे निदान करता येईल. सध्या मात्र नुसत्या अंदाजाच्या वावड्या उडवावयाच्या. दुसरी आश्चर्य-वार्ता ' पूर्वेकडील लोकार्नो 'बद्दलची आहे. आपला गुबगुबीत मॅक्सिम ( लिटव्हिनॉव्ह ) फारच वाहवत चाललेला दिसत आहे. — अर्थात वरच्या हुकमानुसार. मला कळत नाही हे सारे आवश्यक आहे का ? त्या प्रश्नाच्या उत्तरातूनच खुलासा मिळू शकेल; आणि त्या उत्तरासाठी माझ्यापाशी पुरेशी माहिती नाही. तेव्हा पुनः अंदाजच व्यक्त करावयाचे. पण या वेळी माझ्या मनात संदेहही निर्माण झाला आहे.

आणखी एका गोष्टीने माझ्या मनात खळबळ उडविली आहे. ती साधी गोष्ट आहे. पण तिचे महत्त्व मात्र असाधारण आहे. हायझेन्बर्ग यांच्या सिद्धान्ताच्या सध्याच्या अवस्थेबद्दल मी जो शोध चालविला आहे तिच्याशी ती संबंधित आहे. नुकतेच ' द ॲटम ' या एका नव्या पुस्तकाबद्दल मी काही वाचले. डॉ. जॉन तुतीन या नावाच्या व्यक्तीने ते लिहिले आहे. त्या पुस्तकाने अनिश्चिततेच्या सिद्धान्ताची योजनाच उधळून लावल्यासारखी दिसते. तत्त्वज्ञानाच्या आघाडीवर विध्वंस करणारा हा महारथी कोण ते मला माहीत नाही. पण त्याला प्रशस्तिपत्रके मात्र चांगली मिळालेली आहेत. प्रस्तावनेमध्ये सॉड्डीने पुस्तकातील भूमिकेला साथ दिली आहे. गेले वर्षभर मी साधारणपणे अंदाज व्यक्त करीत होतो की, अणूची अन्तर्गत यंत्रणा काहीशी निराळ्या प्रकारची असावी. नाहीतर ' कोपनहेगन स्कूल'च्या दिग्दर्शनानुसार नियतिवाद हा अडचणीत सापडलेला दिसून येत होता. अर्थात एडिंग्टन, जीन्स यांनी ज्या तत्त्वज्ञानविषयक भराऱ्या मारल्या त्यांची मुळीच आवश्यकता नव्हती. तथापि तो एक प्रश्न होता व तो सोडविला जाणे आवश्यक होते. नियतिवाद हा आग्रही सिद्धान्त म्हणून उभे राहणे शक्य नव्हते. आता मला कळते की, नव्या पुस्तकाने अशी भूमिका घेतली आहे की, रुदरफोर्ड यांच्या अणूमुळे--जो काही धक्का देणाऱ्या स्पष्टीकरणासाठी कोपनहेगनला पाठविण्यात आला--

वस्तुस्थितीच्या अगदी उलट चित्र प्रकट होते हे निर्णायक प्रमाण आहे. त्याने प्रश्न सोडविला जातो. माझ्या भावना उचंबळून येणे साहजिक आहे. कारण निश्चितपणे नव्हे पण साधारणपणे मी याच दिशेने विचार करीत होतो. मला वाटत होते की, नव-अध्यात्मवादी जोवर वरकरणी तरी शास्त्रीय पायावर उभे राहात आहेत तोवर त्यांच्याशी शाब्दिक वितंडवाद करण्यात काहीच अर्थ नव्हता. तथापि मला हीही खात्री होती की, तर्कशास्त्राच्या आधारे त्यांचा हा शास्त्रीय पाया सहज रीतीने काढून घेता येईल. तथापि अखेरचा निर्णय प्रत्यक्ष शास्त्रानेच द्यावयाला पाहिजे होता. हे नवे पुस्तक मला मिळाले तर फार बरे वाटेल. या मुद्द्यावर मी बरेच लिहिले आहे. आणि आता क्वॉन्टम थिअरीचे बॉरने केलेले गणिती एकसूत्रीकरण, मॅक्सवेलच्या इलेक्ट्रो-मॅग्नेटिझमच्या नियम, त्याच-प्रमाणे तुतीनच्या पुस्तकात ग्रथित केलेला प्रत्यक्ष पाहणीनंतरचा निष्कर्ष यांच्या आधारे मला नव-अध्यात्मवाद्यांच्या खंडनाच्या माझ्या भूमिकेचा समारोप करता येईल. दुर्दैवाने याच वेळी मला प्रत्यक्ष लेखन करता येत नाही. आपली सारी प्रयोगशाळा डोक्यात साठविणे आइन्स्टाईनलाच शक्य आहे. माझ्यासारख्या शिकाऊ माणसाला ते शक्य नाही. माझे विचार कागदावर टिपल्याशिवाय सूत्रबद्ध रीतीने ते मला विकसित करता येत नाहीत आणि इतके सारे ओझे वाहणे ही डोकेदुखी आहे.

३५

डिस्ट्रिक्ट जेल, अलमोडा
ऑगस्ट २३, १९३४

काही दिवसांपूर्वी मला ब्रॉकवेचे पत्र मिळाले. मी मुळीसुद्धा निराश झालो नाही. मला फारशी आशा नव्हतीच. शिवाय सुरुवातीपासूनच क्रिप्स याचे डोके तिरपे चाललेले दिसत होते. व्यक्तिशः माझ्यावर परिणाम करणाऱ्या प्रत्यक्ष निर्णयाबद्दल मला मुळीच आस्था नव्हती. मला असे वाटत होते की, माझा मुद्दा धसास लावून पाहण्याची ही एक संधी मिळाली होती आणि माझे अद्यापही असे मत आहे की, तो धसास लावायला पाहिजे होता. अरेरे, माझे ते दुर्दैवी निवेदन--जे कधीच केले गेले नाही! त्यात मी जो प्रश्न उभा केला आहे, त्याचा सोक्षमोक्ष लावून घेतलाच पाहिजे. मला वाटते, नामांकित कायदेपंडितांना त्या मुद्द्याचा ठाव घेता आला नाही. किंवा कदाचित ती कल्पना त्यांना विचित्र वाटली असावी. ते काही असो, हा प्रश्न कायमचा मिटला यातच मला आनंद आहे. इतके सारे दिवस नुसते हवेत टांगते राहणे हे किती तापदायक होते. शिकस्त म्हणजे आणखी दोन वर्षे. आणि मला वाटते, पाच वर्षांची शिक्षा ही सुसह्य आहे. त्यानंतर इतरही मार्ग आहेत. ब्रॉकवेला पत्र लिही आणि माझ्यावतीने त्यानीजी आस्था दाखविली त्याबद्दल मला विलक्षण कौतुक वाटते असे कळव मला खात्री आहे की

या पुढेही त्यांची हरेक प्रकारे मदत होत राहील.

माझे मागील पत्र लिहिल्यानंतर लेखनसाहित्याबद्दलचा प्रश्न अनुकूल रीतीने सोडविला गेला आहे. हे साहित्य लवकरच मला मिळेल. फक्त थोडा वेळ—दोन महिने आणि काही दिवस—फुकट गेला आहे. पण आणखी बराच काळ आहे; आणि मध्यंतरीच्या काळाचा, पुस्तकात ज्या तात्त्विक प्रश्नांचा मला परामर्श घ्यावयाचा आहे, त्यांच्याबद्दल चिंतन करण्यासाठी मी उपयोग करून घेतला. आता हे जे नव-प्रामाण्यशास्त्र अस्तित्वात आले आहे त्याचा दंभस्फोट करण्याची माझी तयारी झाली आहे. हे नव-शास्त्र साधारणपणे कोपनहेगन स्कूलची तथाकथित न्यू क्वॉंटमथिअरी आणि विशेषतः अनिश्चिततेचा सिद्धान्त यापासून उगम पावली आहे, असे समजले जाते. बॉरने जो गणिती सिद्धान्त मांडला आहे तो आणि कॅव्हेंडिश प्रयोगशाळा व इतरत्र झालेल्या संशोधनातून जो प्रायोगिक पुरावा उपलब्ध झाला आहे तो, यांच्या व्यतिरिक्त मी तत्त्वतः असे दाखवून देऊ शकतो की, हॉयझेनबर्ग यांचा सिद्धान्त जडवादाच्या मूलभूत तत्त्वांशी विरोधी ठरत नाही. खरे सांगायचे तर श्रो एडिंगरने जड्द्रव्याबद्दलचा जो तरंग सिद्धान्त प्रगट केला आहे आणि जो नवअध्यात्माच्या दृष्टीने हायझेनबर्ग यांच्या सिद्धान्ताचे स्पष्टीकरण मानला जातो, तो वस्तुतः अगदी विरुद्ध स्वरूपाचा आहे. त्या सिद्धान्ताने इलेक्ट्रोमॅग्नेटिझमबद्दलचे पुरातन तत्त्व आणि क्वॉंटम थिअरी यांच्यामध्ये अभेद्य अशी दरी निर्माण झालेली आहे अशी जी समजूत प्रस्थापित झाली होती ती खोटी ठरविली आहे आणि या तथाकथित दरीवर एक पूलच बांधला गेला आहे. आश्चर्य असे की, या पुलाची रूपरेखा १९१३ मध्ये स्वतः बोहरनेच आखली होती. त्याने प्रतिपादन केलेल्या एकसूत्रीकरणाच्या तत्त्वाचा मी उल्लेख करीत आहे, आणि आता वृद्ध बोहर स्वतंत्र इच्छाशक्ती आणि अनिर्बंध द्वैतवाद यांचा पुरस्कर्ता म्हणून पुढे येत आहे. सारा आचरटपणा! इतका की, बरट्रांड रसेललासुद्धा हा सिद्धान्त पचू शकला नाही; आणि म्हणून त्याने म्हटले की या सिद्धान्ताचे स्पष्टीकरण चुकीचे होत आहे. 'अनिश्चित' याचा अर्थ निश्चितपणे 'अशोधित' असा नव्हे, असे त्याचे म्हणणे आहे. या दिशेने बरट्रांड रसेल जाऊ लागला तर मेटॅ-मॅथेमॅटिक्स जी नव-अध्यात्मवादाच्या अनिर्बंध चाळ्यांना प्रतिकार करणारी तात्त्विक विचारसरणी आहे, तिच्या गटात फूट पडेल. व्हाइटहेडला ती फूट हवीच आहे.

सक्तीची फुरसद देणाऱ्या या काही आठवड्यांत आणखी ज्या एका प्रश्नावर मी लक्ष केंद्रित केले आहे तो व्हाइटहेडचा 'प्रकृतिरूप तत्त्वविचार' होय. निखालस दिशाभूल करण्याचा प्रकार आहे हा. त्यावरून सुप्रसिद्ध 'एम्पीरिओ क्रिटिक्स'ची आठवण झाल्यावाचून राहात नाही. त्यांना निसर्गाचा शास्त्रीय दृष्टीने मागोवा घेण्यासाठी, जडवादही नाही आणि भावनावादही नाही तर त्या दोहीपेक्षा श्रेष्ठ अशी विचारपद्धती हवी होती. पण व्हाइटहेडचा 'प्रकृतिरूपवाद' जड तरी, नाही तर अमूर्त तरी, शक्ती-

वर आधारलेला आहे. त्याच्या साऱ्या नवपांडित्यातून आणि मेटॅ-मॅथेमॅटिक्समधून या पेक्षा निराळे काही त्याला सिद्ध करता येणार नाही.

मी पुनः लिहू लागलो की, एक पुस्तक सरळ लिहून पुरे होईल. त्याच्या प्रकाशनाबद्दल विचार करता, परदेशात त्याच्याबद्दल कुतूहल निर्माण होईल किंवा नाही कोण जाणे! हिंदी वाचकांसाठीच ते लिहिलेले आहे आणि सारी चिकित्सा आधुनिक हिंदी विचारातील मूलभूत अशा काही प्रवृत्तींवरच प्रामुख्याने केंद्रित झालेली आहे. अर्थात त्या अनुषंगाने त्या पुस्तकात बराच व्यापक विचार केलेला आहे. ते कसेही असो, प्रकाशन हा तातडीने निर्णय लावण्याचा प्रश्न नव्हे. मला प्रथम बाहेर तर पडू या. दरम्यान कालांतराने होणाऱ्या प्रकाशनाबद्दल काही पूर्वतयारी करायला हरकत नाही. हिंदी तत्त्वज्ञानावरील पुस्तकाबद्दल मात्र सर्वांनाच कुतूहल वाटेल. ते मी शेवटी लिहिणार आहे. दुसऱ्या पुस्तकाचे नाव मी 'आऊटलाइन ऑफ सायंटिफिक थॉट' असे ठेवले आहे. त्यातही अशा प्रकारच्या साहित्यात रस घेणाऱ्या युरोपीय व अमेरिकन वाचकांना विशेष नावीन्यपूर्ण असे मुळीच काही आढळणार नाही. फक्त ज्या पद्धतीने मी विषयाची मांडणी करणार आहे ती त्यांना काहीशी नवीन वाटेल आणि मुद्द्यांची रचना निराळ्या प्रकारची आढळून येईल.

साहित्याची वाण पडल्यामुळे माझी बरीच अडचण होत आहे. काही पुस्तके येथूनच मिळविण्याचा मी प्रयत्न करीत आहे, पण प्रमाणभूत ग्रंथही येथे सहजपणे मिळू शकत नाहीत. परदेशातूनच ते मागविले पाहिजेत. डचमनचे काय झाले हे एक मला कोडे पडले आहे. तो गर्क तरी कशात आहे? एकाकीपणे तो पार्लमेंटमध्ये फारसे काही करू शकणार नाही. लायनचे "फिअर्टे राईश" (ट्रॉट्स्कीने स्थापन केलेले फोर्थ इंटर नॅशनल) फारशी प्रगती करीत असलेले दिसत नाही. तुझ्या गेल्या पत्रावरून मला कळले की, एकजूट करण्याच्या प्रश्नाला हॉलंडमध्ये काही चालना मिळाली आहे. डचमन त्याच्या मागे आहे की काय? मला नाही वाटत. पुस्तकाबद्दल त्याच्याशी निकड लाव. आता राणीच्या तिजोरीतून त्याला पगार मिळत असल्याकारणाने काही गिल्डेन आपल्यासाठी खर्च करावयाला त्याला हरकत नाही; आणि एका गिल्डेनमधून करंट्या फ्रँकपेक्षा कितीतरी अधिक गोष्टी खरेदी करता येतात.

यापुढे बरेलीला कोणत्याही वस्तू पाठवू नयेत. मी तिथे परत जाणार नाही. तिथली हवा मला मानवली नाही. सध्याच्या व्यवस्थेप्रमाणे ऑक्टोबरच्या मध्याला मला सपाटीवरील दुसऱ्या कोणत्यातरी नव्या जागी पाठविण्यात येणार आहे. बदलीमुळे माझ्या प्रकृतीत चांगला फरक पडला. आणखी एक उन्हाळा मला बरेलीला काढावा लागला असता तर इथे येऊन जी सुधारणा झाली ती कधीच झाली नसती. पण माझ्या आजाराचे मूळ कारण अद्याप सापडलेले नाही. छातीतील कळ चालूच आहे. एक्सरेसहित परिपूर्ण वैद्यकीय तपासणी झाली तर, ती फार उपयुक्त होईल.

अलीकडे मी गॅल्सवर्दीचे ' स्वानसॉंग ' वाचीत आहे. पाचव्या वेळी. श्रेष्ठ कादंबरी आहे ती. तीत मला एक धारदार वाक्य आढळले. भावनेची निष्ठा इतकी तर्कशुद्ध की शरीरक्रियेवरसुद्धा तिचा ठसा उमटतो. ती पाषाण युगाशीच संबद्ध मानावी लागेल किंवा निदान व्हिक्टोरियन युगातील मध्यम वर्गीयांतच ती प्रतिबिंबित झालेली आढळून येईल. ही एक कल्पना आहे, जी झिडकारल्यामुळेच अनेक दुःखदायक प्रसंग निर्माण झाले आहेत !

३६

डिस्ट्रिक्ट जेल, अलमोडा
सप्टेंबर २०, १९३४

एक स्थानिक वकील मला भेटायला आला. इथे आल्यापासून तिसरी मुलाखत : आजची भेट घेणाऱ्या इसमाने मला सांगितले की, ' अमेरिकन एक्सप्रेस, पॅरिस ' या पत्त्यावर तुला पाठवलेले सारे कागदपत्र परत आले असल्याचे मला कळविण्याची कामगिरी त्याच्याकडे सोपविण्यात आली आहे. सारेच अजब आहे. आणखी आश्चर्य असे की, इकडील वकिलाला असे कळविण्यात आले आहे की, बर्लिनमधील पत्त्यावर डॉ. रोझेनफेल्ड याना जे कागदपत्र पाठविण्यात आले होते ते पोचविता आले नाहीत, कारण ते प्रतिबंधक छावणीत कैदी होते. गोएरिंगचा हा केवढा विनयशीलपणा नाही ? रोझेनफेल्ड हा प्रतिबंधक छावणीत होता हे मला माहीत नव्हते. आता तो अमेरिकेत आहे असे मासिकावरून मला कळते.

या मुलाखतीसाठी मला तुरुंगाच्या दारापर्यंत नेण्यात आले. जिथून साऱ्या आसमंताचे चांगले दर्शन होऊ शकते. माझ्या जे दृष्टिपथात आले ते खरोखरच सुंदर आहे. पण इतक्या सुंदर पर्वतश्रेणीवरील प्रदेशाच्या गाभ्यात असूनही मला फारच थोडे पाहावयाला मिळाले. तथापि सुटल्यानंतर मला जी विश्रांती आणि आराम हवा आहे आणि आता करीत असलेले काम पुरे करण्यासाठी जे स्वास्थ्य हवे आहे ते मला या प्रदेशात मिळू शकेल. इथली हवा आता छान आहे, आणि ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये ती यापेक्षाही अधिक चांगली असेल असे म्हणतात. सूर्य तसा तेजस्वी आहे पण तेवढाच प्रसन्न ऊब देणाराही आहे; आणि मी असे ऐकतो, सारे आसमंत स्वच्छंद सहली करण्याच्या दृष्टीने अत्यंत चांगले आहे. किती आकर्षक भविष्यकालीन चित्र आहे हे नाही का ? तुरुंगातील जीवनाच्या साऱ्या दुःखावर मात करणारे.

मला वाटते, हिवाळ्याची मला पर्वा नसेल तर मला इथेच ठेवले जाईल. अनुभविक लोकांचे सांगणे आहे की, इथला हिवाळा बरेलीपेक्षा अधिक कडक नसतो. पण अधिक सुखदायकमात्र असतो. म्हणून मी इथेच राहावयाचे ठरविले आहे. फक्त हिवाळा

माझ्या प्रकृतीला अपायकारक नसला म्हणजे झाले. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचा मला कंटाळा आहे आणि ज्या स्थितीत मला नेले जाते त्याची तर मला शिसारी आली आहे. मला वाटते मला इथे बरे वाटेल. गेल्या चार महिन्यांत माझी प्रकृती बरीच सुधारली आहे. हृदयाच्या आसपास थोडा दुखावा आणि अधूनमधून सहन करावी लागणारी डोकेदुखी सोडली तर मी बरा आहे.

पण दुसरा एक ताप उद्भवला आहे. तशी ती मोठी आपत्ती नव्हे. थोडासा विनोदच आहे. अडचण आहे ती ही की, अनेक वेळा रात्री माझी झोपमोड होते. विनोद आहे तो ज्या कारणाने ती होते त्यात आहे. कारण? माझ्या नव्या सोबत्याचे घोरणे आणि ज्या अपूर्व हिरीरीने त्याच्याकडून ही क्रिया घडते ते. भेसूर गोंगाटातील इतका आक्राळविक्राळ बदसूर कोणी कल्पनेनेही जाणू शकणार नाही. त्याचे वर्णन तरी काय करू? कधी घशातून आवाज, कधी कण्हणे, कधी किंचाळणे, कधी किंकाळणे, कधी शिट्या फुंकणे, असा नाना प्रकारचा गोंगाट त्याच्या घोरण्यातून निघत असतो. ती मोफत करमणूक ऐकत मी जागत असताना मला कीव येते ती लठ्ठ पुरुषांशी विवाह करणाऱ्या स्त्रियांची आणि शिसारी येते ती लठ्ठ होण्याच्या बाबतीत असंस्कृतपणा दाखविणाऱ्या पुरुषांची. परमेश्वराची शपथ आहे तुला. ज्या माणसाचा शरीरविस्तार त्याच्या उंचीच्या मानाने सर्वस्वी विसदृश आहे अशा माणसाच्या प्रेमात पडण्याचा असंस्कृतपणा कधीही दाखवू नकोस. तथापि अशा तऱ्हेच्या असंभाव्य विकृतीच्या तू आधीन झालीस तर मात्र ही माझी औषधयोजना ध्यानांत ठेव. त्या सुदैवी प्राण्याला मरेपर्यंत किंवा घोरणे थांबवीपर्यंत उपाशी ठेव. माझा माननीय सोबती मात्र तिरस्काराने माझी औषधयोजना झिडकारून टाकतो आणि त्याचे आणि माझे नाते असे नाही की, ज्यामुळे घटस्फोट देणाऱ्या न्यायालयाचे संरक्षण घेण्याचा मला अधिकार प्राप्त होईल, तेव्हा हा पाहा मी एक हुतात्मा झालो आहे. पवित्र विवाहसंस्थेचा नव्हे तर मला कोंडून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याच्या अविचाराचा एक असहाय बळी! कैद्याला आपल्या वैशिष्ट्याचा आग्रह धरता येत नाही. आणि असेही काही कारावासाचे प्रकार आहेत की, जे विवाहापेक्षाही अधिक बोचक आणि असहायतेचे असतात.

तुझ्या इच्छेनुसार मी जवळजवळ संपविलेल्या पुस्तकाची अनुक्रमणिका पाठवीत आहे. ते काही संपूर्ण चित्र नव्हे. पण मला वाटते पुस्तकाची त्यातून बरीच चांगली कल्पना येईल. हे पुस्तक हिंदी वाचकांना डोळ्यांसमोर ठेवून लिहिले असले तरी व्यापक स्वरूपाच्या प्रश्नांचाही त्यात ऊहापोह केलेला आढळून येईल. नवीनातील नवीन शास्त्रीय साहित्य मी कलकत्त्यातील एका पुस्तक-विक्रेत्यामार्फत लंडनमधून मागविले होते म्हणून आवश्यक ती सारी साधनसामग्री आता मला मिळाली आहे. तथापि प्रश्न होता तो किच्चकट गणित, सहज समजेल अशा मानवी भाषेत अनुवादित कसे करावयाचे? उदाहरणार्थ, पीक्यू-क्यूपी म्हणजे शून्य नव्हे हे तत्त्व सर्वसामान्य मर्त्य जीवांना समजेल

अशा भाषेत तुला जन्मजन्मांतरी तरी समजावून देता येईल काय ? तथापि हायझेन-बर्गच्या सिद्धान्ताचे सारे गुपित त्यातच तर आहे. त्यानंतर त्यातील भेद ! ठीक आहे. जेवढे करता येईल तितक्या अचूकपणे मी हे सारे केले आहे. त्या पुस्तकात गणितावर काही टीका आहे--म्हणजे गणितावर अशी नव्हे. पण जे निर्भेळ गणितज्ञ तत्त्वज्ञाचा आविर्भाव आणून म्हणतात की,—प्रतीके ही काहीतरी अनाकलनीय, आध्यात्मिक कल्पनांचीच जर प्रतीके असतील तर असोत. यापेक्षा जास्त प्रतीकात्मक त्यांच्यामध्ये काही नाही--त्यावर मी कोरडे ओढले आहेत. निर्भेळ गणितातून काढलेल्या निदानांच्या भराऱ्या आवरल्याशिवाय अनिश्चिततेच्या सिद्धान्तातील भौतिक आशय प्रगट करणे शक्य होणार नाही. आणि क्वॉटम मेकॅनिक्स ( श्रो एडिंगर आणि बॉर्न यांनी विकसित केलेले ) आणि क्लासिकल मेकॅनिक्स यांच्यामधील भेद बहुशः काल्पनिक आहे हेही सिद्ध करता येणार नाही. खरे सांगावयाचे तर या भेदाची निर्मिती अवनतीला पोचलेल्या संस्कृतीच्या तात्त्विक गरजांना मोठ्या कौशल्याने शास्त्रीय आधार देण्यासाठीच करण्यात आली आहे. मला असे वाटते की, या अपुऱ्या साधनसामग्रीवर ऑगस्टला आपले निर्णायक मत देणे शक्य होणार नाही. पण सर्वसाधारणपणे त्यावर आपले विचार प्रगट करण्याकडे त्याचा कल होणे शक्य आहे. अर्थात् प्रकाशनापूर्वी या साऱ्या हस्त-लिखितावर हात फिरवला गेलाच पाहिजे. त्या दृष्टीने तज्ज्ञांकडून त्याची पाहणी व्हावयाला भरपूर वेळ आहे. दरम्यान मीही सुधारणा करीनच.

प्रकाशनाबद्दल मला असे वाटते की, ते हिंदुस्थानातच प्रकाशित होणे अधिक इष्ट. पण मग आर्थिक लाभावर पाणी सोडावेच लागेल. पण तो दुय्यम महत्त्वाचा मुद्दा आहे. दरम्यान चीनवरील पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती काढण्यासाठी काही प्रयत्न व्हावयाला पाहिजेत. मला वाटते, जर्मन आवृत्तीचा संपूर्ण निकाल लागला असेल. अडचण आहे ती इंग्रजी हस्तलिखित शोधून काढण्याबद्दलची. मालिक व्हेरलाग प्रकाशनगृहात माझी इतर पुस्तके आणि कागदपत्रे यांच्याबरोबर ते ठेवण्यात आले होते आणि म्हणून हिटलरिझमच्या पवित्र अग्नीत तेही भस्मसात झाले असेल. फ्रँकफुर्ट इन्स्टिट्यूट ऑफ सोशल रिसर्चमध्ये त्याची एक प्रत होती. तीही नाहीशी झालीच असेल. मूळ इंग्रजी हस्तलिखित जर मिळण्याची आशाच नसेल तर दुसरा पर्याय म्हणजे जर्मन भाषेतून त्याचा पुनः इंग्रजीत अनुवाद करणे. पण मग ते मूळ पुस्तक राहणार नाही. कारण जर्मन आवृत्तीतील पहिली तीन प्रकरणे—ज्यात तात्त्विक प्रश्नांचा ऊहापोह करण्यात आला आहे—काहीशी काटून छाटून तयार करण्यात आलेली आहेत. म्हणजे मुळातील पुस्तक इंग्रजीत मुद्रित होण्याची आशा करण्यात अर्थ नाही. परंतु ते हस्तलिखित परत मिळण्याची शक्यता निर्माण झाली तर मात्र त्याच्या प्रकाशनाची व्यवस्था करा. चीन-मधील सध्याची परिस्थिती आणि काही काळ तरी ती तशीच राहण्याची शक्यता, यांचा विचार करता, मला लहानसा का होईना, भविष्यवेत्ता होण्याचे वैशिष्ट्य संपादन करता

येईल. बरेलीला पाठवण्यात आलेली त्या पुस्तकाची जर्मन प्रत मला देण्यात आली नाही. तसेच मार्क्स, एंगल्स, अर्काइव्हज; किती आतुरतेने मी त्यांची वाट पाहात होतो. एकदम आठवण झाली. जर्मनीतील या पागलपणामुळे माझे आणखी केवढे तरी नुकसान झाले आहे. ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास ( एका अमर साहित्यकृतीचे नाव ते घेणार होते ) या माझ्या संकल्पित ग्रंथाची हस्तलिखिते, टिपणे, साधनसामग्री वगैरेसुद्धा नष्ट झाली आहे. चार-पाच वर्षांचे संशोधनात्मक कार्य त्यासाठी खर्ची पडले होते. आता, तो तोटा मला कदापिही भरून काढता येणार नाही.

साऱ्या जगभर विखुरलेल्या माझ्या सर्व मित्रांचे कुशल कळण्याची मला केवढी उत्कंठा लागली आहे म्हणून सांगू. दोरियोच्या अधःपाताची बातमी ऐकून कल्पनातीत वाईट वाटले. स्वतःबद्दल अवास्तव कल्पना करून घेणे मला आवडत नाही. पण मला अजूनही वाटते की, तिथे असतो तर त्याला मी वाचविले असते. तथापि सर्वच बाजूंनी काळजी घेणे शक्य नाही. अर्थात सर्वसाधारण सभेच्या ( कम्युनिस्ट इंटरनॅशनलची सातवी जागतिक परिषद ) निर्णयाबद्दल मी आशावादी नाही. पण कुतूहल वाटणे साहजिक आहे आणि चिंता वाटणे तर अपरिहार्य आहे. तू म्हणशील जुनीच सवय ! होय; उलट दिशेने जो कल दिसत आहे तो भयप्रद आहे. ' नेतृत्वा 'च्या संबंधाने मी ' क्रायसिस ' या मथळ्याखाली जे लेख लिहिले त्यात ही भीती मी व्यक्त केली होती. कृपा करून हाइन्झ आणि ऑगस्ट आणि इतर मित्रांना सांग की, मनाने मी सदैव त्यांच्याबरोबर आहे आणि एक उपयुक्त आणि परिणामकारक कॉम्रेड म्हणून मी कामगिरी बजावीन याबद्दल त्यांनी खात्री असू द्यावी. माझे जे खास क्षेत्र आहे त्याबद्दल मला पुरेपूर विश्वास आहे; आणि त्या विभागात आपण यश मिळविले तर त्याचा एकंदर परिस्थितीवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. तुमच्यापासून दूर झाल्याला लवकरच चार वर्षे पुरी होतील. माझी योजना ऐकून हाइन्झ आणि ऑगस्ट किती व्यथित झाले होते, त्याची मला आठवण आहे. ज्या बिकट परिस्थितीतून ते जात आहेत तीत माझी ते सतत आठवण ठेवतील अशी माझी खात्री आहे. सर्वांना माझ्या हार्दिक भावना कळव.

३७

सेंट्रल प्रिझन, बरेली
ऑक्टोबर २५, १९३४

माझ्या पुराण्या ' घरी ' पुनः एकदा परतलो. फक्त पाच महिन्यांनंतर. इंग्लंडहून आलेले तुझे पत्र आलमोडा येथील माझ्या अखेरच्या काही दिवसांत पोचले. अत्यंत आवश्यक अशी विश्रांती घेण्यासाठी अखेरीस तुला काही आठवड्यांची निवांत मिळाली

हे ऐकून फार आनंद वाटला. तुला जरी यापेक्षा अधिक चांगले स्थळ निवडता आले असते तरी इंग्लंडमधील निसर्गरम्य ग्रामीण विभाग काही त्यासाठी वाईट नाही आणि तुला तो आवडला आहे असे दिसते. फक्त तू सहाही आठवडे लंडनच्या बाहेर काढले असशील आणि प्रोफेसर ओरडेनला हिंडेनबुर्गच्या चरित्रलेखनात एकाकीपणे निमग्न होण्याला वाव दिला असशील अशी मला आशा आहे. लंडनमध्ये असताना तेथील आपल्या मित्रांना माझ्या पुस्तकाची अनुक्रमणिका दाखविलीस का ? त्यावरून पुस्तकातील एकंदर मजकुराबद्दल यथार्थ कल्पना येऊ शकणार नाही हीच खरी अडचण आहे. कारण अनुक्रमणिकेत नमूद केल्यापेक्षा अधिक व्यापक क्षेत्र मी धुंडाळले आहे. तथापि सध्याच्या परिस्थितीत यापेक्षा जास्त काही मला करताच आले नसते. अधिक विस्तृत असे स्पष्टीकरण द्यावयाचे म्हटले तर त्याला बरीच जागा लागेल आणि त्याचीच तर सध्या उणीव आहे.

ऑगस्टचे माझ्या पुस्तकावरील शेरे मी खूप आस्थेने वाचले. कृपा करून त्याला सांग की, अनिश्चिततेच्या सिद्धान्ताची जी चूष निर्माण झाली आहे तिचा समाचार घेताना, त्याला जे जे काही म्हणावयाचे आहे ते माझ्या मनात आले होते आणि म्हणून आणखी कोणत्या सुधारणा करता येतील हे पाहण्यासाठी मी पुनः एकदा हस्तलिखिताचे पारायण केले. या विषयाचा मी परिपूर्ण परामर्श घेतला आहे अशी माझी श्रद्धा आहे– म्हणजे अधिक अनुकूल परिस्थितीत जेव्हा अखेरचा हात फिरवून मी अत्यंत आवश्यक अशा सुधारणा त्या हस्तलिखितात करीन तेव्हा एक परिपूर्ण विचार मांडण्याचे समाधान मला मिळाल्याशिवाय राहणार नाही. गणिताबद्दलच्या माझ्या पाखंडीपणामुळे ऑगस्टला फार मोठा धक्का बसला नसेल अशी मला आशा आहे. माझे गेले पत्र लिहिल्यानंतर मी रसेलचे वाचन करीत आहे आणि त्याचा परिणाम असा झाला आहे की, तथाकथित निर्भेळ गणितज्ञाच्या—विशेषतः रसेल आणि व्हाइटहेड यांचा तार्किक पंथ-आढ्यताखोर आविर्भावाबद्दलच्या टीकेचा पारा अधिक चढविण्याची आवश्यकता मला वाटू लागली आहे. त्यांचा 'तटस्थ अद्वैतवाद' हा नुसता शब्दच्छल आहे आणि त्या कसरतीसाठी गणिताला वेठीस धरले जात आहे. यावरून मला एका मनोरंजक गोष्टीची आठवण होते. आधुनिक शास्त्रीय सिद्धान्ताच्या गूढ आध्यात्मिक स्पष्टीकरणाला पाठिंबा देण्यासाठी एडिंग्टन उपयोगात आणीत असलेला युक्तिवाद. तो म्हणतो की, जो हाडाचा जडवादी आहे त्याने आपल्या पत्नीकडे गुंतागुंतीच्या संख्याशास्त्राचे गूढ म्हणून पाहिले पाहिजे. पण कौटुंबिक शांततेसाठी त्याला तसे करता येणार नाही. एक थोर शास्त्रज्ञ कसला युक्तिवाद करीत आहे पाहा ! बिच्चारे ! कसल्या हताश अवस्थेला पोचले आहेत तरी !

अलमोड्यात असतानाच मला एस्. ने कळविले की, त्याच्याकडे माझ्यासाठी अमेरिकेतून पाठविलेली बरीच पुस्तके आली आहेत. त्यात काही पुस्तके अशी आहेत की, जी मला तातडीने हवी आहेत. उदाहरणार्थ प्लॅन्कचे ' युनिव्हर्स इन द लाइट ऑफ

फिजिक्स ' आणि मॉर्गन आणि हाल्डेनचे अगदी अलीकडील ग्रंथ. पण एस. ने ती पुस्तके अद्याप माझ्याकडे पाठवून दिली नाहीत. इतके निष्काळजी आहेत हे लोक आणि मला काही त्यांचा पाठलाग करता येत नाही. धीर धरून वाट पाहिली पाहिजे. जीवनाच्या या नव्या विद्यापीठात सहनशीलतेचा चांगला धडा मी शिकत आहे. भावी काळात तो उपकारक होईल की अपकारक कोण जाणे. काही क्षण मात्र असे येतात की जेव्हा तत्त्वज्ञाची शांती अगदी कमालीच्या कसोटीला लावली जाते.

डचमनने माझे गाऱ्हाणे आपल्या[१] देवाच्या चरणी ठेवले हा खरोखरच त्याचा चांगुलपणा आहे आणि देवाने ज्या सदिच्छा व्यक्त केल्या त्याबद्दल कृतज्ञता वाटणे साहजिकच आहे. मॉस्कोतील सर्वोच्च देवांकडून मला जी वागणूक मिळाली त्यापेक्षा निराळ्या वागणुकीची अपेक्षासुद्धा करण्यात अर्थ नव्हता. बिचारा ट्रॉट्स्की ! त्याने सहानुभूती व्यक्त केली. यापेक्षा अधिक तो तरी काय करणार ? शिवाय एवढे खरे की, व्यक्ती म्हणून त्याच्यामध्ये सौजन्य असले तरी तोही आपल्या परी देव—आणि शाडूच्या पायांचा—आहेच. माणूस म्हणून जगण्यात जर त्याने समाधान मानले असते तर इतिहासात एक श्रेष्ठ पुरुष म्हणून त्याचे नाव अजरामर झाले असते—परमेश्वरापेक्षाही काहीतरी मोठे. एका नव्या अमेरिकन मासिकात या विषयावर मी काही चांगला मजकूर वाचला.

तुझ्या गेल्या पत्रावरून दिसते की, विली (म्यूएनझेनबर्ग) पॅरिसमध्ये आहे. अमेरिकेहून तो परत आला का ? मला वाटले होते तो तिथे आहे. तो इतका युरोपीय आहे की, नव्या जगात रस घेणे त्याला बहुधा जमणार नाही. पण तो व्यापारी मात्र असा आहे की एखाद्या अमेरिकन व्यापाऱ्यालाही तो मागे टाकील. तिथे त्याने यश मिळवायला पाहिजे होते. गेल्या पत्रात तू लिहिल्याप्रमाणे आपले सारे मित्र आनंदी व आशावादीच राहिले असतील अशी मला आशा आहे. त्यांच्या प्रतिभेचे असे चित्र रंगविण्यात मला किती आनंद होत असेल म्हणून सांगू ? भावनेने मी सदैव त्यांच्याबरोबरच असतो आणि त्यांच्या भावनेतही मी वाटेकरी असतो. ज्यात कधीही ताटातूट होऊ शकत नाही अशा या मीलनाची त्यांनाही जाणीव असावी एवढीच माझी इच्छा आहे.

---

१. माझा ॲम्स्टर्डाम येथील मित्र स्नीव्हलिट हा ट्रॉट्स्कीचा एकनिष्ठ अनुयायी होता. त्याने माझ्या अडचणी ट्रॉट्स्कीला कळविल्या आणि कम्युनिस्ट इंटरनॅशनलकडून मला मिळत असलेल्या वागणुकीबद्दल ट्रॉट्स्कीने आपला संताप व्यक्त केला.

३८

सेंट्रल प्रिझन, बरेली
नोव्हेंबर २३, १९३४

लंडनमध्ये तुझा वेळ चांगल्या रीतीने गेला असेल. लंडन हे एक अपूर्व स्थळ आहे. त्याचे वैशिष्ट्य काही आगळेच. तसे ते गूढरम्य आहे. पण मला ते परिचितासारखे वाटते. माझ्या इंग्लिश मित्रांना नेहमी आश्चर्य वाटत असे की, मी ज्या स्थळाला कधीही भेट दिलेली नाही त्याची इतकी इत्थंभूत माहिती मला असे आणि त्याच्या नैसर्गिक वातावरणाची मला इतकी सुरेख कल्पना असे. काही बाबतींत नॅशनल गॅलरी ही लूव्हर-पेक्षा कमी दर्जाची असली तरी ब्रिटिश म्युझियम ही एक श्रेष्ठ संस्था आहे.

तुझी आणि रोबसनची भेट झाली हा खरोखरच एक अपूर्व योगायोग आहे. सहसंवेदनेचेच हे प्रात्यक्षिक दिसते. हे निसर्गदत्त कलाकार फार भावनोत्कट असतात. विशेषतः रोबसन हा तर बालकासारखा अनघ, अकृत्रिम वाटतो. माझी त्याच्याबद्दलची ही भावना आहे. तुझा अनुभव तसाच आहे का ? मला आशा आहे की तो पॅरिस-मधील मैफलीसाठी येईल आणि तू त्याचे गायन प्रत्यक्षपणे ऐकशील. मी एकदा बर्लिन-मधील वेस्टएंड थिएटर्सपैकी एका अलीशान नाट्यगृहात ओनीलच्या ‘ सम्राट जोन्स ’-ची भूमिका वठविताना त्याला पाहिले होते. एक श्रेष्ठ नट म्हणून मी त्याचा सन्मान केला असता, पण त्याहीपेक्षा श्रेष्ठ गायक म्हणून तू त्याला लिहिलेस तर त्याला माझे खालील मत कळव. नट प्रत्यक्षपणे आपली भूमिका जगत असल्याचे असे उदात्त प्रात्यक्षिक मी क्वचितच पाहिले असेल. रशियन संगीताच्या काही वैशिष्ट्याबद्दल त्याची जी मते आहेत त्यांच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. चायकॉव्हस्कीचे संगीत अद्याप चालू राहावे हा एक अत्याचार आहे असे मला नेहमीच वाटत असे. ला डेम पिक-सारखे मूर्खपणाचे आणि कृत्रिम दुसरे काही तरी असू शकेल काय ? कदाचित मदाम बटरफ्लाय हे दुसरे उदाहरण असू शकेल की ज्यात एक लठ्ठ अमेरिकन राजनैतिक वकील तार स्वरात गात असतो. विलक्षण हास्यास्पद असे ते दृश्य नाही काय ? पण पौर्वात्य संगीताबद्दलची आपली योजना अमलात आणण्याची रोबसनची इच्छा असेल तर त्याचा रस्ता अनेक पटींनी रशियामधूनच जाईल— निर्भेळ संगीताच्या दृष्टीने सुद्धा. काही अंशी रिम्स्की कोरसॅकॉफ आणि बोरोदिन हे सार्वदेशीय संगीताचे भवितव्य उजळ करण्याच्या त्याच्या मार्गावरील अग्रदूत म्हणता येतील. रिम्स्की कोरसॅकॉफच्या ‘ सॅडको ’ मधील हिंदी गाण्याबद्दल, तसेच बोरोदिनच्या ‘ प्रिन्स इगॉर ’मधील तिसऱ्या अंकाबद्दल त्याला काय वाटते हे माझ्या वतीने त्याला विचार. माझ्या अल्पमतीप्रमाणे आणि आवडीनिवडीनुसार दोन प्रकारच्या संगीताच्या समन्वयातून जे काही प्रगट होऊ शकेल त्याचे ते उत्कृष्ट नमुने आहेत. दुर्दैवाने पौर्वात्य संगीताचे स्वतःचे असे काही तंत्र आहे की, त्यात स्वरमाधुर्य— जतन करण्याजोगे असेल तर ते एवढेच— हे आधुनिक

स्वरमेळाच्या झटापटीत नाहीसेच होते. नीग्रो सुस्वर संगीतात तसे होत नाही. रोबसनला या अडचणीची जाणीव असेल अशी मला आशा आहे.

रिव्हिजन बोर्डाकडून माझी सुटका होण्याच्या शक्यतेबद्दल काहीसा गैरसमज झाला आहे अशी मला भीती वाटते. इंग्लंडमधील वा देशातील मित्र या बाबतीत काहीच करू शकणार नाहीत. त्या दृष्टीने मी काही प्रयत्न करावा म्हणून सुचविले नव्हते. रिव्हिजन बोर्ड ही काही न्यायालयीन संघटना नव्हे. बोर्ड शिफारस करते ती केवळ खात्याकडून आलेल्या सूचनांच्या आधारे. माझा प्रश्न, इतरांच्याप्रमाणेच आरोआप विचारात घेतला जाईल. मी एवढीच सूचना केली होती की, माझी मुदतपूर्व सुटका नोकरशाहीच्या आदेशानुसार व्हावी म्हणून साधारणपणे खटपट केली जावी. सरकार प्रांतिक, हिंदी वा ब्रिटिश ( अप्रत्यक्षपणे )—कोणत्याही कैद्याची, आपल्या इच्छेनुसार सुटका करू शकते. या दृष्टीने जे प्रयत्न करावयाचे ते रीतसर मार्गाने झाले पाहिजेत. मॅक्स्टनने याबाबतीत जी काही पावले टाकावयाला पाहिजेत—त्या विषयी मी काही सूचना केल्या होत्या. लॅन्सबरी आणि क्रिप्स यांनीही इच्छा असली तर त्याला साथ द्यावी. यापेक्षा जास्त काहीच करता येण्यासारखे नाही. प्रीव्हि कौन्सिलकडे अपील करण्याची योजना बारगळल्यामुळे न्यायालयामार्फत आता काहीही होण्यासारखे नाही. तू आता फारशी काळजीही करू नकोस. दैव माझ्या अनुकूल असेल तर काही तरी होईल. नाही तर मला आणखी वर्ष दीड वर्ष कळ सोसावी लागेल. ही कल्पना मोठी उत्तेजनकारक नसली तरी ती तेवढी भयानकही खास नाही.

तुला पुन्हा स्थलांतर करावे लागणार आहे ही बातमी वाचून मला दुःख झाले. तू लिहिल्यानंतर मंत्रिमंडळावर एक नवेच अरिष्ट कोसळलेले दिसत आहे. माझ्याकडे येणाऱ्या बातम्या अगदीच तुटक असल्यामुळे परिस्थितीचा मला अंदाज घेता येत नाही. पण ती अशी आणीबाणीची आहे की, केव्हाही वाटेल ते होईल. म्हणून माझे मत आहे की पितृभूमीला तू भेट द्यावी, या कल्पनेचा गंभीरपणे विचार करण्यासारखा आहे. तुला त्यात विरंगुळा मिळेल आणि पुष्कळसे कामही करता येईल. आपल्या मित्रांच्या परिस्थितीबद्दलही मला फार चिंता वाटत आहे. आयर्लंडपेक्षा जास्त चांगले स्थळ त्यांना मिळाले नसते काय ? उत्तरेकडे का ते जात नाहीत ? पण मी त्यांना काय सल्ला देणार म्हणा ? आपल्या वाटाघाटीतून विशेष काही निर्णायक निघू शकत नाही हे वाईट आहे. तुझ्या गेल्या पत्रातील बातमी वाचून मला बरीच आशा वाटू लागली होती. सर्वसाधारण सभा पुढे ढकलण्यात आली हे मला सुचिन्ह वाटले होते. अद्यापही तसे होऊ शकेल. आपण आशा करीत राहू या.

मी जी योजना तुझ्या विचारासाठी ठेवली होती ती पुस्तकविक्रीच्या दुकानापेक्षा अधिक काहीतरी होती. त्यात खरी कल्पना होती ती प्रकाशनसंस्था उभारण्याची; की जी पुढे एक बौद्धिक केंद्रात परिणत होईल. तिचा हेतू आधुनिक शास्त्रीय साहित्याला

चालना देणे आणि त्या दृष्टीने तरुण बुद्धिवाद्यांना उत्तेजन देणे हा राहील. अर्थात या योजनेत पुस्तकविक्रीच्या दुकानाचा अवश्य समावेश होईल. मी ज्या पुस्तकाची रचना करीत आहे ती या देशातील कोणताही बडा प्रकाशक प्रसिद्ध करणार नाही. राष्ट्रीय प्रकाशक आश्रय देतील तो सवंग घोषवाक्ये, भारताचा जगाला संदेश, आध्यात्मिकतेचे वलय आणि भूतकाळाचा गौरव याबद्दलचे टाळ्या घेणारे जे साहित्य असेल त्याला. यापेक्षा निराळ्या प्रकारच्या साहित्याचा ते स्वीकार करणार नाहीत. त्याच्या उलट परदेशात प्रकाशित झालेल्या पुस्तकाचा या देशात साहजिकच मर्यादित खप होईल. म्हणून या देशात पुरोगामी बौद्धिक आंदोलनाला चालना द्यावयाची असेल तर योग्य असे शास्त्रीय साहित्य निर्माण करण्यासाठी व त्याचा प्रसार करण्यासाठी काहीतरी गंभीर योजना आखलीच पाहिजे. त्यासाठीच एक प्रकाशन संस्था उभारण्याची गरज आहे. ही प्रकाशन संस्था व्यापारी भावाने कार्य करणार नाही आणि राष्ट्रवादी पूर्वग्रह आणि प्रतिगामी विचारसरणी यांच्यापासून ती पूर्णपणे अलिप्त राहील.

उद्याचा दिवस हा आपला सर्वांत दुःखदायक वाढदिवस आहे—चार वर्षांपूर्वी मेरान येथे आपण विलग झालो तो हा दिवस. त्याची करुणास्पद आठवण इतकी ताजी आहे की, तो प्रसंग कालच घडल्यासारखा वाटतो. आपल्या प्रवासाची वाटचाल संपेपर्यंत आणखी किती वर्षे जाणार आहेत कोण जाणे! फार नाहीत अशी आशा आपण करू या.

३९

सेंट्रल प्रिझन, बरेली
डिसेंबर २०, १९३४

आपला पत्रव्यवहार आता पुन्हा सुरळीतपणे चालू झाला आहे. (काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे.) मी वृत्तपत्रात वाचले की नव्या वर्षापासून आठवड्यातून दोन वेळा विमानाने पत्रांची ने–आण सुरू होणार आहे आणि वसंत ऋतूपासून रात्रीची विमान-वाहतूक चालू करण्यात आली तर आपल्यामधील काळाचे अंतर फक्त एक आठवड्यापुरते मर्यादित राहील. काय गंमत आहे पाहा. क्लाइव्हला आपल्या इंग्लंडमधील प्रेयसीकडून पत्र यावयाला एक पूर्ण वर्ष लागले आणि त्याला भेटण्यासाठी तिला तीन महिने प्रवास करावा लागला. आता तू फक्त तीन दिवसांत मला भेटू शकशील. खरोखर विकृत निराशावादी किंवा पराकाष्ठेचा प्रतिगामी असा माणूसच मानवजातीची प्रगती होत आहे ही गोष्ट नाकारू शकेल. प्रगती! पूर्णत्वाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनंत काळपर्यंत मानवजातीची जी वाटचाल चालली आहे तिच्या मार्गावरील! ते पूर्णत्व कधी संपादिलेही जाणार नसेल. पण एवढे खरे की तुरुंग, ॲडॉल्फ, फ्ल्यूचे झटके, डोकेदुखी, हृदयविकार आणि जीवनाच्या यातनांची आणखी सारी जंत्री

विचारात घेऊनही असे कबूल करावेच लागेल की जग ही काही अगदीच वाईट गोष्ट नव्हे.

या क्षणाचे माझे सर्वात मोठे दुःख आहे ते तुझ्या पत्रात सर्वत्र पसरलेल्या प्रश्नांचे निश्चित उत्तर देण्याच्या परिस्थितीत मी नाही हे होय. केव्हा ? मला कोठे टाकणार आहे. खरे सांगावयाचे तर अखेरच्या क्षणापर्यंत मला ते कळणारही नाही. कोण जाणे ! कदाचित मला खरे वाटण्यापूर्वीसुद्धा मी बाहेर पडलेला असेन.

विली हा तुझ्यावर पित्याची मायेची पाखर घालणारा असा देवदूत निघावा याचे मला आश्चर्य वाटते. सध्याचे तुझे जे व्यापारविषयक संबंध प्रस्थापित झाले आहेत, त्यांचा विशेषतः विचार करता तू जर स्थलांतर केलेस तर त्यात फार मोठ्या अडचणी येतील असे मला कधीच वाटले नाही. आपले मित्र तुझ्यामागून तेथे जातील[1] ही अपेक्षा कितीही अनिश्चित असली तरी त्या कल्पनेनेसुद्धा माझे मन भारून गेले आहे. डी व्हॅलेरा यांच्या विमुक्त देशात वास्तव्य करण्याचा पर्याय मला उत्साहावर विरजण घालणाराच वाटतो. विलीच्या पत्नीच्या आदरातिथ्याबद्दल तू लिहिलेस. व्यक्तिशः तुझ्याबरोबर त्या आदरातिथ्याचा स्वीकार करण्यात मला विलक्षण आनंद होईल. आम्ही एकमेकासमोर आल्यानंतर हा मोगल बादशहा कसा वागेल हे जाणून घेण्याचे मला फार कुतूहल आहे. तात्पर्य, अनेक कारणास्तव मुक्ततेनंतरचा सुरुवातीचा काळ युरपच्या भेटीत घालविण्याचा माझा मोह अनावर होऊ लागला आहे आणि अशीही शक्यता आहे की, कदाचित ते करणे मला भागही पडेल.

अर्थात या साऱ्या विवेचनानंतरही, केव्हा ? या प्रश्नाबद्दल तुला बोध झालेला नाहीच. निराशा टाळण्याची हमी म्हणून आपण दीड वर्षानंतरच्या काळावरच आपली दृष्टी केंद्रित करू या. दरम्यान आशा ही आपण जतन करूयाच आणि इंग्लंडातील आपले मित्र या आशेला पालवी फोडण्याच्या दृष्टीने जे काही प्रयत्न करतील त्यांच्याकडे तू लक्ष ठेव. एका अमेरिकन पत्रात ब्रॉकवे यांनी लिहिलेले एक अतिशय समजूतदार पत्र मी नुकतेच वाचले. त्याला यश मिळो हीच सदिच्छा.

माझ्या गेल्या पत्रात मी माझ्या कार्याबद्दल काहीच लिहिले नाही. कारण अलीकडे त्या दृष्टीने फारसे काही होतच नाही. ते पुस्तक आता पुरे होण्याच्या अवस्थेला पोचल्यामुळे त्यासाठी आता एकसारखे आधार बघणे आवश्यक आहे आणि सारे हस्तलिखितही हाताशी पाहिजे आहे. माझ्या सध्याच्या स्थितीत त्या सोयी सवलतींवर बंधने पडणे अपरिहार्य आहे. परंतु अगदी नव्या शास्त्रीय ग्रंथांचा बराचसा चांगला संच मला अभ्यासा-

१. कम्युनिस्टातील विरोधक त्या वेळी अपेक्षा करीत होते की, मॉस्कोतील सातव्या आंतरराष्ट्रीय परिषदेत भाग घेण्यासाठी त्यांना आमंत्रण दिले जाईल. कारण फॅसिझमच्या वाढत्या संकटांचा विचार करता साऱ्या कम्युनिस्टांचे एकीकरण केले पाहिजे अशी त्यांनी सूचना केली होती.

साठी उपलब्ध झाला आहे. तुझ्या व्हिॲनीज मैत्रिणीच्या विद्वान पतीने जे विचार व्यक्त केले आहेत त्यात उत्तर देण्यासारखे विशेष मला काही आढळले नाही. मला अर्थात ते वाचून आनंद झाला आणि त्याला आणखी काही सांगावयाचे असेल तर मी त्याचे स्वागतच करीन. खरे सांगावयाचे तर इतर काही लोकांची मते मला मिळाली तर ती हवीच आहेत. उदाहरणार्थ, आइन्स्टाइनच्या "परिमित परंतु अथांग अवकाशाच्या" सिद्धान्ताचे माझ्या मते जे तात्त्विक परिणाम होतात त्यांच्यावर आईन्स्टाइनने दृष्टी फिरविली तर मला फार आवडेल. माझ्या मते त्या सिद्धान्तामुळे एडिंग्टन म्हणतो त्याप्रमाणे, "अपरिमितता नष्ट होत नाही", उलट वैचारिक इतिहासात प्रथमच अपरिमिततेच्या परंपरागत कल्पनेला काही अर्थ प्राप्त झाला आहे. मी या निष्कर्षाला आलो आहे तो केवळ तात्त्विक अंदाजाच्या आधारेच नव्हे; तर गणिती सिद्धांताच्या भौतिक आशयाची चिकित्सा केल्यानंतरच माझे हे ठाम मत बनले आहे. इतरही असे काही मुद्दे आहेत की ज्यांच्या बाबतीत मला अखेरीस या श्रेष्ठतम पंडिताचा सल्ला घ्यावा लागेल. मी श्रेष्ठतम पंडित मात्र अशा लोकांना म्हणतो की जे त्यांच्या सिद्धान्तावरील टीकेतूनच तावून सुलाखून निघाले आहेत.

माझ्या प्रकृतीबद्दल विशेष असे लिहिण्यासारखे काही नाही. अल्मोड्याला जी सुधारणा झाली होती ती टिकू शकली नाही. माझे वजन पुन्हा घटू लागले आहे; छातीतील दुखणे काही वेळी असह्य होते. मला सध्या हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे——रोगी म्हणून नव्हे. पण सुपरिटेंडेंटच्या देखरेखीखाली माझी पाहणी व्हावी म्हणून. मला आता पुरेसे जादा अन्नही मिळते. म्हणून मुदतपूर्व मुक्तता होण्याची आशा फलद्रूप झाली तर माझी पूर्वीची सुदृढ प्रकृती पुनः पूर्वपदावर येण्याच्या दृष्टीने काही अवधी राहिला असतानाच मी बाहेर पडल्यासारखे होईल.

संकल्पित प्रकाशन-संस्थेच्या कार्यक्रमात आधुनिक ललित साहित्याचाही समावेश झाला पाहिजे. नव्या कल्पनांचा प्रसार करण्याच्या दृष्टीने ते अधिक परिणामकारक ठरेल. त्या दृष्टीने जी काही प्राथमिक व्यवस्था करावयाची असेल ती जरूर कर. म्हणजे आपल्या विचारांशी सुसंगत अशा आधुनिक कादंबऱ्यांच्या हिंदी आवृत्त्यांसाठी हक्क प्राप्त करून घेणे वगैरे. मालरॉच्या पुस्तकाबद्दल मी तुला आधीच एकदा लिहिले होते. ते फार चांगले आहे. आता मात्र त्यावर मी विस्तृत मत देऊ शकणार नाही. दुसरे पुस्तक, 'व्होयाज ऑबाऊत द ला नुइत' भयानक आहे; किळसवाणे आहे. काही काळ हलकेफुलके साहित्य मी वाचलेलेच नाही. चांगल्या काही कादंबऱ्या तुला पाठविता आल्यास पाहा.

एका चतकोराच्या मर्यादेत तुझ्या पत्राला उत्तर देणे कठीण असते. मग बऱ्याचशा गोष्टी लिहावयाच्या राहून जातात आणि दुसरी संधी येण्यापूर्वी नवीन गोष्टींचा परामर्श घ्यावा लागतो. म्हणून साचलेल्या गोष्टींचा भारा प्रतिदिनी वाढतच चालला आहे. कधी काळी निर्बंधमुक्त जेव्हा आपण होऊ तेव्हाच या साठवणी रित्या होतील.

४० सेंट्रल प्रिझन, बरेली
जानेवारी २०, १९३५

नव वर्ष सुखाचे जावो, आपणा सर्वांना ! ही सदिच्छा तुझ्याकडे पाठविण्यासाठीच मी इतके दिवस थांबलो असे समजू नकोस. क्षण आला, मी व्यक्त केली. त्या क्षणी मला वाटले की सहसंवेदनेला भौतिक अस्तित्वाचा काही पाया असता तर किती चांगले झाले असते.

पुस्तके आली; पण ती अद्याप मी पाहिली नाहीत. किंवा ती कोणती आहेत याचाही मला पत्ता नाही. जर्मन भाषेत असल्यामुळे त्यांच्यावर सेन्सॉरचे संस्कार झाले पाहिजेत. ती मला खात्रीने आवडतील. अलीकडे मी जरा थकलो आहे— मानसिक दृष्ट्या काही नवीन शास्त्रीय ग्रंथ वाचल्याशिवाय मी फारसे गंभीर कामही केले नाही. ऑगस्टला विचारशील का, की, हान्स रायशेनबाक हे काय प्रकरण आहे ? बर्लिन विद्यापीठात तो नॅचरल फिलॉसफीचा प्राध्यापक आहे. त्याने काही अजीबच भूमिका घेतली आहे. तथापि त्याला जे काही सांगायचे आहे त्यात चाणाक्षपणाचा अंश आहे. पदार्थविज्ञान शास्त्रज्ञांचा आणि निसर्गतत्त्वज्ञांचा एक गट अलीकडे उदयास आलेला दिसत आहे. हा गट जीन्स, एडिंग्टन गटाच्या गूढवादी अध्यात्मावर कठोर टीका करतो आणि त्यासाठी निश्चितपणे प्रत्यक्ष ज्ञानवाद झुगारुन देतो. ( आणि परिणामतः बर्कले पुरस्कृत कल्पनावाद ) पण त्यानंतर मात्र तो गट अर्ध्या मार्गावर थांबतो आणि शहामृगाप्रमाणे डोके खुपसून बसण्याचा खेळ खेळतो. ते स्वतःला ‘ चिकित्सक वस्तुवादी ’ किंवा ‘ भौतिक वस्तुवादी ’ म्हणवून घेतात. रायशेनबाक पहिल्या गटात मोडतो असे दिसते. दुसऱ्या गटाचा अत्यंत तेजस्वी प्रतिनिधी म्हणजे रॉय डब्ल्यू सेलर्स हा होय. अमेरिकेतील विस्कॉन्सिन विद्यापीठात तो तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक आहे. या सर्व लोकांच्या विचारांचा आपण परामर्श घेतला पाहिजे. माझ्या पुस्तकात मी त्यांच्या विचारांची चिकित्सा करू शकणार नाही. ते पुस्तक आधीच अवजड झाले आहे. पण सेलर्स आणि रायशेन बाक यांना काही खडे सवाल टाकून त्यांना तोंड देणे किती तरी उपयुक्त होईल.

त्यावरुन मला एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीची आठवण झाली. अमेरिकन मासिकात मी असे वाचले की आईन्स्टाइनने एक पुस्तक लिहिले आहे. ‘ द वर्ल्ड ॲज आय सी इट ’ असे त्याचे नाव आहे. मासिकातील अभिप्रायावरुन ते खरोखरी पुस्तक नाहीच. पण पत्रे, भाषणे, शास्त्रीय लेख वगैरेंचा तो एक संग्रह आहे. आइन्स्टाइनच्या दृष्टीतून जग कसे दिसते हे जाणून घेण्याचे मला साहजिकच कुतूहल आहे. माझ्या या कुतूहलात तीव्रता निर्माण झाली आहे; याचे कारण असे आहे की गेली दोन वर्षे मी एकाच प्रश्नाचे उत्तर शोधण्यात गर्क झालो होतो.सापेक्षतावादाच्या सिद्धान्तानुसार खरोखर

जग तरी कसे आहे? एका अभिप्राय लेखकाने पुस्तकातील जो एक परिच्छेद उद्धृत केला आहे त्यामुळे माझे कुतूहल अधिकच वाढले आहे. माझ्या पुस्तकात मला त्याचा उपयोग करावयाचा आहे. पण आइनस्टाइन खरोखरच कोणत्या अर्थाने तसे लिहीत आहे हे कळल्याशिवाय मी तो करणार नाही. या मुद्यावर त्याच्याकडून समजावून घेण्याची माझी इच्छा आहे. उद्धृत केलेला परिच्छेद असा आहे—"माझी धार्मिक भावना निसर्गनियमामध्ये जो सुसंवाद दिसून येतो त्याबद्दलच्या उचंबळून येणाऱ्या अपार आश्चर्याचा आधार घेते. आणि त्या वेळी मला ही जाणीव होते की, निसर्गनियमात जे बुद्धिचातुर्य प्रकट होते ते इतक्या श्रेष्ठ दर्जाचे असते की, त्याच्याशी तुलना करता मानवाने जो काही सारा नियोजनपूर्वक विचार वा कृती केली असेल ती अगदीच सामान्य दर्जाची ठरते." ही भावना म्हणजे जीन्सचा 'गणिती परमेश्वर' किंवा लाप्लेसचा 'जागतिक भावात्मा' यांना पाठिंबा देणारा विचार आहे असे कोणी म्हटले तर त्यात काय वावगे ठरेल?

आपल्या मित्रांनी ज्या वाटाघाटी सुरू केल्या आहेत त्यातून काय निष्पन्न होण्याची शक्यता दिसत आहे याचा तू पत्रात स्पष्ट उल्लेख केलेला नाहीस. पण माझा असा समज आहे की, ते कार्य सावकाशपणे पण आशादायक रीतीने प्रगती करीत आहे. आपल्या मित्रांनी आयर्लंडला जाण्याचा विचित्र विचार सोडून दिला ही आनंदाची गोष्ट आहे. सर्व दृष्टींनी स्कँडेनेव्हिया हे सोयीस्कर स्थळ आहे. स्वीडिश मित्रांचे अखेरीस काय घडले ते मला माहीत नाही. ते आपल्याला कायमचे पारखे झाले आहेत काय? पण माझ्या मते वाटाघाटीचा काहीतरी निश्चित निर्णय होईपर्यंत सध्याच्याच जागी पाय रोवून बसणे अधिक चांगले.

ग्रिशाच्या[1] भवितव्याबद्दलच्या काही वार्ता मी वर्तमानपत्रांतून वाचल्या. पण त्या हंगेरियन माणसाबद्दल काही कळले नाही. त्याने तर पूर्णपणे अलिप्त राहावयाला पाहिजे होते. खरे सांगावयाचे तर त्याने सफाईने अडचणी बाजूला करावयाला हव्या होत्या. ते काही असो, मला त्याच्याबद्दल अश्रू ढाळण्याचे कारण नाही. त्याच्या आणि माझ्या ऋणानुबंधात मला आठवते ती, तो तयार करीत असलेली अप्रतीम कॉफी आणि त्याची पत्नी ही फार चांगली आहे. त्याचा पूर्वीचा जो प्रमुख होता त्याच्या 'ऐसपैस' अर्धांगीच्या अगदी उलट. त्याच्या पूर्वीच्या प्रमुखाला म्हणे उच्चासनावर अगदीच किरकोळ स्थान देण्यात आले आहे. मला वाईट वाटते ते सॅफरॉन्हबद्दल. तो अती निष्ठावान होता, आणि आम्ही खरोखरच मित्र होतो. 'ENDE DES HEREN ROY, रॉय महाशयांची अखेर अशी तुतारी फुंकण्याची त्याच्यावर वेळ यावी हा त्याचा दैव-दुर्विलास होय. तथापि सर्व अतिनिष्ठावान माणसांप्रमाणे तो नेहमीच काहीसा उन्मादाच्या आहारी गेलेला असे. ग्रिशा आणि त्याच्यासारखे लोक यांच्याबद्दल काय म्हणू? मला

१ झिनोव्हीव्हला फाशी दिल्याची वदंता आहे.

ते समजतच नाहीत. त्यांना या सत्याचा साक्षात्कार का होत नाही ? की आपण आता मागे पडलो. जगाला आता त्यांची गरज राहिलेली नाही. आपले उरलेले जीवन, आपण जे काही खरोखरच कर्तृत्व दाखविले त्याबद्दलच्या न्याय्य समाधानात जर त्यांनी घालविले तर त्यांच्याही दृष्टीने ते कितीतरी आनंददायक होईल नाही ? त्यानंतर अशा कितीतरी गोष्टी आहेत की ज्यात बुद्धिमान आणि सुसंस्कृत व्यक्तींना लक्ष घालता येईल. त्यांच्या जागी मी असतो तर ? तर उदाहरणार्थ, खालील अनेक प्रश्नांपैकी एखाद्या प्रश्नाचा शोध घेणे मला केवढे तरी उत्साहदायक वाटले असते. हिंदू गाईची पूजा आणि मांजराचा द्वेष का करतात ? $\sqrt{1^2}$ आणि जोहोवा यांच्यामधील संबंध कोणता ? मंगोलियन लोकांचे चेहरे बसके का ?

४१

सेंट्रल प्रिझन, बरेली
फेब्रुवारी १९, १९३५

तुझे पत्र आले आहे. पण दुर्दैवाने ते माझ्या हाती येण्यापूर्वी बरेच दिवस उलटावे लागतील. ते पोलिसांकडे सेन्सॉर होण्यासाठी गेले आहे. यापुढे माझा पत्रव्यवहार, उभय पक्षी, या यंत्रणेतून बाहेर पडावा लागेल. ठीक आहे. उंटाची पाठ मोडणारी ही शेवटची काडी न ठरो म्हणजे झाले.

( मजकूर खोडला आहे ) रिव्हिजन बोर्डाच्या पाहणीतून काही निष्पन्न झाले नाही आणि प्रांतिक सरकारने माझी मुदतपूर्व सुटका करावयाला नकार दिला आहे. ( मजकूर खोडण्यात आला आहे ) वाईटात वाईट सहन करण्याची आपण तयारी करू या. अद्याप पुरी दोन वर्षेसुद्धा काढावी लागतील. या पत्रात वाईट बातम्याच सांगावयाच्या आहेत. आणखी एक ऐक. तू जे जर्मन साहित्य पाठविलेस ते मला मिळणार नाही. का ? कोण जाणे ! ती सारी पुस्तके तुझ्याकडे परत पाठविण्यात आली आहेत.[1] अर्थात माझी दारुण निराशा झाली आहे. काही काळ ललित साहित्य मला मिळाले नाही. थोडासा विरंगुळा म्हणून मला ते हवे होते. तुझ्या पुस्तकात काही चांगल्या कादंबऱ्या असतीलच. दुर्दैव; पण त्याच्या पुढे मान वाकविलीच पाहिजे.

प्रवासाहून—हॉस्पिटलच्या—मी परतलो आहे, आपल्या जुन्या घरी. हिवाळा

१. जी जर्मन पुस्तके परत पाठविण्यात आली त्या बहुशः कादंबऱ्या होत्या. या कादंबऱ्यांचे लेखक टॉमस मान, हाइनरिक मान, लायन फ्यूइटवांगेर आणि त्याच्यासारखेच नामवंत कादंबरीकार होते. हिटलरविरोधी असे काही साहित्यही त्यात होते.

संपला आहे. काही धुक्यांचे दिवस आणि नेहमीपेक्षा अधिक पाऊस सोडला तर हिवाळा तेवढा कडक नव्हता. त्यामुळे मला जादा यातना झाल्या नाहीत. सुखदायक सहवास म्हणजे काय हे जवळजवळ मी विसरून गेलो आहे. मी अधिकच एकलकोंडा आणि माणूसघाणा होऊन बाहेर पडेन. माझा विश्वास होता की स्तब्धता ही सोन्यासारखी अनमोल आहे. यापुढे ती हिऱ्यांप्रमाणे माझ्या अंगावर चमकू लागेल. पण पूर्वी जसे नियमांना अपवाद होते तसेच आताही राहतील. नियम मोडण्यातही आनंद असतो. मी जेव्हा शाळकरी विद्यार्थ्यांप्रमाणे बोललो आणि मूर्खासारखा हसलो तेव्हा माझ्या आनंदाला पारावार नव्हता. पुनः ते करताना मला लाज वाटणार नाही आणि खंतही वाटणार नाही. या वेळी जेव्हा तो दिवस उगवेल तेव्हा मी अगदी सूड घेण्यासाठीच असा वागेन.

अलीकडे काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. पण त्यांच्याबद्दल विशेष चिंता करू नकोस. बरेचसे साहित्य माझ्या हाती आहे आणि आणखी एक गठ्ठा एस्. कडे पडून आहे— गेल्या उन्हाळ्यात न्यूयॉर्कहून पाठविण्यात आलेली पुस्तके. या पुस्तकांचे काय झाले कोण जाणे! ( काही मजकूर खोडून टाकण्यात आला आहे. )

माझ्या कार्याबद्दल तुला काही अहवाल हवा असेल, नाही का? अलीकडे फारसे काही झाले नाही. मी थोडासा अस्वस्थ झालो आहे— मानसिक दृष्ट्या. म्हणूनच ललित साहित्याची ओढ. तथापि मी निवांतपणे सापेक्षतावादाच्या सिद्धान्ताचे तात्त्विक परिणाम यावर काम करीत आहे. एका विशिष्ट मुद्द्यावर आइन्स्टाइनने आपल्या मतांचे स्वच्छ दिग्दर्शन करावे म्हणून त्याला पत्र लिहावयास मी तुला सांगितले होते. त्याच्या व्यक्तिगत दृष्टिकोणाबद्दल मला तशी फार आस्था आहे असे नव्हे. कारण तो भावनात्मक दृष्टीने दिला जाणे शक्य आहे.

तथापि त्याला महत्त्व हे आहेच. पण काही झाले तरी भौतिक सिद्धान्तापासून जे तात्त्विक निदान प्रगट होईल त्यावर या दृष्टिकोणाचा प्रभाव पडण्यासारखा नाही. अडचण आहे ती युनायटेड फील्ड थिअरी अद्याप अपुरीच राहिलेली आहे. तिचा आविष्कार— सर्वस्पर्शी फील्ड लॉबद्दलचे अखेरचे स्पष्टीकरण— हा सापेक्षतावादी भौतिकतेच्या एकंदर पद्धतीतून जे तात्त्विक परिणाम दृग्गोचर होतात ते प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. पण अगदी अलीकडील प्रगतीबद्दलचे ज्ञान माझ्या आवाक्या बाहेरचे आहे.

या विषयावरील साधनसामुग्रीची आणखी पाहणी केल्यानंतर मला कळून आले आहे की, माझ्या पुस्तकाची रचना काही प्रमाणात बदलणे आवश्यक आहे. प्रथमतः तात्त्विक परिणामांचा विषय एकाच प्रकरणात पुरा करण्याची माझी योजना होती; ती योजना मी आता बदलली आहे. त्या मुद्द्यावर जे साहित्य उपलब्ध झालेले आहे त्यावरुन एक सारा विभाग त्या मथळ्याखाली द्यावा आणि चार प्रकरणांत त्याची

विभागणी करावी असे मी ठरविले आहे. या चार प्रकरणांची नावे मी पुढीलप्रमाणे दिली आहेत. : (१) ॲपिअरन्स ॲण्ड रिॲलिटी (प्रॉब्लेम ऑफ परसेप्शन) (२) आयडियालिझम् ऑर मटेरियालिझम (३) एव्हिडन्स ऑफ बायॉलॉजी आणि (४) एव्हिडन्स ऑफ सायकॉलॉजी.

तुला ऐकून मौज वाटेल की, अलीकडे मी मनोविश्लेषण शास्त्रात बऱ्याच आस्थेने लक्ष घालू लागलो आहे. आणि मला असे वाटते की, फ्रॉइड, ॲड्लर आणि युंग यांचा एकत्रित विचार केल्यानंतर त्यांना अशा एका पद्धतीत बसविता येईल की जी वडील=घोडा अशा अतिरेकी सूत्रापेक्षा अधिक अर्थवाही राहील. तथापि वर्तनवाद आणि मनोविश्लेषण यांनी आधुनिक मानसशास्त्रावर तेच दोषारोप ओढवून आणले आहेत की, जे ब्यूकनेर, व्होट यांच्याकडून प्रतिनिधित्व केल्या जाणाऱ्या पदार्थविज्ञानशास्त्रावर केले जात होते. खरोखर एकोणिसाव्या शतकातील यांत्रिक जडवाद्यांनी जी पापे केली त्याची फळे आपण अद्याप भोगीत आहोत. आजच्या गूढवादी आध्यात्मिक पद्धतीचा पाया, एकोणिसाव्या शतकात रुढ असलेले खोटे नाणे आणि आजचे खरे नाणे यांमधील गोंधळावर उभारलेला आहे. हा गोंधळ दूर करणे हे महत्त्वाचे काम आहे. ते करण्यात मी कितपत यशस्वी होईन कोण जाणे!

आता मला थांबलेच पाहिजे — सक्तीने. मॅसीडोनियाच्या फिलिपच्या अस्वस्थ पुत्राने ज्याप्रमाणे आणखी देश जिंकावयाला नाहीत म्हणून नाइलाजाने आपली रक्तरंजित तलवार म्यान केली त्याचप्रमाणे पांढऱ्यावर काळे करण्याला कागद नाही म्हणून मला माझे पेन खाली ठेवले पाहिजे.

## ४२

सेंट्रल प्रिझन, बरेली
मार्च १५, १९३५

एखाद्या सुखद स्वप्नाचा जागृतीने भंग होणे ही एक दारुण निराशा देणारी घटना होय. पण जीवन हे जर एक अखंडित सुखद स्वप्न झाले तर ते निश्चित कंटाळवाणे होईल. आनंदाचा आस्वाद घेण्यासाठी दुःखाची झळही सहन केलीच पाहिजे. परपीडनात काहीसा आनंद मानण्यासारखे हे वाटेल. पण मी काय म्हणतो ते तुला तरी खास पटेल. काही झाले तरी या करंट्या चतकोरामुळे विस्तृत असे अंदाज लिहिण्याला माझे मनच घेत नाही.

मागचे पत्र लिहिल्यानंतर निदान माझ्यापुरता तरी भवितव्याच्या दृष्टीने काहीच फरक झालेला नाही. सध्याच्याच परिस्थितीत आणखी दोन वर्षे काढण्याचे भवितव्य माझ्यासमोर उभे राहिले आहे. ते कितीही अनिष्ट वाटो. पण त्यासाठी माझ्या मनाची

तयारी झाली आहे. खरे सांगावयाचे तर साडेतीन वर्षांचे तुरुंगातील वास्तव्य भरपूर झाले असते. पण मनुष्य योजतो एक, परमेश्वराची इच्छा निराळीच असते. तथापि भवितव्याच्या या काळ्याकुट्ट ढगाला थोडीशी चंदेरी झालर आहे खरी. बहुधा उन्हाळ्यापुरता मी येथे राहणार नाही. तो सुरू झालाच आहे. पण, गेल्या वर्षीप्रमाणे मला इतरत्र पाठविले जाईल. कोठे ? ते अज्ञात आहे. मी तेथे पोचल्यानंतरच मल कळेल. गेल्या वर्षीच्याच जागी मला नेले तर मला ते फार आवडेल. तिथे मला किती तरी बरे वाटेल. ( मजकूर खोडण्यात आला आहे. ) काही अंदाज मला करता येतात. पण ते फारसे सांत्वन करणारे नाहीत.[1] पण तू घाबरून जाऊ नकोस. हवापालट माझ्या दृष्टीने चांगला ठरेल यात शंका नाही. अर्थात् दोन वर्षे याच पद्धतीने काढावी लागली तर त्यांचा अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे—कायम स्वरूपाचा. तसे घडले तर मात्र सुटका झाल्याबरोबर मला तज्ज्ञ वैद्यकीय उपचार करून घेण्यासाठी युरपला जावे लागेल. एका दृष्टीने ते चांगलेच होईल. बरीच वर्षे या प्रकारचे जीवन कंठल्यावर सुसंस्कृत अस्तित्वाचे काही महिने जितके स्वागतार्ह तितकेच उपयुक्तही ठरतील. खरोखर, खरे जीवन जगू लागल्यापासून ज्या प्रकारच्या शारीरिक, बौद्धिक आणि सामाजिक वातावरणाशी मी समरस झालो त्याची मला ओढ लागली आहे. जीवनासाठी आवश्यक असलेल्या दैनंदिन गरजांच्या दृष्टीने शारीरिक कष्ट झाले तर ते कसेतरी आपण सहन करू शकतो. पण विचित्र असे बौद्धिक आणि सांस्कृतिक वातावरण उभोवार असले तर मात्र अत्यंत तापदायक होते. विशेषतः माझ्यासारख्या व्यक्तीला जो ' आल्हाददायक एकलकोंडेपणा ' प्रिय असतो तो सुद्धा पारखा झाला तर माझ्या यातना किती पटींनी वाढत असतील याची तूच कल्पना कर. अर्थात हा एकलकोंडेपणा काही अंशी अमूर्तपणेही पाळता येतो. उदाहरणार्थ, एखाद्या दिवाणखान्यात भोजनानंतरची चर्पटपंजरी ऐकत आपण बसलेलो असलो तरी मानसिक दृष्टीने आपण दूर राहू शकतो—आपल्याच तंद्रीत मग्न. पण ते शक्य होते कारण हे दिव्य मर्यादित काळाचेच असते—शिकस्त म्हणजे काही तासांचे. तुम्ही आपल्या विश्वात पुनः रममाण होऊ शकता.

जर्मन पुस्तके तुझ्याकडे परत आली का ? विनाकारण हा सारा ताप. तू उल्लेख केलेली इंग्रजी पुस्तकेही आली नाहीत. यापुढे जास्त परदेशी भाषांतील साहित्य पाठवू नकोस. ब्रिटिश माल खरेदी कर. किंवा ॲटलांटिक महासागराच्या पलीकडील भावंडाला आश्रय दे. शास्त्रीय साहित्याच्या बाबतीत मला आणखी काही नवीन पुस्तके हवी आहेत. उदाहरणार्थ, सी. जी. डार्विनचे न्यू कन्सेप्शन ऑफ मॅटर, ई. एन. दा, सी आंद्रेदचे मेकॅनिझम् ऑफ नेचर, अलेक्झांडरचे स्पेस टाईम ॲण्ड डीटी, जीन्सचे नवे

१ मला अल्मोड्याच्या तुरुंगात पाठविण्यात आले नाही. कारण पंडित जवाहरलाल नेहरू तेथे होते.

पुस्तक, व्ही. एफ्. कॅल्व्हर्टनचे द पासिंग ऑफ द गॉड्स् आणि लुई मंफर्डचे टेक्निक ॲण्ड सिव्हिलिझेशन.

आपला आनंदाचा दिवस, आपण नितांत आशेने पाहात होतो तितका तो जवळ नाही हे पाहून तुझी घोर निराशा तर झाली नाही ना? फारसा आशावाद ठेवण्यात अर्थच नव्हता. पण कोणत्या दिवशी काय घडेल हे कोणालाच सांगता येणार नाही. भाबडी आशा नाही; पण अगदी अटळ पूर्वनियोजित असे काही नसते. जीवन हे अनेक आश्चर्यांनी भरलेले असते.

४३

सेंट्रल प्रिझन, बरेली
एप्रिल २४, १९३५

मी अद्याप पूर्वीच्याच ठिकाणी आहे. पण पुढच्या महिन्यात मला दुसरीकडे नेण्यात येईल अशी अपेक्षा आहे. माझे पुढील पत्र बहुधा त्या ठिकाणाहून येईल आणि मग तुला ते कोणते हे कळेल. होय, येथे कडक उन्हाळा सुरू झाला आहे. तू महिन्याची रजा घेण्याचे ठरविले आहेस, हे ऐकून आनंद वाटला. उन्हाळ्यात दक्षिणेकडे जाण्यात अर्थ नसतो. तेथे या वेळी गर्दी होते ती निरुद्योगी धनिकांची, जे शारीरिक श्रमासाठी नव्हे तर कॅसिनोमध्ये जाऊन यथेच्छ मद्यपान करण्यासाठी तेथे जातात. ब्रिटनीमध्ये तुला समुद्रकिनाऱ्याजवळ एखादे निवान्त विश्रामस्थान मिळेल. त्या किनाऱ्याच्या रौद्रगंभीर सौंदर्याबद्दल मी पुष्कळ ऐकलेले आहे, ते पाहिलेले मात्र नाही. व्हिक्टर ह्यूगोच्या "टॉयलर्स ऑफ द सी' मध्ये त्याचे हृदयस्पर्शी वर्णन आहे. दिएपे किंवा ड्यूव्हील यांची तू निवड करणार नाहीस असे मला वाटते. कृपा करून करू नकोस. तेथे तुला मुळीच विश्रांती मिळणार नाही. माझी उन्हाळ्याची सुटी गेल्या वर्षाप्रमाणेच सुखदायक ठरेल अशी मला आशा आहे. मला त्याची गरज आहे. आणखी दोन वर्षांसाठी मला जय्यत तयारी ठेवलीच पाहिजे.

आणखी दोन वर्षे अशीच काढावी लागतील या कल्पनेनेच आपण आता जगले पाहिजे. कदाचित् त्याहीपेक्षा कमी काळ काढावा लागेल, कोणी सांगावे. सर्वसाधारणपणे, म्हणजे मी साधा गुन्हेगार असतो तर, शिकरत म्हणजे चार साडेचार वर्षे तुरुंगात काढल्यानंतर मी मोकळा झालो असतो. पण माझ्या बाबतीत सहा वर्षे खणखणून मोजून घेतली जातील. आहे हे असे आहे. पुनःपुन्हा निराशा करून घेण्यात अर्थ नाही. भवितव्याचे हे दर्शन काही सुखद नव्हे. मन विषण्ण करणारेच आहे. पण खोट्या आशेच्या मागे लागण्यापेक्षा वाईटातील वाईटासाठी मनाची तयारी करणे बरे. तथापि मला शक्य तेवढ्या लवकर बाहेर काढण्यासाठी इंग्लंडमधील मित्रांनी मात्र आपल्या

प्रयत्नात ढिलाई करू नये. सांगावयाला मला लाज वाटते, पण मला अगदी वीट आला आहे. अशा प्रकारच्या जीवनात चार वर्षे कंठणे हे असह्य आहे. ते आणखी दोन वर्षे टिकणार ही कल्पना मन विषण्ण करणारी आहे.

डचमन बरोबर झालेली तुझी गेल्या खेपेची बैठक ही पूर्वीच्या अनुभवाइतकी प्रसन्न झाली नाही असे दिसते. काही बाबतीत तो अगदी कंटाळवाणा असतो याची मला कल्पना आहे. पण त्याचे हृदय निर्मळ सुवर्णाचे आहे— व्यक्तिगत संबंधाच्या बाबतीत. व्यक्तिगत मित्र म्हणून मी त्याला फार मानतो. म्हणजे व्यक्तिगत मैत्री इतर संबंधापासून अलिप्त करता येईल तेवढ्यापुरते. अलीकडे तू आपल्या मित्रांबद्दल, विशेषतः हाइन्झ आणि ऑगस्टबद्दल फारच थोडे लिहिले आहेस. तुझी आणि त्यांची वारंवार भेट होत नाही की काय ? त्यांच्याबद्दल ऐकण्यासाठी मी अती उत्सुक असतो. इतर घडामोडींच्या गर्दीत ते मला विसरले तर नाहीत ना ? त्यांच्याशी संबंधित असलेल्या प्रश्नांबद्दल मला फार आस्था आहे. अर्थात ते सांगण्याचीही गरज नाही. वाटाघाटी इतक्या मंदगतीने चालाव्यात हे दुर्दैव आहे. घाई करण्याची तशी खूपच निकड आहे. मी काय नुसती इच्छा आणि आशा प्रगट करणार. इतके असहाय्य व्हावे लागावे हे किती अस्वस्थ करणारे आहे नाही का ?

स्ट्रेसा परिषद आणि लीग ऑफ नेशन्स कौन्सिलची असाधारण सभा यांनी युरपवर जे युद्धाचे काळेकुट्ट ढग संकटाची सावली टाकीत उभे होते त्यांना पांगवले आहे. जबाबदारीची किमान जाणीव असलेल्या व्यक्तींची कोणतीही राजवट या दिवसांत सशस्त्र संघर्षाला चालना देण्याचा विचार करू शकणार नाही. युद्धाचा धोका —जो आज तीव्रतेने भासत आहे आणि प्रतिदिनी वाढत आहे— टाळण्याची तीच एक निर्णायक हमी आहे. जग आज तोल सुटलेल्या अवस्थेत स्वतःला कसेबसे सावरून धरण्याचा प्रयत्न करीत आहे. एखाद्या धक्क्यानेसुद्धा तो समतोल नाहीसा होऊन जग विनाशाच्या खाईत केव्हा कोसळून पडेल याचा नेम नाही. पण लीगच्या जीवनात अगदी पहिल्याच खेपेला ते परिणामकारक ठरताना दिसत आहे. असाधारण सभेचा ठराव प्रभाव टाकणारा आहे. वेड्यापिशा झालेल्या मदोन्मत्तांना त्यातून दहशत बसेल, हीसुद्धा काही लहान गोष्ट नव्हे.

जॅकसची भेट घेणे तुला जमले नाही का ? इतके दुर्मिळ त्याने स्वतःला का करून घ्यावे ? एकट्याच्या बळावर आपल्याला उभे राहता येईल आणि स्वतःचे राज्य स्थापून सम्राट जोन्सप्रमाणे त्यावर आधिपत्य गाजविता येईल अशी का त्याची समजत आहे ? आपल्या मित्रांशी त्याचे संबंध कसे आहेत हे जाणून घ्यायला मी उत्सुक आहे. पण तू त्याची भेट घ्यावीस असे मला वाटत होते ते यासाठी की, तो तुझा चांगला व्यक्तिगत मित्र झाला असता अशी माझी श्रद्धा आहे. अखेरीस पॅरिसचे ते अपत्य आहे ना ? तथापि माझ्याकडून आलेला संदेश पोचविण्यासाठी तुला त्याची भेट हवी

आहे हे कळल्यानंतरही जर तो तुझी भेट घ्यायला चुकला असेल तर मात्र त्याच्या-बद्दलचा माझा सारा उत्साह गळून गेल्याशिवाय राहणार नाही. तो असा वागेल अशी मला कल्पनाही करता येत नाही. पण कोणी सांगावे ? हे विचित्र जग आहे—अनेक आश्चर्यांनी भरलेले.

४४

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
मे २०, १९३५

हा पाहा, एका नव्या स्थळी या वर्षी मी येऊन पोहोचलो आहे. आठवड्यापूर्वीच मी येथे आलो. हे ठिकाण अलमोड्याइतके चांगले नाही. समुद्रसपाटीपासून ते २५०० फूट उंचीवर आहे. भव्य हिमाचलाच्या पायथ्यापाशीच्या एका लहानशा उंचवट्यावर. साहजिकच ते अलमोड्यापेक्षा उष्ण आहे. पण बरेलीच्या मानाने ही सुधारणा खास आहे. एकंदरीने या वर्षीचा उन्हाळा अधिक कडक होईल अशी दुश्चिन्हे दिसत आहेत. पण महिन्याभरात या भागात पाऊस पडू लागेल आणि हवा थंड होईल. सध्या मात्र बरेच उष्ण आहे. या वर्षी हिमालयावरील देवदेवतांच्या मर्जीतून मी उतरलेला दिसत आहे. त्यांच्या परंधामाजवळसुद्धा ते मला फिरकू देत नाहीत. मर्त्य मानवाला देवेच्छे-पुढे मान वाकविलीच पाहिजे. या ठिकाणाबद्दल मी फारसे काहीच लिहू शकत नाही. कितीक युगांपूर्वी मी येथे आलो होतो—परदेशी जाण्यापूर्वी. त्यानंतर या देशात साऱ्याच गोष्टी अनेक परींनी बदलल्या. हे ठिकाणसुद्धा आता बरेच आधुनिक झाले आहे आणि त्याला महत्त्वही येत चालले आहे. येथील तुरुंग मात्र फार लहान आहे आणि त्या मानाने माझ्या वास्तव्याची जागा मी एकटाच एका लहानशा खोलीत राहत आहे. आणि माझी खोली तरी कशी ? चार भिंतींनी वेढलेली एक पेटी. त्या भिंतीवरून बाहेरच्या उंच झाडांचे शेंडे मला दिसतात. शेजारच्या पर्वतरांगांची मी कल्पना तेवढी करू शकतो. त्यांचे दर्शनसुद्धा मला दुर्मिळ आहे. केवढे दुर्दैव आहे नाही ? गेल्या वर्षी इतके वाईट नव्हते. पण दुःखात सुख असे की, मी आता एकटा आहे. गेल्या तीन वर्षांच्या किंवा अधिक काळात माझ्या जीवनात विष कालविणाऱ्या अभद्र सोबत्यांपासून मी आता मुक्त झालो आहे. यापुढे मी, माझी पुस्तके आणि माझे विचार यांतच मस्त राहीन. कोणीही माझ्या समाधीचा भंग करू शकणार नाही. खरोखर त्याचाच मला आनंद झाला आहे.

यापुढे आपल्या पत्रव्यवहाराला उलटसुलट मार्ग आक्रमावा लागेल. तुझी पत्रे इथे आली की, त्यांना पोलिसांकडून पाहणी करून घेण्यासाठी पूर्वेकडे शेकडो मैल प्रवास करून मग पुन्हा येथे परतावे लागेल. त्या प्रवासाला काही दिवस हे लागतीलच. माझ्या

पत्रांना सुद्धा प्रथम उलटा प्रवास करावा लागेल. आपला मर्यादित पत्रव्यवहार तरी उलटसुलट पोस्टाने येत असे पण तेवढे समाधानसुद्धा हिरावून घेतले जाणे हे अती निष्ठुरपणाचे नाही का ?

केव्हा ? त्याच प्रश्नाने माझाही जीव कासावीस होत आहे असे तुला नाही का वाटत ? तुझ्या आतुरतेबद्दल नितान्त सहानुभूती मी नाही दाखवणार तर कोण ? दुसरा विचार तरी माझ्या मनात कसा येऊ शकेल ? कोठे ? तो प्रश्नच उद्‌भवत नाही—कोठेही. लांब पल्लयाचा समुद्रप्रवास सुद्धा त्यासाठी मी करीन–जरी समुद्रप्रवासात माझी भूक मरते आणि मला अचेतन वस्तूप्रमाणे निर्जीव झाल्यासारखे वाटते. अखेरीस दिवस मोजण्याची कैद्याची सवय मलाही जडली आहे. आणखी दोन महिन्यांनी चार वर्षे पुरी होतील. भयंकर लांबलेला हा काळ आहे आणि का ? कोण ? याचे समाधानकारक उत्तर तो देऊ शकेल ?

हा दुःखद विषय आपण सोडून देऊ आणि दुसऱ्या कशाबद्दल तरी बोलू. मालरोच्या पुस्तकाबद्दलचे माझे मत तू विचारलेस. माझ्या भावना संमिश्र आहेत; म्हणून मी त्या प्रकट केल्या नाहीत. विशेषतः त्याला त्या भावना कळाव्या अशी माझी मुळीच इच्छा नव्हती. मी ते पुस्तक पुन्हा वाचीत आहे.— या वेळी इंग्रजी भाषान्तरात. मूळ पुस्तक वाचल्यानंतर माझी जी प्रतिक्रिया झाली ती तशीच कायम आहे. गैर-समजाला जागा न देता माझे विचार प्रकट करणे कठीण आहे. ते जरी श्रेष्ठ पुस्तक नसले तरी चांगले पुस्तक आहे यात तिळमात्रही संशय नाही. पण मला कळत नाही की, त्यातील दोष इतके स्पष्ट असताना सुद्धा, जवळजवळ सर्वांच्या दृष्टीतून कसे निसटले. मुख्य दोष असा आहे की, पुस्तकाचा गाभा वास्तववादी असूनही त्यात भावुकतेचा प्रवाह सारखा वाहत असलेला दिसून येतो. या दोषामुळे त्याचा एकमात्र फायदा झालेला दिसत आहे. तो असा की, त्यामुळे प्रचारक झाल्याचा आरोप त्याच्यावर येऊ शकत नाही. आणि त्याच्या साहित्यकृतीला 'शुद्ध साहित्या'चे वैशिष्ट्य प्राप्त होते. पण मला वाटते शुद्ध साहित्याच्या (ते काय असेल ते असो) निकषावर घासून पाहिले तरी हा दोष झाकून जाऊ शकत नाही. हा मानसशास्त्राचा प्रश्न आहे. या पुस्तकात प्रक्षोभक कृतींचे जे चित्रण इतक्या हृदयंगमरीतीने करण्यात आले आहे, त्या वातावरणात आत्मनिरीक्षणाला— जे अनेक वेळा अत्यंत विकृत स्वरूपाचे असते— वाव आहे का ? मानसशास्त्र या प्रश्नाचे उत्तर अस्तिपक्षी देऊ देणार नाही. पण तरीही मालरोचे नायक, उपनायक हे सारे आत्मनिरीक्षण करण्यात— विकृत होईपर्यंत— मग्न असतात. हा विसंवाद एकतानता बिघडविणारा आहे. शुद्ध साहित्याचा कोठलाही सिद्धान्त त्याचे समर्थन करू शकणार नाही. कलाकाराने आपली पात्रे तयार केली, ते खरे आहे. पण जोवर वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही पात्रे तयार करण्यात येतील तोवरच हा युक्तिवाद मूळ धरू शकेल. ती जर कलाकाराच्या कल्पनेतून

निर्माण झाली असतील तर भावुकतावाद किंवा कल्पनावाद याला का झिडकारून टाकावे? असे म्हणतात की, मालरोने प्रत्यक्ष घडामोडींच्या आधारेच हे चित्रण केले आहे. या मुद्द्यावर भिन्न मते प्रकट होण्याला वाव आहे. पण तो मुद्दा सोडला तरी एवढे ठासून खास सांगता येईल की त्याने कल्पकतेला अनिर्बंध संचार करू दिला आहे. त्यालाही हरकत नाही; जर तो अचूक कल्पना करू शकला तर. पण अचूक कल्पना ही कल्पना राहत नाही; तो संभाव्य निष्कर्ष बनतो. मालरोच्या नायक-उपनायकांची मानसिक अवस्था त्यांच्या प्रत्यक्ष कृतींशी सुसंगत राहात नाही. त्यात कार्यकारण भाव राहात नाही. माझ्या टीकेची मुख्य भूमिका ही आहे. ती प्रकट करून स्तुतीचा जो एक सूर लागला आहे त्यात बिघाड आणण्याची माझी इच्छा नाही. या भूमिकेचे स्पष्टीकरण करावयाचे म्हटले तर अनेक दुय्यम मुद्देही उपस्थित होतील. सध्या ते करणे मला शक्य नाही. पण इतक्या उत्कृष्ट प्रतीच्या साहित्य कृतीवर अशी मूलभूत टीका होणे मात्र आवश्यक आहे. या साहित्यकृतीत खोलवर मूळ धरलेला मानसशास्त्रीय प्रश्नही दडलेला आहे आणि त्याच्या प्रतिक्रिया आपल्या परीने व्यावहारिकतेच्या विश्वात उमटतात. माझ्या टीकेचा सारांश मी एका वैशिष्ट्यपूर्ण इशाऱ्यातून देऊ शकतो.— भावनावादी मार्गच्युतीपासून सावध राहा. आपले गृह आणि गृहजीवन या संकटाने ग्रासलेले असते. पण ते संकट अर्थातच दडलेले असते. भावनावाद कोणत्या का रूपाने प्रकट होईना, तेथे धोका दडलेला आहे असे गृहीत धरावयाला हरकत नाही. रशियन व्यक्तीला खरवडून पाहा. त्याच्या अंतरंगात तार्तर तुम्हांला आढळून येईल. मालरोने जे नितान्त सुंदर चित्रण केलेले आहे ते डागळले गेले आहे ते अजाणतेपणाने त्याच्या हातून घडलेल्या भावनावादी मार्गच्युतीमुळे! भावनावादी मनोभूमिकेमुळे त्याला 'शुद्ध कलाकार' होण्याचे वैशिष्ट्य लाभले आहे. पण जीवनाच्या वस्तुस्थितीच्या कक्षेबाहेर जाऊन उंच भराऱ्या मारणाऱ्या साहित्याची आपल्याला गरज आहे काय! मालरोच्या शुद्ध कलेने बायोमेकॅनिक्सच्या प्राथमिक सत्याचाही अपलाप केला आहे. त्या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणातूनही ते सिद्ध झालेले आहे. त्याने करावयाला पाहिजे होते ते चेनचे स्वगत भाषण आणि मानसिक दौर्बल्यातून प्रकट होणाऱ्या भराऱ्या यांना मुक्त छंदात ग्रथित करणे. आणि मग आपण ग्रीक शोकांतिकेचे पुनरुज्जीवन केले गेल्याचा डंका पिटू शकलो असतो. मालरोच्या या साहित्याने मग मॅक्बेथलाही मागे टाकले असते. मालरोने लायनची मर्जी संपादन केल्याचे मी ऐकतो. त्यात आश्चर्य कसले? भावनावादित्व हा दोघांमधील दुवा आहे.

चांगल्या काही रहस्य कथांची मला भूक लागली आहे. शुद्ध साहित्य हे माझ्या दृष्टीने उच्चभ्रू आहे. हवा थोडी थंड झाली की, लगेच मी माझ्या लेखनकार्यात मग्न होईन. गंभीर लेखन करण्याच्या दृष्टीने सध्याची हवा अगदी उत्साहभंग करणारी आहे. दिवसा काहीच करणे शक्य नाही. आणि रात्री मी थकून गेलेला असतो. हे ठिकाण

माझ्या प्रकृतीच्या दृष्टीने कसे ठरेल हे सध्याच सांगता येणार नाही. काही झाले तरी ते अपायकारक होणार नाही. कोठेतरी उंच उंच पर्वतशिखरावर जाण्यासाठी माझे मन किती ओढ घेत आहे. मग मी पुन्हा खडखडीत बरा होईन — जीवनसंग्राम करण्यासाठी. ही जीवघेणी खंदकातली लढाई केव्हा संपणार आहे? वैतागून जाते मन. पण मी टिकाव धरीन. प्रवासाची अखेर दृष्टिपथात आली आहे. पुढल्या वर्षी या वेळी आपण भवितव्याच्या स्पष्ट योजना सुद्धा आखावयाला लागू.

## ४५

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
जून २१, १९३५

जूनच्या सुरुवातीला उनी कपडे घालून तू खिडकीपाशी बसली आहेस हें वाचून मला खरोखरीच तुझा हेवा वाटला. आम्ही इकडे भयंकर उन्हाळ्यात करपून निघत आहोत. उन्हाळा या वर्षी फारच कडाक्याचा आहे. वाटते, आपण बरेलीतच आहोत. एका दृष्टीने येथे अधिकच वाईट आहे. बरेलीला एका मोठ्या आवारात मला ठेवण्यात आले होते. तेथे बरीच खुली जागा होती. खोलीही खूप मोठी होती आणि तिला तीन लोखंडी दरवाजे होते. खोलीत संध्याकाळच्या वेळी मला श्वासोच्छ्वास तरी करता येत असे. इथे माझी छोटीशी खोली उंच भिंतींच्या लहानशा पेटीत कोंबल्यासारखी आहे. पाय मोकळे करावयालाही इथे जागा नाही. रात्री वाऱ्याची झुळकसुद्धा येत नाही आणि मला आंघोळही करता येत नाही. ठीक आहे म्हणा. तुरुंगात थोड्याच कोणाला सुखसोयी मिळू शकतात? शिवाय या वर्षी हवा नेहमीपेक्षा वेगळी आहे. इतका उष्मा येथे होत नाही. कल्पना कर, गेले पाच-सहा आठवडे येथील उष्णतामान आसऱ्याच्या जागी १०५, १०६, १०७ अंश फॅरनहाइट इतके आहे. बरेलीला अर्थातच तपोमान आणखी आठ–दहा अंशांनी जास्त असे. तेवढ्यापुरते तरी हे ठिकाण बरे आहे. या वर्षी पावसाला उशीर झाला आहे. नेहमी पायथ्याच्या ठिकाणी पाऊस जरा आधीच पडतो. आम्ही त्याची वाट पाहत आहो, लवकर येण्याच्या अपेक्षेने.

अलीकडे माझी अस्वस्थता काहीशी वाढली आहे. कदाचित हवेमुळेही असेल. वेदना असह्य होत चालल्या आहेत आणि त्यामुळे फार अशक्तपणा वाटतो. पावसाची सुरुवात होऊन हवा थंड झाल्याबरोबर मला बरे वाटेल अशी आशा आहे. हवा काही अशीच फार वेळ टिकून राहणार नाही. पण काही झाले तरी तक्रार करून काय उपयोग? तत्त्वज्ञाच्या विरक्तीने तोंड द्यावयालाच पाहिजे. या परिस्थितीत आणखी काही करता येण्यासारखे नाही. त्याचा अर्थ वर्ष दीडवर्षपर्यंत हे सहन केलेच पाहिजे. तोवर माझ्या प्रकृतीची काय अवस्था होईल ते त्याच वेळी कळून येईल. आधी अंदाज

बांधण्यात अर्थ काय? भल्याची आशा करू या आणि फारशा आशादायक न भासणाऱ्या भवितव्याला धैर्याने आणि शांत मनाने तोंड देऊ या.

समजा, वैद्यकीय कारणांसाठी मला परदेशी जाणे भागच पडले तरी अमेरिकेला मी जाणे व्यवहार्यतः शक्य दिसत नाही. फार दूर आहे अमेरिका. ज्याच्यासाठी आपण एवढी जबर किंमत दिली ते उधळून टाकण्याचीही मला इच्छा नाही. पण तुझ्या जाण्याला फार मोठा आक्षेप घेता येणार नाही. शिवाय तुला गेलेच पाहिजे असे दिसू लागले आहे. परदेशात कायमचे वास्तव्य करून राहणारे असंख्य अमेरिकन आहेत. गरट्रूड स्टाईन परतली ती उण्यापुऱ्या पस्तीस वर्षांनंतर — आणि तीही कर भरण्याकरता नव्हे तर व्याख्याने देऊन पैसे मिळविण्यासाठी. फ्रेंच नागरिकत्व स्वीकारण्याच्या शक्यतेबद्दल तू कधी गंभीरपणे विचार केला आहेस का? त्या मार्गात ज्या काही अडचणी आहेत त्यांतून निघायला वाव नाही हे मी समजूच शकत नाही. मूर्खपणा आहे सारा. तू फ्रान्समध्ये जन्माला आलीस आणि जन्मजात नागरिकत्वाचा हक्क तू मागू शकतेस. हे खरे आहे की, तेथील महान् क्रान्तीने पुरुषांच्याच हक्कांचा तेवढा पुकारा केला. पण आपण विसाव्या शतकात राहत आहो आणि आता तरी असा युक्तिवाद करता येणार नाही की, फ्रेंच भूमीवर झालेला तुझा जन्म हा जन्म म्हणून धरता येणार नाही. कारण तू पुरुष-जन्म घेतला नाहीस.

परवाच मी मारी ड्रेसलरच्या आत्मचरित्रातील एक उतारा वाचला. तो जसाच्या तसा मला आठवत नाही, पण त्याचा भावार्थ साधारणपणे असा होता — "आपण पुरुषाच्या दृष्टीने मोलाची आहो हे एकदा स्त्रीला कळले की, ती सौंदर्य आणि मोहकता यांची पुतळी बनल्याशिवाय राहतच नाही." अत्याधुनिक लोकांना ही वृद्ध स्त्री काळाला न साजेशी वाटेल. तिच्या विधानांत पुराण्या स्त्रीत्वाच्या आदर्शाचे काही अवशेष आहेत यातही संशय नाही. पण शब्दशः अर्थ घेतला नाही तर तिच्यासारख्या जुन्या, अनुभवी स्त्रीच्या दृष्टिकोणात काही शहाणपण आहे असे खात्रीने म्हणावे लागेल. शिवाय आपल्याला दुसऱ्या बाजूने पाहता येईल आणि प्रियाराधनाच्या तंत्राचा शोध घेता येईल. पण या मोहिनी घालणाऱ्या तंत्रातसुद्धा शहाणपणाचा आधार घ्यावाच लागतो.

माझ्या पुस्तकात मनोविश्लेषणाबद्दल लिहावे लागेल असे तुला का वाटले बरे? मी जी रूपरेषा तुला पाठविली त्यात त्याचा समावेश नव्हता. पण त्यानंतरच्या काळात मला कळून आले आहे की, या विषयाचा व्यापक दृष्टीने समाचार घ्यावयाचा असेल तर त्या योजनेत मनोविज्ञानशास्त्राचा समावेश करणे आवश्यक आहे. त्याबरोबर मनोविश्लेषण ओघानेच आले. त्या दृष्टीने 'गेस्टाल्ड सायकॉलॉजी'वरील साहित्याबद्दल मला काही माहिती हवी आहे. कोह्लर आणि कोफका यांच्या ग्रंथांव्यतिरिक्त आणखी कोणती पुस्तके उपयुक्त ठरतील?

४६

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
जुलै २१, १९३५

आज मी तुरुंगवासाची चार वर्षे पुरी करीत आहे. आता पंधरा-सोळा महिने राहिले. माझे भाग्य असले तर वर्षभरातही सुटेन. प्रवासाचा शेवट दूरवर असला तरी तो दृष्टिपथात येण्याची वेळ आली आहे खरी. अगदी लवकरात लवकर जेव्हा मी सुटेन तेव्हाही पाच वर्षे मी तुरुंगात काढलेली असतील—मानवाने या प्रकारच्या जीवनात सहन करावयाचा अगदी मोठ्यात मोठा काळ. माझे नेहमीच असे मत होते की, पाच वर्षांपेक्षा अधिक काळचा तुरुंगवास हा मृत्यूपेक्षाही अधिक भयानक होय. व्यक्तिशः मी मृत्यूच यापेक्षा अधिक पसंत करीन. आता अनुभवाने माझे मत पक्के झाले आहे. सुसंस्कृत राजवटींनी ही सुधारणा घडवून आणली तर दंडनीतीमध्ये मानवतेचा ओलावा असल्यासारखे होईल. शिवाय त्यात आर्थिक बचत होईल ती वेगळीच. तुटीच्या अर्थ-संकल्पाच्या या दिवसांत बचत करणाऱ्या प्रत्येक बाबीचा काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे.

माझ्या स्वतःच्या बाबतीत या अग्निदिव्याचा शेवटचा कालखंड अतिशयच वाईट जाणार असे दिसत आहे. म्हणजे माझ्या अपेक्षेप्रमाणे अधिक काळ घालवावा न लागण्याचे भाग्य मला लाभले तरी. या जीवनाचे आणखी एक वर्ष, हे सुद्धा बेचैन करणारे, शहारे आणणारे भवितव्य मला वाटते. शारीरिक दृष्ट्या ते सहन करता येणे अशक्य आहे. या वर्षी जो हवाबदल झाला त्याचा काही एक फायदा मला झाला नाही. खरे तर हा बदल नव्हेच. हवेच्या दृष्टीने, तसेच उंचीच्या दृष्टीने गेले दोन-अडीच महिने तर माझी नुसती घालमेल चालली आहे. आणि त्याचा माझ्यावर इतका परिणाम झाला आहे की, या जीवनातील असंख्य सुखसवलतींकडे लक्ष देण्याचीही माझ्यामध्ये ताकद राहिलेली नाही. मी जीवन म्हटले. पण हे जीवन तरी कसले? सुसंस्कृत व्यक्तीला वर्षानुवर्षे असे डांबून ठेवणे याला का जीवन म्हणतात?

आता पुष्कळ पाऊस पडू लागला आहे आणि उन्हाळ्याची तीक्ष्ण झळ नाहीशी झाली आहे. पण त्यामुळे हवा प्रसन्न झाली असे नाही. उलट ती अधिकच तापदायक झाली आहे. ही दमट उष्णता भयानक असते. विशेषतः ज्या वेळीं कपडे मर्यादित असतात त्या वेळीं तर ती तिरस्करणीय होते. आणि आमचे कपडे तरी कसले? ते घामाने निथळून निघतात आणि मग शिसारी येईल इतका त्यांचा वास येतो. कपडे धुतले तर ते वाळावयाला कितीक दिवस लागतात आणि तोवर हे घामाच्या वासाने डबडबलेले कपडे घालणेच भाग पडते. काय हे जीवन तरी! अंगाखालची काथ्याची गादी ओलसर, दमट आहे. कच्च्या लोकरीचे माझे पांघरुण तर इतके मळकट झाले आहे की, माझ्या कोंदट खोलीला चायना टाउनची दुर्गंधी आल्यासारखी भासते.

अर्थात कैद्याला सुखसोयी उपलब्ध होण्याच्या बाबतीत जे काही प्रमाण ठरविण्यात आलेले असेल त्याच्याशी हे सारे सुसंगतही असेल.

मला अशक्तपणा इतका आला आहे की, जरासे श्रम होताच मला पडून राहावे लागते. आणि दैनंदिन जीवनाचा जो क्रम आहे — आंघोळ, कपडे धुणे, वगैरे — तो पार पाडावयाचा म्हणजे श्रम होणारच. मला वाटते, उष्णतेमुळे हृदयविकार बळावला आहे. छातीतील कळा कायम आहेत आणि काही काही वेळी त्या असह्य होतात. गेल्या आठवड्यात तर त्यांचे प्रमाण फारच वाढले होते. संध्याकाळी पुन्हा ताप येऊ लागला आहे. एकंदरीने या यातना सहन करणे कठीण जात आहे आणि गेल्या चार वर्षांत कधी गेलो नसेल इतका मी वैतागून गेलो आहे. हताश झालो आहे. म्हणून तर माझे असे ठाम मत बनले आहे की, या जीवनाची अशी पाच वर्षे ( खंड न पडता ) तुरुंगात घालविण्यापेक्षा मृत्यूसुद्धा परवडला. ती निवड प्रत्यक्षपणे करण्याची वेळ न येवो म्हणजे झाले. आणि विनोद आहे तो हा की, तशी निवड आपल्याला करताही येत नाही. साधारणपणे समजत अशी की, माणसाला आपल्या जीवनाची वाटेल तशी विल्हेवाट लावण्याचे स्वातंत्र्य आहे. पण सुसंस्कृत जग तेवढासुद्धा हक्क माणसाला देत नाही. आणि तरी मोठ्या दिमाखाने असा दावा केला जातो की, गुलामगिरी फक्त हिज मॅजेस्टी द पॉवर ऑफ द ट्रिनिटी (ॲबिसिनिया) च्या साम्राज्यातच फक्त अस्तित्वात आहे. आणि म्हणून विसाव्या शतकातील सीझर ख्रिस्ती धर्माच्या खऱ्या जन्मस्थानीच्या अंधकारमय जगात सुधारणेची ज्योत पेटविण्यासाठी जेव्हा उद्युक्त होतो तेव्हा त्याला नैतिक साहाय्य दिले जाते आणि त्याच्या अत्याचारांकडे राजनैतिक आचाराच्या दृष्टीने डोळेझाक केली जाते.

ही दुःखाची कहाणी तुला सांगणे हे खरोखरीच मूर्खपणाचे आहे. तुला या बाबतीत काय बरे करता येईल ? तुझे जीवन मात्र त्यामुळे अधिक दुःखी होईल.

लेखकांच्या परिषदेचा जो वृत्तान्त तू दिला आहेस तो मला फार मनोरंजक वाटला. या परिषदेचा तात्पुरता कार्यक्रम एका अमेरिकन मासिकात प्रसिद्ध झाला होता. अवाढव्य आहे तो. परिषदेने खरोखरच का तो कार्यक्रम हाताळला ? शक्य नाही. कारण मग परिषद आठवडाभर भरण्याऐवजी महिनाभर भरली असती. त्या साऱ्या विषयांचा समाचार घ्यावयाचा झाला तर सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या काळापासूनच युरपच्या साऱ्या सांस्कृतिक इतिहासाचा आढावा घ्यावा लागणार. नाहीतर त्या मागे जाऊन प्राचीन ग्रीसकडेही दृष्टिक्षेप टाकावा लागेल. अर्थात काही झाले तरी या परिषदेत काही उद्बोधक चर्चा झाली असेल यात शंका नाही. मालरो अध्यक्षपदी असल्यामुळे अतिवास्तववाद्यांचा हल्ला जरा बोथट झाल्यासारखा वाटला का ? पण परिषदेचा खरा सूत्रधार कोण ? विलीशेन ! आणि पिछाडीला बॅबिटे ? जीड ही एक कमाई आहे — निदान वाटते. रोमॉंरोलॉंवर फारसा विश्वास ठेवता येत नाही. त्याचे

अगदी अलीकडील पुस्तक म्हणजे सावळागोंधळ आहे—एका बुद्धिशौंडाचा नैतिक अधःपात. काय आश्चर्य आहे पाहा! माइक गोल्डने अगदी शंभर टक्के पाठिंबा देणारे भाषण केले. तो पन्नास टक्केसुद्धा सहमत नव्हता. त्या दिवसाची मला आठवण आहे. पण व्यक्तिशः तो फार चांगला माणूस आहे. मला त्याने 'गमावलेला मित्र' मानावे याचे वाईट वाटते. तो तसा भावनोत्कट आहे आणि बाळसेदार पोरासारखाच आहे—तो तसाच राहील म्हणा! त्याच्यामधील गोडवा आहे तो तोच. त्याचा अतिरेक न झाला म्हणजे मिळवली. मद्यपानामुळे तो बेहोश झाल्यानंतर तर त्याचा सहवास अधिकच आनंददायक होतो. मी प्रथम त्याला भेटलो तेव्हा मी सोवळा होतो. मला बिघडविण्यासाठी त्याने फार प्रयत्न केला आणि मला वाटते माझा तोल काहीसा सुटलाही होता! त्याने मला आव्हान दिले तेव्हा साहजिकच मला सांगता येईना की तो पीत असल्यामुळे वाईट आहे. कारण तसे सांगणे हा शुद्ध खोटेपणा झाला असता आणि सोवळेपणाच्या साऱ्या संस्कारातही मी एवढा खोटेपणा करू शकलो नसतो.

काही दिवसांपूर्वी नव्या शास्त्रीय पुस्तकांची एक यादी मी तुला पाठविली होती. मला विशेषतः पुढील पुस्तके हवी आहेत. डब्ल्यू. सी. डी. डॅम्पियर वेदमचे 'हिस्टरी ऑफ सायन्स ॲण्ड इट्स रिलेशन विथ फिलॉसफी ॲण्ड रिलिजन', सी. डी. डार्विनचे 'द न्यू कन्सेप्शन् ऑफ मॅटर', हाल्डेनचे 'फिलासॉफिकल बेसिस ऑफ बायॉलॉजी', व्हाइटहेडचे 'प्रोसेस ॲण्ड रियालिटी', एच्. डिंगलचे 'सायन्स ॲण्ड ह्यूमन एक्सपीरिअन्स'; हायमन लेव्हीचे 'व्हेअर इज सायन्स गोईंग', एडविन बर्टचे 'द मेटॅफिजिकल फाउन्डेशन ऑफ मॉडर्न सायन्स'. ही यादी फार मोठी झाली. पण ही पुस्तके मला मिळालीच पाहिजेत. माझ्या कामासाठी आवश्यक असलेली पुस्तके मिळण्याच्या बाबतीत बरीच अडचण येत आहे. वस्तुतः या भयानक जीवनात लेखन हा माझा एकमेव आनंद आहे. मला मिळण्याजोगी होती तेवढी पुस्तके मी येथूनच मिळविली. पण मला हवी ती सारी पुस्तके या देशातील पुस्तकविक्रेत्यांमार्फतही मिळू शकत नाहीत. म्हणून परदेशातूनच ती मागविली पाहिजेत. दुसरी एक गोष्ट मला विशेषेकरून हवी आहे; ती म्हणजे आईन्स्टाईनचे अगदी नवीन लेखन—ज्यात अणुशक्तीचे प्रयोग आणि सापेक्षतावादाचा सिद्धान्त यांत एकसूत्रीपणा आणण्यात आला आहे. हा लेख अमेरिकन फिजिकल सोसायटीच्या मासिकात प्रसिद्ध झाला आहे. आइन्स्टाइनच्या या भूमिकेबद्दल मला फार मोठे कुतूहल आहे. कारण क्वॉन्टम मेकॅनिक्सच्या तात्त्विक परिणामाचे दिग्दर्शन करताना मी याच प्रकारची कल्पना मांडली होती. खरे सांगावयाचे तर मी प्रत्यक्षपणे असे लिहिले आहे की, सापेक्षतावादाचे भौतिक तत्त्व मायक्रॉकॉस्मिक जगाला लावून क्वॉन्टम सिद्धान्तातील अनिश्चिततेचे कालांतराने स्पष्टीकरण करता येईल आणि आइनस्टाइनची युनायटेड फील्ड थिअरी ही आधुनिक भौतिक शास्त्रात भव्य असा समन्वय करण्याच्या दिशेने प्रगती करीत आहे.

४७

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
ऑगस्ट २०, १९३५

माझी अशी समजूत झाली आहे की, एकोणीसशे तिशीच्या या काळात आधुनिक महिलेने आपल्या अंगोपांगात पुरुषी कणखरपणा आणण्यासाठी व तिटकारा येईल अशी सरळ अंगकाठी प्राप्त करून घेण्यासाठी, प्रत्यक्षपणे आपली भूक मारण्याचे कारण नाही. कारण सध्या जे सौंदर्याचे प्रमाण मानले जात आहे त्यानुसार पाच फूट आठ इंच उंचीसाठी तिला १३५ पौंड वजनापर्यंत मजल मारावयाला काहीच हरकत दिसत नाही. शिवाय खरी गोष्ट अशी आहे की, ग्रीक महिलांचा जो आदर्श मानला जातो त्या तशा सडसडीत नव्हत्या. गोलाईकडेच त्यांचा कल झुकलेला असे. सौंदर्यगुण संख्येतून ठरत नाहीत अशी समजूत आहे.

तो पूर्णपणे युक्लिडपासून अलिप्त आहे. तो गोलाईचा भोक्ता आहे, आणि सरळ रेषा त्याला कधी मानवणार नाहीत. शिवाय काही झाले तरी जीवन चाळिशीला सुरू होते आणि त्या वयात कणखरपणाची पोरकट ओढ नाहीशी होऊन माणूस जरा सुखासीनतेकडे झुकू लागतो.

आता इथे खूप पाऊस पडत आहे आणि हवा बरीच थंड झाली आहे. आतापर्यंत जवळजवळ पन्नास इंच पाऊस पडला. येथील वार्षिक सरासरी मात्र त्याच्या दुप्पट आहे. म्हणजे साधारणपणे बराच पाऊस पडण्यासारखा आहे. नेहमी पावसाळा येथे सप्टेंबरच्या मध्यापर्यंत टिकतो. त्यानंतर हवा फारच चांगली होते. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर हे महिने फार प्रसन्न असतात म्हणे! तसा इथे कडक हिवाळा नसतो. अलमोड्यासारखा तर मुळीच नाही. भव्य हिमालयाच्या पायथ्यावरील हा एक उंचवटा आहे म्हणून इथेच राहायला मला आवडले असते. पण मला भीती वाटते की बहुधा गेल्या वर्षीचीच पुनरावृत्ती होईल; ऑक्टोबरच्या सुरुवातीला मला बरेलीला पाठविण्यात येईल. या जागी तसा मला आनंद आहे. बरेलीला मला जे सोबती देण्यात आले होते त्यांच्यापासून दूर होणे हाच केवढा तरी जीवविसावा आहे. साधारणपणे मला एकटेच राहावयास आवडते; सोबती हवाच असेल तर मला निवड करता आली पाहिजे. पण कैद्याला निवड करता येत नाही. माझ्या माननीय सोबत्यांचे मागे मी एकदा वर्णन केले होते. बाकीचे एकंदरीने त्याच जातीतील. म्हणजे साच्याचे; मी वर्णाश्रमातील जातीच्या अर्थाने बोलत नाही. अल्मोड्यातील माझा सोबती हा जसा एक शुद्ध विनोद होता तशीच ती एक घोर शिक्षाही होती.

आज सारे आसमंत माझ्या जे दृष्टिपथात येते त्याचा मी राजा आहे. माझे हे साम्राज्य अति लहान असले तरी या सार्वभौमत्वाच्या आनंदात मी खूष असतो. माझ्या साम्राज्याच्या भिंतीपलीकडे मी काही फुलझाडे लावली आहेत. ती आज लाल,

शेंदरी, जांभळ्या रंगात मोहरली आहेत. किती सुरेख दिसतात ती. दुर्दैवाने पावसाच्या अखेरीस ती मरून जातील. अशा सुंदर वस्तू नष्ट व्हाव्यात ही केवढी दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांना आत्मा असेल का? मी विचारतो त्यांना. पण ती निःशब्द असतात.

या दिवसात आधुनिक शास्त्रीय संशोधनाने अमरत्वाच्या पुराण्या कल्पनेवर जो प्रकाश टाकला आहे त्याबद्दल मी लिहीत आहे. साहजिकच आत्म्याच्या सिद्धान्ताची मला चीरफाड करावी लागत आहे. म्हणूनच तर मोहरलेल्या फुलझाडांच्या आत्म्याबद्दल मी प्रश्न केला. पण तू काही घाबरून जाऊ नकोस. मी गूढवादी बनलेलो नाही. अर्थात गेल्या दोन वर्षात नवगूढवाद्यांना जे काही सांगावयाचे आहे त्याच्याशी मी पुरेपूर ओळख करून घेतली आहे. आधुनिक पदार्थशास्त्रज्ञ! आणि परमेश्वराच्या शोधात!— इतिहासाच्या या उलट्यासुलट्या कालखंडातील एक अजीब घटना आहे ही. आणि जेव्हा शहाणी माणसे फसलेल्या कार्याचा बचाव करण्यासाठी झटतात तेव्हा काहीशी पटण्यासारखी, पण अत्यंत तकलुपी अशी बाजू तयार करायला ती चुकत नाहीत. तू कधी 'तटस्थतेबद्दल' ऐकले आहेस का? बरट्रांड रसेलची ही अगदी नवीन चूष आहे. पण नाही, अगदी ताजी चूष म्हणजे डोराबरोबरचा घटस्फोट. त्या बेट्याचे मन हा एक चमत्कार आहे. संपत्तीचे साहचर्य आणि त्यातून मिळणारी फुरसद यामुळे त्याचा बुद्धिवाद मोकाट सुटल्यासारखा झाला आहे. आधुनिक तत्त्वज्ञांपैकी जर कोणी निर्भेळ आत्मकेंद्रिततेची भूमिका घेऊन ती दिङ्मूढ करणाऱ्या युक्तिवादाने झाकून टाकीत असेल तर तो बरट्रांड रसेल होय. विसाव्या शतकातील तो ह्यूम खरा. आणि प्रसन्न हृदयाने आणि तितक्याच निर्लेप बेजबाबदारपणाने तो आपल्या गुरूच्याही पुढे जात आहे. ज्ञानसाधनेबद्दल वाटत असलेल्या संशयाला (अस्तित्ववादावरच घाला घालणारा सिद्धान्त मी त्याला म्हणेन) पाठिंबा देताना तो प्रत्यक्षपणे असा युक्तिवाद करतो की शरीरशास्त्रज्ञ—जेव्हा कोणाच्याही मेंदूची पाहाणी करतो तेव्हा तो आपल्या स्वतःच्या मेंदूतील जाणिवाव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचाच अनुभव घेत नसतो. अशा तऱ्हेचा युक्तिवाद करणे हे मानसिक विकृतीचेच लक्षण मानले पाहिजे असे मला वाटते. तथापि फसलेल्या कार्याचा शक्य त्या साऱ्या उपायांनी बचाव करावयालाच पाहिजे. फसलेल्या कार्याचे हे बहादूर संरक्षक मात्र एकाच सिद्धान्ताने प्रेरित झालेले दिसत आहेत. हल्ला करणे हाच बचावाचा सोपा मार्ग होय. त्यांना माहीत आहे की, आपल्या मागे भिंत उभी आहे. पण तरी ते निर्धाराने लढत आहेत यात शंका नाही. त्यांची उपेक्षा करणे, किंवा आपल्या आदर्शानुसार त्यांचे मूल्यमापन करणे चुकीचे आहे. त्यांच्या विरुद्ध असलेले लोक हा मूर्खपणा करीत असतात. त्यांना वाटते तसे हे सोपे नाही. कारण खरी गोष्ट अशी आहे की, नवगूढवाद्यांच्या पाशी स्वतःला पाठबळ आणण्यासाठी भरपूर साधनसामुग्री आहे. कोणी म्हणेल परंपरागत पूर्वग्रहांचे हे पाठबळ आहे. नाही. कमीतकमी प्रतिकार करण्याचे धोरण स्वीकारणे हे चुकीचे आहे. त्यांना तोंड द्यावयाचे ते

त्यांच्याच भूमीवर दिले पाहिजे. त्यांचे मूल्यमापन त्यांच्या आदर्शानुसार केले पाहिजे. चार जुनी-पानी बोधवाक्ये म्हणणे किंवा अवतरणे देणे सोपे आहे. पण त्यांचा परिणाम काही होऊ शकत नाही. ज्यांना आधीच भूमिका पटलेली आहे त्यांच्यावर या युक्तिवादाचा निर्णायक परिणाम होईल. पण इतरांसाठी आपण त्यांच्याच भाषेत बोलले पाहिजे. आपले हत्यार जर कोणते असेल तर ते टीकेचे—आधुनिक शास्त्रीय धर्मातील अन्तर्गत उणिवा व दोष यांचे दिग्दर्शन करण्याचे. अर्थात याला वेळ हवा. सुदैवाने (?) माझ्यापाशी भरपूर वेळ होता. म्हणून मी बरेच गंभीर चिंतन करू शकलो. त्या चिंतनाचा आज ना उद्या प्रत्यक्षरणे उपयोग होऊ शकेल अशी मला आशा आहे. फक्त जितक्या परिपूर्णपणे हे कार्य करायला मी उत्सुक आहे तितके करण्यासाठी आधारभूत ग्रंथांचे एक ग्रंथालयच माझ्यापाशी हवे आणि पद्धतशीर संशोधनासाठी सवलतीही उपलब्ध झाल्या पाहिजेत. सध्या इथे यांपैकी काहीही माझ्याजवळ नाही. म्हणून माझे लेखन तुटक तर होईलच, पण पद्धतशीर विषयमांडणी करण्याच्या दृष्टीनेही ते दोषपूर्ण राहील. शिवाय सोयी-सवलतींच्या दृष्टीने माझ्या सर्व मागण्या मंजूर झाल्या तरी माझ्यासमोर जी योजना आहे ती पुरी व्हावयाला निदान पाच वर्षे तरी लागतील. म्हणून त्यापैकी एकतृतीयांश काम पुरे झाले तरी मला समाधान मानावयाला हरकत नाही. बाकीचे ? ते आपण पुढे पाहू.

आता एक नवल तुला सांगणार आहे. ते ऐकून तू आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहणार नाहीस. बरेलीला मी एक मांजर पाळले होते. दोन वर्षांपूर्वी एक लहानसे पिलू मांजरीबरोबर आले. मी त्याला दूध पाजले आणि ते माझ्या खोलीत राहू लागले. मला त्याचा फार लळा लागला. पण माझ्या सोबत्याला ते आवडले नाही. त्याने अकांडतांडव सुरू केले. मला कळत नाही की हिंदू लोकांनी गायीची पूजा का करावी आणि मांजराबद्दल द्वेष का बाळगावा ? अर्थात मी ऐकले नाही. इतरही अडचणी मार्गात होत्या. बिचाऱ्यावर तीन कुत्र्यांनी हल्ला केला. सुदैवाने मांजर असल्यामुळे त्याला नऊ जन्म होते आणि त्यांपैकी त्याने दोन तीन कुत्र्यांपुढे टाकले असे म्हणावयास हरकत नाही. तेव्हापासून घडले आहे ते मात्र असे की, मी त्या मांजराच्या हिरव्या डोळ्यांतून जगाकडे पाहू लागलो आणि मला ते दृश्य विलक्षण मनोरंजक वाटले. इतके की माझ्या मांजराचे विचार ग्रथित करण्याची मला स्फूर्ती झाली. "द रिफ्लेक्शन्स ऑफ माय कॅट" हे जे पुस्तक त्यांतून निर्माण होणार आहे ते गरट्रूड स्टाइनच्या "ऑटोबायॉग्रफी ऑफ एलिस टोकलास" या पुस्तकाच्या धर्तीवर असेल. अर्थात इतके काही उथळ नव्हे. फक्त मांडणी तशा प्रकारची. त्यातील प्रत्येक शब्द साधारण मर्त्य पुरुषाला आणि अमर स्त्रीला कळण्यासारखा राहील. गरट्रूड स्टाइनच्या लेखनाबद्दल मात्र असे म्हणता येईल की त्यातील आशय ज्याला कळेल त्याने स्वतःला श्रेष्ठ वाङ्मयतज्ज्ञ म्हणून मानावयाला हरकत नाही. पण आपण बोलतो तसे लिहितो असा तिचा दावा आहे.

जगाचे नागरिक बनलेल्या या प्रेषिताचे भाष्य एकदा तरी ऐकण्याची माझी इच्छा आहे. तेवढे पुरे. माझे मांजर मात्र सुबोध भाषेत बोलते. आणि अशा घरगुती प्रश्नांबाबत बोलते की काही लोकांना त्याबद्दल आस्था वाटेल तर अनेकांना त्यामुळे धक्काही बसेल. उदाहरणार्थ, ते आपल्या पित्याशी होणाऱ्या प्रेमसंबंधासारख्या भयंकर गोष्टीबद्दल बोलते. (ती मांजरी आहे हे मात्र लक्षात ठेव; त्यामुळे तर ही कहाणी अधिकच मनोरंजक होणार आहे.) मानवी आदर्शानुसार ही जी विकृती आहे तिचे ते आपल्या युक्तिवादाने समर्थन करते आणि त्या बाबतीत आपल्या बचावासाठी विजयोन्मादाने सर जेम्स यांच्यासारख्या थोर मानववंशशास्त्रज्ञाचा आधार घेते. माझ्या मांजराचा असाही दावा आहे की, आपल्या रक्ताच्या नातलगांशी व्यभिचार करण्याची प्रवृत्ती जनावरा-सारखीच मानवामध्ये आहे असे काही सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांनीही म्हटले आहे. माझी अडचण एवढीच होती की, मानवी जीवनाशी संबंध आल्यानंतर तिचे वर्तन आणि प्रतिक्रिया कशा होत्या, हे बारकाईने आणि पद्धतशीरपणे पाहण्याची मला संधी मिळाली नाही. गेल्या वर्षी जवळ जवळ पाच महिने मी अलमोड्याला होतो. तेव्हा ती फार लहान होती. त्या थोडक्या काळातच एकलेपणा आणि माझ्या सोबत्यांच्या धार्मिक आत्म्यांनी तिला दिलेली निष्ठुर वागणूक यामुळे आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीला ती बळी पडली आणि आपल्या पित्याच्याच सहकार्याने अल्पवयातच मातृत्वाचा अनुभव घेण्याची तिच्यावर पाळी आली. तिचा हा बाप मात्र नेहमीच माझ्या तिरस्काराचा विषय असे. अल्पवयीन मातृत्वातून निर्माण झालेली अपत्ये अर्थातच जन्मानंतर लगेच मृत्युमुखी पडली—नव्हे रानटी पित्याने त्यांचा जीवच घेतला. पितृवात्सल्याचा भाबडा बुडबुडा इतक्या निष्ठुरपणाने फोडला गेला तेव्हाचा तिचा अनुभवही तिने आपल्या निवेदनात सांगितला आहे. आता पुन्हा एकदा तिला सोडून मला येथे यावे लागले.

हे नवलविशेष तुला प्रथम भेटीत सांगण्यासाठी दडवून ठेवण्याची माझी इच्छा होती. पण गेल्या महिन्यातील माझ्या दुःखदायक पत्राची काहीना काही भरपाई करणे मला आवश्यकच वाटले. त्या पत्राची खरोखर आज मला लाज वाटत आहे. आणखी एक बातमी तुला सांगावयाची आहे. गेल्या वर्षी ज्या आजारी स्त्रीबद्दल मी लिहिले होते ती उपचारासाठी युरपला गेली आहे. बर्लिनमध्ये शस्त्रक्रिया करून घेतल्यानंतर प्रकृती सुधारण्यासाठी ती कोठेतरी दक्षिण जर्मनीत गेली आहे. गंभीर शस्त्रक्रिया ज्यांच्याकडे सोपविता येतील अशा तोलाचे सर्जन्स अद्याप तिसऱ्या राइशमध्ये असतील अशी माझी कल्पना नव्हती.

४८

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
सप्टेंबर २२, १९३५

प्रसन्न विचार ही पृथ्वीतलावरील सर्वांत मोठी देणगी आहे; आणि जीवनाचा ज्यांना आस्वाद घ्यावयाचा असेल त्यांनी आपले मन या विचारांनी भरभरून घेतले पाहिजे. आता हे वाङ्मय चौर्य आहे. मला वाटते मॉन्टेनचे हे उद्‌गार आहेत. आजवर या पृथ्वीतलावर जे काही लिहिले गेले आहे त्यातील सर्वांत प्रसन्न आणि चाणाक्षपणाचे जर काही असेल तर ते माझ्या मताने मॉन्टेनचे निबंध होत. फार पूर्वीच ते मी वाचले आहेत. अत्याधुनिक किंवा अतिमॉन्टेनवादी म्हणू का (?) जे लोक आहेत त्यांना या निबंधांचा तिटकारा करता येणार नाही. कारण तसे करण्यामुळे सांस्कृतिक विकृतीचा दोषारोप त्यांच्यावर येण्यासारखा आहे. पण त्यांना हे निबंध जुन्या पठडीतील वाटतात आणि ज्यांना नव्या सिद्धान्ताने पछाडले आहे आणि जे संत, महंत, सिद्धान्त आणि चमत्कार यांच्यासहित एका नव्या धर्ममंदिराचा पाया घालू पाहात आहेत त्यांनी या निबंधाचा गंभीरपणे विचार करण्याचे प्रयोजन नाही असाही त्यांचा कटाक्ष आहे. या नवपूजकांची त्यांच्या त्यांच्या ऐतिहासिक परंपरेनुसार मी रीतसर विभागणी केली आहे. कोणी या नवमतवाल्यांचे पॉल आहेत, तर कोणी पीटर, ॲथनेशियस, टरटूलियन, ऑगस्टीन वगैरे वगैरे आहेत. फक्त संत टॉमस तेवढा आघाडीवर अवतीर्ण व्हावयाचा आहे. कोण जाणे, रूडास त्या अवतारासाठी योग्य आहे की काय? तुला माहीत आहे तो. नाही का? सध्या आपण 'एरियन' (Arien) वादाच्या कालखंडातून जात आहो.

पण आता धर्मगुरूंच्या इतिहासाची चर्चा पुरे झाली. अर्थात् मला हा विषय चित्तवेधक वाटतो आणि नव्या साहित्याच्या आधारे त्याची पुनर्रचना करण्यात मला विलक्षण आनंद वाटतो. त्याबद्दलच्या जुन्या साहित्याचा अभ्यास मी 'हिस्टरी ऑफ सायंटिफिक थॉट, या पुस्तकावर, माझ्या तुरुंगवासातील पहिल्या वर्षात परिश्रम घेत होतो, त्या वेळीच केला. अनेक अनुल्लंघनीय तांत्रिक अडचणींमुळे हे पुस्तक अर्धवटच मला सोडून द्यावे लागले. पण त्यासाठी बहुतेक सर्व साहित्य गोळा झालेले आहे आणि योग्य संधी येताच केव्हाही ते पुरे करता येणे शक्य आहे.

चर्चेशी संबंधित अशा इतिहासाचा अभ्यास करण्यात आणखी एक आनुषंगिक हेतू माझ्या मनात होता. तो म्हणजे ऑगस्टशी असलेला बौद्धिक देवाण-घेवाणीचा व्यवहार पुरा करणे. मध्ययुगीन ज्ञानाच्या मूल्यमापनाबद्दल आमच्यामध्ये काही मतभेद होते. त्याला असे वाटत होते की, मध्ययुगीन संस्कृतीने केलेल्या महत्त्वाच्या कामगिरीला मी कमी लेखत होतो. मला वाटते, एकंदरीने त्याचे मत मला अधिक ग्राह्य वाटू लागले आहे.

आता पुनः आठवण झाली. होय. मी मॉन्टेनबद्दल बोलत होतो आणि एकदम वाहवत गेलो. पण ही पत्रे म्हणजे सुव्यवस्थित निबंध थोडेच आहेत ? दूर अंतरावर असलेल्या व्यक्तीमधील हे संवाद आहेत. साहजिकच त्यांत धरसोड आणि अस्ताव्यस्त-पणा येणारच. मला म्हणावयाचे होते की, पुनः एकदा मॉन्टेनचे निबंध मला वाचावेसे वाटत आहेत. पण दुर्दैवाने ते मला मिळू शकले नाहीत, अगदी देशातील सर्वांत मोठ्या पुस्तकविक्रेत्याकडूनसुद्धा. कदाचित त्यांच्या प्रती संपल्याही असतील—विशेषतः इंग्रजीतील. पण त्या निबंधांच्या बऱ्याच लोकप्रिय आवृत्त्या निघाल्या आहेत आणि त्या सर्वच संपून गेल्या असतील असे मला वाटत नाही. मूळ फ्रेंच आवृत्ती निश्चितपणे उपलब्ध असेल.

पुस्तकावरून आठवण झाली. तुला आनंद होईल ऐकून की माझ्या विश्वासू डचमनने माझा अपेक्षाभंग केला नाही. काही दिवसांपूर्वी त्याच्याकडून दहा पुस्तके आली — सर्व कादंबऱ्या आणि किती काळजीपूर्वक त्याने निवड केली आहे म्हणून सांगू ! त्यांत व्हॅन डाइनची अगदी नवी कादंबरीसुद्धा आहे. त्याला तू पत्र लिही आणि माझ्या वतीने त्याचे आभार मान. त्याला म्हणावे की, मी कृतज्ञ आहे आणि त्याच्या व्यक्तिगत निष्ठेने माझ्या हृदयाला त्याने चटका लावला आहे. हा गुण सामान्यतः लोकांत दिसून आला तर किती चांगले होईल नाही ? मतभेद आणि वादविवाद यांत व्यक्तिगत संबंध आणणे किती गलिच्छपणाचे आहे. वस्तुतः वस्तुस्थितीच्या पातळी-वरूनच ही वादावादीसुद्धा व्हावयास पाहिजे. त्याला माझा आणखी एक निरोप सांग की, युरप सोडण्यापूर्वी त्याच्या मार्फत जे कर्ज मी काढले होते ते आता फिटले आहे. कालांतराने त्याला ते कळेलही किंवा त्याची थोडीशी कल्पना त्याला आलीही असेल. फक्त त्याला ते आवडणार नाही. ते काहीही असो. त्याने जेव्हा मदत मिळवून दिली तेव्हा त्याला ही पुरेपूर जाणीव होती की, मी काही त्याच्या पंथाचा स्वीकार करणार नाही.

मी बरेलीला परत जात नाही. ही जागा हिवाळ्यात चांगली असते असे म्हणतात. उन्हाळा मात्र बरेलीपेक्षा वेगळा भासला नाही. आता हिवाळा पाहू या. तो त्यापेक्षा कठीण जाणार नाही. अल्मोड्याइतकी इथे थंडी पडत नाही. मी मात्र गेल्या हिवाळ्यात तिथे खुशीने गेलो असतो. येथे माझी पेटी मी थोडेसे कोळसे पेटवून उष्ण करू शकतो. मग हिवाळा तितका असह्य होणार नाही. माझ्या पेटीबद्दल मला विलक्षण आस्था वाटू लागली आहे. वाटेल ती तापदायक सोबत असण्यापासून मुक्तता मिळणे हाच केवढा जीवविसावा आहे. तसे पाहिले तर कितीही चांगला माणूस असला तरी त्याच्याबरोबर एका खोलीत राहणे मला कधीही आवडणार नाही. बरेलीत काही वेळी एक नव्हे तर मी पूर्वी वर्णन केलेल्या तीन इसमांच्या सोबतीने मला राहावे लागत

असे. त्या भयानक परिस्थितीत मला पुन्हा जीवन कंठावे लागणार नाही याचाच तुला आनंद होणार नाही का?

फुलांचे माझे पीक — लाल, शेंदरी, जांभळे नष्ट होत आहे. पण दुसरे त्योल्या तयार होत आले आहे. या वेळी फुले पिवळीधमक असतील. त्यानंतर कोणती? कल्पना कर—शेवंतीची. ही सारी फुलबाग माझ्या लहानशा खोलीसमोरच्या छोट्याशा आकुंचित पट्ट्यात फुलत आहे.

बरेलीला मला पुनः परत जावे लागणार नाही. याबद्दल कृतज्ञ होण्याचे आणखी एक कारण आहे. एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात जाताना ज्या पद्धतीचा अंगीकार केला जातो, तिच्याबद्दलच माझा आक्षेप आहे. वर्षानुवर्षे उंच उंच भिंतींनी वेढलेल्या जागेतून बाहेर पडून जगाचे दर्शन घ्यावयाची या बदलीमुळे संधी मिळत असली तरी मला या प्रवासाचा तिटकारा वाटतो. कारण त्यासाठी जी किंमत द्यावी लागते ती फार मोठी आहे. बदलीच्या वेळी कैद्याला साखळदण्डाने बांधण्यात येते. अवजड अशा लोखंडाच्या साखळ्या आपल्या घोट्यावर बांधल्या जाणे किती दुःसह असेल त्याची तूच कल्पना कर. त्यानंतर अशा वेषात जाहीर प्रदर्शन केले जाणे हे तर तिरस्करणीय आहे. जे राजबंदी कारावासात आपल्या पायाने चालत येतात आणि ज्यांना कारावास टाळावयाचा असता तर ते आज मुक्त असते, अशा कैद्यांच्या बाबतीत अशा तऱ्हेचा बंदोबस्त का करावा लागतो हे मला कळत नाही. ठीक आहे. मला वाटते ही एक प्रथा आहे. ती तशीच चालू ठेवली जात आहे. तथापि मला ती पसंत नाही आणि पुनः तो अनुभव घ्यावा लागणार नाही याचाच मला आनंद झाला आहे. बहुधा उरलेले दिवस मला इथेच काढावे लागतील. आता उरले आहे वर्षच. आतां वर्षे नव्हे तर महिने मोजायची वेळ आली ही केवढी आनंददायक घटना आहे, नव्हे का? देवा, महिनेसुद्धा किती अवघड वाटतात. पण ते महिने आहेत; वर्षे नव्हेत. ते असेच उडून जातील आणि प्रवासाचा अंत नजीकच्या टप्प्यात येईल.

परवाच मी कोठेतरी वाचले की, आढ्यता ही लहान माणसांना परमेश्वराने दिलेली देणगी होय. मी ज्या मोठेपणाचा घोष करीत होतो तो माझ्यामध्ये कुठे आहे? पण मी उल्लेख करीत होतो तो शारीरिक सुदृढतेचा नाही. ती आढ्यता नाही. माझ्यामध्ये जी खोलवर भावना रुजलेली आहे, तिचा तो उच्चार आहे. आता कळले तुला ना, मी काय म्हणतो ते. पुरुषी आढ्यतेचा तो आविष्कार नव्हे.

मला कळत नाही, हाइन्स आणि ऑगस्ट प्रदर्शनाला[1] गेले की नाही ? आणि त्यांना ते कसे वाटले? माझी जी भावना झाली आहे ती ही की, वीरपूजनाचा हा

१. कम्युनिस्ट इंटरनॅशनलची सातवी जागतिक परिषद.

नुसता एक महोत्सव होता — आणि देव तरी कसले ? नुसत्या शाडूच्या मूर्ती. डॅढिटला उच्च पदावर अभिषिक्त करण्यात आलेले दिसते.[1] ही कल्पनाच मुळी हास्यास्पद आहे. मला वाटले होते की, मार्क्सने आपल्याला शिकवले की इतिहास हा काही थोर माणसांकडून घडविला जात नाही. आणि इथे तर त्याचे भक्तगण वीरपूजा बांधण्यातच नुसते गर्क झालेले दिसत नाहीत तर त्यासाठी प्रत्यक्षपणे ...... वीर पुरुष निर्माण करीत आहेत. पण हीसुद्धा जुनीच कथा आहे. मानव प्रथम देव निर्माण करतो आणि नंतर त्याची पूजा बांधतो, आणि अशा रीतीने स्वतःची आणि आपल्या देवांचीही शोभा करून घेतो. तथापि मला आशा आहे की, काही तरी चांगले घडून येईलच. कटू अनुभव अगदीच वाया जाणार नाही. काही मनोरंजक घडा-मोडी घडत असल्याची अस्पष्टशी कुणकुण माझ्या कानी आली आहे. कडवट मनःस्थितीच्या आधीन होण्याचे टाळण्यासाठी माणसाने खूपच विनोदीवृत्ती धारण करायला पाहिजे खरी. आता, जगाने नाशच करून घ्यायचे ठरविले असेल तर आपण तरी काय करणार ? खरोखरी, मुसोलिनी जगाला आग लावण्यात यशस्वी झाला तर नाशापलीकडे दुसरे काय घडू शकेल ? आपण अशा परिस्थितीत कोठे तरी हिमालयाच्या पर्वत शिखरावर आपले जग उभारले पाहिजे.

४९

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
ऑक्टोबर २१, १९३५

मला स्वतःला एकाकीपणे राहणेच भाग पडत आहे—एकाकी ! विचार, आठवणी आणि स्वप्नात. चमत्कारावर माझा विश्वास नाही असे मी तुला लिहिले. खरोखर असे सांगण्यात अर्थच नव्हता. या दिवसांत अशा असंभाव्यतेवर कोण विश्वास ठेवणार आहे. चमत्कार करणारे लोक हे फक्त जादूगार असतात आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणारे लोक महामूर्ख ! बौद्धिक दृष्टीने मी असे मानतो की, चमत्कार या विकृतीच्या खुणा होत. भावनात्मक दृष्टीने मी कदाचित त्या श्रद्धेत आनंद मानीत असेन. परंतु कठोर चिकित्से-नंतर आपल्याला कळून आल्याशिवाय राहात नाही की ही भाबडी श्रद्धा आहे; तिची प्रेरणा अशक्याबद्दलची आकांक्षा हीच असते. मला कळत नाही की भक्तजन, ज्यांची पूजा ते बांधतात, त्यांच्यावर इतके ओझे टाकायला का प्रवृत्त होतात ? धार्मिक श्रद्धेतील मूलभूत दोष आहे, तो हाच की, ही श्रद्धा आत्मिक उन्नतीच्या नावाने मानवी आत्म्याला

---

१. डिमिट्रॉफची कम्युनिस्ट इंटर नॅशनलचे सरचिटणीस म्हणून नेमणूक झाली त्याला उद्देशून हे म्हटले आहे.

आध्यात्मिक गुलामगिरीत जखडून ठेवते. धार्मिक वृत्तीचे लोक आपल्या परमेश्वराला फसवा, भोंदू किंवा फ्रॉइडवादी विकृतीच्या आधीन झालेला बनवून त्याचा अधःपात तेवढा करीत असतात. ही सारी एकाच विकृतीची लक्षणे आहेत—मानवतेला पारखी होणारी.

अजून एक वर्ष उरले आहे. नाही, काही महिनेच. मोजावयाचे झाले तर दहा महिन्यांपेक्षा अधिक काळ उरलेला नाही असे मला वाटते. या अपेक्षेमुळे हिवाळ्याला तोंड देण्याच्या दृष्टीने तुझ्या अंगात अधिक उबदारपणा आल्याशिवाय राहणार नाही. अर्थात पॅरिसमध्ये डिसेंबरच्या सुमारास मध्यवर्ती उष्णतावाहक यंत्रणा बंद पडते आणि त्यामुळे हिवाळ्याची तीव्रता वाढते याची मला जाणीव आहे. पॅरिसमधील ग्रीष्म ऋतूच्या तापदायक हवेत तू दिवस कंठीत असताना सध्या इथे मात्र हवा खूपच प्रसन्न आहे. वर्षातील हे सर्वात चांगले दिवस. डिसेंबरपासून येथे पुन्हा पाऊस पडू लागेल; आणि मग माझ्या खोलीवर सुगंधी फवाऱ्याचा मारा करावा लागेल. सध्या मात्र हवा चांगली आहे आणि माझे मनही प्रसन्न आहे. साहजिकच मी खूप काम करीत आहे आणि निष्ठावान इचमनने पाठविलेल्या आधुनिक कादंबऱ्यांचाही आस्वाद घेत आहे. पण यातले बहुतेक उच्चभ्रू साहित्य किती हीन दर्जाचे आहे! बौद्धिक अंदाधुंदी, नैतिक अधःपात आणि आध्यात्मिक गोंधळ सध्या मी आल्डस हक्सलेची सर्वश्रेष्ठ कृती-पॉईंट कौन्टर पॉईंट-वाचत आहे. पण तसे तरी कसे म्हणू? मला वाटते सर्वोच्च सन्मान ॲन्टिक हे 'लाच द्यावा लागेल. किती भयानक साहित्य आहे ते. सारे सामाजिक, भावनात्मक आणि नैतिक प्रश्न फ्रॉइडच्या सिद्धान्ताच्या मुशीतून प्रगट झालेले दिसतात त्यात. मला वाटते, या साऱ्या साहित्यकृतीचे वर्णन 'स्पेंगलरवादाचे नाट्यरूप दर्शन' असे करता येईल. 'पाश्चिमात्य संस्कृतीच्या अवनतीचे' इतके समर्पक वर्णन दुसरे कोणते असू शकेल काय? फक्त सबंध संस्कृतीला-मानवी इतिहासात आजवर तरी सर्वश्रेष्ठ मानता येईल अशी-एका फटकाऱ्यानिशी बदनाम करणे मूर्खपणाचे ठरेल. ही साहित्यकृती तंत्रदृष्ट्या नमुनेदार आहे. पण हेतू? मला वाटते त्यातच तर तिची कलात्मकता आहे—निर्मळ कला! प्रचार नाही तर हे ठीकच आहे. पण कलाकार म्हणून नामवंत व्हायचे असेल तर निष्ठेची आच नको, द्रष्टेपणा तर मुळीच नको आणि दूरदृष्टीतून प्रगट होणारे आलेखनही नको. पण कलेच्या घरात माणसाला राहता येईल काय?

सध्याच्या साहित्याच्या अनवस्थेचे वर्णन एका माजी रशियन राजपुत्राने, नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या एका पुस्तकात यथार्थपणे केलेले आढळते. मी ते पुस्तक वाचलेले नाही, पण त्यावरील पुष्कळसे अभिप्राय मात्र वाचले आहेत. अर्थात धर्मान्तर केलेल्या माणसाच्या ईर्षेने त्याने लिहिले आहे. व्होल्गा मातेच्या चरणी लीन होण्यासाठी रशियात पुन्हा गेलेला हा राजपुत्र आहे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. ते काही असो. या

पुस्तकातील समीक्षेचा दर्जा उच्च प्रकारचा आहे. हक्सलेबद्दलची त्याची टीका कठोर आहे; आणि मला वाटते त्याचे उद्‌गार कोठल्याही दृष्टीने अनुचित म्हणता येणार नाहीत. सामाजिक अवनतीचे दृश्य म्हणजे लिंगविषयक ईर्षेचा उद्रेक होय. असे चित्र रंगविणे ही बौद्धिक विकृती नव्हे तर काय? व्हिक्टोरियाच्या काळातील संस्कृतीचा दोष म्हणजे दडपून टाकण्यात आलेले लैंगिक जीवन होय. आता निसर्ग त्याचा सूड्च घेत आहे. हक्सलेच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा (की निष्कर्षाचा) हा गाभा होय. मला मुळीच वाटत नाही की, टिकाऊ अशा बौद्धिक वा सांस्कृतिक कृतीचा यातून पाया घातला जाउ शकेल! हे कलाकार उत्स्फूर्त कलाकृतींचे महान रचनाकार मानले जातात! ठीक आहे. सुदैव माझे की माझ्या हीन प्रतीच्या साहित्यिक आवडीनिवडींचे समाधान करण्यासाठी डचमनने विचारी मनाने काही रहस्यकथाही सोबत पाठविल्या आहेत. माझ्या सामान्य प्रतीच्या भुकेसाठी उच्चभ्रू असे साहित्य फार महाग पडेल असे मला वाटते. किंवा विनयशीलपणा जरा कमी करून मी म्हणेन की, माझ्या साहित्यिक प्रवृत्ती अमर साहित्याकडेच झुकलेल्या आहेत. हे योग्य नाही याची मला जाणीव आहे, पण मी काहीसा जुन्या पठडीतीलच आहे. हार्डी किंवा गाल्सवर्दीसुद्धा मला व्हिक्टोरिया, एडवर्ड किंवा जॉर्जच्या काळातील समाजाच्या रचनेचे, प्रवृत्तींचे आणि विकृतींचे अधिक समर्थपणे दिग्दर्शन करू शकतील, जे या अती फ्रॉइडवादी, अतिरेकी आचारवादी आणि नवभावुक गूढवादी साहित्यिकांना करता येणार नाही. मग भले ते वास्तववादी किंवा क्रांतिवादी म्हणूनसुद्धा आपली टिमकी वाजवोत.

हो, सहज आठवण झाली. फिजिकल रिव्ह्यूमध्ये आइन्स्टाइनच्या युनायटेड फील्ड थिअरीचे अगदी अलीकडील स्पष्टीकरण प्रसिद्ध झाले आहे. तो अंक मला पाठविण्यासाठी अमेरिकेतील कोणाला तरी आग्रह कर म्हणून मी सांगितले होते. तू त्या बाबतीत कोणाला लिहिलेस काय? मला त्याची फार गरज आहे. कोणी तरी तो तातडीने पाठवील तर फार बरे होईल.

माझ्या मांजराबद्दल तुला इतकी आस्था वाटू लागलेली पाहून मला फार आनंद झाला. मीसुद्धा त्याला बरोबर नेण्याचा विचार केला होता. ते फार सुरेख मांजर आहे. पण स्वतःच्या इच्छेनुसार वागणारे ते आहे. माणसाळावयाला ते तयार नाही. ते आपल्याच ऐटीत सर्वांच्यापासून अलग वागत असते; आणि कोणाकडून लाड करून घ्यावयाला ते तयार नसते. आश्चर्य म्हणजे ते माझ्या बिछान्यात येऊन झोपत असे. पण तुला मात्र त्याचे दर्शन केवळ त्याच्या 'आठवणी'तच मिळेल. सध्या विश्वविद्येत अवगाहन चालले असल्यामुळे ते लेखन काही काळ मी थांबविले आहे.

टिटियन केसाच्या मुलीबद्दल तुला कसे काय कळले? चरित्र-लेखनासाठी तू साहित्य गोळा करीत आहेस की काय? पण एका तपशिलाबद्दल मला प्रथमच खुलासा करू दे. तिचे डोळे घारट हिरवे नव्हते, ते लाल गहूवर्णी होते. माझ्या मांजराच्या

आठवणीच्या संदर्भात मी गारट्रूड स्टाइनचा—थोर पण सुंदर नव्हे—उल्लेख केला. अमेरिकन नागरिकत्वाचा त्याग केलेली स्त्री जवळजवळ पाव शतकपर्यंत ' क्वार्टियर लॅटिन ' विभागाची अधिष्ठात्री होती. त्या काळात आधुनिक कलात्मक तारांगणात ती चमकली. इतकेच नव्हे तर पिकॅसोपासून हेमिंग्वेपर्यंत तिने विख्यात कलावंतांच्या साऱ्या संचाचे कधी पत्नीपद तर कधी प्रेयसीपद तर कधी मातृपद भूषविले. सर्वसाधारण मर्त्य जीवांच्या ती तेवढी परिचयाची नाही. कारण ती जे लिहिते ते त्यांना कळत नाही. याचे कारण तिने स्वतःच असे सांगितले आहे की, ती बोलते तशीच ती लिहिते. पण अलीकडे मात्र तिने सामान्यांच्या जगात आपली छटा उमटविली आहे, आणि तेव्हापासन आजवर जे अनाकलनीय ' भाष्य ' असे, त्यात या जगाला अज्ञात असे साहित्य भांडार उघडलेले दिसू लागलेले आहे. ही काही अघटित घटना नव्हे. इतरही अशी उदाहरणे घडलेली आहेत की, जेव्हा एक तर ते लिहितात ते कोणालाच न कळल्यामुळे किंवा अगदी सामान्यातील सामान्य अशी बोधवचने त्यांनी म्हटल्यामुळे, त्यांना द्रष्टे अशी संज्ञा प्राप्त झालेली आहे. नीत्शे आणि जॉइस यांचा पहिल्या गटात समावेश होतो आणि आपल्या महात्म्याची दुसऱ्या गटात गणना होते. ' झरथुष्ट्र ' नाही तरी कोणाला कळत असेल बरे !

मलाही गेल्या जागतिक प्रदर्शनाचा परिणाम समाधानकारक वाटतो. फक्त बऱ्याचशा गोष्टी नुसत्याच चमकदार आणि वरवरच्या दिसून आल्यामुळे तसा आत्मविश्वास निर्माण होऊ शकला नाही. उत्स्फूर्त असे त्यात काही नव्हते आणि अनुभवातून धडा घेतल्याचा खंबीर पुरावाही त्यात मिळू शकला नाही. तथापि एका बंगाली म्हणीप्रमाणे मुळीच नसण्यापेक्षा आंधळा काका पुरवला. जे हाती आले आहे त्यातच आपण आनंद मानला पाहिजे. बौद्धिक स्वातंत्र्याचा अभाव हाच खरा शाप आहे, आणि या रोगाला काही वस्तुस्थितिनिष्ठ कारणे आहेत. तथापि हा रोग नाहीसा केल्याशिवाय खरे आरोग्य प्रस्थापित होणार नाही. माझे पूर्वीपासून हे मत होते आणि आजही ते कायम आहे. माझ्यावर ' बुद्धिवादी ' असल्याचा आरोप करण्यात येतो, पण लाचार स्तुतिपाठक होण्यापेक्षा तर ते अधिक तिरस्करणीय नाही ना ? स्वतंत्रपणे विचार करण्याचे धाडसही हवे; शास्त्रवचनांची पोपटपंची आणि वीरपूजन यांची जागा आत्मविश्वास आणि स्वमतप्रदर्शन यांनी घेतली पाहिजे. पण स्वत्व असल्याशिवाय ते कसे साध्य होईल ?

५०

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
नोव्हेंबर २०, १९३५

तू जे चैतन्यपूर्ण चित्र रेखाटले आहेस त्यावरून तू ज्या ठिकाणी विश्रांतीसाठी

गेली आहेस ते ठिकाण अगदी आदर्श असल्यासारखे दिसते. विशेषतः आदर्श जे लोकांत सहजपणे मिसळू शकत नाहीत किंवा आपल्या सोबत्यांची जे कटाक्षाने निवड करतात त्यांच्यासाठी. खरे सांगावयाचे तर, मी म्हणतो आहे ते अशा लोकांबद्दल की ज्यांना स्वतःचीच सोबत आवडते किंवा दुसरे कोणी असलेच तर ते अगदी निकटवर्ती —इतके की भूमितीचे अंतरसुद्धा तेथे निरर्थक ठरते आणि किमान बंधनसुद्धा तेथे सहन केले जात नाही. मी युरपच्या त्या कोपऱ्यात कधीच गेलेलो नाही. मला अज्ञात असलेल्या अगदीच थोड्या ठिकाणांपैकी एक म्हणजे सुप्रसिद्ध बास्क किनारा कायमचा माझ्या आठवणीतून काढून टाकणे मला शक्यच नाही. अर्थात काटेकोरपणे तसा तो सुप्रसिद्ध राहिलेलाही नाही. शिवाय, भौगोलिक दृष्टीने मी बास्क भूमीवर पाऊल टाकलेलेच आहे. तो प्रदेशमात्र स्पेनच्या किनाऱ्यावरील होता. आणि तू जेथे होतीस त्याच्या काटकोनात तो वसलेला आहे. कित्येक युगांपूर्वी मी सांटान्डेर येथे काही दिवस काढले आहेत. माजी राजे अल्फान्सो यांचे समुद्रकिनाऱ्यावरील विश्रांतिस्थळ होते ते. एक मेक्सिकन राजनैतिक वकील आणि त्याची पॅरिशियन पत्नी यांच्या सहवासात मी असल्यामुळे, अर्थातच मी तेथील आलीशान राजवाड्यात मुक्काम केला होता. म्हणजे तू आणि मी मिळून बास्क किनाऱ्याचे समग्र दर्शन आपल्याला झाले असे म्हणावयास हरकत नाही.

तथापि अत्यंत आवश्यक असलेली तुझी विश्रांती अपुरीच राहिली, ही दुःखाची गोष्ट आहे. गेल्या वर्षीसुद्धा इंग्लंडमधील तुझ्या विश्रांतीवर पावसानेः पाणी टाकले. आठवण झाली म्हणून विचारतो, गेल्या वर्षीच्या तुझ्या विश्रांतीत व्यत्यय आणणाऱ्या हिंडेनबुर्गच्या चरित्राचे काय झाले ? होय. वादळीच नव्हे तर झंझावाती हवा समुद्रकिनाऱ्यावर असेल तरी ती विलक्षण स्फूर्तिदायक होऊ शकते. फक्त ऊबदार आणि आरामशीर अशा निवाऱ्याच्या ठिकाणातूनच ते रम्य गंभीर दर्शन घेतले पाहिजे. साधुवृत्तीच्या हॉस्पिसने तुला ही सुस्थिती मिळवून दिलेली दिसते. पॅन्हिलियाँ सेंट थेरसेमध्ये तुला साधूचे जीवन तर त्यासाठी कंठावे लागले नाही ना ? मला वाटते बोर्योपासून ते स्थान फारसे दूर नसावे. म्हणजे उंची मद्याची उणीव तुला भासावयाला नको आणि खेळकर बास्क लोक मोठे गुलहौशी असतात. ह्यूगोचा डार्टा हासुद्धा बास्कच होता ना ? की नाही ? किनाऱ्यावर शिंपले गोळा करण्याच्या तुझ्या छंदावरून मला आठवण झाली, मी गेल्या वर्षी अलमोड्याला जे सुंदर दगड जमविले त्यांची. मला बरेलीला परत पाठविण्यात आले तेव्हा ते मला तेथेच सोडून जावे लागले. आल्प्स किंवा पिरीनीज या पुरातन पर्वतराजींशी तुलना करता हिमालय हा बाल्यावस्थेतच आहे. भूगर्भशास्त्राच्या भाषेत तो परवाच सागरातून बाहेर आला. पण त्याच्या उंचीच्या मानाने आल्प्स आणि पिरीनीज हे अगदीच बुटके. तथापि बाल्यावस्थेत असल्यामुळे हिमालयात तसे खडक आढळून येत नाहीत. मला काही काचमणी मात्र आढळले. स्फटिकासारखे

स्वच्छ. तसेच लाल शिरा असलेले काही हिरवेगार दगडही मला आढळले.

त्यावरून मला आठवण झाली की, दोन वर्षांपूर्वी बिहारमध्ये भूकंप झाल्यानंतर ऑगस्टला त्याची कारणमीमांसा हवी होती. त्यानंतर त्या प्रदेशात पुनः एक भूकंपाचा धक्का बसला. भूप्रदेशाच्या दृष्टीने तो विस्तृत नव्हता, पण त्याची तीव्रतामात्र अधिक होती. या दोन घटना एकाच विभागात इतक्या नजीक घडाव्या हे तसे अनैसर्गिकच होते. साहजिकच त्यातून निघालेल्या पुराव्याच्या आधारे भूगर्भशास्त्रज्ञांनी काही शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्या शोधाचा निष्कर्ष साधारणपणे ग्वांदवाना लँड सिद्धान्ताशी मिळताजुळता आहे. त्या निष्कर्षावरून ठामपणे असे सिद्ध झाले की, उपमानव म्हणता येतील अशा माकडांच्या तिन्ही जाती त्या विभागात राहात होत्या. ते इतके जवळचे असले तर माणसाच्या मूळ जन्मस्थानाबद्दल ( लामूरिया ) हेकेलने जी कल्पना केली आहे तिला पाठबळ मिळेल, आणि मध्य आशियातून माणसाचे स्थलांतर सुरू झाले या कल्पनेचा निश्चितपणे त्याग करावा लागेल. माणूस हा मूलतः काळा होता बरे! गोरा नव्हता. हिटलरला केवढा धक्का बसेल नाही? विशेषतः बाल्टिक ( ज्यू ? ) रोझेनबर्गला. पण पुनः मूळ विषयाकडे वळता, या भूकंपामुळे मानवजातीच्या लज्जास्पद वांशिक परंपरेला पाठिंबा देणारा अधिक खंबीर भूगर्भिक पुरावा मिळत असलेला दिसत आहे. त्यातील लुप्त झालेला दुवा कदाचित हिंदी महासागराच्या तळाशी पुरलेला आढळून येण्याचा संभव आहे. हिंदी लोकांना नीग्रो लोकांशी इतका नजीकचा संबंध जुळलेला आवडणार नाही. पण प्रत्यक्ष संबंधित आहेत ते दक्षिणेकडील द्राविडी लोक. उत्तर भारतीय हे आर्यन पंथाचे अगदी कडवे पुरस्कर्ते आहेत. दुर्दैव तरी पाहा, त्यांचा रंग इतका सावळा आहे की, अनेक वेळा त्याची काळ्यातही गणना होऊ शकते. तरीसुद्धा त्यांची अशी दृढश्रद्धा आहे की, त्यांचे पूर्वज मध्य आशियातून उगवले आणि बर्फासारखे गोरे होते! दोष आहे तो उष्णकटिबंधातील सूर्याचा. त्यांना जर कळून आले की, स्थलांतर झाले ते उलट्या दिशेने तर केवढा धक्का बसेल त्यांना! पण ते अधिकच ऊर्जस्वल होणार नाही का? मग भारताला मानवतेच्या तशाच संस्कृतीच्या उगमस्थानाचे श्रेय मिळेल. राष्ट्रवाद हा ऐतिहासिक सत्याकडे पाठ फिरवून इतिहासाची कशी रचना करील याचा काय नियम! पण त्यांना कधीही या चिरंतन सत्याची साक्ष पटणार नाही की विश्वास कितीही दृढ धरला तरी त्यातून सत्य सिद्ध होईल असे मुळीच नाही. हा सारा न्यूनगंडाचा प्रभाव आहे. राष्ट्रवाद हा फ्रॉइडवादी आचाराचाच आविष्कार आहे.

फ्रॉइडवादी आचारावरून मला आठवण झाली. परवा मला एक अपूर्व असे स्वप्न पडले. तशी मला स्वप्ने क्वचितच पडतात. कधीमधी दिवसा पडत असतील तीच. तू म्हणशील वास्तववादी! होय. अजूनही ती संज्ञा मला लागू पडेल–संकटपरंपरा त्यामुळे माझ्यावर कोसळली असूनही. बरे पण आतां स्वप्नाबद्दल सांगतो. आपल्या पुनर्मीलनाचे हे स्वप्न पण कोठे? कल्पना करू शकतेस का? नाही, शक्य नाही. पुनर्मीलन एथियो-

पियात—नेगसचे अतिथी म्हणून. आता या विचित्र स्वप्नाचा अन्वयार्थ तरी कसा लावावयाचा ? फ्रॉइडसुद्धा इथे हरला आहे. माझ्या मनातील विकल्पाशीही मला संबंध जोडता येत नाही. शिवाय विकल्प म्हणे सूड घेत असतात--जशी कांद्याच्या लोणच्या-बद्दलची अप्रीती. खरे ना ? मला वाटते आपल्या शेजाऱ्याच्या पत्नीबरोबर पळून जाण्याची जी दडलेली भावना सुप्त असते तिच्याबद्दलचा विशिष्ट तिरस्कार हा पुरावाच आहे. ते असो म्हणा. कधी मनात कल्पनासुद्धा नसेल अशा त्या ठिकाणी आपण दोघे गेल्याचे मला किती स्पष्टपणे दिसले. अर्थात एथिओपिया अलीकडे या ना त्या प्रमाणात सर्वांच्याच अन्तःकरणात घर करून बसला आहे. आणि बहुधा अन्तर्मनात त्याचे पडसाद उठलेही असतील. पण तेथे जाण्याची इच्छा अगदी कोठल्याही रीतीने माझ्या मनात प्रगट होण्याची शक्यता नसताना माझ्या अन्तर्मनात हा उमाळा कसा येऊ शकेल हे मला कळत नाही. शिवाय खोलवर रुजलेल्या एखाद्या रोगाचे निदान, या-पेक्षा मुसोलिनीच्या आफ्रिकेतील पलायनवादी साहसाला मी जास्त महत्त्व देत नसल्या-मुळे माझी मनःशांती फार भंगली आहे असेही नव्हे. खात्रीने आणखी एका पुराण्या संस्कृतींच्या--तिला रानटी म्हणणेच अधिक सोइस्कर होईल--रक्षणासाठी बायरन-सारखे कंकण बांधण्याइतका वेडाचार करण्याची प्रेरणा मला तरी खास झालेली नाही. गरीब बिचारे अॅबिसीनियन लोक विसाव्या शतकातील सीझरकडून पुराण्या साम्राज्याच्या धर्तीवर--'सुसंस्कृत' केले गेले काय ? किंवा शेबाच्या राणीच्या प्रियकरांच्या वारस-दाराकडून त्यांना रानटीपणात कायमचे डांबले गेले काय ? त्यात त्यांच्या दृष्टीने मोठासा फरक तो काय होणार ? नाही तरी त्यांचे मरण हे ओढवलेलेच आहे. 'सुसंस्कृतीचा राक्षस आणि रानटीपणाचा अथांग सागर' या दोन संकटात ते सापडलेले आहेत. त्यांना स्वतःलाच निर्णय घेऊ दिला तर ते बहुधा अथांग सागराची भीषण शांतताच पसंत करतील--केवळ सवयीचा प्रभाव. भारतात तरी काय ? आपल्याला जे चमत्कारिक दृश्य दिसत आहे ते ऑक्सफर्ड पदवीधर 'महात्मा गांधी की जय' हा जयघोष करीत असल्याचे--आदर्शवादी तेजोवलयाने उजळून निघालेल्या भूतकाळाकडे धाव घेण्याची वृत्ती दुसरे काय ? मला या साऱ्या महाभागांना ग्रामीण जीवनातील 'आदर्श' परि-स्थितीचा आस्वाद घेण्यासाठी पाठवावेसे वाटते ! अर्थात उभ्या महिन्यात एखादे जेवण-सुद्धा न घेता जसे ग्रामीण भागातील लोकाना राहावे लागते तसे जगण्याची मात्र मी त्यांच्यावर सक्ती करीन. सारे जग कसे मूर्ख, आचरट, दांभिक, भोंदू लोकांनी भरले आहे. मन व्यथित करणारी परिस्थिती आहे खरी.

तथापि हे स्वप्न कसे तरी साकार झाले तरी माझी त्यास हरकत नाही. आपल्या मीलनातून जो आनंद निर्माण होईल तो एथिओपिया आणि त्याच्या वेदनांचे सावट सहजपणे नाहीसे करण्याला खात्रीने समर्थ ठरेल. कदाचित दुःखाअंती सुखाचा हा आस्वाद घेण्यासारखेही होईल. स्वप्नातील नेगस हा स्त्री-दाक्षिण्यात अगदी प्रवीण

दिसला. त्याच्या लढ्ढ सम्राज्ञीला त्याचे एवढे तरी वैषम्य वाटले. काय विचित्र घटना आहे तरी ही! मी म्हणतो स्वप्न. मला कधी काळी स्वप्न पडले तरी त्यातील आशय मला कधी आठवत नाही. अंधुकशा आठवणी ज्या तरळत राहतात त्यामुळेच स्वप्न पडण्याची जाणीव होईल तेवढीच. पण हे स्वप्न कसे ताजेपणाने माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले. त्यातील राजवाड्याचे शिल्प, खोल्यांची रचना वगैरे वगैरे गोष्टी कशा माझ्या डोळ्यासमोर साकार झाल्या, आणि विशेषतः आकर्षणाचे जे केंद्र म्हणजे पॅरिसमधील ती पाहुणी, तिच्या हालचालींची चित्रे तर प्रत्यक्षपणे घडावी तशी माझ्या मनश्चक्षूंसमोर उभी राहिली. जणू ही पॅरीसची पाहुणी, जगाला कोड्यात टाकणाऱ्या मॉंशूर लॅव्हालची खास वकीलच होती की काय? मॉंशूर लॅव्हाल तरी पाहा. एकाच वेळी हा मुत्सद्दी दोन घोड्यांवर आरूढ झाला आहे आणि आपल्या यशस्वी ठरणाऱ्या राजनीतीने एकीकडे ॲबिसीनियाचे पाय मागे ओढीत आहे तर दुसरीकडे जिनिव्हातील फसव्या संघटनेला चारित्र्यहीन बनवीत आहे. राजनीतीचा हा आविष्कार जगाला कोड्यात टाकील नाही तर काय? आणि कोण जाणे, पॅरिसच्या प्रीफेक्टशी तुझे जे नाते जुळले आहे त्यामुळे रहस्यमय माताहारीचे वलयसुद्धा तुझ्याभोवती निर्माण होण्याचा संभव आहे. अति-सुसंस्कृत तरुणीचा जो तू उल्लेख केला आहेस, तिचा काका चिआपे तर नव्हे? तो आता प्रीफेक्ट नाही हे खरे. पण क्षणिक अधःपातानंतर तो एक पायरी वर चढलेला दिसत आहे. म्हणजे हे रिश्ते-नाते काही झाले तरी विलक्षण आदरणीय ठरणार आहे. —अगदी दुःखपर्यवसायी स्टॅव्हिस्कीपर्यंत त्याचे धागेदोरे पोचणारे! माझ्या स्वप्ना-बद्दल तुला काय वाटते ते जरूर लिही.

सध्या माझ्याजवळ भरपूर पुस्तके आहेत. काही शास्त्रीय ग्रंथ मी सरळ मागवून घेतले. ते मिळावयाला वेळ लागला पण अखेरीस माझ्याजवळ तात्काळ आवश्यक असलेले सारे साहित्य जमले आहे, आणि गेल्या हिवाळ्यात व उन्हाळ्यात जो काही खंड पडला तो भरून काढण्याच्या दृष्टीने माझ्या कामात चांगली प्रगतीही होऊ लागली आहे. आता जो ग्रंथ तयार झाला आहे तो नियोजित ग्रंथापेक्षा कितीतरी मोठा झालेला आहे. गेल्या वर्षी अल्मोड्याहून मी ज्या पुस्तकाची अनुक्रमणिका पाठविली त्यावरही माझे काम चालू आहे. त्या पुस्तकाचा आशय इतका वाढला आहे की, त्या पुस्तकाचा मथळा "फिलॉसफी, रिलिजन ॲण्ड सायन्स" अशा प्रकारचा काहीतरी व्यापक देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. "आधुनिक शास्त्रीय संशोधनाचे तात्त्विक परिणाम" हे प्रकरणसुद्धा इतके वाढले आहे की, दहा प्रकरणांच्या एका मोठ्या पुस्तकांत त्याचे रूपान्तर करता येईल. सबंध ग्रंथच बहुधा तीन खण्डांत प्रसिद्ध करावा लागेल. किंवा एका मालेतील तीन निरनिराळी पुस्तके म्हणून त्यांची रचना करावी लागेल. सध्याच्या युगात तिहेरी ग्रंथलेखनाची जी पद्धती पडली आहे तिला मीही बळी पडलेला दिसत आहे.

पॅरिसमधील हवा कशी आहे ? हिवाळ्याने आपले उग्र रूप दाखविण्यास एव्हाना सुरुवात केलीही असेल. इथे मात्र कल्पनातीत प्रसन्न हवा आहे. येथील हिवाळामात्र पॅरिसच्या धर्तीवर असतो म्हणजे पाऊस खूप पडतो. पण या अखेरच्या दिव्यातून मी कसा तरी बाहेर पडेन. सध्या माझी शेवंती भरघोस फुलली आहे. ही जात फार चांगली नव्हे. अगदीच बारीक आहे. पण तिचा पिवळाधमक रंग डोळ्याचे पारणे फेडणारा आहे.

आपल्या मित्रांची हालहवाल कशी आहे ? अर्थात विशेष काही सांगण्यासारखे नसेलही. पण वृत्तपत्रांतून आणि मासिकांतून ज्या वार्ता प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांतून साधारणपणे समग्र चित्र मी मनापुढे उभे केले आहे. ते अगदीच निराशाजनक नाही. थोडेसे समाधान मानावयाला हरकत नाही, अशा प्रकारचे ते आहे. बँडिटबद्दल काय सांगू ? आदेशानुसार तो बोलला. उद्या आदेश बदलला तर तो दुसरी भाषाही बोलू लागेल. ही पद्धतीच मुळात दुष्टपणाची आहे.

वागणुकीची पद्धती तरी किती हीनपणाची आहे पाहा–तिरस्करणीय शत्रूंना मिठ्या मारावयाच्या आणि जुन्या तावून सुलाखून निघालेल्या मित्रांना लाथाडावयाचे. मला वाटते आणखी कटु अनुभवातूनच काही धडा शिकला जाईल तो खरा ! बिली तुझ्याशी इतका मोकळेपणाने कसा बोलतो ? भविष्याची चिंता करू नकोस. आपण पाहून घेऊ.

आजारी असलेल्या बाईंचे पती[1] लंडनला गेले होते. ते नुकतेच परतले. तू त्यांना भेटली असशील तर फार बरे होईल. पण ते पॅरिसला गेले असे मला वाटत नाही.

आणखी एक वर्ष उलटले. आपण एकमेकापासून दूर झाल्याला आणखी चार दिवसांनी पाच वर्षे पुरी होतील; आणि वर्षापेक्षाही कमी दिवस आता उरले आहेत. दुःखदायक अशा गोष्टी असूनही या अपेक्षेमुळेसुद्धा प्रफुल्लित व्हावयाला हरकत नाही. जीवन आहे हे असे आहे. ते जास्तीत जास्त सुखकर करणे हे आपले काम आहे. जीवनातील सारी निष्ठुरता आणि कुरूपता ध्यानी घेऊनही ते कसे सुंदर बनविता येईल याचा तोडगा निश्चितपणे आपल्यापाशी आहे.

## ५१

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
डिसेंबर २१, १९३५

आणखी एक वर्ष जवळ जवळ संपत आले. पाच वर्षांपेक्षा अधिक काळ ! विश्वास

---

१. जवाहरलाल नेहरू.

बसणे कठीण आहे. मध्यंतरी वाटेल ते घडले असले तरी काळ धावतच राहिला. पण आता मला एक विचित्र अनुभव येऊ लागला आहे–काळाच्या आध्यात्मिक प्रवृत्तीविषयी एक नवा दृष्टिकोण. प्रत्येक दिवस किती झपाट्याने निघून जातो. धावत्या गाडीतून जाताना आपण तारेचे खांब न्याहाळतो ना तसा. ही कल्पना माझी नाही हं–शॉची. पण दिवस एकत्रित केले की ते किती हळू जात आहेत असे वाटते. महिन्याचे दिवस तितकेच असूनही ते महिने रेंगाळत असल्यासारखे वाटतात. हा अनुभव तरी कसला? मला वाटते, 'विश्वयंत्रणेतील चमत्कृतीचा'च मी अनुभव घेत आहे. ही चमत्कृती कोणती माहीत आहे? ही चमत्कृती ही की, अधिक वेगाने जाणाऱ्या गोष्टींना वेळ अधिक मंदपणे जात असल्याचे दिसून येते ही होय. तसे पाहिले तर हा विरोधाभास आहे. मला तो अनुभव कसा येणार? कारण त्यासाठी प्रकाशाच्या वेगाशी जुळत्या अशा वेगाने मला जावे लागेल. पण त्या अनुभवाचे अतिशय साधे स्पष्टीकरण मी करू शकतो. जोवर मी वर्षांच्या हिशोबाने काळ मोजत होतो तोवर महिन्यांची मोजदाद आपोआपच होत असे. आता मी महिने मोजू लागल्यामुळे ते आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देऊ लागले आहेत. बिचाऱ्यांना लाभू दे ते समाधान. त्या अस्तित्वाची खूण पटवून देताना ते थोडेसे खुनशी झाले तरी ते क्षम्य मानले पाहिजे. तत्त्वज्ञांनी काळाला जरा अनादराने वागविले. आमच्या आध्यात्मिक पूर्वजांच्या उधळेपणाची आपण भरपाई केली पाहिजे, आणि काळाने चालविलेल्या आक्रमणाकडे सहनशीलतेने पाहिले पाहिजे. मी काळाबद्दल म्हणतो; काळपुरुषाबद्दल नव्हे. त्याच्यावर कसेही झाले तरी काही काळ आपण मात करू. आपल्याला तसे वाटेपर्यंत केवळ त्याच्या अविचारी वा परंपरागत आदेशानुसार आपण वृद्ध होणार नाही. या पाच वर्षांच्या बाबतीत त्या हुकूमशहाला मी माझी खास फसगत करू देणार नाही. जीवनातील प्रवाहातून आकस्मिकपणे जेव्हा मला बाजूला सोडण्यात आले तेव्हा मी जसा होतो तसा तरुण, निदान त्यापेक्षा अधिक वृद्ध नव्हेच, असा मीही वर्ष संपताना राहीन.

तू आपल्या प्राथमिक साहित्य कृतीबद्दल जे लिहिले आहेस त्याबद्दल मला बरेच कुतूहल निर्माण झाले आहे. ती पत्रे हस्तगत करणे तुला शक्य होणार नाही काय? धर्मपंथाकडे वळलेल्या त्या दंतवैद्याचा ठावठिकाणा तुला सहज शोधून काढता येईल. एवढेच की प्रभु येशूच्या सत्याचा शोध घेण्यात बरीच प्रगती करून तिने ख्रिस्ती सेविकाश्रमाचा रस्ता धरला नसला म्हणजे मिळविली. तू तत्त्वज्ञानाची जी व्याख्या केली आहेस ती रूढ कल्पनेपासून फार दूर नाही, विशेषतः हे तत्त्वज्ञान जर्मन अध्यात्माशी निगडित असताना. तथापि कान्ट हा खात्रीने, त्यांपैकी सर्वांत वाईट नव्हे. अलीकडे मी 'कान्ट स्टुडियेन' या पुस्तकाशी काहीशी झटापट करीत आहे. नव कान्टवादी मार्गाकडे झुकण्याची यात भीती मुळीच नाही. हा अभ्यास मी करीत आहे तो नवोदित 'मनोद्रव्य सिद्धान्ता'ची (माईंडस्टफ) कल्पना करून घेण्यासाठी. या सिद्धान्ताचा

उगम आधुनिक भौतिक संशोधनातून, विशेषतः 'क्वॉन्टम् फिजिक्स' मधील संशोधनातून झाला आहे असे समजले जाते. भौतिक आशयाच्या कल्पनेची जागा घेण्यासाठी मनोद्रव्य सिद्धान्त पुढे आला आहे असे थोडक्यात सांगता येईल. ही जी नवोदित चूष आहे तिच्यात नवीन असे काही नाही हे मी दाखवून दिले आहे. अर्थात कॉन्टम मेकॅनिक्सने आशयाच्या कल्पनेत जी क्रांती घडवून आणली आहे तिच्यातून या सिद्धान्ताचा उगम झालेला नाही. तो कान्टच्या अनुमानवादाचा किंवा लिबूनिझचा एकाणुवाद व बर्कुलेचा भावुक कल्पनावाद यांच्या मिश्रणाचा प्रतिध्वनी होय. 'कान्ट स्टुडियेन' हे पुस्तक कान्टविरुद्ध कान्टची भूमिका तयार करण्यासाठी आवश्यक होते; त्यातून सिद्ध होत आहे ते हे की, आधुनिक मनोद्रव्य सिद्धान्ताचे खंडन कान्टच्या अनुभववादातील प्रत्यक्ष घटकातून सुद्धा होऊ शकते.

मला अजूनही असे वाटते की, आत्मविसर्जनाकडेच तुझी मनःप्रवृत्ती झुकलेली आहे. शिवाय तुला हेही माहीत असेल की, आपल्या बऱ्याच मित्रांच्या अन्तर्मनात साधारणपणे मी म्हणतो—स्त्रीविषयक परंपरागत कल्पनाच घर करून राहिलेली आहे. अगदी अनपेक्षित ठिकाणीसुद्धा मला हेच गतानुगतिकत्व आढळून आले आहे. कोणी तरी मला एकदा म्हटले की, मी युरोपियनांपेक्षाही अधिक युरोपीय आहे. कारण काय ? तर जेथे कधीही संशयसुद्धा येणार नाही अशा लोकांमध्ये सरंजामशाही युगाचे अवशेष मला आढळून आले म्हणजे मला अगदी चीड येत असे म्हणून. व्यक्तिगत जीवनात आपले मित्र अगदी अपवाद वगळले तर, स्वायसर ( म्हणजे सांस्कृतिक दृष्ट्या मध्यमवर्गीय ) असतात हे तू कधी पाहिले आहेस काय ? पाहिले असणारच. हे वैशिष्ट्यच आहे. ते लक्षात आल्याशिवाय कसे राहील ? सरंजामशाही संस्कृतीचे सरळ वारसदार असण्यात काही फायदा असतो. मी त्यातलाच एक आहे आणि मला तो फायदा मिळाला आहे असे वाटते. भूतकाळ मरून नामशेष झाला असेल तर त्याचे दफन करणे सोपे असते. त्याचा सापळा कपाटात कोंडून ठेवला असला तरी तो सहज बाहेर काढता येऊन खिडकीबाहेर फेकून देता येतो. जीवंत चैतन्यपूर्ण संस्कृतीची गोष्टमात्र वेगळी आहे. ती पुरून टाकावयाची असेल तर तिच्या गळ्याला आधी तात लावायला पाहिजे. आणि तुला माहीत आहे की, परंपरेच्या मुशीतून निघालेल्या स्त्रीचा प्रश्न उद्‌भवला की, बौद्धिक दृष्ट्या चिकित्सक असलेले आघात अन्तर्मनापर्यंत पोचतही नाहीत. स्त्रीच्या परंपरेचे उदाहरण काय देऊ ? तुला इतिहास माहीतच आहे. एक काळ असा होता की, हौरीच्या प्राप्तीसाठी जेव्हा खिस्त धर्मीयांचे जथे इस्लामी स्वर्गभूमीवर हल्ला करायला बाहेर पडत असत तेव्हा आपल्या प्रेयसीचे चारित्र्य ते कड्याकुलपात बंदिस्त करून ठेवीत असत. हेवा ही मालकी हक्काच्या भावनेतून निर्माण होणारी प्रतिक्रिया आहे आणि आधुनिक माणूसही आपल्या मध्ययुगीन पूर्वजांच्या इतक्याच ईर्षेने आपल्या स्त्रीवर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. पूर्वीप्रमाणे तो आपल्या प्रेयसीचे मन चोरणाऱ्या

माणसाला शस्त्र घेऊन दोन हात करण्याचे आव्हान देत नाही हे खरे आहे, पण काही महामूर्ख कॉफीपात्र किंवा मद्याच्या सुरेख बाटल्या यांच्या साहाय्याने नाट्यपूर्ण प्रसंग घडवून आणल्याशिवाय राहात नाहीत. तथापि अनेकवेळा देखाव्यासहित ज्या वेदना सहन केल्या जातात त्या विद्ध अहंकारातून निर्माण झालेल्या असतात. आपल्या मालमत्तेला पारखे व्हावयाचे आणि ते का ? तर म्हणे तुझ्या मानाने ती फार मोलाची होती आणि तू ती गमावलीस, त्याचे कारण तुझी तेवढी लायकीच नव्हती ! आता ही कारण-मीमांसा पचनी पडणे खरोखरच कठीण आहे. मानसचिकित्साशास्त्रातील एका गुंतागुंतीच्या प्रश्नावर का कोण जाणे, मी उगाचच आपले मत प्रगट केले आहे.

माझ्या मनात विचार येतो, प्रेमात हा केवढा स्वार्थ गुंतलेला असतो तरी ! तो निरिच्छ स्वार्थ असता, म्हणजे मालकी हक्काच्या हीन भावनेपासून तो अलिप्त असता तर काही हरकत नव्हती. तसे पाहिले तर स्वार्थीपणा हा सर्वस्वी टाळणे शक्यच नसते. आपल्या अस्तित्वाचाच तो मूलभूत घटक आहे. आपण असणे आणि स्वार्थी नसणे हे अशक्य कोटीतीलच आहे. आपल्या अस्तित्वाच्या जाणीवेशीच स्वार्थ निगडित आहे. निस्वार्थीपणाची घोषणा करणे हा भोंदूपणाचा कळस होय. जणू आत्महत्येनंतर जिवंत राहू शकतो आपण ! अर्थात जे या गुणांची महती गातात ते प्रत्यक्ष व्यवहारात तो गुण कधीच प्रगट करीत नाहीत. कारण त्यांनी तसे केले तर त्यांच्या कंटाळवाण्या शिकवणुकीचा अंतच होईल.

विलीशी तुझा संवाद झालेला जो तू मला कळविलास त्यावर खरोखर विश्वास बसणे कठीण आहे. इतक्या हीन पातळीला लोक कसे जाऊ शकतात हेच मला कळत नाही. इतक्या सूडबुद्धीने वागण्याची त्यांना गरज नाही. हाइन्झ आणि ऑगस्ट यांच्या आशावादाबद्दल ऐकून मला आनंद झाला. हीन कारस्थानांच्या वातावरणात आशावादी राहण्याला फार मोठी निष्ठा आणि त्या निष्ठेतून येणारे धैर्य लागते. तुझ्या भाग-भांडवलाबद्दल तो काय करू शकतो हे विलीला विचार. रीतसर व्यवहार म्हणून योग्य भावाने ते घेण्याला त्याची तयारी आहे काय ? की बाजारात ज्या अंतस्थ व्यवहारातून चढ-उतार घडवून आणले जातात त्यानुसार भाव पाडून घेण्याचाच तो विचार करणार आहे ? तू त्याला सरळ प्रश्न केलास तर त्याची परिस्थिती काहीशी अडचणीची होईल. मला वाटते, तुझ्या भाग-भांडवलाच्या सामर्थ्याची त्याला जाणीव असावी; आणि त्याच्या कक्षेतच हा व्यवहार येत असावा. अर्थात अडचणीत टाकणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्याचा अधिकार त्याच्याकडे सुपूर्द केला गेला असेल तरच त्याला या व्यवहाराची सांगता करणे शक्य आहे. सभोवार जो क्षुद्रपणा पसरला आहे तो खरोखरी मन व्यथित करणारा आहे. त्यामुळे कदाचित आपल्या भवितव्याबद्दलच्या साऱ्या योजनेत आमूलाग्र बदल करणेही मला भाग पडेल. तसे झाले तर माझी योजना तुझ्या माझ्या पुरतीच मर्यादित राहील. मग भले जग खड्डयात जाईना का ? अडचण आहे ती एवढीच की,

भावुकतेच्या ओढीने कोणी फरारी होत असतील तर असोत, पण आपल्याला काही जगापासून दूर जाता येत नाही. तुझ्या आणि माझ्यामध्ये ही फसवणूक करून घेण्याची वृत्तीही नाही.

आइन्स्टाइनचा अलीकडील प्रबंध ज्यात प्रसिद्ध झाला आहे त्या 'फिजिकल रिव्ह्यू'ची प्रत माझ्याकडे पाठवावयाला तू 'जे'ला लिहिलेस का ? तो मिळण्याची मला फार उत्सुकता आहे. साधारणपणे सध्या माझ्याकडे भरपूर साहित्य आहे. फक्त काम करीत असताना अधूनमधून काही विशेष साहित्य मला हवेसे वाटते. पण तुटलेले दुवे सध्या तसेच राहू द्यावयाला हरकत नाही. बाहेर पडल्यानंतर मी ते जोडून घेईन. अलीकडे, एक सबंध प्रकरण लिहून तुझ्याकडे पाठविण्याचा विचार माझ्या मनात येऊ लागला आहे. म्हणजे ज्यादा काम झाले. प्रकरणे खूपच मोठी आहेत—सरासरी शंभर पाने. तथापि एखाद्या प्रकरणावरूनही सबंध कामाची तुला चांगली कल्पना येऊ शकेल आणि प्रकाशनाची पूर्वतयारीही करता येईल. प्रकाशनाबद्दल सांगावयाचे तर या देशातच ते झाले तर मला हवे आहे. पण पुस्तकाच्या आकारामुळे त्यात अडचणी येण्याचा संभव आहे. प्रकाशकाला या पुस्तकात बरेच भांडवल गुंतवावे लागेल, आणि त्याचे एकंदर स्वरूप पाहता त्याचा खप मर्यादितच होईल. म्हणून अधिक व्यवहार्य मार्ग म्हणजे या ग्रंथाची दोन पुस्तके बनविणे—एकात हिंदी वाचकांसाठी विशेषतः लिहिलेला मजकूर छापणे आणि दुसऱ्यात सर्वसाधारण स्वरूपाचा मजकूर समाविष्ट करणे. आजारी स्त्रीच्या वैद्यकीय सल्लागाराला तू भेटलीस हे चांगले झाले. ते सद्‌गृहस्थही[1] पॅरिसला आले असतील आणि तुझी भेट त्यांनी निश्चितपणे घेतलीही असेल. व्यक्तिशः ते अतिशय चांगले आहेत. मी त्यांना चोरांच्या टोळीत सापडलेला सज्जन म्हणतो; आणि त्यांनाही ते काहीसे मान्य आहे. भावनाशीलतेतून येणारा नीतिविवेक त्यांच्यामध्ये आहे एवढेच मला म्हणावयाचे आहे.

५२

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
जानेवारी २१, १९३६

नवे वर्ष तुला सुखाचे जावो— आणि खरोखरीच हे सुखी ठरणार आहे; एवढेच की जेव्हा हे सुख आपल्या हाती येईल तेव्हा हे वर्ष वयाने बरेच वाढलेले असेल. काळाच्या ओघाबद्दल मला आस्था नाही. कारण तो ओघ चालूच आहे. मला आस्था

१. वरील उल्लेख अनुक्रमे डॉ. अटल आणि पंडित जवाहरलाल नहरू यांना उद्देशून केलेला आहे.

आहे ती विशिष्ट काळात घडणाऱ्या एका घटनेबद्दल. त्या घटनेमुळे हे वर्ष इतर कोणत्याही वर्षापेक्षा अधिक सुखी ठरणार आहे. आणि घटना या व्यक्तीवर अवलंबून असतात. थोर आकांक्षांचे माझे जग अभंगच राहिले आहे आणि या सुखी नव्या वर्षातील प्रत्येक दिवस जसजसा दुःखाच्या आणि वेदनांच्या जुन्या दिवसांत लुप्त होत चालला आहे, तसतसे माझे हे जग भौतिक काळाच्या दृष्टीने जवळजवळही येत चालले आहे. आता, यापुढे वर्षांची मोजदाद करावयाची नसल्यामुळे महिन्यांना सर्वांत जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. काळावर विजय मिळविण्याची वेळ जवळ येत चालल्यामुळे अंतराच्या प्रश्नाची मी उपेक्षा करू लागलो आहे. एकदा मी मुक्त झालो की, भौगोलिक अंतर कितीही मोठे असले तरी ते तोडावयाला वेळ लागणार नाही. दर चार वर्षांनी येणारे हे खास वर्ष असल्यामुळे आपल्यापैकी एकाला अवकाशाच्या सागरावरून झेप घ्यावयाला काहीच अडचण पडणार नाही. तांत्रिक दृष्टया अप्रतिम अशी वाहतुकीची साधने उपलब्ध करून देणाऱ्या आपल्या या युगात तो प्रश्न अगदीच साधा आहे. तांत्रिक अडचणींचा अखेरचा अडथळा या ना त्या रीतीने पार पाडण्याची आशा करावयाला आपल्याला हरकत नाही.

बहुधा, आपल्या आवाक्याबाहेरच्या एखाद्या शक्तीने मोडता घातला नाही तर भौगोलिक अंतर तोडण्याचे कार्य तुलाच करावे लागेल. काळावर आपण मिळविलेल्या संपूर्ण विजयातील तुझ्या समान वाट्याखेरीज हा अधिक वाटा तुला उचलावा लागणार आहे. काळावर विजय मिळविल्याचा मला अभिमानाने उल्लेख करताना पाहून कोणाला खचितच असे वाटू लागेल की, जणू आपण मृत्यूवरसुद्धा मात केली आहे. एका अर्थी खरोखरच आपण केली आहे. नाही का ? जगाला ते कधीही समजणार नाही—जीवनातील ते महान सत्य जे आपण अनुभवले आणि बऱ्याबाईटासहित आत्मसातही केले. मला कळत नाही की, मी बेडर अहंकारी आहे, की भाबडा आशावादी ? ते कसेही असो, या भावभावनेत स्वर्गीय आनंद आहे आणि कोठलीही गोष्ट हृदयाला जाणवली की ती भावना खरी असते; माझ्या हृदयाला ती जाणवली आहे खरी !

उण्यापुऱ्या पाच वर्षांनंतर मी नव्याशाच जगात पाऊल टाकणार आहे. अनेक दृष्टींनी मला ते अपरिचित वाटेल आणि म्हणून मी खंबीरपणे पाऊल टाकू शकणार नाही. खरे सांगावयाचे तर माझ्या देशात मी वीस वर्षांनंतर परत प्रवेश करणार आहे. या नव्या वातावरणाशी शारीरिक दृष्टींनी ( सर्वसाधारण स्वरूपात ) जुळवून घेण्यासाठी मला थोडा काळ हवाच आहे. २४ नोव्हेंबर १९३० रोजी माझ्या जीवनाचा जो काळाकुट्ट कालखंड सुरू झाला तो शक्य तेवढ्या लवकर पुसून टाकण्याची मला किती जरी उतावीळ झाली असली तरी पुढील अनिश्चिततेचा काही काळ एकट्यानेच घालवावा असे मला वाटते. अर्थात हा काळ अगदीच छोटा असेल हे निश्चित समज. भवितव्याबद्दलच्या या समाधानात आपण उरलेले दिवस कंठू या.

तू तिकडे असा ओला आणि वादळी हिवाळा घालवीत असताना या वर्षी माझे दिवसमात्र चांगल्या हवेत जात आहेत. ज्या परिस्थितीत मला राहावे लागत आहे तिचा विचार करता तर माझे वास्तव्य आरामशीर झाले आहे. पाऊस फारच थोडा पडला आणि ढगाळ दिवस तर अगदीच थोडे होते. अर्थात व्यक्तिशः मला जे स्वागतार्ह वाटले ते बाहेरच्या लोकांना फार धोक्याचे झाले आहे. अनपेक्षित अशा कोरड्या हिवाळ्याचा पिकावर फार अनिष्ट परिणाम होणार आहे. पण परमेश्वराची करणी अनाकलनीय खरी. कोणाला असेसुद्धा म्हणता येईल की, तो आर्थिक अरिष्ट दूर करण्यासाठीच हस्तक्षेप करीत आहे. कारण आर्थिक अरिष्टांचे या देशापुरते तरी जे कारण आहे ते निव्वळ शेतीच्या परिस्थितीशी निगडित आहे. अर्थात हा कार्यकारणसंबंध हे एक दुधारी हत्यारच आहे. या देशात अवर्षण किंवा महापूर झाला तर त्याचा परिणाम रूझवेल्ट यांच्या नव्या अर्थरचनेतील शेतकीविषयक संकल्पासारखाच होईल. त्यामुळे उत्पादन कमी होऊन शेतीमालाचे भाव कडाडतील. वरकरणी पाहिले तर भवितव्याचे चित्र आकर्षक दिसेल, आणि कोणालाही वाटू लागेल की, त्याबद्दल परमेश्वराचे गुणगानच केले पाहिजे. पण खरी कारणे शोधून काढली तर मात्र पृथ्वीतलावरील राज्यकर्त्यांनाच नव्हे तर सर्व शक्तिमान परमेश्वरालादेखील आर्थिक मंदी नाहीशी करण्यात यश येणार नाही हे कळून येईल. पीक कमी आल्यामुळे अन्नधान्याच्या किंमती वाढतील आणि शेतकऱ्यांच्या मालाला चांगली किंमत येईल हे खरे आहे, पण विक्रीसाठी त्यांच्याजवळ मालही कमी राहील. साहजिकच त्यांची एकंदर खरेदीची शक्ती वाढणार नाही; आणि या देशातील बहुसंख्य ग्राहक हे शेतकरीच आहेत. एक वचन असे होते की ' चिनी माणसाच्या शर्टाचा पृष्ठभाग काही इंचांनी वाढवा आणि जगातील कापड गिरण्यांचे उत्पादन दुपटीने वाढवावे लागेल." हे वचन आपल्या देशातील लोकांनाही लागू होईल. फक्त येथील बहुसंख्य लोकांच्या अंगावर, ज्या शर्टाची लांबी वाढविण्याची कल्पना रंगविण्यात आली आहे तशा प्रकारचा शर्टच नसतो, आणि आमच्या विमुक्तीचा सूत्रधार असलेल्या महापुरुषाने आमच्यापुढे जे पवित्र ध्येय ठेवले आहे ते पंचा आणि ऐच्छिक दारिद्र्याचे. महात्म्याला जर आपले उद्दिष्ट साध्य करता आले तर कापडाची किमान गरज वाढविण्याऐवजी हिंदी शेतकऱ्यांना आजच्यापेक्षाही कमी कपडा वापरावा लागेल. सुदैवाने सर्व शक्तिमान परमेश्वराच्याही आवाक्याबाहेर जे चमत्कार आहेत ते त्याच्या प्रेषितांना घडवून आणता येतील !

महात्म्याचा मी उल्लेख केला आणि त्यावरून एका मनोरंजक प्रकरणाची मला आठवण झाली. मी मनोरंजक म्हटले, पण खरे सांगावयाचे तर हे गंभीर प्रकरण आहे— दरिद्री देशातील झपाट्याने वाढत जाणाऱ्या लोकसंख्येबद्दलचे. मिसेस सँगर ही हिंदी मातांपर्यंत आपला संदेश पोचविण्यासाठी या देशाला भेट देणार आहे. कारण हिंदी मातांची जी प्रसवशक्ती आहे ती इतकी प्रबळ आहे की, गेल्या दहा वर्षांत भारताची

लोकसंख्या तीन कोटींनी वाढली आहे. शिवाय आश्चर्याची गोष्ट अशी की, जन्माला येणाऱ्या अर्भकांपैकी पन्नास टक्के अर्भके मातेच्या उदरातून नाइलाजाने बाहेर येऊन काही दिवसांपलीकडे ती या जगात राहण्याचे नाकारीत असतानाही ही लोकसंख्या या प्रमाणात वाढली आहे. काल मी कुटुंबनियोजनाची मोहीम चालविणारी ही महिला आणि आमचे महात्मा यांच्यामधील एक संवाद वाचला. महात्म्याबद्दल लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही की, प्रत्येक वादग्रस्त प्रश्नावर ठाम मत प्रदर्शित करण्याची त्याची तयारी असते. त्याची साधुवृत्ती आणि त्याचा ब्रह्मचर्याचा सिद्धान्त (त्याने हा सद्गुण प्रत्यक्षपणे व्यवहारात आणला नसूनही तो महात्मा आहे. त्याचा अर्थ एवढाच की, ब्रह्मचर्य ही साधुवृत्ती अंगी बाणविण्यासाठी अत्यंत आवश्यक गोष्ट नव्हे) यांचा विचार करता कोणालाही असे वाटेल की, मातृत्वाच्या प्रश्नाशी निगडित अशा अत्यंत जिव्हाळ्याच्या वैवाहिक संबंधाबद्दलचे अज्ञान तो प्रांजलपणे प्रगट करील. पण नाही. महात्मा म्हणून तो सर्वज्ञ आहे, आणि तात्त्विक दृष्टीने या देशात तो सर्वशक्तिमान आहे. कारण तो जे काही बोलतो त्याला वेदवाक्याचे सामर्थ्य प्राप्त होत असते. त्याने आपल्या पाहुणीला चकितच नव्हे तर अवाक् करताना अशी घोषणा केली की, आपल्याला तिच्याइतकीच स्त्रियांची माहिती आहे. कारण आपण शेकडो नव्हे हजारो स्त्रियांशी अगदी नाजुक प्रश्नावर चर्चा केली आहे. त्यानंतर त्याने जो दण्डक घालून दिला तो हा : संततिप्रतिबंधक उपायांच्या ऐवजी जो पर्याय अमलात आणण्यासारखा आहे तो विवाहित स्त्रियांनी शरीरसंबंधातून मिळणाऱ्या आनंदापासून परावृत्त होणे हा होय. ज्या स्त्रियांनी त्याचा सल्ला घेतला, त्यांना अनिच्छेचे मातृपद टाळण्यासाठी हाच एक नैतिक मार्ग आपण सुचविला असा त्याचा दावा आहे. पण यात नवीन असे काही नाही. या प्रश्नाबद्दलचे महात्म्याचे मत आधीच सर्वांना ठाऊक होते. शिवाय अहिंसेच्या सिद्धान्तामुळे, जादा लोकसंख्येचा प्रश्न युद्धातून सोडविण्याची शिफारस करण्याची त्याला संधी मिळणे शक्य नसल्यामुळे मातृत्वावर काही बंधने लादली गेली तर ती सहन करण्याशिवाय त्याला गत्यंतरच नव्हते. अर्थात या बंधनांना मान्यता देणे हे त्याच्या धार्मिक व नैतिक मतांशी मुळीच सुसंगत नाही. तर गंमत अशी की, आश्चर्यचकित झालेल्या मार्गारेटने या संवादाबद्दल आपले मत प्रगट करताना महात्म्याच्या सल्ल्यामुळे वैवाहिक जीवन व कौटुंबिक सुख यावर कसे भयानक परिणाम होतील हे तर दिग्दर्शित केलेच; पण महात्म्याच्या तर्कपद्धतीतील अंतर्गत विसंगतीही दाखवून दिली—ती अशी की, भारतीय स्त्रीत्वाचा आदर्श जर कोणता असेल तर पतीच्या चरणी लीन होण्याचा. त्याच अनुषंगाने आपल्या सुप्रसिद्ध दृष्टिकोणाला पाठिंबा मिळविण्यासाठी मिसेस सँगरला प्रेमातील लैंगिक आशयाबद्दल जरा विस्तृत चर्चा करावी लागली. ज्या इंग्रजी पत्राने (ज्याचे मालक आणि संपादक इंग्रज आहेत) ही मुलाखत प्रसिद्ध केली त्याच्या संपादकाने तो सारा तपशील गाळून टाकला. अर्थात कोणतेही हिंदी पत्र ती मुलाखत

प्रसिद्ध करणे शक्यच नव्हते. कारण महात्म्याच्या मताची त्यात चिकित्सा आहे. महात्म्याशी ज्यांचे राजकीय मतभेद आहेत असे उजव्या गटातील लोकसुद्धा त्याच्या धार्मिक, नैतिक आणि सामाजिक मतांचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. या देशातील बौद्धिक चैतन्यहीनता मन कुंठित करणारी आहे. हिंदी समाज अद्याप पंधराव्या शतकातच राहत आहे. आमचे सारे प्रश्न सामाजिक कुचंबणेच्या डबक्यातूनच उद्‌भूत होत असतात.

आजारी बाईचे पती अपेक्षेप्रमाणे पॅरिसकडे वळले नाहीत असे दिसते. पण आता तिच्या दुखण्याचा भर जरा ओसरल्यामुळे ते अद्यापही जाऊ शकतील. ती बिचारी कसे तरी आपले जीवन कंठीत आहे. यात तिला यातना आणि दुसऱ्याना दुःख. ती तरी काय करणार ! इथे आपण एका जुन्या नैतिक पूर्वग्रहाशी टक्कर देत आहो. काळाचाच फक्त अवधी राहिला असताना आणि या काळात यातनांशिवाय दुसरे काहीच पदरात पडण्यासारखे नसताना आपण अंत तातडीने जवळ का आणू नये हेच मला कळत नाही. सुदैवाने वैद्यकीय व्यवसाय या पूर्वग्रहाविरुद्ध उभे राहण्याचे धाडस दाखवू लागला आहे, आणि त्यातील लोक वाढत्या प्रमाणात या मन बेचैन करणाऱ्या प्रश्नाला अस्तिपक्षी उत्तर देऊ लागले आहेत.

'एच्' आता कोठे आहे ? ती काय करीत आहे ? तीही अशीच उनाड झाली की काय ? पण न्यूकोएल्नच्या (बर्लिनमधील कामगार विभागातील एक सुंदर वस्ती) अपत्यावर हे दुर्दैव ओढवू नये; तिचा प्रियकर आणि त्याची ब्यूक गाडी यावर तिने फार विसंबून राहू नये हे ठीक. उनाडपणा हा तसा आकर्षक वाटला तरी अवनतीकडे नेणाराच तो उपक्रम आहे. तेथे चढाओढ ही होणारच. विशेषतः चैनीच्या अतृप्त आकांक्षांना चालना देणारा पाश्चिमात्य ऐषआराम समोर दिसत असताना कोणाचा तोल सुटणार नाही ? ठीक आहे म्हणा. नैतिकतेचे धडे देणे हा तर शुद्ध मूर्खपणा आहे. फक्त माझ्या हाती सत्ता आली तर कोबाने[1] पक्षातील एका गुलहौशी अधिकाऱ्याला जी समज दिली होती तिची मी जरूर आठवण ठेवीन. तो म्हणाला होता की, "इतराच्या व्यक्तिगत प्रश्नात हस्तक्षेप करण्याची माझी इच्छा नाही; पण स्त्रियांबद्दल यापुढे जर अधिक बोलणे मला ऐकू आले तर जेथे एकही स्कर्ट दृष्टिपथात येऊ शकणार नाही अशा ठिकाणी तुला जावे लागेल हे ध्यानात ठेव." म्हणजे पाहा, काही झाले तरी माझ्या पूर्वीच्या मित्राचा मी अद्याप चाहता राहिलेलोच आहे. एक काळ असा होता की, तो आमच्या वर्णसाधर्म्याचा अभिमान मानीत असे; आणि मला तो 'सोने' म्हणत असे. आता मला तांब्याचीही किंमत तो देणार नाही. पण सैतानाचेही ऋण मान्य करण्याचे सौजन्य म्हणा, दुबळेपणा म्हणा, माझ्यामध्ये आहे; आणि माझ्या खाती त्याचे ऋण फार मोठे आहे. स्टालिनबद्दलच्या या माझ्या आस्थेबद्दल माझ्यावर कडक टीका झाली होती—वायमार येथे.

---

१. स्टालिनचे उपनाव.

५३

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
फेब्रुवारी २४, १९३६

तुम्ही ज्याची इतक्या उत्कंठेने अपेक्षा करीत होता त्या मुलाखतीतून ( की तिला बैठक म्हणणेच अधिक सयुक्तिक होईल,[1] फारसे समाधान मिळू शकले नाही ही दुःखाची गोष्ट आहे. खरे सांगायचे तर यातून प्रत्यक्षपणे अधिक काही निष्पन्न होऊ शकेल असे मला वाटले नव्हते. 'थोर माणसे' जेव्हा खरोखरच थोर नसतात, (आणि ते जेव्हा असतात तेव्हा क्वचितच त्यांच्या थोरवीला मान्यता मिळते ) तेव्हा त्यांच्याविषयी निश्चित सांगणे कठीण जाते. पण अनिश्चित हिशेब आणि बदलती मूल्ये यांना जीवनाच्या गणिती समीकरणातून वगळता येत नाही. अर्थात हे सिद्धान्तवादी गणित नव्हे तर व्यवहारातील गणित होय. पण निराशेची किंवा 'उपेक्षा' झाल्याची भावना ठेवू नकोस. खरे सांगावयाचे तर तुम्ही ज्याची अपेक्षा करीत होता ते ते देऊच शकत नव्हते. गेल्या पाच वर्षांतील घटनांकडे तू मागे वळून न्याहाळून पाहिलेस तर त्याचे कारण तुला समजून येईल. आता इतके दिवस उलटून गेल्यानंतर तुझे सांत्वन करण्याचीही गरज राहिलेली नाही. तात्कालिक तुझ्या मनात जर काही अनिष्ट प्रतिक्रिया उमटली असेल तर ती एव्हाना नाहीशीही झाली असेल. या अनुभवामुळे मला कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावयाचे आहे याची तुला आणि इतर मित्रांना कल्पना करता येईल. परिस्थिती आहे ही अशी आहे. ती झिडकारून टाकता येत नाही. काही लोकांनी किमान प्रतिकाराचा मार्ग स्वीकारला. पण त्यातून काहीच प्रगती झाली नाही. तुम्ही जी पाहिलीत ती या परिस्थितीतील सर्वांत उत्कृष्ट बाजू. आता त्यावरून एकंदर गुंतागुंतीच्या पार्श्वभूमीची कल्पना सहज करता येईल. येथील परिस्थितीत असे प्रवाह-उप-प्रवाह-परस्परविरोधी प्रवाह आहेत की त्यामुळे प्रश्नाचे नीटसे आकलन होणेही कठीण जाते. या प्रश्नाची यशस्वी रीतीने सोडवणूक करण्यासाठी म्हणूनच आशावादी दृष्टिकोण ठेवला पाहिजे. याच तत्त्वाचा मी आधार घेत आहे. घोषणा आहे ती तीच जुनी. वास्तववादी व्हा ! काही वेळी या तत्त्वाशी एकनिष्ठ राहणे कठीण जाते म्हणा. तथाकथित थोर माणसे म्हणजे एक तापच असतो. आढ्यता आणि तीही दांभिक विनयशीलपणाने झाकलेली, म्हणजे असाध्य असा रोगच होय. आणि जेव्हा या रोगालाच गुण मानले जाते आणि जाणत्या म्हणून मानल्या जाऊ शकणाऱ्या लोकांकडूनच त्याची महती गायली जाऊ लागते, तेव्हा मती कुंठित होऊन जाईल नाही तर काय ? माझा निर्णय (भारताला परत जाण्याचा) मी बदलावा म्हणून हाइन्झ जेव्हा माझे मन वळविण्याचा प्रयत्न करीत होता तेव्हा त्याने

---

( १ ) पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पॅरिसच्या भेटीत त्यांची कम्युनिस्टातील विरोधी गटाबरोबर एक बैठक झाली होती.

केलेले एक भाष्य मला नेहमी आठवते. ते अतिशय शहाणपणाचे भाष्य होते. त्याच्या उत्स्फूर्त चाणाक्षपणाचाच त्यातून प्रत्यय आला आहे. ते उत्स्फूर्त होते असे मी म्हणतो याचे कारण त्या निर्णयाला येण्यासाठी पुरेशी माहितीही नव्हती. हृदयातील जाणीव होती ती आणि ती बरोबर होती. तथापि त्याचा शहाणपणाचा सल्ला मी मानला नाही याबद्दल मला पश्चात्ताप होत नाही. अर्थात त्या वेळी तर हा सल्ला शहाणपणाचा आहे असेही मला वाटले नव्हते. त्याने जी उणीव [1] दिग्दर्शित केली आहे ती भरून काढलीच पाहिजे. मी जे पाऊल टाकले त्याला पुरेसे ते कारण होते. निष्कर्षाबद्दल मला आत्मविश्वास आहे.

खरे सांगावयाचे तर मला युरपची ओढच लागली आहे. पॅरिसमध्ये आपण एकत्र आलो तर केवढी मौज होईल. आणि दलारॉक आपल्या मौजेत व्यत्यय आणील असा तात्काळ तरी धोका दिसत नाही. माझा असा विश्वास आहे की, फ्रेंच मध्यम वर्ग त्यांच्या ट्यूटॉनिक बांधवाइतका स्वतःची फसवणूक करून घेणार नाही. शिवाय जर्मनीमध्ये असेही काही घटक होते की, ज्यांचा बेमुर्वतपणाने उच्छाद करण्यात आल्यामुळे हिटलरचा सत्तासंपादनाचा मार्ग सहजसाध्य झाला. खरे तर हिटलरला चाल करूनही जावे लागले नाही. त्याला उच्चासनावर ढकलून देण्यात आले. स्वतःच्या धैर्यावर अवलंबून राहून त्याला सत्ता संपादन करावी लागली असती तर तो कधीच तेथे आला नसता. साहजिकच ज्यांनी त्याला वर काढले त्यांच्याबद्दल तो निःसंशय कृतज्ञ आहे. नुकताच जो रक्तपात आणि जी ससेहोलपट झाली ती कृतज्ञतेचेच नमुनेदार उदाहरण नव्हे काय ?

आता संध्याकाळ झाली आहे, आणि खोली उबदार व्हावी म्हणून एक लहानशी कोळशाची शेगडी पेटवून मी लिहीत बसलो आहे. साधारणपणे आता, शेकोटीची आवश्यकता राहिलेली नाही. हिवाळा निघून गेला आणि उन्हाळ्याच्या प्रसूतिवेदना सुरू झाल्या आहेत. या देशात वसंत ऋतू हा नसतोच. थंडीतून उन्हाळा हा बदल आकस्मिकपणे होतो. पण कालपासून वातावरण ढगाने भरून गेले होते; आणि आज वसन्तातील पावसाच्या सरी पडू लागल्या आहेत. त्याच्या जोडीला जबरदस्त वाराही घोंघावत आहे. हा वारा पर्वतावरून येत असल्यामुळे बर्फाची शिरशिरी त्यातून झोंबू लागली आहे. म्हणूनच तर शेकोटी ! मार्चच्या सुरुवातीला पुन्हा उन्हाळा येईल आणि

(१) १९३० साली जेव्हा मी भारतात परत जावयाचे ठरविले तेव्हा परदेशातील सर्व मित्रांचा त्या कल्पनेला विरोध होता. सर्वांत विरोध केला तो जर्मन कम्युनिस्ट पक्षाचे विख्यात पुढारी हाइन्‌रिक ब्रँडलर यांनी. त्यांचे असे मत होते की, भारतातील जनआंदोलन सकृद्दर्शनी किती प्रबळ व व्यापक भासले तरी ते अपरिपक्व अवस्थेत आहे आणि शांतपणे पूर्वतयारी करून काही खंबीर पाया घातल्याशिवाय या आंदोलनातून काही निष्पन्न होणार नाही.

थंडीऐवजी आम्ही उष्णतेबद्दल तक्रार करायला लागू. गरीब माणसांचे जीवन ही एक अखंड चालू राहणारी तक्रारच असते. विशेषतः गरिबांसाठी हा देश अगदी कुरूप आहे. मग हवेच्या बदलाबरोबर उंच शिखरावरून सपाटीकडे आणि उलट धाव घेणाऱ्या श्रीमंतांच्या दृष्टीने तो कितीही सुंदर असो. दारिद्र्यामुळे जीवन कुरूप बनते, आणि त्या जीवनाची छाप निसर्गावर उमटून त्याचेही सौंदर्य डागळले जाते. या देशात आराम-शीर अशा जीवनाची व्यवस्था होऊच शकत नाही. झाली तर ती श्रीमंतांसाठी आणि त्यांच्यापैकी बहुतेकांना जीवन सुंदर करण्याला लागणारी सौंदर्यदृष्टी अशी नसतेच.

आता नेहमीच्या प्रश्नाबद्दल. केव्हा ? सप्टेंबरच्या अखेरीस. किंवा निर्भेळ गणि-तात काहीशा बाजवी आशेला स्थान मिळाले तर कदाचित त्या पूर्वीसुद्धा. काही झाले तरी महिना इकडे वा तिकडे झाला तरी आपण श्वास करून घेण्याचे कारण नाही. कारण थोडीथोडकी नाही तर चांगली पाच वर्षे आपण मागे टाकली आहेत. प्रवासाची अखेर आपण गाठत आलो आहो हे सत्य आहे. तीसुद्धा केवढी उत्साह देणारी घटना आहे. मग असंख्य अडीअडचणी आणि यातना असल्या तरी आपण त्यांच्याकडे लक्ष का पुरवावे ?

आता काही तरी आनंदाचे. होय. एक मांजर माझ्यापाशी आहे. या वेळी मी तुला त्याच्याबद्दल लिहिणारच होतो. ते आल्याला दोन महिने होऊनही गेले आहेत. बरेलीला होते तसे ते दिसायला फार चांगले नाही. पण पुष्कळच लाघवी आणि खेळ-कर. सध्या माझ्या पायालगतच्या चटईवर शेकोटीपाशी ते झोपले आहे. नुकत्याच आलेल्या एका वाईट अनुभवामुळे ते जरा घाबरून गेले आहे. पावसातून त्याला यावे लागले. मांजरांना पाण्याचा तिटकारा असतो, हे तुला माहीतच आहे. हा बोका आहे. अद्याप पिलूच आहे. पण पौरुषाची पहिली चिन्हे, उदाहरणार्थ, घोगरा आवाज तो प्रकट करू लागला आहे. दोन महिन्यांपूर्वी तो आला तेव्हा क्षुद्र, तिटकारा येईल इतके कुरूप, भुकेलेले आणि थरथर कापणारे असे ते पिलू होते. आता दोनच महिन्यांत ते तिपटीने वाढले आहे. त्याचे सारे स्वरूपच आता बदलले आहे. त्याचा रंग राखी-किरमिजी आहे आणि त्यामुळे तो लहानशा चित्त्यासारखाच दिसतो. आता तो मुळीच वाईट दिसत नाही. त्याचे डोळे रंगभूमीवरील जपानी नायकाप्रमाणे आहेत. तू कधी त्यांची चित्रे पाहिली आहेस का ? तिरस्करणीय आणि त्यांच्या अभिनयाची पद्धतीही तशीच.

मी दिवस रेटून नेत आहे. जुन्या कळा आणि दुखणी सध्या तितकी तापदायक नाहीत. परंतु अलीकडे माझ्या कमरेतून कळा येऊ लागल्या आहेत. विशेषतः किडनीच्या विभागात. काही वेळी त्या असह्य होतात. ठीक आहे. बाहेर सुटल्यानंतर माझ्या प्रकृ-तीची अगदी संपूर्ण शहानिशा करून घेतली पाहिजे. बाहेरून, तुला हवेच असेल तर, मी फारसा बदललेलो नाही, हे खरे की काय कोण जाणे. मी एवढेच म्हणेन की, काल-पुरुषाने आपली पावले माझ्या शरीरावर उमटविली असली तरी मला अधिक पोक्त

झाल्यासारखे वाटत नाही. आता कालपुरुषाने जो प्रभाव गाजविला आहे तो असा की, माझे केस बरेच उडून गेले आहेत. डोक्यावरील केस आता पूर्वीसारखे दाट राहिलेले नाहीत. पण ते टकल मात्र नव्हे, की ज्यामुळे बौद्धिकतेचा रुबाबदार असा आभास तयार होऊ शकतो. जे काही साहित्य (तो मेंदू आहे असे समजले तर) असेल ते जाड अशा केसांच्या भारांनी अद्यापही पुष्कळच आच्छादिलेले आहे. काल-पुरुषाने ज्यावर आपली छाप पाडली आहे असा दुसरा विषय म्हणजे पुनः माझे केसच. ते जे उरले आहेत त्यांत राखी रंग बराचसा शिंपडला जाऊ लागला आहे-- काळ्या लोखंडात रुपेरी धागे– सोनेरी नव्हे. मी आदरणीय पोक्तपणात प्रवेश करीत आहे अशी घोषणासुद्धा मला काव्यमय भाषेत करता येत नाही याचे कारण असे की, लोखंड आणि वृद्धपणा (ओल्ड) एका सुरात बसत नाही. जसे सोने (गोल्ड) बसते. म्हणून ही अनिष्ट आणि खेदजनक वार्ता अगदी कठोर सत्यानिशी ऐकण्यासाठी तू आपल्या मनाची तयारी केली पाहिजेस. शिवाय माझे तीन दात मी गमावले आहेत– मुळीच कारण नसताना. त्यांच्यामध्ये मूलभूत असा दोष काहीच नव्हता. चांगल्या दंत-वैद्याने त्यांची डागडुजीही केली असती. पण माझ्या सध्याच्या परिस्थितीत मला ते काढूनच टाकावे लागले. कारण सततच्या वेदना टाळण्याचा तेवढाच एक उपाय शिल्लक होता. तथापि हा तोटा तसा मानण्यासारखा नाही, आणि दिसण्यासारखाही नाही. त्या साऱ्या अक्कलदाढा होत्या की ज्यांना व्यावहारिक असे फारसे महत्त्व नसते. माझी आशा एवढीच आहे की, ते गमावल्यामुळे शहाणपणाचा तेवढा वाटामात्र कमी झालेला नसेल. माझ्या शहाणपणाच्या साठ्यातील– आणि मला वाटते तो जरा बेताचाच आहे– तीनचतुर्थांश गमावून बसणे मला परवडणार नाही. पण शहाणपणाला जेव्हा देवा-दिकांचे गुण चिकटविण्यात येतात आणि अज्ञान हा गुण मानण्यासाठीच जेव्हा त्याचे देव्हारे माजविले जातात, तेव्हा शहाणपणाला मी विशेष मोल देत नाही. ते असो म्हणा. बाकी माझा चेहरामोहरा फारसा बदललेला नाही. एकंदर अशक्तपणा वगैरे. या प्रकारच्या जीवनात काढलेल्या पाच वर्षांचा परिणाम विचारात घेताही माझ्या जीवनाच्या चाळीस वर्षांचे ओझे मला खात्रीने भासत नाही खरे. आता मला वाटते हा सारा पोरकट तपशील पुरे झाला.

माझी मुख्य तक्रार आहे ती मला पुरेशी खुली हवा मिळत नाही आणि व्यायाम घडत नाही ही. या जागी मला हलताही येत नाही. येथील आवार फारच छोटे आहे. साहजिकच मला ओढ लागली आहे ती पर्वतावर किंवा समुद्रकिनाऱ्यावर खुल्या हवेत तुझ्याबरोबर स्वैर संचार करण्याची. समुद्राबद्दलची तुझी आस्था सोडून देण्याची तुझ्यावर मी सक्ती खास करणार नाही. समुद्राबद्दल तसा मला विशेष तिटकारा नाही. फक्त फार दूरचा समुद्रप्रवास मला आवडत नाही. फार कंटाळवाणा होतो तो. सध्या माझ्या या लहानशा पेटीत कोणत्याच प्रकारची फुलझाडे नाहीत. हिवाळ्यात ती सारी मरून गेली.

उन्हाळा हा जास्वंदीचा मोसम. काहा मी लावून पाहणार आहे. उष्ण कटिबंधातील जास्वंदीची तुला कल्पना नाही. बर्फासारखी सफेद असतात ती फुले, आणि त्यांचा वास थोडा उग्र असतो. ज्यांना सवय नाही त्यांना तो फारच ऊग्र वाटतो. आश्चर्य असे की, उष्णकटिबंधातील लोकांची सौंदर्यदृष्टी, निदान फुलांच्या संबंधी तरी, चमत्कारिक आहे. फुलांचे गुणगान केले जाते ते त्यांच्या रंगावरून वा आकारावरून नव्हे तर फक्त त्यांच्या सुवासावरून. अत्यंत सुरेख दिसणाऱ्या फुलांना वास येत नसेल तर त्यांच्या विरुद्ध नाक मुरडले जाते. अशा फुलांची 'चारित्र्याशिवाय सौंदर्य' असलेल्या स्त्रियांशी तुलना केली जाते. मूल्यमापनाच्या या दृष्टीचे तत्त्वज्ञानविषयक सार असे की, नीतीपुढे सौंदर्याने पड खाल्ली पाहिजे. तसाच प्रश्न उभा राहतो तो असा की, गांधीजींच्या इतक्या तऱ्हेवाईक कल्पना असतानासुद्धा हिंदी लोकांवर त्यांचा इतका प्रभाव कसा पडू शकतो? त्या प्रश्नाचे उत्तरही याच सांस्कृतिक परंपरेत मिळते. कारण या परंपरेचे मूळसुद्धा भूतकाळातील सामाजिक परिस्थितीत रुजलेले असते. सौंदर्यप्रीती हा गुन्हा आहे. सौंदर्याला प्रतिष्ठा हवी असेल तर त्याला चारित्र्याची जोड हवी. चारित्र्य म्हणजे काय? त्या प्रश्नाला एकच उत्तर मिळू शकणार नाही. सरंजामशाही संस्कृती त्याचे उत्तर देते आणि पौर्वात्य जगाचा 'आध्यात्मिक दृष्टिकोण' चारित्र्याच्या त्या गुलामगिरीच्या, गुलामगिरी लादणाऱ्या कल्पनेलाच अद्याप चिकटून राहिलेला आहे. हा दृष्टिकोण माणसाची चैतन्यशक्तीच खच्ची करतो. व्यक्तीचा मानसिक विकास जर कालांतराने माणसाच्या विमुक्तीचाच प्रेरक ठरणार असेल तर त्या विकासाच्या मार्गाला सर्वस्वी विरोधी अशी शक्ती आध्यात्मिक तत्त्वज्ञान— जर त्याला तत्त्वज्ञान म्हणावयाचेच असेल तर—हीच होय. इतिहासाचा हा दारुण दैवदुर्विलास आहे.

मला आत्यंतिक भूक लागली आहे ती चांगल्या संगीताची. सध्या माझ्या कधी काळी कानी पडते ते शेजारच्या ख्रिस्ती मंदिरात दफनासाठी येणाऱ्या व्यक्तीच्या अन्त्य यात्रेच्या वेळचे संगीत. परवाच एक अन्त्ययात्रा मेंडेलसाँचे संगीत वाजवीत निघून गेली. लष्करी इतमामाने काढण्यात आलेली ती अन्त्ययात्रा होती. सैनिकी बॅण्ड वाजत होता, आणि चांगल्या प्रकारे वाजत होता. फक्त ढोल पुरेसा आच्छादिलेला नव्हता. मृत्यूत सुद्धा सौंदर्य आहे. मरणाऱ्या व्यक्तीला अन्त्ययात्रेच्या वेळचे मेंडेलसाँचे संगीत ऐकण्याची भावना झाली तर त्याच्या मनात किती प्रसन्न भाव उमटतील नाही? खरोखर उत्कृष्ट संगीत कोणाचे? मेंडेलसाँचे की हॅंडेलचे? मी न्याय देऊ शकणार नाही. मला: फक्त चांगले संगीत आवडते, आणि मी त्याचा आस्वाद घेऊ शकतो. मला वाटते, मला सर्वांत आवडणाऱ्या गोष्टींपैकी ते एक आहे. येताना ग्रामोफोन आणि चांगल्या ध्वनि-मुद्रिका घेऊन ये. सर्वोत्कृष्ट ध्वनिमुद्रिका या देशात मिळू शकणार नाहीत–उदाहरणार्थ, बेथोवेनच्या सिंफनीज, किंवा देबूसांचे 'थायस' ज्यात त्या महामूर्ख धर्मगुरूला मोह-वश करण्यात आले आहे.

ऑगस्टचा अमेरिकेतील संकल्पित व्याख्यानदौरा साध्य होऊ शकत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पण त्यातून फार चांगले काही निष्पन्न झाले असते की नाही याची शंकाच आहे. अर्थात आर्थिक लाभ होण्याची मात्र शक्यता होती. ते काही असो. ऑगस्ट निराश झाला असेल. मंदीने त्या देशात बौद्धिक खळबळ उडविलेली दिसत आहे. आपले बौद्धिक जीवन जे निर्जीव, चेतनाहीन झाले आहे, ते ढवळून काढण्याची आज अत्यंत आवश्यकता आहे. मला कळत नाही की ती प्रेरणा आपल्याला अॅटलांटिक महासागरापलीकडील त्या देशातून मिळेल काय? तो देश साहित्यात काही मोलाची भर घालीत आहे. तत्त्वज्ञानविषयक विचारातही काही वैशिष्ट्यपूर्ण प्रवाह तेथे प्रकट होत आहेत. प्रोफेसर सेलर यांचे 'फिलॉसफी ऑफ फिजिकल रिॲलिझम्' हे पुस्तक उदाहरणार्थ, फार उद्बोधक आहे. नंतर सी. ई. स्ट्रॉंगचे 'रिव्हाइज्ड पॅन्थीझम्' हे पुस्तक. लेखकाने स्वतः म्हटल्याप्रमाणे जडवादाचे त्यात नव्याने स्पष्टीकरण करण्यात आले आहे. सध्या मी पर्ल बकचे 'चायनीज ट्रायॉलजी' हे पुस्तक वाचीत आहे. गेल्या कित्येक दिवसांत या विषयावर इतके चांगले पुस्तक लिहिले गेले नसेल आणि या पिढीतील सर्वोत्कृष्ट पुस्तकांत त्याची खास गणना केली जाईल. आमच्या मार्क्सवादी पंडितांना त्यापासून पुष्कळ शिकता येईल. पण त्यांच्यामध्ये आवश्यक तो विनयशीलपणा असेल तर.

## ५४

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून<br>
मार्च २२, १९३६

फेब्रुवारीच्या मध्याला येथील हिवाळा संपून गेला. तेव्हापासून उन्हाळा आणि वसन्त ऋतू यांच्यामध्ये संघर्ष चालू झाला आहे. वसन्त ऋतु संघर्ष तरी कसला करणार म्हणा! कोठे प्रतिकाराची चुणूक तो दाखवील एवढेच. भारतातील हवामानाच्या योजनेत वसन्ताला फारच लहान स्थान आहे. तथापि अद्यापपर्यंत हवामान वाईट नव्हते— दिवसा चकचकीत सूर्यप्रकाश, रात्री प्रसन्नपणे थंड. पण उगीच स्वप्नरंजनांत गुंग होऊ नकोस. सूर्य अत्यंत निष्ठुर होऊ शकतो. पॅरिसमधील हिवाळी पावसाइतकाच. - निरुद्योगी धनिक सोडले तर हा देश वास्तव्यासाठी मुळीच चांगला नाही, आणि तो सुंदर तर खासच नाही. खरे तर क्षुद्रतेने तो परिपूर्ण भरलेला आहे. अर्थात कोणत्याही गोष्टीला आदर्श रूप देता येते, आणि भावुकता ही अशी एक सवंग भावना आहे की, जी तर्कावर मात करू शकते. पण मी वास्तववादी आहे आणि वास्तववाद्याच्या दृष्टीने हा देश ओंगळपणा, दारिद्र्य आणि अज्ञान यांनी काठोकाठ भरलेला दिसल्याशिवाय राहणार नाही. खरोखरी हा मन विषण्ण करणारा एक प्रश्न आहे आणि दुर्दैव असे की ज्यांना या

प्रश्नाचे स्वरूप आणि त्याची गंभीरता उमगलेली आहे, आणि त्यांना अशी बालंबाल खात्री वाटते की, तो सोडविण्याची आपल्याला संधी मिळाली तर आपण एखाद्या जादूच्या कांडीनिशी तो प्रश्न सोडवू शकू, त्याना ही संधी कधी काळी मिळालीच तर आहे तो गोंधळ ते अधिक बिघडवून टाकतील यात शंका नाही. सुदैवाने त्यांच्यामधील नालायकी इतकी अलौकिक आणि त्यांचे अज्ञान इतके अवाढव्य आहे की, त्यांना ही संधी मिळणे कठीण आहे. तू पाहिले आहेस ते प्रभावळीतील सर्वोत्कृष्ट नेतृत्व. त्यावरून तुला बाकीच्या सूत्रधारांची कल्पना करता येईल.

सामाजिक संशोधन करणारी संस्था स्थापण्याची कल्पना उत्कृष्ट आहे. अशा तऱ्हेच्या संस्थेच्या साहाय्याने फार मोलाचे कार्य करता येईल. पण फ्रँकफुर्ट इन्स्टिट्यूट आता कोण चालवीत आहे? गेल्या वर्षी तू लिहिलेस की, पोलॉक अमेरिकेला गेला. तो परत आला की काय? अशा तऱ्हेच्या उपक्रमाचे दूरगामी महत्त्व जाणण्याची अत्यंत आवश्यक अशी कल्पकता तो दाखवील असे मला मुळीच वाटत नाही. आणि वाएल? अशा तऱ्हेच्या संस्थेची हिंदी शाखा स्थापन करण्याबद्दल जर त्याचे मन वळविता आले तर मला फार आनंद होईल. तथापि या दृष्टीने मन वळविण्याचे काम हाइन्झ आणि ऑगस्ट यांनाच करावे लागेल असे मला वाटते. अर्थात वाएलवर त्यांचा पूर्वीचा प्रभाव असला तर! तथापि, तुझ्याकडून पत्र आल्यानंतर मी त्या संस्थेच्या सध्याच्या प्रमुखाला संदेश पाठवीन. हिंदी शाखा उघडण्याचे ठरले तर एखाद्या विद्यापीठाला ती जोडून घेता येईल असे मला वाटत नाही. सुरुवातीला तरी निदान नाही. परंतु काही प्रख्यात प्राध्यापकांचे सहकार्य आपल्याला सहज मिळविता येईल. अडचण आहे ती पैशांची. हिंदी दात्यांकडून तो मिळू शकणार नाही. त्या संस्थेचे मुख्य कार्य साहित्य-निर्मिती हेच असले पाहिजे. म्हणजे प्रकाशन शाखा हवी. या देशात बौद्धिक आंदोलनाचे केंद्र म्हणून प्रकाशन-संस्था उभारण्याच्या माझ्या योजनेबद्दल मी तुला आधीच लिहिले आहे. सुटकेनंतर तेच मुख्य कार्य मी हाती घेईन. म्हणून त्या संस्थेच्या लोकांनी आपल्या योजनेला पाठिंबा द्यावा यासाठी त्यांचे मन वळविण्याचे काम तू आपले चालूच ठेव. खरे सांगावयाचे तर आपण संशोधन-संस्थेपेक्षा 'मालिक फेरलाग' या प्रकाशन-संस्थेच्या धर्तीवरच कार्य करावयाला पाहिजे. घोषवाक्य एकच असावयाला पाहिजे—प्रकाश, आणखी प्रकाश.

व्यक्तिशः शास्त्रीय लेखनकार्य हाती घेण्याचीच माझी प्रवृत्ती झाली आहे. सध्याची माझी योजना पुरी करावयाची झाली तरी अनेक वर्षे काम करावे लागेल. मुख्य ग्रंथ म्हणजे, हिंदी संस्कृतीचा एकंदरीने चिकित्सक इतिहास आणि विशेषतः हिंदू तत्त्वज्ञानावरील प्रबंध, हा लिहून व्हावयाचा आहे. आतापर्यंत झाली आहे ती पूर्वतयारी. जी पुस्तके लिहून झाली आहेत त्यातून चिकित्सक दृष्टिकोणाला अनुकूल असे वातावरण तयार होईल. हिंदुस्थानातील बुद्धिवादी न्यूनगंडाने पछाडलेले आहेत. त्यांच्या

मध्ये विज्ञानाची चिकित्सक दृष्टीही नाही आणि विनोदवृत्तीही नाही. येथे सामाजिक संशोधन आणि इतिहासाची पुनर्रचना केली जाते ती काल्पनिक सुवर्णयुगाचा आभास निर्माण करण्याच्या हेतूने. भारतीय सुवर्णयुग हे आदर्श ग्रामयुगही नव्हते, आणि तरी म्हणे ते पूर्वकाळातील आधुनिक संस्कृतियुग होते अशी श्रद्धा ठेवली जाते. शुद्ध आचरटपणा आहे तो!

शास्त्रीय लेखनाचे कार्य मला कितपत चालू ठेवता येईल कोण जाणे! खरोखर येथल्यापेक्षा युरोपमध्येच ते अधिक व्यवस्थित रीतीने करता येईल. पण या चार भिंतींच्या बाहेर पडल्यानंतरही मला विमुक्तपणे हालचाली करता येणार नाहीत. बहुधा परदेशी जाण्यासाठी मला पासपोर्ट दिला जाणार नाही. इतर अनेक अडीअडचणीं-बरोबरच दैव ही काहीतरी शक्ती आहेच की, जी अखेरीस माझ्या भावी वास्तव्याचा निर्णय घेईल. आज ना उद्या मला युरोपला भेट द्यावीच लागेल. जुन्या मित्रांच्या भेटी-गाठी घ्यावयाच्याच आहेत. पण ते केव्हा शक्य होईल हे मात्र दैवाच्या हाती आहे. तोवर आणीबाणीच्या परिस्थितीशी आपण जुळवून घेऊ आणि जेवढा काही त्यांचा चांगला उपयोग करून घेता येईल तेवढा करून घेऊ. माझे एवढेच सांगणे आहे की, उगाच कल्पनाजाल गुंफू नकोस. या स्वप्नभूमीबद्दल तुझी निराशा होणार आहे. प्रत्यक्षात ती अगदी वेगळी आहे. जीवनाच्या ज्या तऱ्हा तुला येथे आढळून येतील त्या एक-मेकापासून आणि तुझ्यापासून विलक्षण भिन्न असतील. तुझ्या उत्साहावर पाणी टाक-ण्याची माझी इच्छा नाही. पण परिस्थितीची तुला योग्य जाणीव असावयास पाहिजे. युरोपमधील जीवन त्या मानाने फारच सीधे आहे. आश्चर्यकारक वाटेल तुला हे म्हणणे. पण ते खरे आहे.

पुस्तकांच्या बाबतीत माझ्यापाशी बराचसा प्रातिनिधिक साठा जमला आहे. त्यां-पैकी बहुतेक मी येथून सरळ मागविली. काही अमेरिकेहूनही आली. जे ने पाठविलेली म्हणून जी मला समजली त्यांपैकी चार पुस्तके तेवढी मला मिळाली. बाकीची अजून गहाळ आहेत. दुसरा सहा-सात पुस्तकांचा आणखी एक संच आला असल्याचे मला कळले. पण ती माझ्या जवळपाससुद्धा फिरकली नाहीत. आश्चर्य आहे नाही? पण सत्य आहे ते. या थोर देशाबद्दल तिरस्कार वाटावा आणि पवित्र धूळ आपल्या पायावरून झटकून टाकून स्पेन, मेक्सिको, दक्षिण समुद्रातील बेटे वगैरे कोठेतरी देशांतर करावे असे मला वाटण्याला माझ्यापाशी असंख्य कारणे आहेत. पण एकदा अखेरचा प्रयत्न करावा असा मोहसुद्धा मला टाळता येण्यासारखा नाही. तो एकदा प्रयत्न फसला की देवदेवादिकांच्या कनवाळू कृपेवर या देशाला सोडून मला त्याचा कायमचा निरोप घेता येईल.

सोबत जी यादी दिली आहे ते सारे शास्त्रीय साहित्य मला परदेशांतून आजवर मिळाले आहे. तू जी मला सरळ पुस्तके पाठविलीस त्यांचा यात समावेश नाही. तथापि

सध्या मला जे हवे आहे ते सारे साहित्य मी पैदा केले आहे. पुढे मी एकदा सुटलो की, सारी पुस्तके आपल्याला विकत घ्यावी लागणार नाहीत. मग सार्वजनिक ग्रंथालयाचा मला उपयोग करता येईल. एक-दोन पुस्तके मात्र मला तातडीने हवी आहेत; ती या देशातील पुस्तक-विक्रेत्यांकडून मिळू शकत नाहीत. त्यांतील अत्यंत महत्त्वाचे म्हणजे आइन्स्टाईन यांच्या ' युनायटेड फील्ड थिअरी 'च्या अगदी अलीकडे प्रसृत झालेल्या स्वरूपाचा परामर्श घेणारे पुस्तक. त्यासाठी प्रिन्सटन विद्यापीठात तरुण डॉ. रोझेन यांच्या सहकार्याने आइन्स्टाईन यांनी काम केले. गेल्या उन्हाळ्यात अमेरिकन फिजिकल सोसायटीच्या मासिकात त्या संशोधनाचा निष्कर्ष प्रसिद्ध झाला होता. अर्थात त्यासाठी सुद्धा मला तशी वाट पाहावयाला हरकत नाही. पण त्याबद्दलच्या कुतूहलाने मी बेजार झालो आहे. त्याचे कारण असे आहे : मी अशी एक धिटाईची आणि नावीन्यपूर्ण सूचना केली आहे की, क्वॉन्टम फिजिक्स, विशेषतः वेव्ह मेकॅनिक्स आणि हायझेनबर्ग यांचा अनिश्चिततेचा सिद्धान्त यांनी निर्माण केलेल्या अडचणी ( आशय आणि कारणपरंपरा यांच्या प्रश्नाबद्दल ) कालान्तराने, सूक्ष्म सृष्टीच्या घटनांना सापेक्षतावादाचे भौतिक तत्त्व लावून सोडविता येतील. खरे सांगावयाचे तर मी याही पुढे आणि असे दिग्दर्शित करण्यापर्यंत मजल गाठली आहे की, इलेक्ट्रॉनिक गतीची अनिश्चितता ही खरोखर ज्ञानशास्त्रातील सापेक्षतेशी संबंधित आहे आणि तरंग आणि अणू यांच्या सकृद्दर्शनी विरोधी भासणाऱ्या कल्पना या भौतिक जगातील अन्तःस्तराच्या रचनेचा, सापेक्षतेच्या दृष्टीने विचार केला तर इलेक्ट्रॉनिक गतीशी जुळून येणाऱ्या असतील. अर्थात यात नवीन असे काही नाही. दिरॅकच्या संशोधनातून त्याचा अमूर्त गणिती प्रकार जर काढून टाकला तर त्याचे निष्कर्ष हीच दिशा दाखवितील. खुद्द एडिंग्टनने अशी सूचना केली आहे की, कॉस्मिक कॉन्स्टंट ही अत्यंत मूलभूत अशी भौतिक जाती होऊ शकेल. तथापि एकंदरीने भूमिका घेतली जात आहे ती अशी की, क्वॉंटम फिजिक्स हाच खरा शास्त्रशुद्ध पाया आणि सापेक्षतावाद हा पूर्वकालीन सिद्धान्ताचाच एक भाग.त्यावर माझी भूमिका अशी—आणि त्याला एडिंग्टन याच्यासारख्या नवगूढवाद्यांच्या शास्त्रीय मतांतून आणि दिरॅक यांच्या ग्रंथातून पाठिंबा मिळत आहे—की, क्वॉन्टम थिअरीपेक्षा सापेक्षतावादाचा सिद्धान्तच निसर्गाच्या रचनेच्या गाभ्यात आपल्याला खोलवर घेऊन जातो; सापेक्षतावाद हे विश्वव्यापी तत्त्व आहे तर क्वॉन्टम थिअरी ही विशिष्ट प्रश्नाशीच निगडित आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर सापेक्षतावाद हे संपूर्ण शास्त्रीय ज्ञानाचे--नव्या तशाच परंपरेने चालत आलेल्या—प्रतिनिधित्व करणारे एक तत्त्वज्ञानात्मक प्रतीक आहे.युनायटेड फील्ड थिअरीचा व्याप वाढविताना आइन्स्टाइन यांनी क्वॉन्टम थिअरी ही ' अपूर्ण ' म्हटली आहे ते असे सूचित करण्यासाठी की, सापेक्षतावादाच्या तत्त्वाची व्याप्ती वाढवूनच ती पूर्ण करता येईल. तेव्हा या विस्तृत झालेल्या स्वरूपाची मला संपूर्ण माहिती मिळाली --

जो तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोण मी विचारासाठी तात्पुरता मांडला आहे त्याला प्रत्यक्ष भौतिक पाठिंबा मिळेल अशी मला आशा वाटत आहे. म्हणूनच माझे कुतूहल. ते क्षम्य नाही का?

गाल्सवर्दीच्या साऱ्या कादंबऱ्या तू जमविल्या आहेस हे फार छान आहे. होय. तो माझा आवडता लेखक आहे. कादंबरीच्या क्षेत्रात मला वाटते माझ्या आवडीनिवडी जरा जुन्या प्रकारच्या आहेत. गाल्संवर्दी आणि हार्डी हे माझे आवडते लेखक. आधुनिकांत सिंक्लेअर लुई, आणि आता माझे नवे प्रेम जडले आहे ते पर्ल बकवर. घाबरू नकोस. ते केवळ साहित्यिक प्रेम आहे आणि माझी आई होऊ शकेल इतकी ती पोक्त आहे. पण काय आश्चर्य आहे पाहा. नुकताच तिने आपल्या साधुवृत्तीच्या नवऱ्यापासून घटस्फोट घेतला आहे आणि आपल्या प्रकाशकाशी लग्न केले.

त्यावरून पाहा, मला माझ्या चीनवरील ग्रंथाची आठवण झाली. ॲडॉल्फच्या कृपेमुळे जर्मन आवृत्ती जन्मतःच बळी पडली.[1] इन्स्टिटयूट ऑफ सोशल रिसर्चच्या संबंधात तुझी जी योजना होती तिच्या यशस्वितेला या अनुभवामुळे धोका पोचेल की काय अशी मला भीती वाटते.[2] तथापि मी इतक्या सहजपणाने पराभुत होत नसतो. तो ग्रंथ पुनः प्रकाशित झालाच पाहिजे. तो ग्रंथ चांगला आहे, आणि भविष्यकाळासाठी स्फूर्ती देणाराही आहे. पूर्वीच्या एका पत्रात मूळ इंग्रजी प्रत कोठे मिळू शकेल त्याची संभाव्य ठिकाणे मी नमूद केली होती. अखेरचा उपाय म्हणून त्याचा जर्मनमधून अनुवाद केला पाहिजे. जर्मन आवृत्तीच्या काही प्रती तरी, बर्लिनमध्ये पुस्तके जाळण्याचा जो ऐतिहासिक कार्यक्रम झाला, त्यातून वाचल्या असल्या म्हणजे मिळवली.

या पत्राचा पहिला भाग जरा खिन्नतेचा आहे. परवापासून मला अजीर्णाचा त्रास सुरू झाला आहे– हा एक विचित्र अनुभव. अजीर्णामुळे माणूस वैतागल्यासारखा होतो, तथापि त्याची मला थोडी भरपाई करू दे. काल रात्री मला चांगली झोप लागली आणि आज सकाळपासून मला अधिक प्रसन्न वाटत आहे. साहजिकच माझ्या मनात योजनांची गर्दी उसळली आहे. माझ्या मनात प्रथम आला तो ग्रामोफोनचा विचार. आपण कोठेही असलो तरी तो आपल्याजवळ हवाच. खूपशा ध्वनिमुद्रिका घेऊन ये. गेल्या पत्रात मी काही सुचविल्याच आहेत. पण आपल्या मीलनाचा तो आनंदाचा दिवस अद्याप

---

१. ही आवृत्ती जर्मनीमध्ये नात्सी सत्तेवर येण्यापूर्वी काही दिवसच आधी प्रसिद्ध झाली होती. माझा प्रकाशक नात्सींच्या 'काळ्या यादी'त होता, आणि नात्सींनी त्या प्रकाशन–संस्थेवर धाड घातली. माझ्या पुस्तकांचा संच जप्त करण्यात आला आणि इतर अनेक पुस्तकांबरोबर तो जाळून टाकण्यात आला.

२. माझे चीनवरील पुस्तक फ्रॅंकफुर्ट विद्यापीठाला जोडलेल्या इन्स्टिटयूट फॉर सोशल रिसर्चच्या प्रेरणेनुसार लिहिले गेले होते.

अनिश्चितच आहे आणि मला खरोखरच निराश वाटू लागले आहे. माझी रीतसर आशा फळाला आली, म्हणजे सामान्य गुन्हेगाराला मिळते ती माफी मला मिळू शकली तर अगदी जास्तीत जास्त म्हणजे आणखीन सहा महिन्यांत मी सुटावयाला पाहिजे. खरे तर चारच महिन्यांत माझी सुटका व्हायला पाहिजे. पण ही रीतसर आशासुद्धा मी सोडून दिली आहे आणि वाईटात वाईट काय होईल त्याच्यासाठी मी माझ्या मनाची तयारी चालविली आहे. त्याचा अर्थ आपल्या मीलनाचा दिवस ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर-पर्यंत लांबेल.

हिंदुस्थानातील उन्हाळा तुझी कसोटी पाहणाराच ठरेल. सूर्य नुसता तळपत असतो इथे. युरपमधील प्रखरतम सूर्यावरूनसुद्धा उष्णकटिबंधातील उन्हाळ्याची कल्पना करता येणार नाही. अर्थात उन्हाळ्यासाठी या देशात थंड हवेची ठिकाणे आहेत. पण ते श्रीमंतांचे स्वर्ग—गरिबांना पारखे झालेले, त्यांनी हस्तगत करून घ्यावयाचे ते. साधारण उंच ठिकाणे म्हणजे जेथे आधुनिक विश्रांतिस्थाने नाहीत. ती पोचावयाला कठीण आहेत. आणि सुधारलेल्या जीवनाच्या साऱ्या सवलतींचा तेथे अभाव आहे. तरीसुद्धा आपण कसे तरी एखादे ठिकाण शोधून काढू आणि सुखी होऊ. पण मी कल्पना-साम्राज्यात गुंग होणारा नसल्यामुळे आपण कोठेही सुखी होऊ असे मात्र मी म्हणणार नाही. कोठेही सुखी होणे खरोखरच शक्य नसते. आनंद काही आत्म्यापासून प्राप्त होत नसतो. भौतिक परिस्थितीतून तो निर्माण होतो आणि त्यात मने आणि शरीरे यांनी सुखाचा शोध घेणे आवश्यक असते. एमिली आणि सोफी ही जीन जॅकसच्या विकृत कल्पनेची अपत्ये आहेत. दारिद्य, दैन्य आणि दुःख यांचा अनुभव घ्यावा लागणाऱ्या परिस्थितीत आणाभाका घेतलेले प्रेमीजीव सुद्धा एकमेकांचा तिरस्कार करावयाला लागतील. जगामध्ये प्रेम इतके कमी झाले आहे त्याचे कारणच हे की, शारीरिक यातना इतक्या वाढल्या आहेत. प्रसन्न घर आणि कोंदट खोली यात अंतर नाही असे म्हणणे शुद्ध आचरटपणाचे आहे. मी आरामाचा आणि सौंदर्याचा भोक्ता आहे. फार यातना सोसल्या की माणूस कडवट होतो आणि कडवटपणामुळे बौद्धिक समतोल बिघडतो. कुरूपतेमुळे आत्म्याचे चैतन्यच नष्ट होते. कल्पनादरिद्री लोकांच्या पुढे उद्दिष्ट आणि ध्येय तरी कोठले असू शकेल ? आणि ध्येयविहीन माणसे ही नुसती जनावरे होत. कोणी म्हणेल, ही कल्पनावादाकडे झेप तर नव्हे ? मुळीच नाही. जीवनाचे ध्येय हे त्या ध्येयाच्या कल्पनेपेक्षा काहीतरी वेगळे आहे, पण या साऱ्या रूढ कल्पना मी तुला का सांगतो आहे ? 'अन्स्टी स्पुनान्टी ' चा एक चषक घेत शेकोटीजवळ होणारा हा सुखसंवादच समज. अहाहा ! सध्या या क्षणी बिअरचा एक प्यालासुद्धा किती सुखद होईल.

आणखी सहा महिने किंवा अधिक. मी तर म्हणतो आठ महिने. तुझी निराशा करताना मला किती दुःख होते म्हणून सांगू. पण जग अती निष्ठुर आहे. नाहीतर सामान्य न्यायनीतीलाही आपण पारखे का व्हावे ? ठीक आहे. आपण आहोत तेथे

आहोतच—असाहाय्य. पण एवीतेवी काही महिन्यांचाच प्रश्न आहे. या दीर्घकालीन दिव्याला आपण तोंड दिले. त्यापुढे आता काही महिन्यांचा काय पाड !

युरपचे राजकीय वातावरण अधिकाधिक स्फोटक होत आहे. ॲडॉल्फने नुकताच जो पवित्रा टाकला त्याने शांततेच्या डळमळत्या डोलाऱ्याला धक्काच दिला असता. पण हे अरिष्ट सध्या तरी टळले आहे. असे हातघाईवर आलेले प्रकरण किती काळ आटोक्यात राहणार ? हा खरा प्रश्न आहे. पाश्चिमात्य जगाची स्थिरता सुरक्षित ठेवली जाईल असे दिसते. पण कशी ! रशियाला लांडग्यांच्या तोंडी देऊन. जर्मनीने आपली मागणी स्पष्ट केली आहे. पूर्वेकडे चला. ( द्रांग नाक ऑस्टेन ) हा जर्मनीचा घोष आहे. तिकडे दुसऱ्या टोकाला 'पश्चिमेकडे चला' असे घोष उठत आहेत. अबिसीनियापेक्षाही अधिक मोठी लूट संकल्पित आहे. पाश्चिमात्य राष्ट्रे आणि अमेरिका त्या लुटीला मान्यता देऊन पाश्चिमात्य संस्कृतीचे संरक्षण करतील काय ? नात्सींचा वंशश्रेष्ठतेचा सिद्धान्त आणि जपानी सरंजामशाही यांची एकजूट ही एकोणिसाव्या शतकातील सारे कर्तृत्व नव्या रानटीवादाच्या अग्निमुखात टाकल्याशिवाय राहणार नाही; आणि हिंदी राष्ट्रवाद जगाला आपला 'आध्यात्मिक संदेश' द्यावयाला तत्परच आहे. हा संदेश म्हणजे : निरंकुश जडवादाच्या दोन्ही स्वरूपांना मान्यता. जग खरोखरच पागल बनले आहे. तरी आपण अनपेक्षित ठिकाणाहून असा धीराचा शब्द ऐकतो की, शांततेचे मित्र केव्हाही नसतील इतके आज प्रभावी आहेत. हे स्वप्नरंजन नसेल अशी आपण आशा करू या. मी बाहेर येण्यापूर्वी आणि तू वादळी केंद्रातून बाहेर पडण्यापूर्वी जगाचा भडका उडालेला मला नको आहे.

## ५५

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
एप्रिल २२, १९३६

उन्हाळा अधिकृतपणे सुरू झाला. सरकारी कचेऱ्या उंच हवेच्या ठिकाणी जाऊ लागल्या. साहजिकच नित्यनैमित्तिक कार्य लांबणीवर पडू लागले आहे -- आपला पत्रव्यवहारसुद्धा. जीवन हे गुंतागुंतीने भरलेले आहे खरे.

सहज आठवण झाली. जन्मजात हकानुसार फ्रेंच नागरिकत्व मिळविण्याचा प्रयत्न तू केलास का ? म्हणजे अंकल सॅमला इतक्या दूर अंतरावरून निष्ठा दाखविण्याचे प्रयोजन तरी तुला पडणार नाही. किती आचरटपणा आहे हा की, निव्वळ पासपोर्टला पुनर्मान्यता मिळविण्याच्या तांत्रिक कारणासाठी तुला अटलांटिक महासागर पार करून जावे लागावे. ते आवश्यक नाही, अशी माझी खात्री आहे. अमेरिकेतून परागंदा झालेल्या आणि कितीक युगे अमेरिकेच्या बाहेर काढलेल्या अमेरिकन लोकांनी युरप

भरलेला आहे. जन्मसिद्ध हक्क म्हणे अपरिवर्तनीय आहे. शब्दप्रयोग मोठा आकर्षक आहे. अठराव्या शतकातील भविष्यवेत्त्यांनी तो बराच लोकप्रिय केला. या देशाच्या अठराव्या शतकातील अनुभवातून जाण्याच्या दृष्टीने प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण घ्यावयाचे असूनही आमचा राजकीय कोष 'अपरिवर्तनीय हक्कांनी' भरून गेला आहे. किती विचित्र कल्पना तरी! जगात अपरिवर्तनीय असे काही तरी आहे काय? सारी माया की सारेच कल्पित! स्वातंत्र्य हे अपरिवर्तनीय आहे, तर लोक त्यापासून वंचित कसे होतात? ज्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले आहे, किंवा ज्यांनी त्याचा कधीच उपभोग घेतला नाही ते उच्च रवाने आपल्या "अपरिवर्तनीय जन्मसिद्ध हक्काचा घोष" करीत आहेत. तर्कशास्त्र येथे अगदीच लंगडे पडते एवढेच म्हणावे झाले! जन्माने जो हक्क तुला प्राप्त झाल्याचा बकवा केला जात आहे त्याच्याशिवायच तू जन्माला आली आहेस. अजीब नाहीतर काय हे तर्कशास्त्र. न्यायशास्त्राच्या आधारे सोडविण्यासारखे हे कोडे आहे. हेग येथील न्यायासनापुढेच तो प्रश्न सोडविण्यासाठी ठेवावयाला पाहिजे. पण ॲडॉल्फच्या झंझावातातून हेग न्यायालय तर आधी वाचू द्या!

फ्रान्समध्ये सध्याचे हे दिवस अगदी विलक्षण खळबळीचे आणि घाईगर्दीचे असतील नाही? सार्वत्रिक निवडणूक अणि नव्याने जन्माला आलेल्या प्रशियन लष्करशाहीच्या सावटाखाली! पण या घाईगर्दीत ते जर क्षणभर विचार करावयाला थांबले तर त्यांना कळून येईल की हे सावट पडले आहे ते विरुद्ध दिशेवर. संकट आले आहे, ते फ्रान्सवर नाही. मला एवढीच आशा आहे की, फ्रान्सच्या गौरवशाली तिसऱ्या रिपब्लिकचे राज्यकर्ते वैभवशाली तिसऱ्या राइशच्या परराष्ट्रधोरणाच्या वास्तविकतेकडे कानाडोळा करणार नाहीत. युद्ध ऱ्हाईन नदीवर होणार नाही. निदान नजिकच्या काळात तरी खास नाही. अर्थात एखाद्या अनपेक्षित घटनेमुळे केव्हा कसे आगीत तेल ओतले जाईल हे कोणी सांगावे? पण पूर्वरचित जी योजना आहे ती पूर्वेविरुद्ध पाश्चिमात्य राष्ट्रांची एकजूट उभारण्याची. जर्मनीत जे राजनैतिक डावपेच शिजत आहेत त्यांचे यश फार मोठ्या प्रमाणात फ्रेंच सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालावर अवलंबून आहे. फ्रान्समधील फ्रंट पाप्युलेर विजयी होईल हे जवळजवळ ठरल्यासारखे दिसत आहे. त्यातून वर उल्लेखिलेल्या दुष्ट योजनेच्या अंमलबजावणीला काहीसा धरबंद बसेल. पण प्रश्न आहे तो ही लोकशाहीवादी एकजूट किती काळ टिकेल? दुसऱ्या बाजला जपानी लोकांना युरोपमध्ये लवकरच निश्चित घडामोडी घडतील याबद्दल आत्मविश्वास वाटत आहे. त्यांच्या पाश्चिमात्य दोस्तांकडून त्यांना ही पूर्वसूचना मिळाली असावी. आणीबाणीचा हा क्षण आहे खरा. युरोपमधील लोक अक्षरशः दारूगोळ्याच्या कोठारावर बसले आहेत. परवाच वृद्ध लॉइड जॉर्जने परिस्थितीचे मोठे विदारक चित्र रंगविले. सुदैवाने कोणत्याही समंजस राष्ट्रातील समंजस माणसाला युद्ध नको आहे. प्रश्न आहे तो एवढाच की, भवितव्यतेविरुद्ध ते उभे राहू शकतील काय?

माझ्या बाजने तुझ्या अधीर प्रश्नाला–केव्हा ?–मी निश्चित उत्तर देऊ शकत नाही. त्या दृष्टीने काही ठाम वार्ता कळावी म्हणून मी प्रयत्न करीत आहे; पण आतापर्यंत तरी निदान मला उत्तेजनकारक असा निर्वाळा मिळालेला नाही. परिस्थिती आहे तशीच आहे—वर्षाऐवजी काही महिन्यांचा प्रश्न; आणि आपल्या अपेक्षेपेक्षा अधिक काही महिने काढावयाची वेळ आली तर आपण धीर सोडता कामा नये.

अलीकडे माझ्या मनात निवृत्त जीवन जगण्याचे विचार प्रबळपणाने घोळू लागले आहेत. निवृत्त कशासाठी ? तर शास्त्रीय लेखनकार्याला वाहून घेण्यासाठी. निदान काही काळ तरी. हा मोह माझ्या अधिक चांगल्या निर्णयावर ( म्हणजे व्यावहारिक दृष्ट्या ) मात करू शकला तर मी निश्चितपणे परदेशी जाईन. आणि पुराणा युरोप आज धडाडून पेटत चालला असताना मला जाण्यासारखे अमेरिका हे एकच ठिकाण राहिले. पण फार गंभीरपणे या योजनेबद्दल विचार करू नकोस. आजची मनःप्रवृत्ती त्यातून प्रकट होत आहे. काळजीपूर्वक विचार करून मी हे सांगत नाही. तथापि एवढे मात्र मला कबूल केलेच पाहिजे की ही विचित्र प्रकारची कल्पना माझ्या मनावर पकड घेऊ पाहात आहे. ती मला झुगारूनही देता येत नाही. आणखी स्पष्टपणाने बोलावयाचे तर माझ्या मनात फार कडवटपणा आला आहे. अनेक गाऱ्हाण्यांना वाचा फोडावीशी मला वाटते. चहू-बाजूंनी मला जी वागणूक मिळत आहे त्याबद्दल उद्वेग माझ्या मनात निर्माण झाला आहे. या भावना माझ्या मनात जागृत व्हाव्या ग्राबद्दल माझा मलाच राग येत आहे. पण ती गाऱ्हाणी खरी आहेत हे मात्र मी नाकारू शकत नाही. तथापि मला हेही पटते की, जगाच्या क्षुद्रतेमुळे माणसाने इतके विचलित होऊनही चालणार नाही. माझे विचार खूपच गुंतागुंतीचे आहेत आणि खरोखर माझे मन मला खुलेपणाने उघड करता आले असते तर किती चांगले झाले असते ! अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्या लिहिता येत नाहीत. केव्हातरी एकदा माझ्या मनाला जो प्रश्न सतावीत आहे, त्याबद्दल आपण विचारविनिमय करू. तो प्रश्न आपल्या जीवनाच्या साच्याच्यामध्ये गुंफलेला आहे. आणि तरीही त्या साच्याला धक्का दिल्याशिवाय हा प्रश्न समाधानकारकपणे सोडविता येणार नाही. आता प्रश्न इतका मनस्ताप देणारा का व्हावा याची तुला सहज कल्पना करता येईल. आज माझ्या मनाचे आक्रंदन चालले आहे ते हे की, व्यक्तीला पूर्णपणे वस्तुनिष्ठ होता येईल काय ? स्वतःसाठी मी विचार करावयाला शिकलो तेव्हापासून माझ्या मनात याबद्दल संशय नव्हता. साहजिकच भावनात्मकतेकडे माझा कल झुकत असलेला पाहून माझ्या मनाला यातना होऊ लागल्या आहेत. तू घाबरून जाऊ नकोस. विचारमंथनच आहे ते. मनातला हा आवेग आहे. तो काही काळानंतर निघूनही जाईल. तथापि जोवर ही मनःप्रवृत्ती उसळून येत आहे, तोवर त्याचा ताप हा होणारच. मला कोणताही प्रश्न टाळणे आवडत नाही हे तुला माहीत आहे. माझ्यासमोर येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाला धिटाईने तोंड देण्याची माझी तयारी असते आणि त्याची तड

गाठण्याची माझी पात्रता असते असाही नेहमीच माझा विश्वास होता. म्हणून प्रश्न समोर उभा राहावा आणि तो सोडविण्यासाठी माझ्या जीवनाचे जे तत्त्वज्ञान आहे त्यात बदल करण्याची वेळ यावी ही गोष्ट मला बरीच त्रासदायक वाटत आहे. वाटले तर याला आत्मिक संघर्ष म्हण. पण एवढी मात्र खात्री असू दे की, यातून मी सहीसलामत बाहेर पडेन. फक्त त्यासाठी जीवनाच्या वास्तविकतेशी प्रत्यक्ष संपर्क प्रस्थापित झाला पाहिजे असे दिसते.

मला जो प्रश्न अस्वस्थ करीत आहे तो हा : समूहाचा एक सभासद म्हणून व्यक्तीने जे प्रयत्न केले असतील त्याबद्दल व्यक्तिशः त्याला संपूर्णपणे निरपेक्ष राहता येईल काय ? तसे राहता येईल असे नेहमीच मला वाटत आले होते. पण त्या निष्ठेला आता दळ पोचत असलेला दिसत आहे. मला तो बदल मुळीच आवडत नाही. कारण या निष्ठेचा मला अभिमान वाटतो आणि साहजिकच ती ढळता कामा नये असे मला मनापासून वाटते. दैवदुर्विलास तरी कसा आहे पाहा. अनेक वर्षे मी एकलेपणानेच ओसाड रानातील उजाड शेत नांगरीत होतो, त्यात बीज टाकीत होतो. आज परिश्रमपूर्वक केलेल्या या जोपासनेतून बीज अंकुरित होत असल्याचे मला आढळून येऊ लागले आहे. आणि या आनंदाच्या क्षणीच मला निराशेने ग्रासावे याला विकृती न म्हणावे तर काय ? माझ्या मनात ही जी भावना उमटत आहे तिचा अर्थ तरी काय ? आपली सेवा रुजू व्हावी, मान्य केली जावी ही दडून राहिलेली इच्छा दुसरे काय ? या जाणीवेनेच मला फार मनस्ताप होत आहे. उपहासाच्या भावनेने माझे मन भरून गेले आहे. कोण्या एके काळी एका प्रज्ञावंताने एक खडा बोल ऐकविला—"सामान्यत्व हाच लोकप्रियतेचा पाया होय." या बोलात सत्याचा बराच मोठा अंश आहे हे जरी नाकारता आले नाही तरी त्यातील उपहास हा उद्वेगजनक आहे. आश्चर्य असे की, आता मला असे दिसू लागले आहे की, मी कबूल करीत होतो त्यापेक्षा कितीतरी पटींनी मोठा असा सत्याचा अंश या बोलात समाविष्ट झालेला आहे. नेतृत्व हे केवळ वस्तुनिष्ठ असावयाला पाहिजे, या माझ्या सिद्धान्ताला केवढा धोका निर्माण झाला आहे तो तूच पाहा. खरोखर, आता मला या सत्याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही की कुमार्गाने नेणे हेही मार्गदर्शनच आहे. आणि थोर नेते म्हणून ज्यांना मानले जाते ते बहुसंख्य वेळा कुमार्गदर्शनच करीत असतात. तथापि या दृष्टिकोणाचा तर्कशुद्ध निष्कर्ष ऐतिहासिक आवश्यकतेच्या दृष्टिकोणाशी विरोधी होईल.तो दृष्टिकोण ॲडॉल्फच्या बेदरकार सिद्धांताशी सुद्धा सुसंगत होईल की जनतेला फसविलेच पाहिजे. पण या चित्राला दुसरीही एक बाजू आहे आणि मला आशा आहे की, माझ्या निष्ठेला पाठबळ देऊ शकणारी सोडवणूक या प्रश्नातून मी काढू शकेन. विरोधविकासवादाचे अत्यंत प्रभावी हत्यार आपल्या हाती आहेच. वर सांगितलेल्या अनिष्ट गोष्टी खऱ्या तर आहेतच. पण ऐतिहासिक घडामोडी या अधिक मूलभूत अशा गोष्टींच्या आधारेच अखेर विकसित होत असतात.

व्यक्तिगत प्रभुत्व प्रस्थापित करण्याची जी इच्छा सारखी डोके वर काढीत असते ती या गोष्टी साध्या झाल्या तर आपोआपच नष्ट होईल.

हे सारे गूढगुंजन आहे नाही का ? अधिक योग्य असा काळ येईपर्यंत हे विचार-मंथन आपण पुढे ढकलू या. दरम्यान माझ्या मनःप्रवृत्तींशी मला शक्य तो मुकाबला केलाच पाहिजे. क्षणभर वाटते, मी त्याचा उल्लेखच करावयाला नको होता. तथापि आता उल्लेख झालाच आहे. तुझा अपेक्षाभंग होणार नाही अशी मला आशा आहे. प्रत्येक देवाचे पाय शाडूचेच असतात, त्याशिवाय तो देव कसा होईल ?

या वर्षी हवेने जरा कनवाळूपणा दाखविला आहे. सबंध मार्च महिन्यात अधून-मधून पाऊस पडतच राहिला म्हणून तपमान खाली राहिले. पण अखेरीस उन्हाळा आपल्या साऱ्या वैभवांनिशी अवतरला आहे. लवकरच संध्याकाळी कष्टाचे कोणतेही काम करणे अशक्य होईल. उंच उंच तुरुंगाच्या भिंती माझ्या खोलीच्या सभोवार असल्यामुळे त्या खोलीत अतिशय कोंदट वाटते. घामांच्या तिथे धारा लागतात आणि वातावरण असह्य होते. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे तुरुंग बंद होण्याची वेळ. संध्याकाळी साडेसात वाजेपर्यंत अंधार पडत नाही. आणखी काही दिवसांनी अर्धा तास वाढेलच. पण मला सहा वाजता बंद केले जाते. सूर्य उजळत असताना जनावराप्रमाणे कोंडले जाणे हे अती तापदायक आहे. माझ्या मांजराला सुद्धा त्याचा तिटकारा आहे आणि ते बाहेरच राहते. नाहीतर मला माहीत आहे, त्याला आत येऊन माझ्या पुस्तकावर बसणे अधिक आवडेल. त्याची ती आवडती जागा आहे. बहुधा त्याला वाटत असावे की, वाचणे आणि लिहिणे हा काळाचा अपव्यय आहे: अलीकडे त्याच्याही अडचणी सुरू झाल्या आहेत—वयात येण्यामुळे निर्माण झालेल्या. वसंतऋतूत तो वाढीस लागला आणि त्याला प्रेयसी हवीशी वाटू लागली. आक्रोश करीत तो हिंडू लागला. पण प्रेयसी कोठे मिळणार ? कैद्याच्या जीवनातील हाच तर चिरंतन प्रश्न आहे. सुदैवाने तो तसा कैदी नाही. तो तुरुंगात राहत आहे तो एवढ्याच समजुतीने की, आपल्याला येथे खाद्य मिळत आहे. आणि माझ्याबद्दल जी आवड त्याच्या मनात निर्माण झाली आहे ती याच भक्कम पायावर उभारलेली आहे. यापेक्षा त्याला तुरुंगात राहण्यासाठी अधिक कारण कोणते असणार ? म्हणूनच आपले मार्जारत्व प्रस्थापित करण्याची अनिवार ओढ त्याच्यामध्ये निर्माण झाली तेव्हा तो बाहेरच्या जगात निघून गेला. आता तो पुन्हा एकाकीपणाच्या आनंदात मग्न झाला आहे. बहुधा वक्तशीर जे खाद्य मिळते त्याच्या प्रेमासाठी त्याने त्याग केला नसावा. तो परतला त्याचे खरे कारण तेच असावे. परंतु ते एकमेव कारण मात्र खास नव्हे. अन्न निश्चित मिळणे ही त्याच्या जीवनाची मुख्य काळजी नव्हे. स्वातंत्र्यासाठी तो अन्नाचा त्याग करावयालाही मागेपुढे पाहत नाही. माझ्या या पेटीत रात्रभर कोंडून घ्यावयाला तो तयार नसतो आणि साऱ्या तुरुंगभर तो रात्री भटकत असतो. ही त्याची निशाचरी लक्षात घेऊन तो बाहेर जाण्यापूर्वीच मी त्याला अन्न देत

असतो. पण मी विसरलो तरी तो बाहेर जातोच. उदाहरणार्थ, आज संध्याकाळी मी लिहीत बसलो आणि तो निघूनही गेला. आता सकाळी माझी ही पेटी उघडली जाई-पर्यंत तो परत येऊ शकणार नाही.

बरीचशी पुस्तके माझ्याकडे आली आहेत. बहुतेक सर्व कादंबऱ्या आणि फारशा चांगल्या प्रतीच्या नव्हेत. तथापि अलीकडे 'ॲन्थनी ॲडव्हर्स' सारखी जी उच्चभ्रू कादंबरी मी वाचीत आहे तिचा विचार करता या कादंबऱ्या मला तरी स्वागतार्ह वाटत आहेत. या 'श्रेष्ठ आधुनिक कलाकृती' बद्दल माझे काही फारसे चांगले मत झालेले नाही. कंटाळवाणी आहे ती. कादंबऱ्यांच्या बाबतीतील माझी आवड सामान्यांची आहे—विकृत वाटण्याइतकी ठाम. आशयाच्या दृष्टीने अगदी पोकळ असे साहित्यप्रकार कितीही सुंदर असले तरी त्यांचा आस्वाद घेण्याची पात्रता माझ्यामध्ये खास नाही. 'ॲन्थनी ॲडव्हर्स' हे या 'निर्मेळ कलाकृती' च्या वर्गातील वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण होय. अगदी बारीक अक्षरातील हजारावर पाने आणि आशय इतका थोडा—आणि जो काही आशय आहे तो सारा गूढवाद! मनाचा गोंधळ उडाला आणि मती कुंठित झाली तर नवल काय? अर्थात लेखन अती सुंदर. पण भाषेतून विचार व्यक्त व्हावयाचे असतात ना? नुसत्या भाषेला सौंदर्यवाचक मोल कसे प्राप्त होऊ शकेल. फुलांची सुंदर माळ पाहून जसा तुम्हाला आनंद होईल तसा कौशल्यपूर्ण रीतीने रचलेले वाक्य वाचून तुम्हांला आनंद होऊ शकणार नाही. साहित्य हे कलेच्या इतर शाखांपासून उदाहरणार्थ, चित्र-कला, शिल्पकला, वेगळे असते ते यामुळे की साहित्याला आकार तसाच आशयही हवा असतो. म्हणूनच चांगले काव्य इतके दुर्मिळ असते.

नव्याने जी पुस्तके माझ्याकडे आली त्यात सारबॉन विद्यापीठाचे एक प्रकाशन आहे. ते तुझ्याकडूनच आले असावे. मला त्याचा फार आनंद झाला. त्या मालिकेत आणखीही काही चांगली पुस्तके आहेत, आणि ती स्वस्तही आहेत. त्यांची यादी मी पुढे पाठवीन. दे ब्रोग्ली याच्या दिग्दर्शनाखाली ती तयार झालेली आहेत. या गृहस्थाचा सामाजिक राजकीय दृष्टिकोण कोणता आहे हे जाणून घेण्याला मी उत्सुक आहे. ल ॲक्शन फ्रँके की कॅमेलॉ दु रॉयचा तो सभासद आहे? शास्त्रीय क्षेत्रात तो क्रांतिकारक आहे खरा. तसे असले तर विज्ञानाची तत्त्वचिकित्सा करताना ते एक आश्चर्यच ठरेल.

तुझे पत्र अद्याप यात्रेवरून परत आलेले नाही. बदलीच्या चक्रात ते सापडलेले दिसते. म्हणजे आणखी काही दिवस त्याला पोचावयाला लागतील. मला मात्र माझे पत्र आज पाठविलेच पाहिजे. तेच भवितव्य त्याच्याही नशिबी असेल.[1] आता वर्षापेक्षा अधिक काळ त्यांनी पाहिलेच आहे की आपला पत्रव्यवहार निखालस कौटुंबिक असतो, आणि त्यात आक्षेपार्ह असे काहीही नसते. तेव्हा अधिकाऱ्यांनी आपल्यावरील नियंत्रण

१. माझी सारी पत्रे सी. आय. डी. च्या अलाहाबाद येथील मुख्य कचेरीत तपासणीसाठी पाठविली जात असत.

हलके करून आतुरतेने वाट पाहण्याच्या जादा त्रासापासून आपल्याला वाचविले तर त्यांचे काही बिघडेल काय ? तथापि आणखी काही महिन्यांच्या आत कटाक्षाने मर्यादित केलेल्या आणि कठोरपणे नियंत्रित केलेल्या पत्रांच्या दानावर जगण्याची आपल्याला आवश्यकता राहणार नाही. आपल्याला दळणवळणाचे आणि सहजीवनाचे स्वातंत्र्य राहील. नव्याने प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्याचा उत्सव आपण कसा बरे साजरा करू ? मिळू द्या तर प्रथम ते-- मग पाहता येईल.

५६

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
मे २४, १९३६

या महिन्यात सुद्धा केव्हा ? या तुझ्या प्रश्नाला निश्चित उत्तर देण्याच्या परिस्थितीत मी नाही. या वेळपर्यंत काहीतरी पक्केपणाने मला कळेल अशी मला आशा होती. पण परिस्थिती अद्याप आहे तशीच आहे--वर्षाऐवजी महिन्यांचा प्रश्न माझी अपेक्षा होती–आणि ती सफल व्हावयाला पाहिजे होती–की मी जुलैच्या मध्याला मुक्त होईन. तोवर सहा वर्षांची शिक्षा झालेल्या कोठल्याही योग्य आचरणाच्या कैद्याला प्रत्यक्षपणे जेवढा काळ तुरुंगात काढावा लागावा त्यापेक्षा अधिक काळ मी तुरुंगात काढलेला असेन. आणि मी आचरणाच्या बाबतीत विलक्षण चांगल्या रीतीने वागणारा कैदी आहे आणि माझ्यावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांनी खुलेपणाने तर त्याचा निर्वाळा दिला आहेच. पण त्यांनी वेळोवेळी असे आश्वासनही दिले आहे की, अत्यंत आवश्यक असेल त्यापेक्षा जास्त काळ मला तुरुंगात ठेवले जाणार नाही, अशी आपण व्यवस्था करू. पण जेव्हा हिशेब करावयाचा दिवस आला तेव्हा असे घडले की, माझ्या अवस्थेतील आणि माझ्या वागणुकीच्या कैद्याला जेवढे दिवस तुरुंगात घालवावे लागतील त्यापेक्षा पाच किंवा सहा महिने मला अधिक घालवले पाहिजेत. हे कोणत्याही अर्थाने न्यायाचे ठरेल का ? सर्वांनी मान्य केलेल्या माझ्या चांगल्या वागणुकीबद्दल मला जास्तीत जास्त सूट मिळण्याची अपेक्षा नष्ट झाल्यानंतर साहजिकच मी त्याच्या खालोखाल जी काही सूट मिळेल तिची अपेक्षा करू लागलो. त्या दृष्टीने कमीत कमी जरी मला सवलत दिली गेली असती तरी ऑगस्टअखेर मला सुटावयाला हरकत नव्हती. मी त्याबद्दल तरी मोठ्या आत्मविश्वासाने आशा करीत होतो. त्या कल्पनेनेच मी अलीकडील एका पत्रात अस्पष्ट अशी सूचना दिली होती. मी स्वतः त्या आशेवर डोळे लावून बसलो होतो. पण आता असे उघड होऊ लागले आहे की, ती आशा सुद्धा फोल ठरणार आहे आणि माझ्या सुटकेचा क्षण नोव्हेंबर अखेरपर्यंत लांबण्याची शक्यता आहे. पण माझी सहनशक्ती आता तुटावयाची वेळ आली आहे. ज्याला अंत नाही असा ताण कोण

सहन करू शकेल ? चांगल्या वागणुकीचा कैदी म्हणून माझी जी नोंद झाली आहे ती टिकवून धरणे मला खरोखरीच आता शक्य होणार नाही. अर्थात मला जी अत्यंत अन्यायाची वागणूक मिळत आहे तिचा निषेध करण्यासाठी मी काही केले तर नैतिक वा कायदेशीर अशा दोन्ही दृष्टींनी ही गैरवर्तणूक खास होणार नाही. कैद्यालासुद्धा काही हक्क असतात. शिवाय निर्वाणीचा मार्ग स्वीकारण्यापूर्वी माझ्यापुढे खुली असलेली सारी पावले मी टाकीत आहे आणि टाकल्याशिवाय राहणार नाही. म्हणजे मला जे तुरुंगात ठेवीत आहेत त्यांनी घालून दिलेल्या सान्या अटी मी पाळल्यासारखे होईल. तथापि त्याचा परिणाममात्र माझी परिस्थिती अधिकच बिघडण्यात होण्याची शक्यता आहे. त्या परिस्थितीत कोणतीही किरकोळ सबब देऊन मला जी किमान सूट देण्यात आली आहे तीसुद्धा रद्द केली जाईल आणि मग पुढील नोव्हेंबरनंतर एक वर्ष उशिराने माझी मुक्तता करण्यात येईल. पण तसे झाले तर या दडपशाहीपुढे मान वाकविण्यासाठी मी मात्र तुरुंगात नसेन. दंडनीतीबद्दलचे जे तत्त्व मी विशद केले आहे त्यापासून मी अद्यापही ढळलेलो नाही. त्या तत्त्वानुसार पाच वर्षांपेक्षा अधिक काळ तुरुंगात काढावयाला लावणे आणि विशेषतः जे निर्ढावलेले गुन्हेगार नाहीत त्यांना काढावयाला लावणे हे मृत्यूपेक्षाही भयानक आहे. हा जिवंत मृत्यू पाच वर्षांपेक्षा अधिक काळ मी मुळीच सहन करणार नाही. तुरुंगातून सुटका करून घेणे माझ्या शक्तीच्या बाहेरचे आहे. पण मर्त्य जीवाचे कवच झुगारून देणे माझ्या शक्तीबाहेरचे खास नाही. निराशेच्या मनःप्रवृत्तीत हे लिहिले जात नाही, तर निर्धाराने आणि जगाला हे विदित व्हावे म्हणून मी हे लिहीत आहे. दुसरा मार्ग माझ्यापुढे खुला नाही. कोणत्याही कैद्याला ज्याची हमी मिळते—कारण मी खुनी नाही, ना दरोडेखोर, ना चोर,—ते हिरावून घेतले जाणे हे सर्वस्वी निंद्य आहे, हा शुद्ध असह्य असा जुलूम आहे. स्वाभिमान असलेली कोणतीही व्यक्ती त्याच्यापुढे मान वाकविणार नाही, तिने वाकवूही नये.

आता आपण इतर गोष्टींबद्दल बोलू. तुझे पत्र पुन्हा उशिरा आले. येण्यात उशीर नाही. परतण्यात ( गुप्त पोलीस खात्याच्या कचेरीतून ). उद्यापर्यंत ते माझ्याकडे येईल असे मला वाटते. असहाय्य परिस्थितीत आशाच तेवढी करावयाची असते. फार मोठी अपेक्षा करणे हा एक अपूर्व अनुभव असतो आणि ती साध्य होण्याच्या अगदी जवळ आली असताना तिचा भंग होणे हा एक निष्ठुर घाला असतो. आले पुन्हा ते रडगाणे ! वीट आला आहे मला त्याचा. अरे देवा, मी विकृत होत चाललो आहे की काय ? नाही. नाही. मी तसा शाबूत आहे, माझे डोके ठिकाणावर आहे आणि आणखी बरीच वर्षे मला तसेच राहावयाचे आहे.

‘ बर्फ आणि पंखा ’ यांचे चित्र अगदी भुरळ पाडणारे आहे. फक्त माझी एक पुस्ती आहे. ते चित्र थंडगार करणारे तसेच क्षुधा निर्माण करणारेही असू दे. म्हणजे नुसत्या बर्फाच्या जोडीला बर्फासारखी थंडगार बीअरही असू देत ! मी एक विचार

करणारे यंत्र आहे; पण पौरुषाचे लक्षण असलेले जे सरळ माकडहाड त्याची जोपासना करताना दुसऱ्या टोकाकडे मी दुर्लक्ष करणार नाही. मला वाटते तुझा आवडता लेखक, फ्रेझर ( मी सुद्धा या मूर्तिभंजक शिलेदाराचा भोक्ता आहे ) यानेच म्हटले आहे की, मानवत्वाचे (·पुरुषी अहंकाराची परंपरा नष्ट करण्यासाठी या शब्दप्रयोगाचा सर्रास उपयोग करावयाला पाहिजे ) पूर्णत्व जर कशाने साध्य होणार असेल तर आपल्या शरीररचनेतील मध्यवर्ती जो स्तंभ आहे त्यांच्या दोन्ही टोकांकडून निर्माण होऊ शकणाऱ्या आनंदाचा पुरेपूर आस्वाद घेण्यानेच होय. ग्रीक लोक या ध्येयाच्या सर्वांत जास्त जवळ गेले; आणि होमरने वर्णन केलेल्या अनिवार हास्याने भरलेल्या दिवसांचा आपण अनुभव घेतला आहे. तो अनुभव अविस्मरणीय आहे आणि यापुढेही तो जगल्याशिवाय आपण राहणार नाही. म्हणजे पाहा, नजीकच्या भविष्यकाळावर ढगांची सावली पडलेली असूनही दूरवरच्या काळातील भवितव्याबद्दल माझा आत्मविश्वास काही ढळलेला नाही.

कॅफेमधे त्या दुबळ्या मनाच्या स्त्रीशी तुझे जे हितगुज झाले ते गोंधळात टाकणारे आहे. दूरवरच्या प्रवासाचे तिने जे भाकित केले त्याबद्दल तुला काय वाटते ? तो प्रवास अत्यंत यशस्वी होईल हे जे तिने दुसरे भाकित केले आहे त्याबद्दल तिला धन्यवाद दे. बर्लिनमधील उपाहारगृहात ज्या मुलाने तुझा हात पाहिला त्याच्याबद्दल काय सांगू ? तो शुद्ध लाजाळूपणा होता. उघडे डोळे ठेवले होते त्याने आणि जे पाहिले ते त्याने फडाफडा सांगितले. तुला आठवत नाही का ? तो मुलगा पॉटसडॅमजवळच्या त्या ठिकाणी आपल्या बरोबर सहलीसाठी आला होता आणि त्याचेही गोऱ्या एमीशी प्रियाराधन चालले होते. तिच्याबद्दलची वार्ता ऐकून मला वाईट मात्र फार वाटले. त्यावरून तिच्या संबंधाने तू जे लिहिलेस ' दमदाटी देण्यासाठी नव्हे, ' त्याची मला आठवण होते. मी ती दमदाटी मानीत नाही, तर विमुक्तीची निःसंदिग्ध घोषणा मानतो.

तुरुंगातून सुटून, एखाद्या मुलीच्या "जी मला अधिक चमकदार आणि आकर्षक" वाटेल—प्रेमपाशात सापडण्याची मला मुळीच शक्यता दिसत नाही. तुरुंगाच्या दाराबाहेर फारशा कोणी वाट पाहतील असेही नाही. एकंदरीत असा मोहपाश घालणाऱ्या मुलींची जगात रेलचेल झालेली नाही. विशेषतः या देशात त्यांना मागणी फार आहे—– मोहिनी घालण्यासाठी विमुक्तपणे संचार करणाऱ्या मुली फारच थोड्या असल्यामुळे. शिवाय मी इतरत्र बराच गर्क असणार आहे.

तुझ्या पासपोर्टचा व्यवहार संपला, निदान काही काळापुरता हे ऐकून हायसे वाटले. वर्षानंतर काय घडेल हे कोणी सांगावे. फ्रंट पाप्युलेरच्या सध्याच्या राजवटीत फ्रेंच नागरिकत्वाचा तुझा जन्मसिद्ध हक्क तुला प्राप्त करून घेता येईल. तिसऱ्या रिपब्लिक-बद्दलची तुझी भक्ती जाहीर कर; देशभक्ती हा मार्क्सवादी सद्गुण झाला आहे. फ्रान्स-मधील निवडणुकीतील आश्चर्यकारक निकालाला महान क्रांतीच्या घोषवाक्याचे पुनरुज्जीवन

कितीसे कारणीभूत आहे कोण जाणे. लामार्से गायले का ते ! संगीतासाठी हा बदल फार चांगला. तथापि कादूराच्यापुढे ते गेले नसतील अशी आशा आहे. कान्त्रेका हे भित्तिपत्रक फार चांगले होते. अनपेक्षित विजयामुळे मॉस्कोतील देव अगदी भांबावून गेले असतील. फक्त हा विजय कोणाचा आहे याची जाणीव त्यांना कधीच का होणार नाही ? त्यांच्या अपरोक्ष हा त्यांना विजय मिळाला असल्यामुळे त्याचे पुढे काय करावयाचे याबद्दल ते साशंक असणे शक्य आहे. थोरे एलिसे राजवाड्याचे दार ठोठावणार की काय ?[1] मग तेवीसच्या ऐतिहासिक परंपरेचा शेवटच झाला म्हणावयाचा. थोरे हा उपाहारगृहातील एक उमदा नोकर असे. पण मला वाटते आतापर्यंत तो साफ बिघडून गेला असेल. दोरियो धुळीस मिळत असलेला दिसतो. एका अमेरिकन मासिकात प्रसिद्ध झालेला त्याच्या भाषणातील काही भाग मी वाचला. फ्रान्स व सोव्हिएट युनियन यांच्यामध्ये जो करार झाला आहे त्याला मान्यता देण्याच्या प्रश्नावर फ्रेंच पार्लमेंटमधे त्याने केलेले हे भाषण होते. त्या भाषणाचा वृत्तान्त खरा असेल तर हे भाषण अत्यंत वाईट होते. स्त्रीव्हलिटच्या भाषणासारखे मला ते वाटले-द्वेषाने आणि कडवटपणाने ओतप्रोत भरलेले. अर्थात कडवट होण्याला दोरियोला अनेक कारणे आहेत. इतरांनाही तशीच आहेत. पण माणसाने तोल सोडता कामा नये. मला वाटते त्याचा तोल सुटत चालला आहे. अरेरे, फार दुःखाची घटना होईल ती. माझा त्याच्यावर फार जीव आहे. तो असा एक जुना मित्र आहे की, ज्याला परत भेटण्यासाठी मी फार दूरवर चालत जाईन. पण काय करणार ! वास्तविकतेचे प्रवाह--विरोधी प्रवाह आपल्या नियंत्रणशक्तीच्या पलीकडचे आहेत. पण चांगल्या माणसांना निराशेच्या गर्तेत लोटण्याबद्दल मी साऱ्या देवादिकांना, विशेषतः छोट्या देवांना जबाबदार धरल्याशिवाय खात्रीने राहणार नाही. केवढा घातकी अपव्यय आहे हा !

खरोखर या जगात इतक्या काही उद्वेगजनक गोष्टी आहेत की, ज्या पचविण्यासाठी तसाच जबरदस्त कोठा हवा. मी ज्या आत्मिक संघर्षात सापडलो होतो, त्यातून मी जवळ जवळ बाहेर पडलो आहे. त्याबद्दल मी लिहिणे हे मूर्खपणाचे होते. मला त्याबद्दल लाजच वाटली पाहिजे. पण मी काही आत्मवृत्त लिहीत नाही. म्हणून मी जे लिहितो त्याबद्दल एवढे सावध राहण्याचे मला कारण नाही. या देशातील घडामोडींबद्दल लिहावयाचे तर येथे केवढा शब्दांचा गलबला माजला आहे, त्याची तुला कल्पना आली असेलच. पिदान बोलणे होत आहे ही जरी एक घटनाच असली तरी त्याचा परिणाम गैरसमज निर्माण करणारा होतो. मला त्याबद्दल चिंता वाटते. योग्य ते नियंत्रण आणि मार्गदर्शन येथे नाही. ते मिळाले तर परिस्थितीला चांगला आकार मिळणे शक्य आहे.

---

१. मॉरिस थोरे हा फ्रान्सच्या कम्युनिस्ट पक्षाचा सरचिटणीस होता.

गेल्या महिन्यात मी 'अॅन्थनी अॅडव्हर्स'बद्दल तुला लिहिले. फॉर्टी डेज ऑफ मूसादाघ हे सुद्धा अलीकडील एक खळबळ उडवुन देणारे पुस्तक आहे. या कादंबरीचा लेखक जर्मन आहे. गेल्या युद्धामध्ये आर्मीनियन लोकांनी तुर्कांकडून होणाऱ्या कत्तलीचा जो प्रतिकार केला त्याची ही कथा आहे. ही एक पहिल्या प्रतीची कलाकृती मानली जाते. मी ती अद्याप वाचली नाही. आधुनिक साहित्यातील बोलबाला झालेल्या कलाकृतींबद्दल माझी बऱ्याच वेळा जशी निराशा होते तशी या कादंबरीच्या बाबतीत होणार नाही अशी मला आशा आहे. गाल्सवर्दीमध्ये तुला रस वाटला ही आनंदाची गोष्ट आहे. स्वानसॉंग तू वाचलेस का ? तुला फ्लुअर कशी आवडली ? ती जर मला माझ्या आदर्शाच्या अगदी जवळची तितकीच दूर असल्यासारखी वाटली तर भांडवलदारी संस्कृतीचा पुरस्कर्ता म्हणून माझा निषेध केला जावयाला पाहिजे का ?

एक गोष्ट मला अगत्याने हवी आहे. ती म्हणजे आइन्स्टाइनचा नवा प्रबंध—फिजिक्स अँड रिॲलिटी. तो फिलाडेल्फियाच्या फ्रँकलिन इन्स्टिटयूटच्या मार्च महिन्याच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेला त्याचा प्रबंध—युनायटेड फील्ड थिअरीचे नव्यातील नवीन स्पष्टीकरण मला मिळालाच नाही. किती खेदजनक अवस्था आहे ही नाही ! मला या दोन्ही गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. सध्या सापेक्षतावादाच्या सिद्धान्ताचे ज्ञानशास्त्रावर जे परिणाम होत आहेत त्यांचा मी अभ्यास करीत आहे. आइन्स्टाइनच्या नव्या सिद्धान्तामुळे माझ्या कल्पनांना बळकटी येत आहे असे दिसते. म्हणून त्यांचा विस्तार करण्यासाठी मला या प्रबंधाची जरुरी आहे. तथापि त्यावर जो अखेरचा हात फिरवावा लागेल तो माझी परिस्थिती सुधारल्यावरच. तोवर जे शक्य आहे तेवढे मी करीत आहे आणि त्याच्या परिणामांबद्दल माझे समाधान आहे —चांगला तात्त्विक आशय दिल्याबद्दल.

फ्रँकफुर्ट इन्स्टिटयूटच्या लोकांबरोबर तू चर्चा केलीस का ? म्हणजे हिंदुस्थानात एक शाखा काढणे किंवा ती जोडून घेणे याबद्दल जी सूचना मी केली होती तिच्याबद्दल या योजनेला पाठिंबा देण्याच्या बाबतीत त्यांचे मन वळविता आले तर ते खात्रीने फार उपयुक्त होईल. त्यामुळे शास्त्रीय लेखन करण्याचे जे मी ठरविले आहे ते पार पाडण्याच्या दृष्टीने मला फार उपयोग होईल. एवढे खरे की पुढील काही काळ तरी या लेखनालाच बहुशः मी वाहून घेणार आहे. मी जे लेखन केले आहे ते या देशात प्रकाशित करण्याची माझी इच्छा आहे. त्या दृष्टीने इन्स्टिटयूटकडून काही मदत मिळाली तर ती स्वागतार्ह आहे. अर्थात मी जे मुख्य कार्य केले आहे ते कटाक्षाने समाजशास्त्र विषयक नाही. पण इन्स्टिटयूट ज्या प्रकारच्या समाजशास्त्रविषयक संशोधनाला उत्तेजन देते त्यासाठी तत्त्वज्ञानविषयक असा पाया या देशात या लेखनामुळे मी घातला आहे. मार्गदर्शक अशी तत्त्वज्ञानविषयक तत्त्वे नसल्यामुळे या देशातील समाजशास्त्रविषयक संशोधनाचे स्वरूप भूतकालाचा गौरव करणे एवढेच झाले आहे. त्यामुळे सध्याच्या वास्त-

विकृतेकडे चिकित्सक दृष्टिकोणातून पाहण्याला वाव राहत नाही, आणि साहजिकच भविष्याचा रस्ता रोखला जातो. शिवाय हाती घेतलेले सध्याचे काम मी संपविले की भारतीय तत्त्वज्ञानाचा चिकित्सक इतिहास लिहिण्याचे खरेखुरे समाजशास्त्रविषयक कार्य मी स्वतःच हाती घेईन. तुरुंगातील पहिल्या दिवसात मी या दृष्टीने बरीचशी प्राथमिक तयारी केलेलीच आहे. म्हणून माझी योजना ही इन्स्टिट्यूटच्या कार्यक्रमाशी बरीच जुळणारी आहे. मला वाटते फेलिक्स हीच या बाबतीतील निर्णय घेणारी व्यक्ती असावी. त्याची समजूत घालणे कठीण नाही. पण दरम्यानच्या काळात ब्यूनो आयर्सशी धान्याचा व्यापार करण्यापेक्षा ओडेसाशी करणे त्याला अधिक किफायतशीर वाटले नसले म्हणजे झाले.

क्लेमेन्सबद्दलचा तुझा उल्लेख वाचून मी जरा गोंधळात पडलो आहे. मला माहीत नव्हते की, त्याला असे महत्त्व प्राप्त झाले आहे की ज्यामुळे त्याच्या घोषणा अमेरिकन लोक म्हणतात त्याप्रमाणे गुरुकिल्लीने उघडले जाणारे ज्ञानभांडार मानले जावे. त्याचा भाऊ हा अर्थात अगदीच निराळ्या प्रकारचा माणूस आहे. माझी त्याच्या बाबतीतही निराशा झाली आहे. तो दाखवू पहात नाही असा आशय त्याच्यामध्ये आहे. कोण्या दुष्ट संगतीमुळे त्याच्यामध्ये विलक्षण दुबळेपणा आला आहे. क्लेमेन्सच्या बाबतीत बोलावयाचे तर, कोठल्याही परिस्थितीत त्याचा गंभीरपणे विचार करण्याचे कारण नाही. तो स्वतःचा विचार स्वतः करू शकणार नाही आणि नव्याने काही सांगू शकणार नाही हे पक्के समजून रहा. एवढेच म्हणता येईल की, अशा प्रकारच्या लोकांचीच आजकाल चलती आहे. दुर्दैवाने ते खरे आहे हे मी जाणतो. तुमच्या जगात सर्वसंग्राहक वृत्तीने थैमान घातलेले दिसत आहे. या देशात अपरिपक्वतेचेच नाणे अद्याप रूढ आहे. त्यात भर पडते ती आचरट संधिसाधुपणाची आणि त्यातही निष्ठा नसल्यामुळे पुष्कळ वेळा तो फुकटच जातो. हा सारा सावळागोंधळ युद्धदेवाच्या निर्दय प्रहारांची वाट पाहून दूर होणार नाही. पण ग्रीक शोकांतिकेतील अपरिहार्य अशा निर्वाणीच्या प्रसंगाप्रमाणे युद्धदेव अवतीर्ण होण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत, आणि सैतानाच्या स्वाधीन झालेले जग हिटलरला शांततेचा मार्ग दाखवावयाला सांगत असल्याचा विचित्र देखावा जगात दिसत असतानाही त्याच्या आगमनाची चाहूल ऐकू येऊ लागली आहे.

शापित जगाला युद्धदेवाच्या भीषण नृत्यासाठी खुशाल तयारी करू देत. त्याच वेळी आपण मात्र आपल्या कौटुंबिक जीवनाकडे परतूया. माझे लहानसे घरकुल मोडले आहे. माझ्या मांजराने बंदिस्त अवस्थेविरुद्ध बंड पुकारले आणि माझा त्याग केला. माझ्या लहानशा पेटीबाहेर त्याचे जे निशाचरी व्यवहार चालत असत त्यात त्याने आपले सन्मान-पद दोन पिलांना ठार करून साजरे केले. ही पिले ही तुरुंगाची नवी कमाई होती. इतक्या शुभ मुहूर्तावर सुरू केलेले कार्य पुरे पार पाडण्याचा त्याचा निर्धार होता. पण मी त्याचे निशाचरी स्वातंत्र्य हिरावून घेऊन त्याच्या खुनी साहसाला रायबंद घातला. बंदिवासात

तो अगदी वेड्यासारखा झाला. एका सकाळी त्याने पळून जाण्याची संधी साधली आणि उरलेल्या दोन पिलांवर तो चाल करुन गेला. पण त्या पिलांचे रक्षण करण्याची जबाबदारी काही कैद्यांनी स्वीकारली होती. त्यांनी या भावी खुन्याला पकडले, त्याला सज्जड शासन केले आणि तुरुंगाच्या बाहेर त्याला हाकलून लावले. त्याने बाहेर काही दिवस काढले. कारण परत आत येण्याच्या बाबतीत त्याने जिवे धाक घेतला होता. मला असे कळले की, बाहेरच्या विशाल जगात तो खूप सुखी होता आणि परत आणण्याचे जे प्रयत्न करण्यात आले त्यांचा त्याने खूपच प्रतिकार केला. मला वाटले की, घरगुती आरामापेक्षा त्याने स्वातंत्र्य अधिक पसंत केले असावे. म्हणून घरकुलातून मी त्याला बाद केला. त्यामुळे मी खिन्न झाल्याशिवाय मात्र राहिलो नाही. आता हा उधळ्या मुलगा पुनः परत आला आहे. काल त्याला पोत्यात बांधून बाहेर नेण्यात आले. पुन्हा मार बसण्याच्या भीतीने तो अर्धमेला झाला होता. उधळ्या मुलाच्या आगमनाखातर एक गोन्हा कापण्याची मला शक्यता नसल्यामुळे, ते न करता मी प्यालाभर दुधाने त्याचे स्वागत केले. सामुदायिक खुनाचा आणि स्वातंत्र्यसंपादनाचा प्रयोग करण्यापूर्वी तो दुधाचा अगदी तिटकारा करीत असे—मांजराच्या दृष्टीने विचित्र गोष्ट. आता दुधावर त्याने ताव मारला, इतक्या उत्साहाने की जणू ते रसभरित कच्चे मांसच आहे—त्याचे आवडते अन्न. स्वातंत्र्याच्या काळात त्याला पुरेसे अन्न मिळाले नाही. तो बारीक आणि घाणेरडा झाला आहे. पण खरे तर घरच्या सुखापासून तो दूर गेला तो स्वातंत्र्याच्या आकांक्षेने खास नव्हे. त्याला हाकलून लावण्यात आले आणि तो बाहेर राहिला तो आत्यंतिक भीतीने. त्याला स्वातंत्र्य हवे होते ते आपला परमेश्वरदत्त जन्मसिद्ध हक्क बजावण्यासाठी—लहान पिलांना मारण्याचा.मला वाटते अजूनही त्या स्वातंत्र्याची त्याला ओढ लागलेली असेल. पण सुदैवाने दरम्यानच्या काळात पिलेही त्या वयाच्या पलीकडे जाऊ लागली आहेत की ज्या वयात जनावरांच्या नीतिनियमांनुसार त्यांना ठार करण्याचा बोक्याला कायदेशीर अधिकार असतो.

माझ्या घरकुलाबद्दल तुला विशेष आस्था वाटण्यासारखी एवढीच वार्ता. आता फुले मुळीच नाहीत. फक्त नवी झाडे, जी दोन महिन्यांत फुलून निघतील. या वर्षी पाऊस खूपच लवकर आला आहे. त्यामुळे भाजून काढणाऱ्या उन्हाची झळ थोडेच दिवस सहन करावी लागली. सध्याचे हवामान मात्र अधिकच तापदायक आहे—दमट, कोंदट आणि घामट पण सर पडून गेल्यानंतर काही तास बरेच थंड वाटू लागते. ते सुद्धा पुष्कळ आहे. एकंदरीने या वर्षी उन्हाळा बराच सुसह्य झाला आहे. म्हणून मला वाटते की, चाळिशीच्या पलीकडे मी झुकलेला असूनही मी अखेरीस तुरुंगातून फारशी तोशीस न पडता आणि पुरेशा सुदृढ स्थितीत बाहेर पडेन. मग जीवन पुन्हा सुरू होईल. नुकतेच मला कळले की, तुझे पत्र आले आहे. केवढे हे भाग्य! परमेश्वर दयाळू आहे खरा—अश्रद्ध इसमाच्या बाबतीत सुद्धा. फक्त कंजूष आहे बेटा त्या बाबतीत.

५७

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
जून २०, १९३६

आणखी महिन्याभरात या जीवनाची माझी पाच वर्षे पुरी होतील; आणि आत जवळजवळ ठरल्यासारखेच झाले आहे की, माझी सुटका व्हावयाला अजून बरेच महिने जावयाचे आहेत. माझे अजूनही असेच मत आहे की पाच वर्षांच्या जिवंत मृत्यू-पेक्षा मृत्यू अधिक भयानक नाही. पण माणसाचा निश्चय डळमळून टाकणारे काही मोह हे असतातच. तथापि मी जे गेल्या पत्रात लिहिले आहे ते कायमच आहे. त्यानंतर मी सरकारपुढे हा प्रश्न ठेवला आहे. म्हणजे काही सवलत मिळण्याची मला आशा आहे असे नव्हे, फक्त न्याय वगैरेबद्दल जे इतके बोलले जाते त्याचा विचार करून मी न्याय मिळतो का हे पाहण्यासाठी केवळ गंमत म्हणून माझी बाजू ठासून मांडली आहे. तसे पाहिले तर माझी सुटका मी केलेल्या कायद्यानुसार नव्हे तर सरकारी कायद्यानुसार जेव्हा रीतसर होईल तेव्हाच करण्यात यावी एवढीच माझी मागणी आहे. या माझ्या न्याय्य मागणीचा स्वीकार करणारे पत्र आले नाही तर इतर जे मार्ग आहेत त्यांचा मी अवलंब करीन. या महिन्याच्या अखेरीला उत्तर यावयाला पाहिजे. ते उत्तर नकारार्थी आले तर हे पत्र तुला ज्या सुमारास पोचेल तेव्हा माझ्या बाजूने मी दुसरे पाऊल टाकलेलेही असेल. खरे सांगावयाचे तर, माझ्या परिस्थितीतील सामान्य गुन्हेगारापेक्षा अधिक काळ तुरुं-गात काढावयाची बेशरमपणे माझ्यावर सक्ती करण्यात आली नाही तर हे पत्र पोच-ण्याच्या सुमारास म्हणजे ८ जुलै रोजी मी बाहेर पडावयाला पाहिजे. त्या दिवशी मी साडे चार वर्षे पुरी करीन. (खटल्याच्या काळातील सहा महिने न मोजता) म्हणजे माझ्यासारखी शिक्षा झालेल्या कैद्याने जेवढी शिक्षा प्रत्यक्षपणे भोगावयाला पाहिजे त्या-पेक्षा अधिक काळ मी शिक्षा भोगलेली असेन. अर्थात् तुरुंगातील त्याची वागणूक मात्र अशी पाहिजे की, ज्यामुळे सूट देण्याची शिफारस त्याच्याबद्दल केली जाईल. माझे तुरुंगातील वर्तन त्या दृष्टीने अनुकूल आहे. त्यामुळेच करारापेक्षा अधिक देण्याची सक्ती करणे हे मला असह्य वाटत आहे. पण सध्याची माझी प्रतिकाराची प्रवृत्ती इतरही कारणांमुळे बळावली आहे. मी ज्या 'आत्मिक संघर्षाचा' पूर्वी उल्लेख केला ते एक महत्त्वाचे कारण आहे. खरोखर तुरुंगातील आणखी काही महिन्यांच्या वास्तव्यापेक्षाही या कारणामुळे मी अधिक बेचैन झालो आहे. अर्थात सध्याच्या माझ्या मनःप्रवृत्तीवर या वास्तव्याच्या अपेक्षेने थोडा परिणाम केला असेल यातही संशय नाही.

माझ्यापुढे उभ्या राहिलेल्या प्रश्नाचे स्वरूप काय आहे याचे आकलन तुला झाले असेल असे मी समजतो. मागील पत्रात जे मी लिहिले त्याचे तुला कोडेही पडले अस-ण्याचा संभव आहे म्हणा. आताही या पूर्णपणे अपुऱ्या पडणाऱ्या साधनातून अधिक प्रकाश पाडण्याचा मी प्रयत्न करणार नाही. परंतु मी मागील पत्रात स्पष्ट केल्याप्रमाणे

त्या प्रश्नाचे व्यक्तिगत स्वरूप नाहीसे झाले आहे आणि एक आकर्षक तत्त्वज्ञानविषयक प्रश्न असा आकार त्याने घेतला आहे. साहजिकच गेली अनेक वर्षे मी ज्या प्रश्नाचा विचार करीत आलो आहे त्यापेक्षा अगदीच भिन्न असा हा प्रश्न मला हाताळावा लागत आहे. त्याचे कारण असे आहे की, या प्रश्नामुळे शोध घेण्याचे एक अगदीच नवे क्षेत्र उघडले जात आहे. ते क्षेत्र म्हणजे सामाजिक मनोविज्ञान असे मी तात्पुरते नाव देईन. अगदीच उनाड असे क्षण सोडून दिले तर मी बहुशः हा शोध माझ्या मनाबाहेर ठेवतो. संमिश्र पेय हे खरे पेय म्हणून आनंददायी असेल. पण रूपक म्हणून विचार करता ते फार गोंधळ निर्माण करणारे होते. तत्त्वज्ञानात्मक मिश्रण करावयाची माझी इच्छा नाही. ( ते असो म्हणा. मी तयार करीत असलेले ते सुप्रसिद्ध संमिश्र पेय तुला आठवते का ? ) ज्या प्रश्नाने मला गोंधळात टाकले आहे तो व्यक्तिगत अनुभवातून निर्माण झाला आहे, माझ्या एकट्याच्याच नव्हे; म्हणून त्यावर सांगोपांग चर्चा झाली पाहिजे आणि त्या बाबतीत तर खरी अडचण येणार आहे. हा प्रश्न इतका व्यक्तिगत स्वरूपाचा आहे की आजवर तो आत्मचरित्रपर साहित्यापुरताच मर्यादित राहिला होता. त्याच्या उलट मला स्पष्टपणे कळून आले आहे ते असे की, या प्रश्नाची सोडवणूक आत्मचिकित्सेतून होणार नाही--अर्थात् त्या योजनेत आत्मचिकित्सेला स्थान हे राहीलच--तर लोकप्रियता, यश, मान्यता वगैरे आविष्कारांच्या चिकित्सक समजुतीतून होईल. या सर्व बाबतीत माझे एक सुस्पष्ट तत्त्वज्ञान होते हे तुला माहीत आहे किंवा नाही कोण जाणे! मला वाटते लायनच्या ( ट्रॉट्स्की ) संबंधात मी एकदा थोडेसे लिहिलेही होते. माझ्या तत्त्वज्ञानानुसार आचरण करणे मला कठीण वाटू लागले आहे--माझ्या अंतर्मनाच्या जाणिवेनुसार. कारण ती जाणीव हेच मुळी अंतिम निर्णय देणारे सर्वोच्च न्यायालय आहे. माझ्या प्रश्नाचा गाभा आहे तो हाः या प्रश्नाच्या बाबतीत व्यवस्थित रीतीने विचार करावयाला मला सध्या वेळ नाही ही गोष्ट सोडली तरी खरी अडचण आहे ती ही की, सामाजिक मानसशास्त्राला या दडून बसलेल्या प्रश्नांचा शोध घेण्यासाठी रूढ अशी पद्धती अस्तित्वात नाही. आजवर त्या प्रश्नांचा आत्मनिवेदनपर पद्धतीनेच विचार करण्यात आला.

वस्तुनिष्ठ सत्याचे मूलधन म्हणून आत्मचरित्र हे मी सर्वस्वी अविश्वसनीय मानतो. कोणीही व्यक्ती त्याच्या वा तिच्या नाजूक जिव्हाळ्याच्या अनुभवाबद्दल सत्य आणि त्रिवार सत्य कधीही सांगू शकणार नाही हे जवळजवळ निश्चित ठरलेले आहे. मला खरोखर कळत नाही की, बुद्धिमान लोक आत्मवृत्त लिहिण्याच्या बाबतीत इतकी उतावीळ का करतात ? हा सुद्धा मनोविश्लेषणाचाच प्रश्न आहे. चरित्र ही निराळी गोष्ट आहे, पण स्वलिखित चरित्र ? लेखकांच्या प्रामाणिकपणाचा आदर राखूनही त्या आत्मचरित्रातील ऐतिहासिक सत्याबद्दल आणि मनोविज्ञानात्मक महतीबद्दल मी साशंक आहे. मग भले साहित्य म्हणून ते नमुनेदार असू द्या. खरे म्हटले तर हा प्रामाणिकपणा आणि

सचोटी यांचा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो ' अंतर्मनातील मनोव्यापारांचा. ' फ्रॉइडवादी देवाच्या आदेशापासून कोण बरे कधी मुक्त होऊ शकतो ? खरोखर मूर्तिभंजक मत प्रकट करण्याचे धाडस करून मी असे म्हणेन की, आत्मवृत्त लिहिणे हे त्या देवतेच्या मंदिरात पूजा करण्यासारखे आहे. अत्यंत सत्यनिष्ठ माणूसही आपल्या नकळत आत्म-वृत्तामध्ये साऱ्या दंतकथांचा मालमसाला खच्चून भरत असतो, नाहीतर या साहसाचे तर्कशुद्ध रीतीने स्पष्टीकरण करता येत नाही. विचार करू शकणाऱ्या, विचार प्रकट करू शकणाऱ्या, सांस्कृतिक मूल्यांच्या साठ्यामध्ये काही मोलाची भर टाकू शकणाऱ्या व्यक्तीला लिहिण्यासाठी इतर अनेक विषय सहजपणाने सापडू शकतील, मग आत्मचरित्र लिहि-ण्याच्या बाबतीत जो एक भावनेचा नैसर्गिक अडथळा येतो त्याच्याशी झटापट करण्याचा त्याने प्रयत्न का करावा ? स्वतःबद्दल बोलणे ? हा एक वृत्तीचाच प्रश्न आहे नाही का ?

आता हे नुसते शब्दब्रह्म झाले. मला खात्री आहे तुझ्या अंतःकरणात प्रकाश पडण्याऐवजी तू अधिकच गोंधळून गेली असशील. पण प्रकाश टाकण्याची माझी इच्छाच नव्हती. मी कसा टाकू शकेन ? माझे मनच अंधारात चाचपडत असताना अधिक मोकळेपणाने आणि प्रांजळपणाने आपल्याला बोलता येईल तेव्हाच आपण त्या-बद्दल चर्चा करू—बहुधा लवकरच. किती लवकर ? कोठे ? तेच तेच प्रश्न. ज्यांच्याविषयी फक्त अंदाज तेवढा व्यक्त करता येतो. लवकरच—कोठेतरी एवढे निश्चित झाले आहे.

युरपमध्ये येऊन तुला भेटण्याचे ठरविले तरी ते कठीण आहे याची मला जाणीव आहे. पण अलीकडे माझा कल तिकडेच फार झुकू लागला आहे. माझ्या मनातील संघ-र्षाचा हा व्यावहारिक पुरावाच होय. कल उघडउघड असा की जगाला सत्यनाश करून घ्यावयाचा असेल तर आपण काय करणार ? परंतु या मुद्यावरील तुझ्या चिंतनाचा मी विचार केला आहे आणि मी त्याच्याशी सहमत आहे. फक्त हे जे मन आहे ते तिथलेच असण्याचा संभव आहे. नाहीतरी त्या मनाचा संघर्ष असाच चालू राहिला तर ते तिथे पोचल्याशिवाय राहणारच नाही. निराशामय वाटते ना हे सारे ? खरे आहे ते. व्हर्सायचा तहनामा या नावाने सुव्यवस्था आणि सुरक्षा यांचे जे अधिष्ठान प्रस्थापित करण्यात आले आहे ते संरक्षकांच्या संमतीनेच उधळून लावले जात असताना आणि लीग ऑफ नेशन्सवर मुसोलिनीकडून होणाऱ्या लत्ताप्रहाराला या आढ्यताखोर संस्थेच्या एकनिष्ठ सभासदांकडून पाठिंबा दिला जात असताना कोणी आशावादी तरी कसा राहू शकेल ? होय, ते शक्य आहे. केव्हा ? तर असा एक सोडवणुकीचा मार्ग शोधून काढण्या-वर आशा विसंबून ठेवली जाईल, की ज्याविषयी सहानुभूती दाखविण्याबद्दल व्यक्तीला अनेक वर्षांचा कारावास भोगावा लागतो. आश्चर्य असे की, या व्यक्ती तुरुंगात खितपत पडलेल्या असताना त्यांचे संरक्षकच हिंसेचे थैमान माजावे म्हणून पूर्वतयारी करताना दिसत आहेत. या हिंसाचाराला आपण पायबंद घातला नाही ( आणि त्यासाठी एकच मार्ग उपलब्ध आहे ) तर आपणा सर्वांचा विध्वंस अटळ आहे.

साधारणपणे हे दिवस मी आळसात घालवीत आहे. मुख्यतः हवामान हेच त्याचे कारण आहे. या वर्षी पाऊस जरा लवकर आला. म्हणून भयानक उन्हाळा फार काळ टिकला नाही. परंतु सध्याचे हवामान तितकेच वाईट आहे. रात्रंदिवस घामाच्या धारा लागाव्या, आणि विशेषतः कपडे बदलावयाचे झाले तर एकापेक्षा जास्त कपडे नसावे आणि ते वारंवार धुवावयाचे म्हटले तर पुरेसा साबण नसावा ही गोष्ट किती शिसारी आणणारी असेल याची तूच कल्पना कर. ते कसे तरी जमविले तर कपडे फाटून जातात आणि ती मोठीच आपत्ती आहे. कपडे तरी काय ? ते जुनेपाने झाले तरच ते सहन करता येतात. कारण मग जरा त्यांचा रंग पांढरट होतो आणि जुनेपणामुळे ते थोडेसे मुलायमही होतात. नवे कपडे ? त्यांचा विचारसुद्धा नको. त्यांचा पोत काय आणि त्यांचे रूप तरी काय ? म्हणून वापरता येतील तितके दिवस मी जुने कपडेच घालतो. कौटुंबिक वातावरणाची ही एक झलक. माणसाला कशाचीही सवय होते नाही का ?

माझ्या ग्रंथाच्या प्रकाशनाबद्दल काही पक्की व्यवस्था करण्यात आली तर पुढील पाच वर्षे मी शास्त्रीय लेखनासाठीच केवळ खर्च करावयाला तयार आहे—मी सुरू केलेले कार्य पुरे करण्यासाठी; आणि त्या कार्यक्रमात युरपच्या भेटीचा आणि तेथील कमी जास्त वास्तव्याचा खात्रीने समावेश होईल. हाइन्झ आणि ऑगस्टसाठी हे एक आकर्षणच आहे. नजीकच्या काळात मी तिथे असावे असे त्यांना खरोखरीच वाटत असेल तर वाईलच्या मागे त्यांनी लागावे हे बरे. मी एवढेच आश्वासन देऊ शकतो की हे एक अतिउपयुक्त कार्य होईल आणि मी भक्कम असे कार्य करूनही दाखवीन-- कदाचित वैचारिक दृष्टीने ही माझी चिरकालीन देणगीही होऊ शकेल. बाकीचे सारे इतके क्षणभंगुर दिसत आहे. शिवाय नजीकच्या भविष्यकाळात इतके तातडीचे किंवा व्यवहार्य असे काही करावयाचेही दिसत नाही. दूरचा पल्ला आपल्याला गाठावयाचा आहे याबद्दल माझ्या मनाची खूणगाठ आता पटली आहे. या देशातील परिस्थितीचे हाइन्झने जे निदान केले होते ते अगदी अचूक होते. तेच निदान आजही लागू आहे. परिस्थिती खरोखरीच अपरिपक्व आहे. हा जो सावळागोंधळ माजला आहे त्यात मीही सामील होऊन किंवा ज्याचे मोल संशयास्पद आहे असे नैतिक पुण्य गाठी मारण्यासाठी वारंवार जबर मोल देण्याची मी तयारी करून कोणताही उपयुक्त हेतू साध्य होणार नाही. नैतिक पुण्य ! या अनैतिक जगातील एक दंभ ! पुढील वेळी आपण एका आल्हाद-दायक मैफलीत जेव्हा बसू, तेव्हा भविष्यकाळातील हवेत इमले उठविण्यात आपण गर्क होणार नाही तर सध्याच्या परिस्थितीत कसे जगावे याचा विचार करू. आपली स्वतःची एक 'रॉबिन हिल' असावी ही कल्पना तुला कशी आवडेल ? माझी स्वतःची आजची मनःस्थिती ती आहे. पण माझ्या वडिलांनी चहाचा व्यापार करण्याची कल्पकता दाखविली नाही. उलट भावी कारकून आणि भावी काळात घडविले जाणारे वकील यांना संस्कृत शिकविण्यात त्यांनी जन्म घालविला. त्याचा परिणाम काय झाला आहे तो

आपल्या या स्थितीवरून दिसत आहे.

ज्ञानसिद्धान्तावरील प्रकरण नुकतेच मी पुरे केले. सुमारे पन्नास हजार शब्दांचे हे प्रकरण आहे. दोन महिने त्यासाठी घालविले. माझे काम मंदगतीने होत आहे का ? अलीकडे मी आळशी होत चालल्याचा उल्लेख आधी केलाच आहे मी. काही काही वेळा दिवसातून एक शब्दही मी लिहिला नाही. पण दुर्दैवाने हा आनंद देणारा आळशीपणा नव्हे. त्यात मौज......

पूर्वीच्या पानावरील अखेरचे वाक्य अपुरेच राहिले आहे. बाकीची पाने मी लिहीत असताना पूर्वीची पाने स्थानिक नियंत्रकांकडून मंजूर व्हावी म्हणून मी त्यांच्याकडे पाठविली आहेत. हे पत्र शनिवारच्या एअरमेलने तुझ्याकडे जाण्यासाठी तुला येथून पाठविले जावे म्हणून ही योजना मी केली आहे. मध्यंतरी वरिष्ठ सेन्सॉरकडील येण्याजाण्याचा प्रवास ते करीलच.

माझ्या निर्धाराबद्दल तुला मी जे लिहिले होते तो दुबळा करणारे मोह तुझ्या पत्रामुळे वाढले आहेत. तुझ्या पत्रात तू भवितव्याचे केलेले वर्णन वास्तववादी असल्यामुळे ते अधिकच हृदयस्पर्शी झाले आहे. अर्थात त्या रंगदार वर्णनात भावुकतेची बारीकशी छटा ही आहेच. इतर गोष्टींबद्दल तात्काळ मला थोडेसे लिहिलेच पाहिजे. म्हणून या विषयाची अखेर करताना मी तुला एवढेच फेर आश्वासन देतो की, माझा समजूतदारपणा सहजासहजी नष्ट होणार नाही. माझा क्रोधसुद्धा समजूतदारपणाच्या भाषेतच प्रगट होईल.

"त्या प्रश्नाबद्दल" तू जे उद्गार काढले आहेस ( असे पाहा, हा व्यक्तिशः माझा प्रश्न आता राहिलेला नाही. अनेक जे प्रश्न सोडवावयाचे आहेत त्यापैकीच तो एक आहे आणि तो सोडविण्याच्या दृष्टीने मला काही हातभार लावण्याची इच्छा आहे ) त्यातून गंभीरपणे विचार करावयाला मला बरेचसे खाद्य मिळेल. तथापि वाट पाहणे हा एकमेव सुज्ञपणाचा मार्ग ठरतो. मी त्याला 'सर्वांत शहाणपणाचा मार्ग' म्हणणार नाही. विशेषतः तुम्हांला जेव्हा समाधान असते–मुख्य मुद्दा आहे तो समाधान प्राप्त होण्याची तुमच्यामध्ये पात्रता आहे किंवा नाही हा होय—की आपण ज्यासाठी धडपड केली ते साध्य झाल्याचे आपण पाहत आहो तेव्हा तर वाट पाहणे हा तेवढा शहाणपणाचा मार्ग मुळीच ठरू शकत नाही. मी अस्वस्थ झालो, कारण काही काळ मला वाटले की, हे समाधान मानण्याची आपल्यामध्ये जेवढी हवी तेवढी पात्रता नाही. ती भावना आता गेली आहे. माझ्यामध्ये ती पात्रता आहेच. उरलेले सारे समतोलपणाने अभ्यास करण्याचे, समीक्षण करण्याचे आणि–वाट पाहण्याचे कार्य आहे.

५८

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
जुलै २०, १९३६

अखेरीस त्या यक्षप्रश्नाचे–केव्हा ?–उत्तर देण्याच्या परिस्थितीत मी आलो आहे. फक्त ते उत्तर मन उल्हसित करणारे असणार नाही. अद्याप आणखी चार महिने राहिले आहेत. अगदीच अनपेक्षित असे या ना त्या रीतीने काही घडले नाही (तशी आशा फारशी नाहीच) तर नोव्हेंबरच्या या सुमाराला मी सुटेन. या प्रकारच्या जीवनाला तोंड देण्याची माझी कधीही तयारी नसतानासुद्धा त्या जीवनाचे आणखी चार महिने मला काढावे लागणार आहेत. तथापि तुझ्या पत्राने माझा सारा निर्धार नष्ट केला आहे. उद्या तुरुंगातील माझी पाच वर्षे पुरी होतील.

तुझा संदेश मला अखेरीस पोचला––कित्येक महिन्यांपूर्वी व्यक्तिशः तू पाठविलेला. बरोबर दोन वर्षांनंतर काल मला मुलाखतीची संधी मिळाली. अलमोडा येथे मी असताना–आणि ती १९३४ च्या उन्हाळ्याची गोष्ट–माझी एका व्यक्तीशी मुलाखत झाली होती. त्यानंतरची ही पहिली मुलाखत. ज्यांच्याबरोबर संदेश आला[1] ते महिन्यापूर्वी विश्रांतीसाठी जवळच्या उंच हवेच्या ठिकाणी गेले होते. व्यक्तिशः येऊन त्यांनी संदेश देणे शक्यच नव्हते. त्यांनी एका स्थानिक मित्राकडे हे काम सोपविले. हा मित्र एक प्रमुख नागरिक असल्यामुळे––स्थानिक म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष––मुलाखतीसाठी त्याने परवानगी मिळविली. उरलेल्या महिन्यात तो न चुकता मला भेटणार आहे.

पूर्वीच्या पत्रात मी जे लिहिले त्यात भर घालावयाची म्हणजे तू युरोप सोडण्यापूर्वी माझ्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या बाबतीत काही प्राथमिक तयारी करावी अशी माझी इच्छा आहे. पुढील महिन्यात त्या ग्रंथातील आशयाबद्दल मी आणखी काही साहित्य पाठवीन. ऑगस्टचे डायलेक्टिक मटीरिॲलिझम (इंग्रजी आवृत्ती) ज्या लोकांनी प्रकाशित केले ते हेही पुस्तक प्रकाशनासाठी घेऊ शकतील. कारण हे पुस्तकही त्याच प्रकारचे आहे. ऑगस्टचे पुस्तक इंग्रजीतून प्रकाशित झाले ही फार आनंदाची गोष्ट आहे. या विषयावरील लोकांना आकलन होण्यासारखा तो सर्वोत्कृष्ट प्रबंध आहे. उदाहरणार्थ, या देशात त्याचा फार उपयोग होईल. माझ्या ग्रंथातील अखेरचे प्रकरण या विषयावरच राहील. प्रत्यक्षपणे मी ते लिहिलेले नाही. पण त्याची आखणी मात्र तपशीलवार मी केली आहे. खरे सांगावयाचे तर विज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांचे तत्त्वज्ञानात्मक वैशिष्ट्य काय आहे याबद्दलचे जे स्पष्टीकरण करण्यात आले आहे त्यावरून क्रमाक्रमाने काढलेले निष्कर्ष आणि आधुनिक शास्त्रीय सिद्धान्तापासून निर्माण होत असलेल्या म्हणून मानल्या जाणाऱ्या अगदी अलीकडच्या काळातील तत्त्वज्ञानविष-

---

१ जवाहरलाल नेहरू

यक मतांची समीक्षा यातून मी माझ्या मनाशी त्याची आखणी केली आहे. या निष्कर्षांची जी मालिका तयार झाली आहे आणि जे विचार फारसे परंपरागत वाटणार नाहीत त्यांच्याबद्दल ऑगस्टशी चर्चा करण्याची माझी फार इच्छा आहे. पण हे निष्कर्ष तर्कदृष्ट्या टाळता येण्यासारखे नाहीत. व्यवहारवादाचा आरोप करण्यात जरी अतिरेक होत असला तरी मला असे वाटते की, तो आजवर करण्यात आला त्यापेक्षा अधिक परिणामकारक रीतीने म्हणजेच तिरस्कार आणि अधीरता यांच्या आविर्भावासहित केला गेला पाहिजे. अर्थात ही कितीही न्याय्य असली तरी आपल्या तत्त्वज्ञानाच्या अचूकतेबद्दल ज्यांची अद्याप खात्री पटलेली नाही त्यांच्यावर यामुळे फारसे वजन पडण्याची शक्यता नाही या मुद्द्यावर मी विशेष भर दिला आहे आणि बाबावाक्य प्रमाण मानण्याची जी ठळक सार्वत्रिक प्रवृत्ती दिसून येत आहे तिच्यावर हल्ला चढविणेही मला आवश्यक वाटले आहे. आपल्याला हे कबूल करण्याचे धैर्य असले पाहिजे की, अखेरचा शब्द काही एका शतकापूर्वीच बोलला गेला नाही आणि आपण हीही जाणीव ठेवली पाहिजे की आपल्या तत्त्वज्ञानाची मूलभूत तत्त्वे विज्ञानावर आधारलेली असल्यामुळे, विज्ञानातील प्रगतीच्या अनुषंगाने काही मुद्द्यांची फेरतपासणी, स्पष्टीकरण किंवा फेरआखणी करणे आवश्यक ठरेल. ड्यूहरिंगची समीक्षा करताना एंगल्सने जे म्हटले ते आपण लक्षात ठेवले पाहिजे. त्याने ड्यूहरिंगवर हल्ला चढविला आहे तो तत्त्वज्ञानाची एक अभेद्य यंत्रपद्धती ड्यूहरिंगने बनविली म्हणून. ज्या तात्त्विक यंत्रपद्धतीवर एंगल्सने इतका हिरीरीने हल्ला चढविला ती आपल्या काळातील सुधारणाविरोधकांच्या दृष्टीने एक अचल तत्त्वच झाले आहे. सिद्धान्ताबद्दलच्या आग्रहामुळे विचारपद्धतीचे अस्तित्वच नाहीसे होत आहे. तथापि विचारपद्धती हेच तर आपल्या तत्त्वज्ञानाचे सर्वांत प्रभावी असे हत्यार झाले आहे. त्यामुळे आपले सिद्धान्त एकसारखे विकसित करावयाला आपल्याला वाव मिळतो आणि त्यामुळे ज्ञानाच्या सर्व शाखांचा समन्वय, जे तत्त्वज्ञान एक बंदिस्त विचारपद्धती नव्हे, आणि सुस्पष्ट अशा विसंगतीमध्ये तर्कशुद्ध एकसूत्रीपणा आणणाऱ्या कल्पनापद्धतीची ज्या तत्त्वज्ञानाला जोड मिळालेली आहे, त्या तत्त्वज्ञानाच्या चौकटीतच होऊ शकतो हे प्रदर्शित करणे शक्य होते. मी जवळजवळ असे म्हणावयाला तयार आहे की, मार्क्सवाद हा सिद्धान्तांचा एक समुच्चय नव्हे तर विचारपद्धतीची एक दिशा आहे. त्यातील आशयाबद्दल माझे असे मत आहे की, मूलभूत तत्त्वांचा अणुमात्रही त्याग न करता त्यातील काही कल्पना सोडता येणे शक्य आहे. संज्ञेबद्दल आग्रह न धरता आपण त्यातील आशयाला महत्त्व दिले पाहिजे आणि अशा रीतीने धर्मपंथ बनविल्याच्या आरोपाच्या कक्षेबाहेर आपण स्वतःला ठेवले पाहिजे. आचरट सनातनीपणाने जे आंधळे झालेले नाहीत त्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, जड वस्तूच्या कल्पनेचा आशय परंपरागत कल्पनेपेक्षा अगदीच निराळा आढळून आला आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, संज्ञेलाच जर आपण कटाक्षाने चिकटून राहिलो

तर शाब्दिक वादाच्या आवर्तात आपण सापडतो; आणि त्यातून बराचसा गोंधळ निर्माण होतो. त्या परिस्थितीत संज्ञेची व्याख्या करण्यासाठीच आपल्याला बराचसा वेळ नाहक खर्च करावा लागेल. रूढ झालेल्या संज्ञांच्या आशयाच्या स्वरूपामध्येच क्रांती झाल्यामुळे जेथे जुन्या कल्पना अर्थहीन आणि चुकीचे मार्गदर्शन करणाऱ्या होत आहेत, तेथे जुन्या संज्ञांबद्दल आग्रह धरण्यात अर्थ काय ? माझा असा स्पष्ट निर्णय झाला आहे की, आपल्या तत्त्वज्ञानाला " भौतिक वस्तुनिष्ठवाद " असे नवे नाव देता येईल आणि दिले पाहिजे. परंतु जडवस्तूबद्दलच्या जुन्या कल्पनेचा न पटण्यासारखा बचाव करून या नामाभिधानाची तरफदारी करण्यापेक्षा जगाबद्दलचा आपला जो दृष्टिकोण आहे, त्यामागील आवश्यक तत्त्व कोणते ते वर्णनात्मक रीतीने दिग्दर्शित करणे अधिक उपयुक्त होईल. माझे असे मत आहे की, "भौतिक वस्तुनिष्ठवाद ही संज्ञा, जे तत्त्वज्ञान आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचे सारे भांडार तर्कशुद्ध पद्धतीत--जिला अंत नाही अशा--एकत्रित करू शकते त्याला अत्यंत समर्पक आहे. आणि जडवादाचे तेच तर सार आहे. जोवर या सत्त्वाचे स्पष्टपणाने आकलन केले जाईल आणि मूलभूत तत्त्वांच्या अनुषंगानेच ते विकसित केले जाईल तोवर ही संज्ञा अशी विस्तृत करता येईल की, ज्यामुळे चुकीचे मार्गदर्शन करू शकणाऱ्या विचार-पद्धतीला वावच राहणार नाही.

आशयाच्या कल्पनेच्या बाबतीत जी नाकारता न येण्यासारखी क्रांती झाली आहे तिच्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी 'विरोधविकास' या विशेषणाचा विशेष उपयोग होऊ शकणार नाही. ते विचारपद्धतीच्या स्वरूपावरच भर देते आणि त्या दृष्टीने ते फार समर्पक आहे. पण तरी प्रश्न हा राहतोच : जडवस्तू म्हणजे काय ? त्याची पुनःपुन्हा व्याख्या केली जात आहे ( मी स्वतःही आणखी एका व्याख्येची त्यात भर टाकली आहे. ) आणि त्यामुळे असे झाले आहे की, नवा आशय आणि जुनी कल्पना यात काहीही साम्य राहिलेले नाही. तथापि हा संबंध विसरता येणार नाही. म्हणून माझी सूचना आहे की, जुन्या कल्पनेची नव्या व्याख्यांशी सांगड घालणे सोडून देण्यात यावे आणि अधिक समर्पक अशी संज्ञा स्वीकारण्यात यावी– स्पष्टीकरणाच्या हेतूने. आपण जर जडवस्तूच्या कल्पनेला हेकेखोरपणाने चिकटून राहिलो आणि आधुनिक शास्त्रीय संशोधनाच्या संदर्भात ही कल्पना बदलली पाहिजे, अशी जी आपल्या तत्वज्ञानानेच सक्ती केली आहे तिच्याप्रमाणे आपण बदल करावयाला तयार झालो नाही, तर उदाहरणार्थ, ब्रह्मवादाच्या तर्कशुद्ध परिणतीबद्दल वाद घालणे आपल्याला फार कठीण होईल. अशा निसटत्या भूमीवर आपण उभे न राहणे बरे. एकाणुवाद किंवा देकार्तच्या बुद्धिवादाला आलेले कल्पनावादी कडू फळ यांच्याविरुद्ध दंड थोपटण्यासाठी स्पिनोझा ठीक होता. पण आज ' स्पिनोझाकडे परत चला ' असा मंत्रघोष आपल्याला करता येणार नाही. तथापि आमचे तत्त्वज्ञान जडवस्तूच्या कल्पनेनुसार उभेही राहात नाही आणि पडतही नाही अशी सारे धैर्य एकवटून आपण घोषणा केली नाही तर

आपण सुद्धा धर्मपंथच बनवीत आहो अशा आरोपापासून आपण मुक्त होणार नाही.

'मनोद्रव्यवादाचा' मी एक कठोर टीकाकार आहे. मी त्या सिद्धान्ताच्या फाडून चिंध्या केल्या आहेत. त्याचप्रमाणे हायझेनबर्गचा नवकाण्टवाद ( काण्टवादी ज्ञानशास्त्राचे पुनरुज्जीवन करण्याचीच त्याची सूचना आहे याची किती लोकांना जाणीव आहे कोण जाणे ) सुद्धा मला गोंधळात टाकू शकत नाही. पण सत्य आहे ते असे की जड आणि चैतन्य यांच्यामधील वैशिष्ट्य नाहीसे झाल्यामुळे तत्त्वज्ञानाला वस्तुनिष्ठ सत्याची अशी व्याख्या करणे भाग पडू लागले आहे की, ज्यात या दोघांचाही समावेश होऊ शकेल. 'वस्तुनिष्ठ असते ती जडवस्तू' ही जुनी व्याख्या काहीच सिद्ध करीत नाही. ती सिद्ध झालेली गोष्ट गृहीत तेवढी धरते. शिवाय त्यातून आणखी काही धोक्याच्या सिद्धान्ताकडे आपण खेचले जातो. जग जे माझ्या दृष्टीने वस्तुनिष्ठ आहे त्यात इतर लोकांची मने हा जगाचाच घटक होय; आणि माझ्या मनाचे संबंध त्यांच्याशी तशाच प्रकारचे आहेत. आपण ब्यूएकनरच्या आचरटपणाचा स्वीकार करून मन हा जडाचा स्राव आहे अशी व्याख्या करू शकत नाही. त्यातून निष्पन्न काय होते ?—वस्तुनिष्ठ मन. त्याचे आपण काय करणार ? आपण त्यातून अधिक चांगला मार्ग काढला नाही तर ब्रह्मवादाचा स्वीकार केल्याशिवाय गत्यंतर राहात नाही.

या वर्षी नेहमीपेक्षा जास्त पाऊस पडला. म्हणून उन्हाळ्याचा फार त्रास झाला नाही. पण उष्णता पुन्हा काही काळ वाढेलच. आता सुद्धा सूर्य मावळताच असह्य होऊ लागते—कुंद हवेमुळे. लवकरच थंड आणि प्रसन्न हवा होईल. माझी पेटी पुन्हा फुलांनी भरली आहे. गेल्या वर्षीच्या फुलझाडांना बहर आला आहे—अगदी :रंगीबेरंगी. मेंडलचा प्रयोग काही प्रमाणात मी करून पाहिला. पण सूक्ष्मदर्शक यंत्राशिवाय तुम्हांला फारसे काही करता येत नाही. तथापि या वर्षी विशिष्ट प्रकारची लाल फुले निर्माण करण्यात मी यश मिळविले आहे.

५९

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
ऑगस्ट २३, १९३६

अद्याप तीन महिने. काळाची सत्यता नाकारणाऱ्या तत्त्वज्ञानामध्ये काही अर्थ असावयाला हवा होता असे मला वाटते. ते वृद्धकपी कधी तुरुंगात गेले नसावे किंवा पागलखाना हे जे त्यांचे स्थान त्याच्यापासून दूर राहिले असावे. तो अनुभव त्यांना आला असता तर इतकी बाष्कळ बडबड त्यांनी केली नसती.

माझ्या ग्रंथाचा सारांश तू तयार करीत आहेस. त्यासाठी आणखी काही मजकूर मी पाठवून देईन. पण पूर्वीच्या माझ्या पत्रात मी जी कल्पना दिली त्यापेक्षा अधिक

विस्तृत देणे कठीण आहे. पूर्ण सारांश पाठवायचे म्हटले तरी एका पत्रात समाविष्ट होऊ शकणार नाही इतका तो जाडजूड होईल. त्यानंतर ग्रंथाच्या रचनेचा प्रश्न अद्याप निश्चित व्हावयाचाच आहे. म्हणजे तीन खंडांतील एक ग्रंथ तो करावयाचा की तीन वेगवेगळी पुस्तके तयार करावयाची ? अलमोड्याहून मी जो आराखडा पाठविला होता त्यात एकंदर योजनेचे स्वरूप देण्यात आले आहे. पण त्यानंतर मी जे लेखन केले आहे त्यामुळे आधुनिक शास्त्राचे तत्त्वज्ञानात्मक परिणाम याबद्दलचा विभाग एका मोठ्या पुस्तकाच्या आकाराचा झाला आहे. ( सुमारे हजार छापील पाने. ) गेले वर्षभर मी केवळ त्यावरच लक्ष केंद्रित केले आहे. मला असे वाटते की या भागाची अनुक्रमणिका मी मागील एका पत्रात दिली आहे. म्हणून त्याबद्दल थोडीशीच पुरवणी मी जोडणार आहे.

मूळ योजना अशी होती की, मुख्यतः भौतिक शास्त्रांच्या अनुषंगाने जे तत्त्वज्ञानात्मक निष्कर्ष काढण्यात आले आहेत त्यांना बळकटी आणण्यासाठी प्राणिशास्त्र आणि मनोविज्ञानशास्त्र यावरील प्रकरणे परिशिष्टे म्हणून जोडावी. आता तू पाहशील की अनुक्रमणिकेत, विरोधविकासवादावरील खरोखरी अखेरीच्या प्रकरणापूर्वी जे प्रकरण देण्यात आले आहे ते ज्ञानसिद्धान्तावरील आहे. एका परीने सबंध संशोधनातील तो निर्णायक महत्त्वाचा भाग आहे. आधुनिक भौतिक संशोधनाने जे तत्त्वज्ञानात्मक प्रश्न उभे केले आहेत ते अखेरीस ज्ञानशास्त्राशीच संबंधित आहेत. म्हणून तत्त्वज्ञानाच्या या जुन्या प्रश्नाकडे मला सखोलपणे पाहावे लागले. मग आधुनिक मनोविज्ञानशास्त्राने जे निष्कर्ष काढले आहेत त्यांचा विचार करण्याची निकड मला भासली. आणि मला असे वाटते की, आधुनिक प्राणिशास्त्रातील संशोधन आणि विशेषतः मेंदूशी संबंधित शरीरविज्ञान आणि वंशविकासशास्त्र यांनी केलेली प्रगती यातून प्रकट झालेल्या निष्कर्षांबद्दलचे प्रमाणपत्र आधारभूत धरल्याशिवाय तुम्हांला मनोविज्ञानशास्त्राच्या सिद्धांताचा नीटसा परामर्श घेता येणार नाही. म्हणून पुस्तकाची रचना बदलण्यात आली आहे. आता प्राणिशास्त्र आणि मनोविज्ञानशास्त्र यावरील प्रकरणे विरोधविकासवादाच्या प्रकरणाआधी घालण्यात आली आहेत आणि त्यांना भौतिकशास्त्रांइतकेच महत्त्व प्राप्त झाले आहे.[1]

सध्या मी मनोविज्ञानाशास्त्रावरील प्रकरणावर हात फिरवीत आहे. म्हणून त्या प्रकरणाच्या रचनेबद्दलचा वृत्तान्त अधिक निश्चित आणि व्यवस्थित झाला नाही. पण त्यातून सर्वसाधारण कल्पना येऊ शकेल. यापुढे त्यावरील विवरण अधिक तपशीलवार होईल. प्राणिशास्त्रावरील प्रकरण संपले आहे आणि त्याने माझे परिपूर्ण समाधान झाले आहे. आणि त्यामुळे गेल्या पत्रात ज्या तत्त्वज्ञानात्मक निर्णयांचा मी उल्लेख केला त्यांना बळकटी आली आहे. पण ‘ फेरवादाची ’ आरोळी उठू नये म्हणून हे निर्णय बरेच सावधपणे दिग्दर्शित केले पाहिजेत. खरोखर तसे त्यात काही नाही. माझे म्हणणे एवढेच

१. या ठिकाणी श्री. रॉय यांनी आपल्या ग्रंथाची अनुक्रमणिका दिली आहे.

की आपले तत्त्वज्ञान जिवंत, चैतन्यपूर्ण असले पाहिजे आणि प्रगती हे तर जीवनाचे सार आहे. माझ्या 'पाखंडीपणा'बद्दल ऑगस्टला काय म्हणावयाचे आहे हे जाणून घेण्याला मी उत्सुक आहे. प्रत्यक्ष भेटीतून त्यावर चर्चा झाली तर ती खात्रीने फार उपयुक्त ठरेल.

मालिक फेरलागच्या धर्तीवर एखादी प्रकाशन-संस्था काढण्यात आली तर या देशात तो एक फार फायदेशीर धंदा होईल. उदाहरण म्हणून विरोधविकासवादावरील ऑगस्टचे पुस्तक घेणे त्याची स्वस्त हिंदी आवृत्ती (इंग्रजीत) काढली तर त्याचा चांगला खप होईल. तशीच व्यवस्था इतर प्रकाशनांबद्दल-शास्त्रीय ग्रंथ तशाच कादंबऱ्या-करता येईल. अर्थात त्यानंतर मूलभूत अशा ग्रंथांचे प्रकाशन हाती घेता येईल. सामाजिक दृष्ट्या पुरोगामी वृत्तीचे जे तरुण लेखक आहेत त्यांना उत्तेजन देणे फायद्याचे ठरेल. आधुनिक भारतीय कादंबऱ्यांना मग जागतिक बाजारपेठ मिळेल. खरे सांगावयाचे तर हिंदी साहित्यातील उत्कृष्ट कलाकृती जगापुढे येतच नाहीत. जगाला उपलब्ध होत आहे ते शिळे साहित्य. आता असे साहित्य येथे निर्माण होत आहे की, जे गूढवाद आणि भावुकवाद —हिंदी साहित्याचे वैशिष्ट्य तेच मानले जात आहे—यांनी आता मर्यादित राहिलेले नाही. तरुण महिलांनी लिहिलेले काही चांगले साहित्य माझ्या वाचनात आले आहे. साहजिकच हे नवे साहित्य सामाजिक बंडखोरी आणि सांस्कृतिक नवमतवाद यांचे निशाण फडकवीत पुढे येत आहे. अर्थात सवंग राष्ट्रवादी भावना आणि प्रतिगामी भावुकवाद यांचा प्रभाव अद्याप-कायम आहेच; आणि ते प्रवाह नव्या साहित्याला गिळून टाकण्याचा प्रयत्न करतातच. पण एखाद्या संघटनेच्या मध्यस्थीने या तरुण लेखकांना उत्तेजन देण्यात आले तर सांस्कृतिक नवमतवादाचे हे आंदोलन प्रभावी होईल आणि त्याचे परिणाम दूरगामी होतील.

लवकरच मी अधिक मोकळेपणाने जगाचे परीक्षण करू लागेन. पूर्वीसारखा मी जगापासून आता तोडला गेलेला नाही. नुकतेच मला एक दैनिक वाचनासाठी दिले जाऊ लागले आहे. त्यामुळे जगातील घडामोडींचे एकंदर निरीक्षण मी दैनंदिन करू शकेन. स्पेनमधे जे नाटक चालले आहे ते उदाहरणार्थ, भयानक खळबळ उडविणारे आहे. पण आश्चर्य असे की,तारेने जी वार्ता आली आहे, तीत फ्रंट पॉप्युलेर मंत्रिमंळातील व्यक्तिगत स्वरूप दिग्दर्शित करण्यात आलेले नाही. उल्लेख आहे तो त्यात तीन स्त्रियांचा समावेश करण्यात आला आहे एवढाच. मी दोरियोबद्दल काही चिंता वाटण्यासारखी बातमी वाचली आहे. एका 'पक्षांतर केलेल्या इसमाने' (कम्युनिस्ट) मंत्रिमंडळात प्रवेश केला अशी बातमी आहे. हा इसम कोण? मला इरीनबद्दल (क्यूरी)[1] नेहमीच विलक्षण सहानुभूती वाटत आली आहे. मी तिला भेटलो मात्र कधीच नाही. तिने जे शास्त्रीय संशोधन केले (आपल्या पतीच्या साहाय्याने) आणि ज्याबद्दल त्या दोघांना

१. लिऑब्लम यांच्या जनता आघाडी या सरकारात तिचा समावेश करण्यात आला होता.

नोबेल पारितोषिक मिळाले त्याचा निष्कर्ष माझ्या कार्याच्या दृष्टीने फारच उपयुक्त ठरला आहे. जड आणि चैतन्य यांच्यामधील परस्पर सादृश्याचे जे दिग्दर्शन करण्यात आले आहे तो शास्त्रीय साहित्यातील एक मानबिंदू आहे. इतर गोष्टींच्या आधारे (उदाहरणार्थ, अवकाशातून परावर्तित होणारी प्रभावी किरणे) या दिग्दर्शनामुळे थर्मोडायनॅमिक्सच्या दुसऱ्या कायद्यावर आधारलेला शास्त्रशुद्ध निर्मितीचा सिद्धान्त तत्त्वज्ञानाला निर्णायक रीतीने खोडून काढता येतो. केल्विनच्या काळापासून हा सिद्धांत दहशत बसवीत आला आहे. एडिंग्टनने त्याचा खूपच गाजावाजा केला. मी या प्रश्नाकडे तपशीलवार लक्ष दिले आहे आणि मला वाटते मी बिनतोड अशी बाजू तयार केली आहे. त्या बाबतीत मी काही अंदाज व्यक्त करण्याचे धाडस केले आहे. आणि तेथे आइन्स्टाइनचा उल्लेख करणे अपरिहार्य झाले आहे. त्याचे कारण असे आहे की, आइन्स्टाइनने सान्त पण अमर्याद अवकाशाबद्दलची जी कल्पना मांडली आहे तिच्यातूनच हा अंदाज प्रकट होत आहे. मला जे माहीत आहे त्यावरून असे दिसते की, या प्रश्नाचा त्या दिशेने कोणीच विचार केलेला नाही. पण त्या कल्पनेचे स्वरूप मात्र स्पष्ट करण्यात आलेले आहे. ते स्पष्टीकरण वरकरणी परस्परविरोधी अशा प्रमेयावर आधारलेले दिसेल. पण ही प्रमेये, आइन्स्टाइनचे गुरुत्वाकर्षणाचे नियम ज्या नव्या ज्ञानाच्या आधारे तयार झालेले आहेत त्यातून विकसित झालेली आहेत. तात्पर्य असे की, अशा रीतीने चिकित्सा होऊन बाहेर पडलेली कल्पना अमर्याद अवकाशाचे तत्त्व जाणून घेण्याइतके आणि विरोधविकासवादाच्या दृष्टीने मोजण्याइतके स्पष्ट करते ही माझी बाजू आहे. अमर्यादित्व जर आध्यात्मिक कल्पना राहिली नाही तर जडवस्तूची मर्यादा संपलीच पाहिजे. कारण अवकाश ही काही पोकळी नाही. ती कशाने तरी भरलेली असते. जडवस्तूचे चैतन्यात रूपांतर होत असल्यामुळे (थर्मोडायनॅमिक) ऊष्मगतिक समतोलाचे पिशाच्च गाडले जाते. विश्वविद्येच्या क्षेत्रात यंत्रणावादी दृष्टिकोण यशस्वी ठरतो. विश्वयंत्रणेला चालू होण्यापूर्वी गुंडाळण्यासाठी ईश्वराची गरज शिल्लक राहात नाही.

६०

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
सप्टेंबर २४, १९३६

अंथरुणावर पडून लिहिण्याची आता माझी पाळी आहे. फ्ल्यूच्या आजाराने मी पडून होतो. या वेळी तो आजार नुसता स्पर्श करून गेला नाही. त्याने मला अंथरुणाला खिळवून ठेवले. मी जे लिहीत आहे ते प्रयासाने. आणि मला वाटते हे गिचमिड लेखन तुला वाचताही येणार नाही. साधारणपणे हे शेवटचे दिवस वेगाने निघून जात नाहीत. पूर्वी हजारो दिवस होते तेव्हा ते नुसते उडून गेल्यासारखे वाटत असत. आज मात्र

त्यांना अंत नाहीसे झाले आहे. कसा असणार ? ओबडधोबड गादी, कपडे घामाने डबडबलेले, त्यांचा दर्प सुटला तरी ते बदलता येत नाहीत, छोटेखानी खोलीत मी आढ्याकडे पाहत बसलो आहे किंवा तीन फुटांवरच बंदोबस्ताने उभ्या असलेल्या तांबड्या भिंतीकडे खिडकीतून माझे लक्ष जात आहे, या अवस्थेत दिवस खायला उठले तर त्यात काय नवल ? रात्री जेव्हा ताप वाढला तेव्हाचा अनुभव भयानकच. सुदैवाने अशा फार रात्री काढाव्या लागल्या नाहीत. ठीक आहे म्हणा. ते दिव्य संपत आले आहे. मला पुष्कळच बरे वाटू लागले आहे. पण पाय थरथरतातच. सध्याच्या परिस्थितीत लवकर पूर्वपदावर येणे कठीण आहे. तुरुंगात आजारी पडणे म्हणजे नरकवास भोगणे होय. कुत्र्याचे जीवन असते ते. तथापि तुमच्या काहीही भावना असोत, संध्याकाळ पडताच खल्ल्ल आवाज होतो, दोन मजबूत कुलपे दरवाजाला लागतात आणि रात्रीच्या त्या भयानक काळात तुम्ही स्वतःचेच जे काय सांत्वन कराल तेवढेच. येथे व्यक्तीचा प्रश्नच उद्भवत नाही. व्यक्तिनिरपेक्ष पद्धती आहे ती (अर्थात सर्वच दृष्टींनी नव्हे). ती निर्दयपणाने आपला अंमल गाजविते, आणि त्या अमलाखाली माणसे ही कड्याकुलपाखाली बंदिस्त असलेली जनावरे होतात. आजारीपणामुळे अंथरुणावर पडून राहिलेला माणूस पळून तरी कसा जाऊ शकेल ! पण तुम्ही बरे असा की आजारी असा, या जनावराला कुलपाच्या आत बंदिस्त केलेच पाहिजे. त्याबद्दल आणखी काही बोलता येण्यासारखे नाही, करण्यासारखे तर काहीच नाही.

मला भूक लागली आहे पुन्हा माणूस म्हणून जगण्याची. पण हा अखेरचा पल्ला दरदिवशी मोठा होत चाललेला दिसत आहे. लवकरच मला नियमित वाचन आणि लेखन करता येईल अशी मला आशा आहे. मग प्रत्यक्षात जो काळ अगदी निर्दय वाटतो तितका वाटणार नाही. अडचण आहे ती अशी की हे खडतर जिणे असह्य झाले आहे आणि माझ्या विचारांचा ताजेपणा त्यातून नाहीसा होत आहे. गेले कित्येक दिवस जे मी लिहीत होतो ते अलीकडे मी वैतागाने टाकून देऊ लागलो आहे. ते अगदीच शिळे वाटते. शास्त्रीय साहित्यातील भयानक नीरसपणा काढून टाकून प्रसन्न शैलीत ते सादर करण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे. एकंदरीने मला त्यात यश आले आहे. पण मला थकवा आला आहे, आणि मला वाटू लागले आहे की, मला आता मानवी जीवन जगले पाहिजे आणि जेथे कमी गुदमरल्यासारखे होईल अशा वातावरणात श्वासोच्छ्वास केला पाहिजे. तरच माझे विचार पुन्हा ताजे, टवटवीत होतील.

तथापि, मी स्वतःकडे दुर्लक्षमात्र करीत नाही. शक्य ती मी माझी स्वतःची काळजी घेईनच. कारण निदान कामचलाऊ तब्येतीत तरी मला बाहेर पडावयाचे आहे. उदाहरणार्थ, इतक्या अशक्तपणाच्या अवस्थेतही मी स्वतःसाठी सूप बनविले. तो काही सर्वस्वी मनोरंजनात्मक खेळ नव्हता. माझ्यासाठी जो अन्न शिजवीत असे तो आज सुटून गेला आणि त्याच्या जागी आलेल्या माणसाला आजारी माणसासाठी अन्न

बनविण्याची क्रिया इतकी चांगली माहीत आहे जितकी ख्रिस्ती धर्ममंदिरात प्रभू-प्रार्थनेचा उपचार करण्याची पद्धती मला ठाऊक आहे. पण गंमत अशी की, मला खरोखरच पाकक्रिया चांगली साधली. बर्लिनमध्ये पाकक्रियेचे जे प्रयोग मी करीत होतो त्याची आता आठवण काढू नको ! येथे फ्रेंच सुगृहिणीचेच कौशल्य आत्मसात करावे लागेल. तिच्याविषयी जी दंतकथा सांगितली जाते ती अशी की फ्रेंच गृहिणी बटाट्याच्या साली आणि हिरव्या भाजीची काही पाने यांच्या साहाय्याने पंचपक्वानांचे सुग्रास जेवण तयार करू शकते. मी तयार केलेले सूप मुळीच वाईट नव्हते, आणि गेली पाच वर्षे खात असलेल्या ज्या एकसाची अन्नाच्या नुसत्या दर्शनाने मला वीट आल्यासारखे वाटत असे त्याचा विचार करता हे प्रशस्तिपत्र खात्रीने फार मोलाचे ठरेल. अरेरे ! पॅरिस-मधील एखाद्या अलिशान उपाहारगृहात, पोमार्ड मद्याच्या बाटलीसहित रात्रीच्या जेवणाचा आस्वाद घेण्यासाठी काय बरे मी देणार नाही !

आता पुरे झाला नाही का आचरटपणा ! पण माझे डोके रिकामे झाले आहे आणि ओझे टाकावे तसे जडही झाले आहे. साहजिक आहे ते. बाहेरून आलेली सर्दी आपल्या नव्याने सापडलेल्या घराचा त्याग करावयाला तयार दिसत नाही. मला वाटते, या ठिकाणाहून मी आता एकच फक्त पत्र लिहीन. उगाच आशावादी बनू नकोस आणि खोट्या आशेने हुरळूनही जाऊ नकोस. २० नोव्हेंबरच्या आधी मी मुळीच सुटणार नाही. माझ्या बाबतीत न्यायदेवता ( या चंचल देवतेला सन्मानार्थीच संबोधले पाहिजे ) विलक्षण कठोर झाली आहे. इतकी की तिने दंतकथेतील आंधळेपणाचेच, जणू ध्येय साध्य केले आहे. मला कोडे पडले आहे ते हे की, चांगल्या ग्रीक देवतेला (साऱ्या ग्रीक देवता चांगल्या होत्या कारण त्या इतक्या सुंदर होत्या. ) तराजूचा तोल इकडे नाही तर तिकडे झुकत नाही, हे दिसले कसे ? तिला तर पट्टी बांधून आंधळे करण्यात आले होते. ग्रीक दंतकथाकार हा एक चाणाक्ष माणूस होता. त्याने यान्याचे खरे चित्र रंगविले -- ज्यांच्यामध्ये पारडे खाली ओढण्याची ताकद असते त्यांच्या बाजूलाच न्याय वळतो. देवता आंधळी असल्यामुळे तिला पाहता येत नाही. माझ्या बाबतीत न्यायाचा आदेश आहे-- मग तो योग्य नसेना का-- की मला २० नोव्हेंबरच्या आधी मुक्त केले जाता कामा नये. या परिस्थितीत नोव्हेंबरचे पत्र मी तुरुंगातून लिहिणार नाही. सुटकेनंतर लिहिलेले पत्र कितीतरी दिवस आधी तुला पोचेल आणि साडेपाच वर्षांनंतर आपल्या-मधील ते पहिले खाजगी पत्र होईल.

अलीकडे मी जे एक काहीसे चित्तवेधक कार्य करीत होतो--माझ्या योजनेच्या बाहेरचे--त्यात आजारीपणाने अडथळा आणला. एक नवा फ्रान्सिस बेकन भारतात अवतीर्ण झाला आहे. या प्रांताच्या हायकोर्टाच्या मुख्य न्यायाधीशाने ( हिंदी आहे तो ) मला वाटते एक मनोरंजक चूष म्हणूनच, केंब्रिजला ज्या गणिताचा त्याने अभ्यास केला होता त्या आपल्या जुन्या प्रेयसीकडे पुन्हा लक्ष वळविले आहे. त्याने एक नवा गुरुत्वा-

कर्षणाचा सिद्धान्त मांडला असून, त्यामुळे सापेक्षतावादाच्या सिद्धान्ताची सारी इमारत तर कोसळणार आहेच, पण वेव्ह मेकॅनिक्सचीही आहुती पडणार आहे. गेल्या काही वर्षांत सापेक्षतावादाच्या सिद्धान्ताविरुद्ध जे जे काही लिहिले गेले त्याचा मी अभ्यास केला असल्यामुळे या नव्या सिद्धान्ताच्या स्पष्टीकरणाकडे साहजिकच मी मोठ्या कुतूहलाने पाहात आहे. नव्या क्वान्टम थिअरीबद्दल बोलावयाचे तर आधुनिक विज्ञानाचे ते भव्योदात्त अपत्य आहे असेच मी समजतो. तथापि आइन्स्टाइनची पद्धती इतक्या तर्कशुद्ध रीतीने रचली गेली असल्यामुळे तिच्याविरुद्ध नवे कोठले आक्षेप घेतले जातात ते पाहावयाला मी उत्सुक होतो. सर शहा महमद सुलेमान (आमच्या बेंकनचे ते नाव आहे) यांच्या प्रबंधाचा संपूर्ण मसुदा माझ्या हाती आला नाही; परंतु त्यांच्या सिद्धान्तातील भौतिक आशय आणि तत्त्वज्ञानात्मक अर्थ यांच्याबद्दलची स्पष्ट कल्पना मी हळूहळू करून घेतली. त्याने असे घोषित केले आहे की, असापेक्ष काळाला आइन्स्टाइन यांनी दिलेला नकार आणि जडवस्तूच्या सत्यावर श्रोडिंगर-हायझेनबर्ग यांनी केलेला आघात ही आधुनिक शास्त्रातील सर्वांत मोठी पाखंडे होत; आणि म्हणून त्यांचा सामना करणे आवश्यक आहे. आता दुसऱ्या प्रमेयाच्या बाबतीत ते पूर्णपणे चुकले आहेत. माझ्या ग्रंथात 'आशया'वर मी जी तीन प्रकरणे लिहिली आहेत त्यात मी हे निर्णायक रीतीने दाखवून दिलेले आहे. पहिल्या प्रमेयाच्या बाबतीत सूचना आहे ती अशी की, पदार्थविज्ञानशास्त्राने न्यूटनच्या निरपेक्षतावादाकडे पुन्हा वळावे. खरोखर गेल्या पाव शतकात सापेक्षतावादाच्या मार्गदर्शक तत्त्वाच्या आधारे पदार्थविज्ञानशास्त्राने जी प्रगती केली आहे ती लक्षात घेतल्यानंतर ही सूचना विकृतच नव्हे तर काय? तथापि या सिद्धान्ताबद्दल युरोपमधील शास्त्रीय जगाला माहिती झाली आहे किंवा नाही आणि त्याबद्दल काय मत झाले आहे हे जाणून घेण्याची माझी फार इच्छा आहे.

मॅक्स बॉर्न अलीकडेच या देशात येऊन गेला. परंतु माझ्या माहितीप्रमाणे त्याने सुलेमान यांच्या सिद्धांतावर काही मत प्रदर्शित केले नाही, किंवा प्रसिद्ध हिंदी शास्त्रज्ञांपैकी कोणीही यावर बोललेले दिसत नाही. अर्थात विशेषतः आइन्स्टाइनचे मत जाणून घेण्याची माझी फार इच्छा आहे. त्याने हा प्रबंध पाहिला आहे का? विद्वज्जनांतील संकेताप्रमाणे तो प्रबंध आधी त्याला सादर करावयाला पाहिजे होता. पण आइन्स्टाइनने त्यावर जाहीर मत व्यक्त केलेले नाही. वेव्ह मेकॅनिक्सबद्दल सुलेमान यांची माहिती सर्वस्वी चुकीची आहे. मी ते स्पष्ट केले आहे. तेव्हा त्या बाबतीतील त्यांचे मत अप्रस्तुत आहे. परंतु गुरुत्वाकर्षणाच्या त्यांच्या नव्या सिद्धान्तासाठी त्यांनी बळकट अशी गणिती बाजू तयार केली आहे असे कळते; फक्त आपल्या दृष्टीने त्यात नवीन असे फारसे काही नाही; म्हणजे भौतिक लक्षणाला दिलेले केवळ नाव किंवा नमुनेदार गणिती–सूत्र यापलीकडे प्रत्यक्ष सिद्धान्ताच्या स्वरूपाचा विचार करता त्यात फारसे काही नवीन नाही. नव्या सिद्धान्ताबद्दल चांगले म्हणता येईल ते एवढेच की न्यूटनच्या कल्पना पुनरुज्जीवित

करण्याच्या दृष्टीने नवीन गाणेती आधार उपलब्ध करून दिल्याचा दावा त्याला करता येईल. सुलेमान याच्या सिद्धांतात तर्कदोष झाला आहे तो हा की, आइन्स्टाइनच्या सिद्धान्ताने पूर्वसंमत सिद्धांत झिडकारून टाकलेले नाहीत; त्याचा सिद्धान्त ही एकोणिसाव्या शतकातील पदार्थविज्ञानशास्त्राच्या सबंध प्रगतीची तर्कशुद्ध परिणती होय. न्यूटनने व्याख्या करता येण्यासारखी नाही म्हणून जे प्राथमिक स्वरूपाचे घटक मानले त्यांची आइन्स्टाइनने व्याख्या केली आहे एवढेच.

या नव्या सिद्धान्ताची प्राथमिक समीक्षा करणारा एक प्रबंध सादर करावयाचे मी ठरविले आहे. त्यात विशेषतः त्यातील प्रमेयांबद्दलच्या चुका आणि तत्त्वज्ञानात्मक असंबद्धता मी दिग्दर्शित करणार आहे. पदार्थांबद्दलची अतिभौतिक असापेक्षता जर तुम्ही पुनरुज्जीवित करू लागला तर जडवस्तूच्या भौतिक अस्तित्वावर एडिंग्टन यांच्या शाखेकडून जो हल्ला होत आहे तो तुम्ही कसा परतवून लावू शकाल ? आइन्स्टाइनचे मत त्या दृष्टीने मला अगदी अगत्याने हवे आहे. नव्या सिद्धान्ताच्या समीक्षेचे काम नेटाने मला पुढे न्यावयाचे असल्यामुळे त्यावर अधिक विस्तृत विवेचन मला पुढे करावेच लागेल.

आजच्यासाठी एवढे पुरे. हे सुद्धा तीन वेळा प्रयत्न करून मी लिहिले आहे. हे पत्र मी उद्या संपवीन. संध्याकाळसुद्धा अजून बरीच शिल्लक आहे. मी पाव आणि दुधाचा एक प्याला घेईन आणि निवांतपणे विश्रांती घेईन. अनेक प्रकारच्या परिश्रमांनी— स्वयंपाक, भोजन, पत्रलेखन—थकून गेल्यामुळे मला रात्रीची शांत झोप लागेल आणि मग नव्या जागृत होणाऱ्या उत्साहाने मी उद्या पाकक्रियेतील माझ्या साहसात अधिक यशस्वी होईन असे मला वाटते. मला बनवावयाचे आहे कस्टर्ड पुडिंग. आहे ना कल्पना ? तुझे काय मत आहे ? हरहुन्नरी आहे की नाही मी ? पण तेवढ्या कौशल्यावर तुझे समाधान होत नाही हे मला माहीत आहे. दुर्दैवाने पाकक्रियेच्या बाबतीतसुद्धा प्रतिभाशाली व्यक्ती काही झाडाला लागलेली आढळून येत नाही. माझी एवढी खात्री आहे की, या पृथ्वीतलावर आपले पणतू—खापरपणतू वास्तव्य करीत असतील तेव्हा हे एवढे पक्वान्न मानले जाणार नाही. पण तेवढा काळ तरी ते राहील काय ? हा खरा प्रश्न आहे. तुमच्याकडील विश्वाला बरेच हादरे बसत आहेत आणि अधिक भयानक हादरे बसावे म्हणून नेटाने प्रयत्नही केले जात आहेत. मला कळत नाही, परमेश्वर आपल्या किमयेकडे पाहून समाधानाने निश्वास सोडत असेल का : "ठीक आहे."

तू ज्या नव्या कादंबऱ्या पाठविणार होतीस त्याचे काय झाले ? नवा व्हॅन डाइन वाचण्यासाठी मी विशेष उत्सुक आहे; तथापि आता उशीर झाला [आहे. थोड्याच दिवसांत सध्या मी ज्याचा अभ्यास करीत आहे त्या विषयाकडे मी वळू शकेन. हा अभ्यास मनोविश्लेषणशास्त्रावरील साहित्याचा. त्यात नाडीविद्येवर चॅरकॉट, जॅनेट वगैरे लोकांनी पूर्वतयारीचे जे कार्य केले आहे त्याचाही समावेश होतो; एखाद्या विशिष्ट

विषयाचा अभ्यास करताना मी बहुशः योजनेबाहेरचे काही लिहीत असतो. ते कशा करिता ? तर निवडलेल्या साधनसाहित्याची पद्धतशीर रीतीने मांडणी करण्याकरिता आणि आपल्या मनात त्याची रूपरेषा आखण्याकरिता. नाडीविद्या, मनोविकृती आणि मनोविश्लेषण यांचा अभ्यास करताना मी योजनेबाहेरचे काही प्रयोगात्मक लेखन केले आहे. ते तसे कुतूहल निर्माण करणारे झाले आहे. त्याला मी नाव दिले आहे, ' सायकॉलोजी ऑफ द सीअर. ' गूढवादी वा धार्मिक अनुभवांचा त्यात परामर्श घेण्यात आलेला आहे. माझी भूमिका अशी आहे की, हा अनुभव म्हणजे दडपून ठेवलेल्या मनोभावना व्यापक अर्थाने, म्हणजे साधारण भावनात्मक जीवनाच्या दृष्टीने बहुशः लैंगिक, यांचे जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणाने करण्यात येणारे उदात्तीकरण होय. तुला गंमत वाटेल, पण परंपरागत फ्रॉइडवाद्यांच्या पंथात मी बसल्यासारखा झालो आहे. अर्थात अतिलैंगिकवाद्यांशी मात्र माझे पूर्ण एकमत होऊ शकत नाही. कारण ते अतिरेक करताना दिसून येतात. पण फ्रॉइडचा सिद्धान्त मात्र अधिक शास्त्रशुद्ध आहे. प्रायोगिक मानसविज्ञानाशी जुळणारा.अखेरीस मनाचे व्यापार कळण्याच्या दृष्टीने विश्वसनीय पद्धती असेल तर तीच होय. त्याचा अर्थ असा की, माझा कल वर्तनवादाकडे झुकलेला आहे--पॅव्हलॉव्हचे संशोधन आणि पशूंचे मनोविज्ञान यावर आधारलेला प्रकार. तथापि फ्रॉइडचा मूलभूत गुण म्हणजे त्याच्या तत्त्वज्ञानात्मक भूमिकेचा खंबीरपणा. त्यामुळेच मी त्याच्याकडे ओढला गेलो आहे. त्याला विरोधी असलेला झूरिक पंथ ( युंग, मॅडर वगैरे ) हा फार मोठ्या प्रमाणावर अंदाजावरच आधारलेला आहे आणि अभिजात चिकित्सक मनोविज्ञानाकडेच तो जाऊ पाहतो. काही गोष्टी गृहीत धरा आणि त्यांच्या- भोवती सिद्धान्ताचे जाळे पसरा. मनोविज्ञानात्मक नमुन्यांचे जे वर्गीकरण युंगने केले आहे ते हटवादीपणाचे आहे--शास्त्रशुद्ध पाया नसलेले.

आपले सारे मित्र कसे आहेत ? साऱ्या घडामोडी ज्या वेगाने होत आहेत त्यामुळे त्यांच्या मनात विलक्षण खळबळ उडणे साहजिक आहे. या दिवसांत युरपमध्ये असणे फार मनोरंजक होईल आणि उपयुक्तही होईल. मी किती लवकर तेथे पोचू शकतो कोण जाणे ! स्पेनमध्ये जो हलकल्लोळ उडाला आहे त्याच्या अंतिम निर्णयाबद्दल मी बराच आशावादी आहे. अर्थात स्पेनमधील घटनांची सबब काढून, आंतरराष्ट्रीय दरोडेखोरांपैकी कोणी दारूच्या कोठाराला आग लावील की काय हा धोका कायमच आहे. लोकशाहीवादी मुत्सद्द्यांची दहशतीने मती कुंठीत करण्यात आणि बेदरकारपणे लूट करण्यात हे धटिंगण यशस्वी होतात ही विलक्षण आश्चर्याची गोष्ट आहे. लिऑं ब्लूम यांनी स्पॅनिश प्रश्नात हस्तक्षेप न करण्याचे जे धोरण आखले आहे ते परिणामाच्या दृष्टीने अपुरे तर खरेच. पण काहीतरी सबब काढून या प्रश्नात हस्तक्षेप करण्याची जी खुनशी योजना शिजत आहे तिला प्रतिबंध करण्याच्या सद्हेतूने या धोरणाची आखणी केली असणे शक्य आहे. या धोरणाची जे तोंड भरून घोषणा करीत आहेत त्या सर्वांनीच

ती अमलात आणणे शहाणपणाचे होईल. पण प्रत्यक्षात तसे होणार नाही. ब्लूम आणि थोरे यांच्यामधे काही तेढ आल्याचे मी वाचले. या उडाणटप्पू पोराबद्दल मी नेहमीच थोडासा अस्वस्थ असतो. या वेळी फ्रंट पॉप्युलेरमध्ये कोणत्याही प्रकारचा दुबळेपणा येणे हे सर्वनाशाला आवाहन होईल. इटली आणि जर्मनी यामधून पोसला गेलेला स्पॅनिश रोग मग फ्रान्सलाही ग्रासून टाकील. त्यातून काही भले निष्पन्न होण्याची काही तरी शक्यता आहे काय ? नाही. त्रिवार नाही. म्हणून या वेळी ब्लूमला बळकटी आणलीच पाहिजे. जॅकसच्या नव्या प्रवृत्तीबद्दल मी एक आश्चर्यकारक बातमी वाचली. द ला रॅाकची जागा घेण्यासाठी त्याची घोडदौड चालली असल्याचे कळले. असंभवनीय ते शक्य कोटीत येऊ पाहत आहे. कोण काय बोलणार त्याबद्दल. हा मात्र व्यक्तिशः माझ्यावर घाला होईल. तथापि त्याला जी वागणूक देण्यात आली त्याबद्दल कडवट न होणारा हा अतिमानवच म्हटला पाहिजे. तो उद्या अधःपाताच्या गर्तेत पडला तरी व्यक्तिशः माझी त्याच्याबद्दलची आवड कायमच राहील, आणि त्याच्या भावना मी नेहमीच समजू शकेन. अर्थात त्याच्या वर्तनाबद्दल त्याला मी क्षमा करीन असे मात्र मुळीच नाही.

आता आजारी माणसाने लिहावे त्यापेक्षा हे पत्र खूपच लांबले. पण तीन हप्त्यांत ते मी पुरे केले. व्यक्तिगत दुःखे आणि गाऱ्हाणी आणि अशाच क्षुद्र हकीकती, लांब लांब पसरलेल्या महिन्याच्या अखेरीस सांगण्यासाठी काही ओळी लिहिणे अगदीच असमाधानकारक आहे हे खरे.

६१

डिस्ट्रिक्ट जेल, डेहराडून
ऑक्टोबर २१, १९३६

समाधीतून माझे हे अखेरचे पत्र. आता दिवस मोजावयाची वेळ आली; महिने सुद्धा गेले. महिन्यानंतरच्या आजच्या दिवशी तुलनात्मक दृष्टीने स्वतंत्रपणे दोन दिवस मी काढलेले असतील. मागे दृष्टी टाकली तर आज या जीवनाची पाच वर्षे आणि तीन महिने मी पुरे केलेले दिसून येतील.

खरे सांगावयाचे तर, या जगाचा मला कंटाळा आला आहे. त्याचा नाश अटळ दिसत आहे किंवा पुनरुज्जीवन जर संभाव्य असेल तर प्राणांतिक देहदंड आणि यातना दीर्घ काळपर्यंत सोसण्याची तयारी ठेवावी लागेल. अर्थात महान शौर्याच्या उदाहरणांनी हा काळ उजळून निघालेला असेल. हे वीरवृत्तीचे गौरवशाली युग आहे हे तुझ्या कधी ध्यानात आले आहे काय ? या शापित कालखंडाला विरंगुळा देणारी तेवढी एकच एक मेहेरनजर आहे. आपण ज्या वेळी या वीरवृत्तीचा विचार करतो, तेव्हा असली छोटी

छोटी दुःखे किती क्षुद्र वाटू लागतात. त्यांना तोंड देण्यासाठी त्यातूनच आपल्याला शौर्य मिळाले पाहिजे. पण धैर्य किंवा त्याचा अभाव हा खरा प्रश्न नाही. प्राप्त परिस्थितीत कृती करण्याची अत्यंत परिणामकारक पद्धती कोणती? शक्तीचा अपव्यय आणि प्रयत्नांची असफलता हाच ज्या दिवसांचा नियम झाला आहे त्या दिवसात जीवन जास्तीत जास्त फलप्रद होईल म्हणून काय करावे? हा खरा प्रश्न आहे. नवे जग उदयाला येण्यापूर्वी जुन्या जगाचा "ऱ्हास आणि पतन" पाहण्याची पुन्हा आपल्यावर नव्याने पाळी येणार असेल तर मठस्थ जीवन (त्याचा आधुनिक प्रकार) ही एक ऐतिहासिक गरज— विज्ञान आणि संस्कृती यांचा अग्नी प्रज्वलित ठेवण्यासाठी—ठरेल. पण खरोखर इतके सारे अभद्र काही होणार नाही. पण हिंसक आत्मनाशाची प्रचीती आणणाऱ्या अवनतीचा उणापुरा लांबलचक कालखंड अगदी अपरिहार्य दिसत आहे. एच. जी. वेल्सचे हे भाकित वाटते ना? त्याचा नवा चित्रपट 'भवितव्याचे चित्र' तू पाहिलास का?

ते असो म्हणा. मला वाटते कमालीच्या निराशावादी कल्पना आहेत या. मोकळेपणाने न बोलण्यासारख्या. पण आपला हा दूर अंतरावरून होणारा शेकोटीजवळील, निःसंकोच सुखसंवाद आहे आणि तिसऱ्या राइशचे आपण गर्वशाली नागरिक नसल्यामुळे घरात गुप्त जागी बसविलेल्या डिक्टाफोनची आपल्याला भीती बाळगण्याचे कारण नाही.

आपण आता रानातून जवळ जवळ बाहेर पडलो आहो. ज्या अनंत अडचणींतून आपल्याला अद्याप बाहेर पडावयाचे आहे, त्यांच्या विचाराने नाउमेद होऊ नको. तुरुंगाबाहेरच्या माणसावर तुला अधिक विश्वास ठेवता येईल आणि आणखी अठ्ठावीस दिवसांनंतर मी बाहेर पडणारच आहे. जग निष्ठुर आहे. पण आपण निर्धाराचे आहो.

हे तुरुंगातून लिहिले जाणारे पत्र आहे याचा मला विसर पडू लागला आहे. आणि मोह होत आहे अशा गोष्टी लिहिण्याचा की, ज्याच्यासाठी चार आठवडे वाट पाहणे भाग आहे. दरम्यान एवढे लिहिले तरी पुरे; साऱ्या मित्रांना माझ्या जिव्हाळ्याच्या सद्भावना दे आणि त्यांना म्हणावे, शक्य झाले तर, त्यांच्याजवळ असण्याइतके सुख मला दुसऱ्या कशाने होणार नाही. मी भयंकर बेचैन मात्र झालो आहे. ब्लूमवादी लोक इतके महामूर्ख कसे? त्यांच्या मानेभोवती फासाची दोरी अनिवार्यपणे आवळली जात आहे हे त्यांना दिसत नाही का? आणि ही दोरी 'लोकशाहीवादी' राष्ट्रांच्या–की ज्यांच्या सुखासाठी ते आपला आत्मा विकीत आहेत आणि स्वतःच लोकशाहीवरील बलात्काराला ते हातभार लावीत आहेत—मदतीने आणि मतीने आवळली जात आहे हेही त्यांना दिसत नाही का? काही चमत्कार घडला नाही तर फ्रेंच राज्यसत्ताकाची घटिका भरली आहे. फ्रँकोच्या आफ्रिकेतील रानटी पलटणी, नाकेबंदी करण्यासाठी पीरीनीजचा कब्जा घेतील तेव्हा फ्रान्सला कोण वाचवू शकेल? लोकशाहीवादी दोस्तगण फ्रेंच सैन्यदलानेच फ्रान्सचे जीवन उद्ध्वस्त केलेले पाहत स्वस्थ बसतील. या

सैन्य दलात खिस्ती-राष्ट्रवादी भावनांचा प्रादुर्भाव आधी झालेला आहेच. ज्यांनी हस्तक्षेप करणे हा स्पेनमधील फॅसिझमच्या विजयाला मदत करण्याचा अत्यंत परिणामकारक मार्ग आहे असे मानले, त्यांच्यापुढे लोटांगण घालण्याच्या धोरणाचा हा शोकपर्यवसायी परिणाम आहे. अत्यंत आधुनिक स्वरूपाच्या बॉम्बफेकी विमानांचे थवे मोरोक्कोच्या उजाड पर्वतांवर उगवत नाहीत. तसाच तोफखाना आणि दारूगोळ्याचा अमर्याद पुरवठा. स्पेनमध्ये ते सारे कोठून आले आणि विशेषतः एका पक्षाच्या हितासाठी धर्मकार्याला आधिदैविक शक्तींकडून साहाय्य मिळत आहे—मातेच्या स्थानी असलेल्या चर्चने चमत्कार करण्याची शक्ती पुनःसाध्य केली आहे असा विश्वास धारण केल्याशिवाय सहजसिद्ध असा निष्कर्ष आपल्याला टाळता येणार नाही. कोणत्याही विचारी माणसाला टाळता येणार नाही. फक्त भोंदूपणा आणि अप्रामाणिकपणा हेच परिस्थितीच्या निरपवाद सत्यावर पांघरूण घालू शकतील; आणि तरीही ते अद्याप हस्तक्षेप न करण्याच्या घोषणा करीत आहेत. फ्रँकोच्या हाती अझाना पडले ( कबायेरो त्याच्या हाती पडणार नाही कारण तो लढत लढत धारातीर्थी पडणेच अधिक श्रेयस्कर मानील.) तर द ला रॉक किंवा फ्रेंच प्रजासत्ताकाचे काही लष्करी अधिकारी यांच्या करवी ब्लूम फासावर लटकावला जाणे हा फक्त काळाचाच प्रश्न राहील. तो एक भयानक दैवदुर्विलास होईल. त्यातूनच सुटण्याचा एकमेव मार्ग—पवित्र धर्मयुद्धात सामील होणे—इस्रायलच्या अपत्याला वाद आहे.

दोरियो ही एक शोकांतिका आहे. नाही का? अखेरची जी मासिके माझ्या हाती आली त्यात त्याच्या हालचालींचा थोडासा तपशील देण्यात आला आहे. त्याची लोकप्रियता लक्षात घेता, तो एक खरा धोका होईल. पण दोष कोणाचा–मुळात? मला अजूनही असे वाटते की त्याला दारुण निराशेच्या गर्तेत लोटून देण्यात आले. त्याची कृती हा त्या निराशेचा परिपाक होय. इतर अनेक लोकांसारखा वैचारिक गोंधळाची साक्ष देणारा तो भावनोत्कट माणूस नव्हे. शत्रूच्या गोटाकडे त्याला लोटण्यासाठी तसेच सबळ कारण हवे होते त्याचा अर्थ असा मात्र नव्हे की त्याच्या वृत्तीचे मी समर्थन करीत आहे किंवा ज्या न्यायनिवाड्याला तो पात्र आहे त्याच्यापेक्षा कमी कठोर असा निर्वाळा त्याच्या बाबतीत दिला जावा म्हणून इतिहासापुढे मी याचना करीत आहे.

कोण जाणे, कदाचित् इतक्या दूर अंतरावर असल्यामुळे आणि इतका काळ, जवळ जवळ जगापासून तोडला गेला असल्यामुळे परिस्थितीकडे अत्यंत निराशाजनक दृष्टी-कोणातून पाहण्याकडे माझा कल झुकला असणे शक्य आहे. त्यांच्या उलट त्याच कारणासाठी माझी मते अधिक वास्तववादी असण्याचाही संभव आहे. आशावाद हा बहुशः तर्काची झिलई दिलेला भावुकवाद असतो. म्हणून वास्तववादी लोकांवर अनेक वेळा निराशावादाचा आरोप केला जातो. मी तत्वतःच निराशावादी आहे; ऐतिहासिक अपरिहार्यतेच्या सांत्वनकारी, आत्मवंचना करणाऱ्या सिद्धांतावर विश्वास ठेवू नकोस.

इतिहासात अपरिहार्य असे काही नसते. आजची संस्कृती कोसळून पडण्याची आणि स्वतःच्याच दडपणाखाली ती समूळ नष्ट होण्याची शक्यता विचारातही घेण्यासारखी नाही असे समजण्याचे मुळींच कारण नाही. अवनती, ऱ्हास, नैतिक अधःपात आणि संपूर्ण विलय होणे हा दुसरा पर्याय नेहमीच अस्तित्वात असतो. पुनर्रचना करणाऱ्या शक्ती, पूर्वीच्या तशाच आणीबाणीच्या प्रसंगी होत्या त्यापेक्षा आज पुष्कळच प्रभावी आहेत. पण त्या विजयी होतीलच अशी निर्विवाद हमी देता येणार नाही. आत्मविश्वासात आशेचा बराच मोठा अंश असतो. आपण आशा जरूर करू या. दरम्यान कारस्थानात रंग भरत चालला आहे.

पासपोर्टच्या व्यवहाराबद्दल अमेरिकन लोक उगाचच बडेजाव माजवीत असतात. आपल्या अनमोल देशात रानटी लोकांच्या झुंडी येतील ही त्यांची दहशत. शेकडो अमेरिकन लोक वर्षानुवर्षे परदेशांत राहतात आणि तरी त्यांचे नागरिकत्व कायम राहते. सर्वसाधारणपणे या नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही. तुझ्या प्रकरणाबद्दल वकिलातीतील एखादा आढ्यताखोर दुय्यम अधिकारी अडचणी निर्माण करीत असावा. त्यानंतर ते 'गोरे कॉकेशियन' ज्यांच्या धमन्यांतून अनेक प्रकारच्या रक्तांचे मिश्रण वाहत असते, ते 'अनार्यांशी विवाहबद्ध' होणाऱ्या स्त्रियांकडे सहानुभूतीच्या दृष्टीने पाहत नाहीत. त्यांना तू सांग, त्यांच्या 'देवलोका'चे पावित्र्य बिघडविण्याची तुझी मुळीच इच्छा नाही आणि दत्तक देशात पाऊल टाकताच तू अमेरिकन नागरिकत्व तात्काळ सोडून देशील. विवाहित स्त्रीने अधूनमधून पतीला सोडून केवळ कर भरण्यासाठी वॉशिंग्टनला गेले पाहिजे, असा आग्रह ते धरू शकत नाहीत. हे आधुनिक सालोमन आपले कायदे अधिक समजूतदारपणे का करू शकत नाहीत ? हक्क द्यावयाचा आणि त्याचा प्रत्यक्ष व्यवहार अशक्य करून ठेवायचा हा काय कायदा झाला ?

अखेरीस हे पत्र पुरे झाले. चार हप्त्यांत ते मी लिहिले. पुढील पत्र मी बाहेरून लिहीन. कल्पना कर नुसती.

आज आमचा सर्वांत मोठा राष्ट्रीय उत्सव आहे—धर्मपूर्वकाळात उगम पावलेला. माझे स्वतःचे जन्मस्थान–बंगाल—त्या प्रांतात तो विशेष उत्साहाने साजरा केल जातो. दहा दिवस तेथील उत्सव चालतो. या भागात फक्त दोन दिवस. या भागात रामाने रावणावर मिळविलेल्या विजयाचा दिवस म्हणुन तो मानला जातो—'रामायण' या महाकाव्याची ती कथा. आमच्या प्रांतात राक्षसांच्या ( हिंदू पुराणातील टायटन्स ) पराभवाबद्दल हा उत्सव साजरा केला जातो. या राक्षसांनी म्हणे देवांना जिंकून त्यांना स्वर्गातून हाकलून लावलेले असते. राक्षसांच्या पराभवाचे हे दिव्य विश्वव्यापी शक्तीचा अवतार असलेल्या दहा हाताच्या देवतेने पार पाडले अशी दंतकथा आहे. त्या देवतेची ही पूजा बांधली जाते. ग्रामीण विभागातील कलाकार वंशपरंपरेने या देवतेच्या सुंदर मातीच्या मूर्ती बनवीत असतात. सहा दिवसांची पूर्वतयारी आणि तीन दिवसांची पूज

( या पूजेसाठी बकऱ्या आणि मेंढे यांचे थवेच्या थवे देवीच्या पायी वाहिले जातात काही वेळा रेडयांचीही आहुती देण्यात येते; तो एक असा प्रसंग असे की जेव्हा आम्हा मुलांना मांस खाता येत असे. ) पार पाडल्यानंतर या मूर्ती पाण्यात बुडविल्या जातात—आजच्या दिवशी, संध्याकाळी समस्त जन घरोघरी तयार करण्यात आलेल्या मद्याचे विमुक्तपणे प्राशन करतात. त्या मद्याची बेहोषी वाढविण्यासाठी विशिष्ट प्रकारची मिठाईही खाल्ली जात असे. तरुणपणी आम्ही या उत्सवाचा आनंद खूप लुटला. मुलांना त्या प्रसंगी नवे कपडेही मिळत असत. या वर्षी त्या उत्सवासाठी मला घरी जाण्याची फार फार अपेक्षा होती. पण भाग्य नव्हते झाले ! घरी आम्ही अष्टभुजा देवीच्या देवळाचे पुजारी आहो. ते देवालय आणि सभोवतालच्या शेताचा पट्टा आम्हाला आंदण मिळालेला आहे. साहजिकच पूर्वी आमच्या इथे उत्सव साजरा होत असे तो प्रचंड प्रमाणावर. आणि रक्तरंजित असे तो——बिचारी बकरी आणि बिचारे शेतकरी यांच्या जिवावर.

आता विमुक्त आनंदाने तुझ्या चित्तवृत्ती पुलकित होऊ दे. लवकरच आपण खुल्या जगात पाऊल टाकू, पाहू, करू, व आनंद लुटू. माझ्या मनावरचा ताबा सुटू लागला आहे, माझी अधीरता कळसास पोचली आहे. जे फळ पदरात पडत आहे ते अनमोल आहे. त्याच्याशी खेळ करून चालणार नाही.

६२

डेहराडून ( तुरुंगाबाहेरून )
नोव्हेंबर २०, १९३६
दुपारी तीन वाजता

मी सुटलो—पाच वर्षे आणि चार महिन्यानंतर. सकाळी साडेआठ वाजता ही घटना घडली. मला तर युगानुयुगे बाहेर असल्यासारखे वाटत आहे. मी अगदी भांबावून गेलो आहे. लोकांच्या मेळाव्यात आहे मी एकसारखा. केवढा विचित्र अनुभव. कल्पना करता येणार नाही असा. सारे किती प्रेमळ आणि जिव्हाळा असलेले. हे लहानसे शहर खळबळून उठले आहे. त्यांच्यामध्ये एक नवा माणूस आला आहे ना ! जो वर्षानुवर्षे फक्त नावानेच अस्तित्वात होता. तो आता रक्तामांसाचा माणूस म्हणून समोर आला आहे. त्यांच्या मनातील अधीर उत्सुकतेची तू कल्पनाच कर. पण मला विश्रांती हवी आहे. म्हणून सार्वजनिक निदर्शनांना बंदी घालण्यात आली आहे. माझ्या मित्राच्या—स्थानिक वकील आहे तो—घरी मी बसलो आहे. इतर प्रमुख स्थानिक पुढाऱ्यांसह तो मला भेटण्यासाठी तुरुंगाच्या दाराशी आला. मी इथे एक-दोन दिवस राहीन. लोकांचा आग्रह जास्त दिवस राहण्यासाठी चालला आहे. उद्या नेहरूंना भेटण्याची

मला अपेक्षा आहे. तुला ठाऊक आहे अशा ठिकाणी–बरेलीला. निवडणूक मोहिमे-निमित्त ते सारखे दौऱ्यावर असतात. काही काळ मी त्यांच्याबरोबर अलाहाबादला काढीन –पुढील कार्यक्रम आणि वास्तव्याचे ठिकाण ठरेपर्यंत. तेथूनच पुढील पत्री मी सारे सविस्तर लिहीन. आता आपल्याला महिना उलटेपर्यंत वाट पाहावी लागणार नाही!

मला आतापासूनच आत्मविश्वास वाटू लागला आहे. तुला ठाऊक आहे, बरेचसे जिल्ह्याचे मित्र दूरदूरच्या भागातून माझ्या स्वागतासाठी येथे आले आहेत. त्यांच्यापैकी कोणीही सधन नाही. आणि या देशातील दूरदूरच्या ठिकाणी जाणे खर्चाचे असते. म्हणजे त्यांची माझ्यावर श्रद्धा आहे. वातावरण मला उत्साहाचे दिसत आहे आणि मी काही परिणामकारक कार्य करीन याबद्दल मला विश्वास वाटू लागला आहे. नाही, मला पुन्हा तुरुंगात जावयाचे नाही, माझ्या हाती असेपर्यंत. तौलनिक दृष्ट्या मला जे स्वातंत्र्य मिळाले आहे आणि ज्याच्यासाठी मला जबर किंमत द्यावी लागली आहे ते मी नाहक उधळून टाकणार नाही.

⁂

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे